अध्याय तेविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐ नमो सद्गुरु विश्वरूप । बिश्वा सबाह्य तूं चित्स्वरूप । तुझें निर्धारितां रूप । तूं अरूप अव्यय ॥ १ ॥ चराचर जें सावेव । ते तुज अरूपाचे अवेव । जीवशिव हे तुझी माव । अद्वयवैभव पैं तुझें ॥ २ ॥ घृतपुतळी दिसे साकार । घृतपणें ते निराकार । तैसा तूं अव्यय अक्षर । जगदाकार भाससी ॥ ३ ॥ ठसावलें जें दिसे जग । निर्धारितां तुझें अंग । अंग पाहतां तूं अनंग ।

तीं ऐकण्यासाठीं उद्धव सावधान चित्त होऊन बसला. २६ सिंह जसा हत्तीला धरण्यासाठीं टपून बसलेला असतो, त्याप्रमाणें उद्धव शांतीच्या लाभासाठीं सावध होऊन बसला. २७ पाण्यांत मासा झळकतांच गण्या पक्षी जसा झडप घालून त्याला आकाशांत नेतो, तसा शांतीच्या लोभानें उद्धव उत्सुक होऊन बसला. २८ तें भिक्षुगीताचें निरूपण श्रीकृष्ण पुढल्या अध्यायांत करणार आहे. ज्यायोगें शांति पूर्णपणें ठसेल तेंच लक्षण भगवान् सांगणार आहे. २९ ज्यांना परमार्थाची आवड असेल त्यांनीं तप, यज्ञ इत्यादि साधनांचीं द्वारें सोडून शांतिरूपी साधनावर दृढ श्रद्धा ठेवावी. ७३० श्रीकृष्ण शांतीचें पूर्णपणें वर्णन करील. त्यासाठीं उद्धव चित्त सावधान करून बसला आहे. तरी आतां श्रोत्यांनीं मजकडे लक्ष द्यावें, असें एका-जनार्दन विनवीत आहे. ७३१.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवाद नांवाचा बाविसावा अध्याय समाप्त झाला.

हे ॐकाररूपी विश्वरूप सद्गुरो ! तुला नमस्कार असो. ज्ञानस्वरूप तूं या विश्वांत अंतर्बाह्य भरून राहिला आहेस. तुझ्या स्वरूपाचा विचार केला तर तूं निराकार व अव्यय आहेस. १ हे सर्व साकार चराचर प्राणी तुझ्या निर्गुणस्वरूपाचेच अवयव आहेत. जीव व शिव ही तुझी माया व अद्वयत्व हें तुझें वैभव आहे. २ तुपाची केलेली बाहुली साकार दिसते, पण तुपाच्या दृष्टीनें पाहिल्यास ती जशी निराकारच आहे; तसाच तूं अव्यय, अविनाशी असून जगदाकारानें भासतोस. ३ हा जो जगाचा ठसा उमटलेला दिसतो, त्याचा विचार केला असतां तें तुझेंच

अनंगाचा माग तुजमाजीं नाहीं ॥ ४ ॥ देखिजे तें तूं नव्हसी। नव्हे तें तूंचि होसी। होणें न होणें नाहीं तुजपाशीं। ऐसा तूं जगासी जगद्‌गुरू ॥ ५ ॥ शब्द तुजहोनियां दूरी। तूं शब्दा सबाह्य अंतरीं। बोलका तूं चराचरीं। वेदशास्त्रीं तूं वक्ता ॥ ६ ॥ उंसापासूनि गोडी दिसे। उंसा सबाह्य गोडीचि असे। गोडियेमाजीं ऊंस नसे। वेदांसी तुज तैसें सौजन्य ॥ ७ ॥ वेदांचा वक्ता तूंचि होसी। वेदीं प्रतिपादिजे तुम्हांसी। शेखीं वेदांसी नाकळसी। निःशब्दवासी गुरुराया ॥ ८ ॥ जेवीं कां निःशब्द अनाहतध्वनी। असे ध्वनिमात्रीं मिळूनी। तो अनाहत वाजविजे जनीं। ऐसें नाहीं कोणी वाजंत्र॥ ९ ॥ तेवीं तूं वेदांचा वक्ता। सकळ शास्त्रां युक्तिदाता। परी वेदशास्त्रार्थसंमता। तुज तत्त्वतां न बोलवे ॥ १० ॥ म्हणों तूं केवळ निःशब्द। तंव निःशब्द आणि सशब्द। हाही मायिक अनुवाद। तूं एवंविध न कळसी ॥ ११ ॥ तूं न कळसीचि तत्त्वतां। ऐशिया युक्तींचा तूंचि विज्ञाता। ज्ञाताचि हें जंव स्थापूं जातां। तंव अज्ञानता असेना ॥ १२ ॥ जेथ अज्ञानता नाहीं। तेथ ज्ञातेपण कैंचें कायी। हो कां मुख्यत्वें नोवरी नाहीं। तैं नोवरा पाहीं म्हणे कोण ॥ १३ ॥ तूं ज्ञाता ना अज्ञाता। तूं बोलता ना नबोलता। तूं बहु ना एकुलता। तुझी अलक्ष्यता लक्षेना ॥ १४ ॥ तूं निःशब्द निर्विकार। तूं निर्गुण निरहंकार। हेंही म्हणतां पडे विचार। तूं जगदाकार जगदात्मा ॥ १५ ॥ जगदाकारें तूं प्रसिद्ध। तेथ कोणाचें कोणा बाधे द्वंद्व। पर नाहीं मा परापराध। अतिविरुद्ध कोणासी ॥ १६ ॥ यापरी सद्‌गुरुनाथा। तुझे चरणीं द्वंद्वसमता। तेणें समसाम्यें निजकथा। श्रीभागवता चालविसी ॥ १७ ॥ तेंचि श्रीभागवतीं। बाविसावे अध्यायाअंतीं। उद्धवें पुशिलें निजशांती। द्वंद्वसमाप्तिउपावो ॥ १८ ॥ उद्धवें प्रश्न केला वाड। जेणें ब्रह्मज्ञानाची पुरे चाड। तो श्रीशुकासी लागला गोड।

स्वरूप आहे. तुझें अंग पहावयास जावें, तर तूं अनंगच आहेस; परंतु अनंगाचा म्हणजे कामाचा लवलेशहि तुझ्यामध्यें नाहीं. ४ जें दृष्टीला दिसतें तें तूं नाहींस व जें दिसत नाहीं तें तूं आहेस. होणें व न होणें तुजपाशीं नाहीं. असा तूं जगाचा जगद्‌गुरु आहेस. ५ शब्द तुझ्याहून दूर आहेत. पण तूं शब्दांच्या आंत-बाहेर व्यापून राहिला आहेस. चराचरांतील बोलणारा तूंच आहेस. वेदशास्त्रांतील वक्ताहि तूंच आहेस. ६ उंसापासून गोडपणा आलेला दिसतो. ऊंस आंतून-बाहेरून गोडच असतो. ६ परंतु गोडपणांत कांहीं ऊंस नसतो; त्याचप्रमाणें वेदामध्यें तुझें सौजन्य भरलेलें आहे. ७ वेदांचा वक्ताहि तूंच व वेदांत तुझेंच प्रतिपादन केलें आहे. परंतु शेवटीं हे निःशब्दांत राहणाऱ्या गुरुराया! वेदांना तुझें स्वरूप कळत नाहीं. ८ ज्याप्रमाणें शब्दरहित अनाहत ध्वनि इतर सर्व स्पष्ट ध्वनींमध्यें अनुवृत्त असतो, पण तो अनाहत ध्वनि व्यक्त करितां येईल, असें साधन या जगांत एकहि नाहीं, ९ त्याप्रमाणें तूं वेद सांगणारा व सर्व शास्त्रांना युक्ति देणारा असूनहि वेद-शास्त्रांना संमत असलेल्याहि तुजविषयीं तत्त्वतः कांहीं बोलतां येत नाहीं. १० तूं केवळ शब्दरहित आहेस, असें म्हणावें तर निःशब्द व सशब्द हा देखील मिथ्या अनुवादच आहे. अशाप्रकारें तुझा कांहींच थांग लागत नाहीं. ११ तूं कसा आहेस हें खरोखर कळत नाहीं. या ज्ञानाचा ज्ञाताहि तूंच आहेस; पण तूंच ज्ञाता आहेस हें सिद्ध करावयास जावें तर अज्ञान उरतच नाहीं. १२ जेथें अज्ञानता नाहीं, तेथें ज्ञातेपण तरी कोठचें! जेथें मुख्य नवरी मुलगीच नाहीं तेथें नवरा मुलगा पहा, असें कोण म्हणणार! १३ तूं ज्ञाता नाहींस; व अज्ञाताहि नाहींस; बोलता नाहींस व अबोलताहि नाहींस; तूं अनेक नाहींस व एकहि नाहींस. त्यामुळें तुझ्या अलक्ष्यतेची कांहीं कल्पनाच करितां येत नाहीं. १४ तूं निःशब्द, निर्विकार, निर्गुण व निरहंकार आहेस, असें म्हणतांनाहि मोठा विचार पडतो. असा तूं जगदाकार जगदात्मा आहेस. १५ तूं जगदाकारानें प्रसिद्ध आहेस. तेव्हां कोणचें द्वंद्व कोणाला बाधणार! परच जर नाहींत तर पराचा अपराध विरुद्ध कोणाला वाटणार! १६ याप्रमाणें हे सद्‌गुरुनाथा! तुझ्या चरणांमध्यें द्वंद्वाचें ऐक्य झाल्यामुळेंच तूं समत्वभावानें भागवताची कथा चालवितोस. १७ त्याच या श्रीभागवताच्या बाविसाव्या अध्यायाच्या शेवटीं उद्धवानें आत्मशांतीचा व द्वंद्वनिवृत्तीचा उपाय विचारिला. १८

तेणें पुरे कोड परीक्षितीचें ॥ १९ ॥ ऐकोनि उद्धवाची प्रश्नोक्ती । शुक सुखावला आनंदस्फूर्ती । तो म्हणे सावध परीक्षिती । तुष्टला श्रीपति उद्धवासी ॥ २० ॥ ब्रह्मज्ञानाची निर्वाणस्थिती । ते जाण पां मुख्यत्वें शांती । ते उद्धवें पुशिली अतिप्रीतीं । तेणें श्रीपति संतोषला ॥ २१ ॥ तो शांति आणि निवृत्ती । सांगेल चौ अध्यायोक्ती । ऐक राया परीक्षिती । ते मी तुजप्रती सांगेन ॥ २२ ॥ ऐकें पांडवकुलदीपका । कौरवकुळीं कुलतिलका । तूं शांतीसी अधिकारी निका । निजात्मसुखा साधकू ॥ २३ ॥ साधावया ब्रह्मप्राप्ती । तूं त्यक्तोदक श्रवणार्थी । यालागीं शांति आणि निवृत्ती । ऐक नृपति हरि सांगे ॥ २४ ॥ तेविसावे अध्यायीं निरूपण । दुर्जनीं क्षोभविलें मन । त्या मनासी ये क्षमा पूर्ण । तेंचि श्रीकृष्ण सांगेल ॥ २५ ॥ भिक्षुगीतसंरक्षण । तें मनोजयाचें लक्षण । प्रकृति-जयाचें निरूपण । सांगेल संपूर्ण चोविसावा ॥ २६ ॥ सांगोनि त्रिविध त्रिगुण । परी लक्षविलें निज-निर्गुण । हें गुणजयाचें निरूपण । सुलक्षण पंचविसावा ॥ २७ ॥ सव्विसावा अध्यावो येथ । तो धड-धडीत विरक्त । सांगोनियां ऐलगीत । स्त्रियादि समस्त विषयत्यागू ॥ २८ ॥ गुण विषय प्रकृति मन । या चहूंचें समाधान । चहूं अध्यायीं विशद जाण । स्वमुखें श्रीकृष्ण सांगेल ॥ २९ ॥ यापरी परी-क्षितीस जाण । करोनियां सावधान । श्रीशुकयोगींद्र आपण । कथालक्षण निरोपी ॥ ३० ॥

ज्यायोगें ब्रह्मानंदाची इच्छा निवृत्त होईल, असा उद्धवानें हा मोठा महत्त्वाचा प्रश्न केला. तो प्रश्न श्रीशुकाला फार आवडला व त्यामुळें परीक्षिती राजाची हौस पूर्ण झाली. १९ उद्धवाचा प्रश्न ऐकून श्रीशुकाचार्य आनंदानें डोलूं लागले आणि परीक्षितीला म्हणाले कीं, हे राजा ! श्रीकृष्ण उद्धवावर प्रसन्न झाला आहे, तरी सावध हो. २० कारण मुख्यत्वेंकरून शांतीच ब्रह्मज्ञानाची सीमा आहे व उद्धवानें अत्यंत प्रेमानें तिच्याचविषयीं प्रश्न केला आहे. त्यामुळें श्रीकृष्णालाहि आनंद वाटला २१ व तो आतां या पुढील चार अध्यायांत शांति व निवृत्ति यांचेंच निरूपण करणार आहे. तेंच मी आतां तुला सांगतों. २२ हे पांडवकुलदीपक, कौरवकुलतिलक राजा परिक्षिते ! तूंच शांतीचा योग्य अधिकारी आहेस. आत्मसुखाचा साधक आहेस. २३ ब्रह्मप्राप्ति साधण्यासाठीं सर्वांवर पाणी सोडून तूं केवळ श्रवणाचा संकल्प केला आहेस. यास्तव आतां श्रीहरि शान्ति व निवृत्ति सांगत आहे, ती ऐक. २४ दुर्जनांनीं मनाला कितीहि क्षुब्ध करण्याचा यत्न केला तरी तें क्षमायुक्त कसें राहूं शकतें याचेंच निरूपण या तेविसाव्या अध्यायांत श्रीकृष्ण करणार आहे. २५ चोविसाव्या अध्यायांत भिक्षुगीतसंरक्षण म्ह० मनोजयाचें लक्षण व स्वभावजयाचें निरूपण सविस्तर सांगणार आहे. २६ पंचविसाव्या अध्यायांत त्रिगुणाचें त्रिविधत्व सांगून स्वतः निर्गुण असल्याचें दाखवितील व गुणजयाचें सुंदर निरूपण करतील. २७ सव्विसावा अध्याय तर उघड-उघड विरक्तिपरच आहे. ऐलगीत म्ह० बुध व इला यांचा पुत्र जो पुरूरवा त्यांचें गीत सांगून स्त्र्यादिक सर्व विषयांचा त्याग उपदेशिला आहे. २८ याप्रमाणें गुण, विषय, प्रकृति मन या चारींचें समाधान श्रीकृष्ण स्वमुखानें स्पष्ट करून सांगणार आहे. २९ याप्रमाणें श्रीशुकाचार्यांनीं परीक्षितीला चित्त सावधान करण्यास सांगून कथेचें निरूपण करण्यास आरंभ केला. ३०.

[या तेविसाव्या अध्यायात लोकांचा तिरस्कार सहन करण्याचा उपाय व भिक्षुगीताच्या प्रकारानें विवेक-बुद्धीनें मनाचा संयम सांगितला जातो. खरोखर पूज्य लोकांना दुर्जनांचा उपद्रव दुःसह होतो, यास्तव या पुढील चार अध्यायांनीं तो सहन करण्याचे उपाय सांगितले जातात. त्यांतील या पहिल्या अध्यायांत भिक्षु-गीतानें मनाचा विजय, दुसऱ्या म्ह० चोविसाव्या अध्यायांत प्रकृति व पुरुष यांचा विवेक, पंचविसाव्या अध्या-यांत गुणवृत्तीचा विजय व सव्विसाव्या अध्यायांत ऐलगीतद्वारां विषयसंगत्यागानें सत्संग, असे उपाय भगवा-नांनीं क्रमानें वर्णिले आहेत.]

बादरायणिरुवाच—स एवमाशंसित उद्धवेन भागवतमुख्येन दाशार्हमुख्यः ।
सभाजयन् भृत्यवचो मुकुन्दस्तमाबभाषे श्रवणीयवीर्यः ॥ १ ॥

शुक म्हणे परीक्षिती । ऐकोनि उद्धवाची विनंती । वचनें संतोषला श्रीपती । तो उद्धवाप्रती संबोधी ॥ ३१ ॥ कोटि जन्मांतीं केवळ । द्विजत्व पाविजे सुकुळ । हें महापुण्याचें निजफळ । तेंचि निष्फळ हरिभक्तीविणें ॥ ३२ ॥ सदा सफळ आंब्याचा रुख । त्यावरी उपजे कांवरुख । तो सफळहि निष्फळ देख । तैसें उत्तम लोक भजनेंवीण ॥ ३३ ॥ ते स्थिति नाहीं उद्धवापासीं । उत्तम जन्म यादववंशीं । सभासदता आल्याही हातासी । श्रीमदासी मुलेचिना ॥ ३४ ॥ झालियाही राज्यसंपत्ती । जो विसंबेना भगवद्भक्ती । भागवतमुख्यत्वाची प्राप्ती । त्यासीच निश्चितीं महाराजा ॥ ३५ ॥ सगुण सुंदर पतिव्रता । अनुकूल मिळालिया कांता । जो विसंबेना भगवत्पदा । भागवतमुख्यता त्या नांव ॥ ३६ ॥ इहीं गुणीं अतियुक्त । विवेकेंसीं अतिविरक्त । श्रीकृष्णचरणीं अनुरक्त । मुख्य भागवत उद्धवू ॥ ३७ ॥ वयें धनें जें श्रेष्ठपण । तें श्रेष्ठत्व अतिगौण । भगवत्प्राप्ती ते श्रेष्ठ जाण । तेणें भाग्यें परिपूर्ण उद्धवू ॥ ३८ ॥ जो श्रीकृष्णाचा विश्वासी । श्रीकृष्ण एकांत करी ज्यासी । गुह्य ज्ञान सांगे ज्यापाशीं । त्याच्या भाग्यासी केवीं वानूं ॥ ३९ ॥ परब्रह्म जें कां साक्षात । जें उद्धवासी झालें हस्तगत । त्याच्या बोलामाजीं वर्तत । भाग्यें भाग्यवंत तो एक ॥ ४० ॥ उद्धवभाग्य वानित वानित । शुक झाला सद्गदित । स्वानन्दें वोसंडला तेथ । ठेला तटस्थ महासुखें ॥ ४१ ॥ उद्धव भाग्याचा उद्रेक । सांगतां वोसंडला श्रीशुक । तें देखोनि कुरुनायक । जाहला आत्यंतिक विस्मित ॥ ४२ ॥ ज्याचें निजभाग्य सांगतां ।

बाद० उवाच—शुक्राचार्य म्हणाले, भागवतमुख्येन उद्धवेन एवं आशंसितः सः दाशार्हमुख्यः श्रवणीयवीर्यः मुकुन्दः—भगवद्भक्तांतील श्रेष्ठ अशा उद्धवानें याप्रमाणें ज्याची प्रार्थना केली आहे, असा तो यादवांतील मुख्य व ज्याचा पराक्रम श्रवणीय आहे असा मुकुंद, भृत्यवचः सभाजयन् तं आबभाषे—त्या भृत्याच्या वचनाचा सत्कार करीत होत्साता त्या भृत्याला बोलला. १.

श्रीशुकाचार्य म्हणाले कीं, हे परीक्षिति राजा ! उद्धवाची ही विनंति ऐकून श्रीकृष्णाला संतोष वाटला व त्यानें उद्धवाला उपदेश केला. ३१ कोट्यवधि जन्म घ्यावे, तेव्हां कोठें चांगल्या द्विजकुलांत जन्म येतो. पण हें जें महापुण्याचें फल तेंच हरिभक्तीवांचून निष्फळ होतें. ३२ आंब्याचा वृक्ष नेहमीं फल देतो, पण त्यावर बांडगूळ वाढलें म्हणजे तो फळलेला वृक्षहि जसा निरुपयोगी होतो, त्याप्रमाणें भजनावांचून उत्तम जन्महि व्यर्थ होतो. ३३ पण उद्धवाला त्या बाजूनें कांहींच अडचण नाहीं. यादव कुलासारख्या उत्तम वंशांत त्याचा जन्म झाला. त्याला राजसभेंत बसण्याचा अधिकार प्राप्त झाला असूनहि संपत्तीच्या मदानें तो मत्त झाला नाहीं. ३४ ऐश्वर्ययुक्त राज्य प्राप्त झालें तरी जो भगवद्भक्ति क्षणभरहि सोडीत नाहीं, त्यालाच श्रेष्ठ भक्ताचा मान मिळतो. ३५ गुणवती, रूपवती, पतिव्रता व सर्व प्रकारें अनुकूल भार्या लाभली असतांहि जो भक्तिमार्ग सोडीत नाहीं तोच भक्त श्रेष्ठ होय. ३६ या गुणांनीं अतिशय संपन्न, विवेकामुळें अत्यंत विरक्त व श्रीकृष्णावर अति आसक्त असा मुख्य भक्त उद्धवच होय. ३७ वयानें किंवा द्रव्यानें जो मोठेपणा येतो, तो अगदीं सामान्य प्रतीचा आहे. खरा मोठेपणा भगवत्प्राप्तींत आहे. त्यांत पूर्ण असल्यामुळें उद्धव मोठा भाग्यवान् खरा ! ३८ जो श्रीकृष्णाच्या विश्वासाला पात्र, ज्याच्याशीं श्रीकृष्ण सल्लामसलत करितो, व ज्याला आपलें गुप्त ज्ञान सांगतो, त्याच्या भाग्याचें वर्णन किती करावें ! ३९ जें साक्षात् परब्रह्म तेंच उद्धवाच्या हस्तगत झालें. व त्याच्या वचनांत राहूं लागलें. तेव्हां तोच एक भाग्यवान् खरा ! ४० उद्धवाचें भाग्य वाखाणीत असतां श्रीशुकाचार्य सद्गदित होऊन त्यांचें अंतकरण प्रेमानें भरून आलें व त्या संतोषाच्या भरांत ते क्षणभर मुकाट्यानें बसले. ४१ उद्धवाच्या भाग्याचें वर्णन करीत असतां श्रीशुकास गहिंवर आलेला पाहून परीक्षितिराजाला मोठें आश्चर्य वाटलें. ४२ (व तो म्हणाला कीं–) ज्याचें भाग्य सांगत असतां श्रीशुक इतके

श्रीशुकासी होतसे अवस्था । उद्धव भाग्याचा तत्त्वतां । मजही सर्वथा मानला ॥ ४३ ॥ तंव शुक म्हणे रायासी । परम भाग्य तें उद्धवासी । तेणें विनवितां हृषीकेशी । वचनमात्रेंसीं तुष्टला ॥ ४४ ॥ उद्धवासी शांतीची चाड । तो प्रश्न श्रीकृष्णासी झाला गोड । त्याचें पुरवावया कोड । निरूपण वाड सांगेल ॥ ४५ ॥ परम शांतीचा अधिकारी । तूंचि एक निजनिर्धारीं । ऐसें उद्धवप्रेमपुरस्कारीं । शांति श्रीहरि सांगत ॥ ४६ ॥

श्री० भ०—बार्हस्पत्य स वै नात्र साधुर्वै दुर्जनेरितैः । दुरुक्तैर्भिन्नमात्मानं यः समाधातुमीश्वरः ॥ २ ॥

उद्धवा तूं जें बोलिलासी । मीही सत्य मानीं त्यासी । दुर्जनीं केल्या अपमानासी । साहावया कोणासी शांति नाहीं ॥ ४७ ॥ देव पादुका वाहती शिरसीं । मुख्य इंद्र लागे ज्याच्या पायांसी । अष्ट महासिद्धि ज्याच्या दासी । ब्रह्मज्ञान ज्यापाशीं वचनांकित ॥ ४८ ॥ ऐसा देवगुरु बृहस्पती । त्याचा शिष्य तूं विवेकमूर्ती । यालागीं शांतीच्या साधक युक्ती । तूंचि निश्चितीं जाणसी ॥ ४९ ॥ शांति आकळावया उद्धवासी । आदरें सत्कारी हृषीकेशी । अनुमोदूनि त्याचे बोलासी । शुद्ध शांतीसी हरि सांगे ॥ ५० ॥ निंदा अवज्ञा हेळण । दुर्जनीं केलिया अपमान । हें साहे तो ईश्वर जाण । निजबोधें पूर्ण तो मद्रूप ॥ ५१ ॥ ज्यासी सर्वभूतीं निजात्मता । दृढ बाणलीसे तत्त्वतां । तो दुर्जनाचिया घाता । साहे सर्वथा यथासुखें ॥ ५२ ॥ जो स्वयें होय अवघें जग । त्यासी लागतां उपद्रव अनेग । उठेना क्रोधाची लगबग । साहे अनुद्वेग यथासुखें ॥ ५३ ॥ निजांगीं लागतां निजकर । नुठी क्रोधद्वेषांचा उद्गार । निजात्मता जो देखे चराचर । शांति

तल्लीन झाले तो उद्धव खरोखर मोठा दैववान् होय. मला देखील ही गोष्ट पटली. ४३ तेव्हां श्रीशुक राजाला म्हणाले कीं, उद्धवाचें सुदैव अलौकिक खरें. त्यानें श्रीकृष्णाला विनंती करितांच त्याच्या नुसत्या शब्दानें तो संतुष्ट झाला ४४ उद्धवाला शांतीची इच्छा आहे हें ऐकतांच श्रीकृष्णाला तो प्रश्न मोठा गोड वाटला. त्याची हौस पुरविण्यासाठीं आतां तो त्याचेंच निरूपण करील. ४५ 'उद्धवा ! परम शान्तीचा तूंच खरा अधिकारी आहेस,' असें उद्धवाला प्रेमपुरस्सर बोलून श्रीहरीनें शान्तीविषयीं सांगण्यास आरंभ केला. ४६.

—भगवान् पुढील दोन श्लोकांनीं प्रथम उद्धवाच्या वचनाचा अंगीकार करीत होत्साता त्याच्या वचनाचा सत्कार करितो—

श्रीभग० उ०—भगवान् म्हणाले, बार्हस्पत्य– हे बृहस्पतीच्या शिष्या ! यः दुर्जनेरितैः दुरुक्तैः भिन्नं आत्मानं समाधातुं ईश्वरः सः साधुः अत्र नास्ति वै–जो दुर्जनांनीं बोललेल्या दुर्वचनांनीं क्षुब्ध झालेल्या मनाला शांत करण्यास समर्थ होईल असा साधु खरोखर या जगांत नाहींच. २.

हे उद्धवा ! तूं जें बोललास तें मलाहि कबूल आहे. कारण दुर्जनानें अपमान केला असतां तो सहन करण्याची शांति कोणांतच नसते. ४७ देव ज्याच्या पादुका मस्तकावर वहातात, देवांतील श्रेष्ठ इंद्र ज्याचे पाय धरितो, अष्ट महासिद्धि ज्याच्या दासी आहेत ब्रह्मज्ञान ज्याच्या मुठींत रहातें, ४८ असा जो देवांचा गुरु बृहस्पति, त्याचा तूं शिष्य साक्षात् विवेकाची मूर्तीच आहेस. तेव्हां शांति साध्य करण्याचे निश्चित उपाय तुलाच ठाऊक असणार. ४९ उद्धवाला शांतीचें रहस्य कळावें म्हणून श्रीकृष्णानें त्याचा आदरानें सत्कार केला व त्याच्या म्हणण्यास अनुमोदन देऊन तो शुद्ध शांतीचें लक्षण सांगूं लागला. ५० दुर्जनानें आपली निंदा, उपहास, अवज्ञा किंवा अपमान केला तरी तें सर्व जो सहन करितो तो साक्षात् ईश्वरच समजावा. आत्मज्ञानानें तो पूर्णपणें मद्रूपच असतो. ५१ जो आपलेंच स्वरूप सर्व भूतांमध्यें पहातो, त्याची आत्मभावना इतकी दृढ झालेली असते कीं, दुर्जनांनीं त्याचा घात जरी केला तरी तो मोठ्या सुखानें सहन करितो. ५२ जो स्वतः सगळें जगत् होतो. त्याला अनेक प्रकारचा त्रास सोसावा लागला तरी त्याच्या मनांत क्रोधाची उसळी उठत नाहीं. तो लोकांचा उपद्रव उद्विग्न न होतां संतोषानें सहन करितो. ५३ आपलाच हात आपल्या अंगाला लागला असतां आपण जसा क्रोधाचा किंवा द्वेषाचा उद्गार काढीत नाहीं तसा जो सगळ्या चराचर सृष्टीकडे आत्मरूपानें पहातो, त्याच्या घरीं शांति आपण

त्याचें घर स्वयें रिघे ॥ ५४ ॥ उद्धवा ऐसा ज्यासी निजबोधू । त्यासी म्हणिजे सत्य साधू । तोचि साहे पराचा अपराधू । शांतिशुद्धू तो एक ॥ ५५ ॥ नेणोनियां निजबोधातें । इतर जे सज्ञान ज्ञाते । ते न साहती द्वंद्वांतें । ऐकें तूतें सांगेन ॥ ५६ ॥

न तथा तप्यते विद्धः पुमान्बाणैः सुमर्मगैः । यथा तुदन्ति मर्मस्था ह्यसतां परुषेषवः ॥ ३ ॥

तिख्याचे अतितिख बाण । जेणें घायें होती विकळ प्राण । त्याहूनि दुर्जनाचे वाग्बाण । अधिक जाण नृपती ॥ ५७ ॥ लोहाचे बाण जेथ लागती । तेचि अंगें व्यथित होती । परी वाग्बाणांची अधिक शक्ती । घायें भेदिती पूर्वज ॥ ५८ ॥ लोहबाणाचे लागलिया घाये । ते पानपाल्या व्यथा जाये । परी वाग्बाण रुपल्या पाहें । तें शल्य राहे जन्मांत ॥ ५९ ॥ वर्मस्पर्शाचें बासटें जाण । विंधितां निंदेचे वाग्बाण । तेणें भेदितांचि अंतःकरण । सर्वांगीं पूर्ण भडका उठी ॥ ६० ॥ दुर्जनाचिया दुरुक्ती । अपमानाची उद्धती । साहावयालागीं शांती । नव्हे निश्चितीं प्राकृतां ॥ ६१ ॥ ऐशिया रीतीं यथोचित । उद्धवाचें मनोगत । संलक्षूनि श्रीकृष्णनाथ । शांतीचा निश्चितार्थ सांगों पाहे ॥ ६२ ॥ पूर्वीं सांगीतलें निजशांतीसी । वेगीं साधीं म्हणे उद्धवासी । ते अटक वाटेल तयासी । अतिसंकोचासी पावेल ॥ ६३ ॥ होतें उद्धवाचे मानसीं । हे शांति असाध्य सर्वांसी । हें जाणोनियां हृषीकेशी । सांगे इतिहासेंसीं भिक्षुगीत ॥ ६४ ॥

कथयन्ति महत्पुण्यमितिहासमिहोद्धव । तमहं वर्णयिष्यामि निबोध सुसमाहितः ॥ ४ ॥

होऊन रहाते. ५४ उद्धवा! असें ज्याचें आत्मज्ञान असतें, त्याला खरा साधु असें म्हणतात. तोच दुसऱ्याचा अपराध सहन करितो व तोच शांतीनें शुद्ध होय. ५५ आत्मज्ञानावांचून जे इतर विद्वान् पंडित असतात ते हीं द्वंद्वें सहन करूं शकत नाहींत. त्याविषयींच आतां सांगतों ऐक ५६.

—कारण—

यथा हि मर्मस्थाः असतां परुषेषवः तुदन्ति–ज्याप्रमाणें नित्य मर्मस्थानींच राहणारे दुर्जनांचें दुरुक्तिरूप बाण व्यथा करितात, तथा सुमर्मगैः बाणैः विद्धः पुमान् न तप्यते–त्याप्रमाणें मर्मापर्यंत जाऊन पोंचणाऱ्या बाणांनीं विद्ध झालेला पुरुष व्यथा पावत नाहीं. [दुरुक्तीप्रमाणें तीक्ष्ण बाणांनेंहि पीडा होत नाहीं, असा याचा भावार्थ.] ३.

पोलादाच्या तीक्ष्ण बाणाचा वेध झाला असतां ती जखम प्राण व्याकुळ करिते; परंतु मर्मभेदक शब्दरूपी वाग्बाण अंतःकरणाला त्याहूनहि जास्त घरे पाडतात. ५७ पोलादाचे बाण जेथें लागतात तेवढ्या शरीरालाच व्यथा होते; पण वाग्बाणाचें सामर्थ्य भयंकर असतें. त्याच्या घावानें पूर्वजहि विद्ध होतात. ५८ पोलादाच्या बाणाची जखम वनस्पति वगैरे औषधीनें बरी होते, पण वाग्बाणाचें शल्य जन्मभर टोचीत रहातें. ५९ वर्म काढणारे विषयुक्त निंदेचे वाग्बाण एकदां अंतःकरणांत खुपले कीं, सगळ्या अंगाचा भडका होतो. ६० दुर्जनांचें दुष्ट वचन अपमानानें पूर्ण भरलेलें असतें. तें सहन करण्याइतकी मनाची शांतता सामान्य जनांत नसते. ६१ अशाप्रकारें श्रीकृष्णानें उद्धवाचें मनोगत पूर्ण जाणून शांतीचा निश्चितार्थ सांगितला. ६२ त्यानें पूर्वीं एकदां आत्मशांति सांगितली होती व तीच तूं आतां सत्वर संपादन कर, असेंहि म्हटलें होतें. पण उद्धवाला तो मोठा अडथळा वाटला व त्यामुळें त्याच्या मनांत संकोच उत्पन्न झाला. ६३ कारण अशा प्रकारची शांति सर्वांना असाध्य आहे, असें उद्धवाच्या मनांत होतें, हें जाणून श्रीकृष्णानें भिक्षुगीताचा वृत्तान्त सांगण्यास आरंभ केला. ६४.

—तथापि मी जे उपाय सांगणार आहे, त्यांच्या योगानें सर्व सहन करितां येणें शक्य आहे, अशा अभिप्रायानें भगवान् एका इतिहासाला आरंभ करितात —

उद्धव–हे उद्धवा! इह महत्पुण्यं इतिहासं कथयन्ति–याविषयीं एक अतिशय पवित्र इतिहास सांगतात. अहं तं वर्णयिष्यामि–मी त्याचें वर्णन करितों. सुसमाहितः निबोध–तो तूं शांत चित्तानें ऐक. ४.

अशांतिक्षोभाचे चित्तमळ । क्षाळावया जी तत्काळ । इतिहासगंगा केवळ । अतिनिर्मळ कृष्णोक्ती ॥ ६५ ॥ श्रीकृष्णवदनब्रह्माद्रीं । श्रीभागवतऔदुंबरीं । जन्मली शांतिगोदावरी । निजमूळाकारीं निर्मळ ॥ ६६ ॥ ते गुप्त ओघें नारदगती । उद्धवगंगाद्वारीं व्यासोक्ती । तेचि शुकमुख कुशावर्ती । प्रकटे अवचितीं पवित्रपणें ॥ ६७ ॥ तया पवित्र ओघाचिये गती । श्रद्धाधृती समरसे भक्ती । प्राची अरुणा वरुणा सरस्वती । हे संगमप्राप्ती जेथ होय ॥ ६८ ॥ तेणें शांतिगंगेची स्थिती । भरूनि उथळे अतिउन्नती । तेथ श्रवणार्थी बुडी देती । ते पवित्र होती निजक्षमा ॥ ६९ ॥ ते शांतिगंगा अतिविख्यात । उद्धव करावया पुनीत । प्रकट करी श्रीकृष्णनाथ । भिक्षुगीतविन्यासें ॥ ७० ॥

केनचिद्भिक्षुणा गीतं परिभूतेन दुर्जनैः । स्मरता धृतियुक्तेन विपाकं निजकर्मणाम् ॥ ५ ॥

उद्धवा कोणी एक संन्यासी । दुर्जनीं उपद्रवितां त्यासी । म्हणे क्षयो होय दुष्टकर्मासी । येणें संतोषें मानसीं क्षमावंत ॥ ७१ ॥ आपुले अंगींचे मळ । पुढिलीं क्षाळितां सकळ । जो क्रोधेंसीं करी तळमळ । तो मूर्ख केवळ आत्मघाती ॥ ७२ ॥ लोक म्हणती ज्यासी दुर्जन । संन्यासी म्हणे ते माझे स्वजन । माझे दोषांचें निर्दळण । यांचेनि धर्में जाण होतसे ॥ ७३ ॥ संमुख कोणी निंदा न करिती । तेणें अत्यंत सुखावे चित्तीं । ह्मणे मज तुष्टला श्रीपती । पापाची निष्कृति सहजें होय ॥ ७४ ॥ ऐसेनि विवेकें तत्त्वतां । शांतीसी ढळों नेदी सर्वथा । चढोनी निजधैर्याचे माथां । गायिली गाथा ते ऐक ॥ ७५ ॥ उद्धवासी म्हणे श्रीकृष्णनाथ । ये अर्थी होई सावचित्त । अतिलोभी तो अतिविरक्त । झाला तो वृत्तांत सांगेन ॥ ७६ ॥

काम-क्रोधादिकांनीं मलिन झालेली चित्तवृत्ति निर्मल करावयास श्रीकृष्णोक्तिरूप इतिहास ही अति पवित्र गंगाच आहे. ६५ श्रीकृष्णरूपी ब्रह्मपर्वतावर भागवतरूपी औदुंबर वृक्षाखालीं शांतीरूपी गोदावरी जन्मास आली. त्यामुळें ती मुळापासून पवित्र आहे. ६६ ती गुप्त ओघानें नारदापर्यंत आली. हे उद्धवा ! तीच व्यासोक्तीनें गंगाद्वारीं प्रकट झाली. पुढें श्रीशुकाचार्यांच्या मुखरूपी कुशावर्तांत अकस्मात् पवित्रपणानें प्रकटली. ६७ तिच्या पवित्र ओघाबरोबरच श्रद्धा, धृति, भक्ति याच अरुणा, वरुणा व सरस्वती या नद्यांच्या रूपानें येऊन त्यांचा तेथेंच संगम झाला. ६८ त्यामुळें शांतिरूपी गंगेला पूर आला व ती दुथडीनें वाहूं लागली. त्यांत जे श्रवणार्थी बुडी मारितात, ते आपल्या अंगच्या क्षमेनेंच पावन होतात. ६९ आतां उद्धवाला पावन करण्यासाठीं श्रीकृष्ण भिक्षुगीताच्या वर्णनानें ती अतिशय प्रसिद्ध शांतिरूपी गंगाच प्रकट करीत आहे. ७०

दुर्जनैः परिभूतेन निजकर्मणां विपाकं स्मरता धृतियुक्तेन केनचित् भिक्षुणा गीतं-दुर्जनांकडून तिरस्कार केल्या गेलेल्या, आपल्या पूर्वकर्मांचा परिपाक आठवणाऱ्या व धैर्ययुक्त, अशा एका भिक्षूनें ही इतिहासरूपी गाथा सांगितली आहे. ५.

उद्धवा ! ऐक. कोणी एक संन्यासी होता. त्याला दुर्जनांनीं उपद्रव दिला. तेव्हां तो क्षमाशील संन्यासी मनांत संतोषून म्हणाला कीं, या त्यांच्या कृत्यानें माझ्या दुष्ट कर्मांचा क्षय होईल. ७१ आपल्या अंगावर असलेला मळ जर दुसऱ्यानें येऊन धुवून काढिला, तर आपलें अंग अनायासानें निर्मल होतें. त्यासाठीं जे क्रोधानें व्यर्थ चडफडत बसतात, ते मूर्ख आत्मघातकी होत. ७२ लोक ज्यांना दुर्जन बोलतात त्यांना हा संन्यासी आपले स्वजन म्हणत असे. कारण त्यांच्या वर्तनानें माझ्या दोषांचा सहजच नाश होतो, असें तो समजत असे ७३ त्याच्या तोंडावर त्याची कोणीं निंदा केल्यास तो मनांत अतिशय संतुष्ट होऊन म्हणत असे कीं, श्रीहरीच माझ्यावर प्रसन्न झाला. म्हणून माझ्या पापांचें सहज निरसन होत आहे ७४ असा विवेक करून तो मनाची शांति ढळूं देत नसे. त्यानें आत्मिक धैर्याच्या शिखरावर चढून जें गीत गायिलें, तें ऐक ७५ श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाला कीं, तूं आतां सावधान चित्तानें ऐक. पूर्वी जो अतिलोभी होता, तोच पुढें अत्यंत विरक्त कसा झाला तो वृत्तान्त मी सांगतों. ७६.

अवान्तिषु द्विजः कश्चिदासीदाढ्यतमः श्रिया । वार्तावृत्तिः कदर्यस्तु कामी लुब्धोऽतिकोपनः ॥ ६ ॥

मालवदेशीं अवंतिनगरीं । तेथ ब्राह्मण वसे गृहद्वारीं । कृषिवाणिज्य वृत्तीवरी । जीविका करी निरंतर ॥ ७७ ॥ गांठीं धनधान्यसमृद्धी । अमर्याद द्रव्यसिद्धी । परी अतिशयें कृपणबुद्धी । पोटाही त्रिशुद्धी न खाय ॥ ७८ ॥ पोटा सदा खाय कदन्न । तेंही नाहीं उदरपूर्ण । तेथ स्त्रीपुत्रादि दासीजन । जठरतर्पण न पावती ॥ ७९ ॥ न करी नित्यनैमित्य । स्वप्नीं नेणे धर्मकृत्य । देव ब्राह्मण अतिथी तेथ । सदा जात पराङ्मुख ॥ ८० ॥ कवडी एक लाभू पाहे । तैं मातापित्यांचें श्राद्ध आहे । तें सांडूनि अंत्यजगृहा जाये । न मनीं भये स्पर्शाचें ॥ ८१ ॥ मी उत्तम हा हीन वर्ण । हे धनलोभें गिळी आठवण । हाता येतां देखोनि धन । स्वीकारी अन्न पतिताचें ॥ ८२ ॥ धनकामासाठीं देख । न मनी पाप महादोख । कवडीच्या लोभें केला मूर्ख । नाठवे नरकमहापातू ॥ ८३ ॥ यापरी तो कर्मभ्रष्ट । अकर्म करी क्रियानष्ट । अतिवंचक महाशठ । केवळ नष्ट धनलोभी ॥ ८४ ॥ त्या धनलाभाचा अवरोधू । होतां देखोनि खवळे क्रोधू । गोहत्यादि ब्रह्मवधू । करावया सिध्दु स्वयें होय ॥ ८५ ॥ धनकामीं क्रोधाची वस्ती । धनापाशीं पापें असती । धनलोभीं ज्याची स्थिती । कदर्युवृत्ति त्या नांव ॥ ८६ ॥ ऐसें धन सांचिलें फाडोवाडें । त्याचाही व्यय जैं करणें पडे । तैं प्राणांतचि येऊनि घडे । विचार पुढें असेना ॥ ८७ ॥ वानराचे

—तो भिक्षु पूर्वी मोठा धनाढ्य होता. पण मोठया कष्टानें संपादन केलेल्या द्रव्याचा नाश झाल्यामुळें त्याला फार दुःख झालें. तो संसाराला कंटाळला व त्यानें संन्यास केला; पण भिक्षाटन करीत असतांना दुर्जनांनीं त्याला उपद्रव दिला. तेव्हां प्रकृत सहनशीलतेच्या उपयोगी अशी गाथा तो सांगता झाला, असें सांगण्यासाठीं भगवान् त्या भिक्षूचें चरित्र सांगतात—

अवान्तिषु कश्चित् श्रिया आढ्यतमः वार्तावृत्तिः कदर्यः तु कामी लुब्धः अतिकोपनः द्विजः आसीत्— माळव्यामध्यें कोणी एक लक्ष्मीनें अतिशय संपन्न, कृषि, वाणिज्य इत्यादि उपायांनीं उपजीविकेचें साधन संपादन करणारा, कृपण पण अति कामी, लोभी व अतिशय क्रोधी ब्राह्मण रहात होता. [स्वतःला, धर्मकृत्याला, पुत्र, स्त्री, देवता, अतिथि व भृत्य या सर्वांना अन्न–वस्त्रादिकांच्या बाबतींतहि जो पीडा देतो तो कृपण होय, असें धर्मशास्त्रांत सांगितलें आहे.] ६.

पूर्वीं माळव्यामध्यें उज्जयिनी नगरींत एक ब्राह्मण होता. तो आपल्या घराच्या दारांत बसत असे. शेत-वाडी व व्यापार करून तो आपला निर्वाह निरंतर चालवीत असे. ७७ त्याच्यापाशीं धनधान्याचा संग्रह फार मोठा होता. पदरीं अगणित द्रव्य होतें. परंतु तो अतिशय कृपण असल्यामुळें पोटभर अन्नहि खात नसे. ७८ नेहमीं शिळें-पाकें, हलकें अन्न खात असे व तेंहि कोणाला पोटभर देत नसे. त्याचीं स्त्री-पुत्र, नोकर-चाकर इत्यादि सगळीं अर्धपोटीं रहात असत. ७९ तो कधीं नित्य-नैमित्तिक कर्म करीत नसे. धर्मकृत्य तर त्याला स्वप्नांतहि ठाऊक नव्हतें. देव-ब्राह्मण-अतिथि या तिघांनाहि तो विमुख घालवीत असे. ८० घरीं माता-पित्यांचें श्राद्ध असलें तर तो श्राद्ध सोडून एका कवडीच्या प्राप्तीसाठीं अंत्यजाच्याहि घरीं जात असे, त्यांत विटाळाचें भयहि तो मानीत नसे. ८१ मी उत्तम वर्णाचा ब्राह्मण व हा हीन वर्णाचा अंत्यज, हा भेद तो धनलोभापुढें विसरून जाई व हातीं धन येतें हें दिसतांच पतिताच्याहि घरचें अन्न स्वीकारीत असे. ८२ द्रव्यलोभापुढें तो महादोष, पातक इत्यादि कांहीं मानीत नसे. कवडीच्या लोभानें त्याला इतकें मूर्ख बनविलें होतें कीं, त्याला आपल्या नरकरूपी महापातकाचेंहि स्मरण रहात नसे. ८३ अशा प्रकारें तो कर्मभ्रष्ट कर्म न करून क्रियानष्ट झाला होता. तो महाठक, मोठा कपटी व धन-लोभानें केवळ नष्ट बनला होता. ८४ त्याच्या धनलोभांत कांहीं अडथळा आलेला दिसला कीं, त्याचा क्रोध खवळत असे व तो स्वतः गोवध, ब्रह्महत्त्या यांसारखीं महापातकें करावयास सिद्ध होत असे. ८५ जेथें द्रव्याची इच्छा असते, तेथें क्रोध रहातो. द्रव्यापाशीं सगळीं पातकें असतात. अशी ज्याची धनलोभी वृत्ति असते त्यालाच ‘ कृपण ’ असें म्हणतात. ८६ अशा प्रकारें द्रव्याच्या मोठाल्या उतरंडी जरी रचून ठेविलेल्या असल्या तरी त्या धनाचा खर्च करण्याचा प्रसंग येतांच त्याचे प्राण जाऊं लागतात. दुसरा विचारच सुचत नाहीं. ८७ वानराच्या

गालींचे चणे । हाता न येती जितां प्राणें । तैसा द्रव्याचा व्ययो करणें । तेंचि मरणें कदर्या ॥ ८८ ॥

ज्ञातयोऽतिथयस्तस्य वाङ्मात्रेणापि नार्चिताः । शून्यावसथ आत्मापि काले कामैरनर्चितः ॥ ७ ॥

घरींचा भात वेंचेल कांहीं । यालागीं वैश्वदेव करणें नाहीं । तेथ अतिथि आलिया पाहीं । कोणे समयीं कोण पूजी ॥ ८९ ॥ अतिथि आलिया जाण । ऐसे बोल बोले आपण । जे वचनमात्रें जाती प्राण । त्यासी मागे कोण अन्नोदक ॥ ९० ॥ देखोनि त्याचिया घरासी । ब्रह्मचारी नित्य उदासी । आशा त्यजिली संन्यासीं । जेवीं राजहंसीं गोमय ॥ ९१ ॥ भिकारीं सांडिलें त्याचें द्वार । अतिथीं डावलिलें निरंतर । पाहुणा दूरी पाहे बिढार । निराशी पितर सर्वदा ॥ ९२ ॥ दारा न ये कोरान्नकर । घर सांडूनि गेले उंदीर । काउळीं वोसंडिलें तें घर । चिडियां साचार न मिळे दाणा ॥ ९३ ॥ मुंग्यांसी पडे नित्य लंघन । तिहीं धरिलें बिढार आन । पोटें ना खाय जो आपण । तेथ कथा कोण इतरांची ॥ ९४ ॥ अत्यंत भूक लागल्या पोटीं । चणेही न खाय जगजेठी । तेथ कायसी सेवकांची गोठी । कावलीं पोटीं स्त्रीपुत्रें ॥ ९५ ॥ जैं वमन घडे त्यासी । तैं न करी फळाहारासी । अधिक वेंचू कोण सोशी । यालागीं उपवासीं स्वयें पडे ॥ ९६ ॥ तेथ कुळगुरूचा सन्मान । कुळधर्म गोत्रजभोजन । व्याही जांवई यांचा मान । धनलोभी जाण कदा न करी ॥ ९७ ॥ ऋतुकाळें फळें येती पूर्ण । त्यांसीं दृष्टिभेटी हाटीं जाण । परी जिव्हेसीं आलिंगन । प्राणांतीं आपण हों नेदी ॥ ९८ ॥ मातेचें स्तनपान सेविलें । तेंचि क्षीर रसना चाखिलें । पुढें दूधचि वर्जिलें । व्रत धरिलें धनलोभें ॥ ९९ ॥ रस रसनेचें माहेर ।

तोंडांतील चणे जसे तो जिवंत असतांना आपल्या हातीं लागूं देत नाहीं, तसें द्रव्याचा खर्च करणें हेंच कृपणाचें मरण होय. ८८.

तस्य (ये) ज्ञातयः अतिथयः च ते तेन वाङ्मात्रेण अपि न अर्चिताः—त्याच्या ज्ञातीचे लोक व त्याच्या घरीं आलेले अतिथि यांचा तो नुसत्या शब्दानेंहि कधीं सत्कार करीत नसे, शून्यावसथे काले कामैः आत्मा अपि अनर्चितः—धर्महीन गृहामध्यें किंवा देहामध्यें योग्य कालीं विषयांच्या योगानें त्यानें आपल्या आत्म्यालाहि कधीं संतुष्ट केलें नाहीं. ७.

घरांतला भात कमी होईल, म्हणून तो कृपण वैश्वदेवहि करीत नसे. मग अशा ठिकाणीं एखादा अतिथि आल्यास त्याची कोणत्या वेळीं कोण पूजा करणार ! ८९ एखादा अतिथि दारीं आल्यास त्याला तो असे कटु शब्द बोलत असे कीं, त्या शब्दानेंच त्याचे प्राण जातील ! मग त्याच्यापाशीं अन्न-पाणी कोण मागणार ! ९० राजहंस शेणाकडे जसा ढुंकूनहि पहात नाहीं, तसा ब्रह्मचारी अशा कृपणाच्या घरीं भिक्षेसाठीं फिरकत नाहीं किंवा संन्यासी त्याच्या घरून कांहीं मिळण्याची आशा करीत नाहीं. ९१ भिक्षेकऱ्यांनीं त्याचें दारच वर्ज केलें होतें. अतिथींनीं त्याच्या घराला कायमचें डावलिलें होतें. पाहुणा आपलें बिऱ्हाड त्याच्यापासून दूर शोधीत असे आणि पितर बिचारे सर्वदा निराश होऊन रहात. ९२ त्याच्या दारांत कोरान्न मागण्यासहि कोणी येत नसे. उंदीर त्याचें घर सोडून पळून जात. कावळे त्याच्या घराकडे फिरकतहि नसत. चिमण्यांना धान्याचा एक कणहि सांपडत नसे. ९३ बिचाऱ्या मुंग्यांना तर रोज उपासच घडत असे, तेव्हां त्यांनीं दुसरें घरीं बिऱ्हाड शोधिलें. अहो ! जो स्वतःच्या पोटाला खात नसे, तेथें इतरांची काय कथा ! ९४ तो स्वतः एवढ्या संपत्तीचा मालक असूनहि अतिशय भूक लागली तरी फुटाणे देखील खात नसे. तेथें नोकर-चाकरांची दाद कोण घेणार ! त्याच्या स्त्री-पुत्रांच्या पोटांत तर भुकेनें कावळे कोकलत असत. ९५ एखादेवेळीं त्याला वांति झाल्यास तो फराळहि करीत नसे. कारण अधिक खर्च झाल्यास कोणीं सोसावा ! असें म्हणून तो उपाशी पडून राही. ९६ अशा स्थितींत कुलगुरूचा सन्मान, कुलधर्म, गोत्रजांना भोजन व्याही-जांवई यांचा सत्कार तो द्रव्यलोभी कोठचा करणार ! ९७ निरनिराळ्या मोसमांत येणारीं फळ-फळावळ तो बाजारांत नुसत्या डोळ्यांनीं पहात असे; पण तिची व जिभेची गांठ प्राणांतींहि पडूं देत नसे. ९८ बाळपणांत जें मातेचें दूध प्राशन केलें होतें, तेवढीच त्याच्या जिभेला दुधाची चव ठाऊक. पुढें त्यानें धनलोभानें दूध न पिण्याचें व्रतच धरिलें. ९९ रस हे रसनेंद्रियाचें माहेरच आहे; पण रसावांचून तें इंद्रिय अतिशय गांजलें. हा धन-

तेणेंवीण ते गादली थोर । धनलोभ अतिनिष्ठुर । करितां करकर भेटों नेदी ॥ १०० ॥ वस्त्रें मळकीं अतिजीर्ण । मस्तक सदाचा मलिन । मुखीं वास निघती जाण । स्वप्नींही पान न खाय ॥ १ ॥ सण वार दिवाळी दसरा । तैं जुने जोंधळे धाडी घरा । अन्नेंवीण पीडी लेंकुरां । कदर्यु खरा या नांव ॥ २ ॥ धनलोभी धर्महीन । देखोनि कदर्युवर्तन । विमुख झाले स्वजन । तेंचि निरूपण हरि सांगे ॥ ३ ॥

दुःशीलस्य कदर्यस्य द्रुह्यन्ते पुत्रबान्धवाः । दारा दुहितरो भृत्या विषण्णा नाचरन् प्रियम् ॥ ८ ॥

नाहीं स्वधर्मीं निजशीळ । दानधर्म खुडी सकळ । अत्यंत धनलोभी केवळ । त्यासी दुःशीळ बोलिजे ॥ ४ ॥ अन्न आच्छादनेंवीण । कुटुंबेंसहित आपण । जो कदर्थवी निजप्राण । कदर्यु पूर्ण त्या नांव ॥ ५ ॥ कदर्यु नरासी तंव देख । मुख्य स्त्री होय विमुख । स्वजन आणि सेवक । पुत्रही पराङ्मुख होती त्यासी ॥ ६ ॥ आपले जे कां सखे बंधू । तेही करूं लागती विरोधू । द्रव्यविभागाचा संबंधू । कलह सुबध्दू आरंभे ॥ ७ ॥ गांठीं असोनि अमित धन । न करी माहेरसणबोळवण । कन्या क्षोभोनियां जाण । शाप दारुण त्या देती ॥ ८ ॥ गोत्रज सदा चिंतित । हा मरे तैं जेवूं दूधभात । आप्त ते झाले अनाप्त । अवघे अनहित वांछिती ॥ ९ ॥ जयाचिया द्रव्यासी जाण । नाहीं धर्माचें संरक्षण । तें काळेंची होय क्षीण । तेंचि लक्षण हरि सांगे ॥ ११० ॥

तस्यैवं यक्षवित्तस्य च्युतस्योभयलोकतः । धर्मकामविहीनस्य चुक्रुधुः पंच भागिनः ॥ ९ ॥

लोभानें इतका निर्दय बनला होता कीं, जीभेनें कितीहि कट-कट केली तरी तो रसाची व तिची भेट होऊं देईना. १०० तो फाटलेलीं मळकीं वस्त्रें नेसत असे. त्याचें मस्तक सदा धुळीनें भरलेलें असे. तोंडाला घाण येत असे. स्वप्नांतहि कधीं तो विडा खात नसे. १ व सणवार, दिवाळी, दसरा आला असतां तो किडके जोंधळे घरीं पाठवीत असे. बिचाऱ्या पोरा-बाळांना अन्नावांचून तळमळत ठेवीत असे. यालाच खरा कृपण म्हणतात. २ अशा धनलोभी व धर्महीन माणसाचा कंजुषपणा पाहून त्याचे आप्त-मित्र त्याच्यापासून दूर जातात. त्याचेंच वर्णन आतां श्रीहरि करीत आहे. १०३.

दुःशीलस्य कदर्यस्य पुत्रबान्धवाः द्रुह्यन्ते—दुःशील व कृपण असलेल्या त्याचे पुत्र व बांधवहि त्याचा द्रोह करूं लागले. विषण्णाः दाराः दुहितरः भृत्याः प्रियं न आचरन्—त्याला कंटाळलेल्या त्याच्या स्त्रिया, कन्या व सेवक त्याचें प्रिय करीत नसत. ८.

ज्याची स्वधर्माचरणांत निष्ठा नाहीं, ज्यानें पूर्वापार चालत असलेला सगळा दानधर्म बंद केला आहे व जो अत्यंत धनलोभी आहे त्याला दुःशील म्हणावें. ४ जो अन्न-वस्त्रावांचून सगळ्या कुटुंबासह आपल्या जीवाला क्लेश देतो, त्याला पक्का कृपण असें म्हणतात. ५ अशा कृपण पुरुषाला अगोदर त्याची स्त्री सोडून जाते. नंतर आप्त-इष्ट, नोकर-चाकर, पुत्र हीं सगळीं त्याच्यापासून विमुख होतात. ६ त्याचे सख्खे भाऊ त्याच्याशीं विरोध करूं लागतात. द्रव्याच्या विभागाची वेळ आली कीं, खात्रीनें भांडणाला आरंभ होतो. ७ जवळ अलोट संपत्ति असूनहि जो कधीं माहेरवासिणी मुलींना चार दिवस बोलावीत नाहीं किंवा त्यांची सन्मानानें सासरीं बोळवण करीत नाहीं त्या मुली संतापानें त्याला दारुण शाप देऊं लागतात. ८ इतर सगळे गोत्रज त्याच्या मरणाची वाट पहात बसतात. 'हा जेव्हां मरेल तेव्हांच पोटभर दूध-भात खावयास मिळेल' असें बोलतात. आप्त शत्रु होतात आणि सगळे त्याचें अनिष्ट इच्छितात. ९ ज्याच्या द्रव्याचें संरक्षण करण्यास धर्म नसतो तें द्रव्य लवकरच क्षय पावतें. त्याचें लक्षण आतां श्रीहरि सांगत आहे. ११०.

एवं यक्षवित्तस्य उभयलोकतः च्युतस्य धर्मकामविहीनस्य तस्य पंचभागिनः चुक्रुधुः—याप्रमाणें यक्षांच्या वित्तासारखें ज्याचें वित्त केवळ रक्षणीय आहे, भोग्य नाहीं; अशा दोन्ही लोकांपासून च्युत झालेल्या, धर्म व काम या पुरुषार्थांनीं विहीन असलेल्या त्याच्या पंचयज्ञदेवता त्यावर रुष्ट झाल्या. ९.

खाय ना जेवीं ना लावी हात । ठेव्यापाशीं जैसें भूत । तैसें याचें यक्षवित्त । असे राखत ग्रहो जैसा ॥ ११ ॥ केवळ धर्मकामरहित । धनलोभी जैसें भूत । त्या नांव बोलिजे यक्षवित्त । जीवाहून आप्त अर्थ मानी ॥ १२ ॥ स्वशरीरीं भोग नाहीं जाण । तेणें इह लोक झाला शून्य । नाहीं स्वधर्मकर्म पंचयज्ञ । परलोक शून्य तेणें झाला ॥ १३ ॥ यज्ञाचे पंच विभागी । यज्ञभाग न पवे त्यांलागीं । ते कोपोनियां पंचविभागी । वित्तनाशालागीं उद्यत ॥ १४ ॥ पावोनि ब्राह्मणजन्म वरिष्ठ । धनलोभें स्वधर्मनष्ट । तो होय उभय लोकीं भ्रष्ट । पावे कष्ट कृपणत्वें ॥ १५ ॥ करितां अतिआयास । जोडला अर्थ बहुवस । त्यासी अधर्में आला नाश । तोही विलास हरि सांगे ॥ १६ ॥

तदवध्यानविस्रस्तपुण्यस्कन्धस्य भूरिद । अर्थोऽप्यगच्छन्निधनं बह्वायासपरिश्रमः ॥ १० ॥

पंचयज्ञदेवता सकळ । येणें उपेक्षिल्या केवळ । तिहीं द्रव्यलाभाचें मूळ । पुण्यक्षयें तत्काळ छेदिलें ॥ १७ ॥ द्रव्यप्राप्तिपुण्यदिवाकर । अस्तमाना गेला तो भास्कर । मग द्रव्यलाभाचा अंधकार । अधर्में थोर दाटला ॥ १८ ॥ प्रयासें संचिली संपत्ती । तिसी अधर्म आंधाराची ये राती । क्षोभल्या पंचधा यज्ञमूर्ती । पंचधा पावती महानाश ॥ १९ ॥ जो सुखी न करी कुटुंबालागीं । जो निजात्मा निववि-विना नाना भोगीं । जो द्रव्य न वेंची धर्मालागीं । त्यासी पंचविभागी उठती ॥ १२० ॥ दायाद चोर राजा आगी । अधर्में रोग संचरे अंगीं । हे पांचजण विभागी । द्रव्यनाशालागीं पावती ॥ २१ ॥ नाहीं द्विजपूजा श्रद्धायुक्त । नाहीं लौकिकक्रिया उचित । नाहीं दानादि धर्म वेदोक्त । द्रव्यक्षयो तेथ आवश्यक ॥ २२ ॥ जेथ नाहीं वडिलांसी सन्मान । जेथ नाहीं पंचमहायज्ञ । जेथ

भूत जसें कधीं कांहीं न खातां, न जेवतां, सांठविलेल्या धनाला कधीं हातहि न लावितां, ठेवीपाशीं राखण रहातें, तसा हा आपलें यक्षवित्त एखाद्या ग्रहासारखें राखीत बसे. ११ धर्मकामरहित धनलोभी म्हणजे जणुंकाय भूतच होय. म्हणूनच त्याला यक्षवित्त म्हणतात. तो द्रव्याला आपल्या प्राणाहून प्रिय मानितो. १२ आपल्या शरीराला कसलेंच सुख न दिल्यामुळें त्याचा इहलोक कष्टमय होतो आणि स्वधर्म-कर्म,पंचयज्ञ हें न केल्यामुळें त्याला परलोकहि पारखा होतो. १३ यज्ञभाग घेणाऱ्या पांच देवता असतात. त्यांना आपापला हिस्सा न मिळाल्यामुळें त्या कोपतात व त्याच्या द्रव्याचा नाश करण्यास प्रवृत्त होतात. १४ सर्वांत श्रेष्ठ ब्राह्मणजन्म प्राप्त झाला असतां जो धनलोभानें असा धर्मनष्ट होतो, तो इह व पर या दोन्ही लोकांपासून भ्रष्ट होतो व आपल्या कृपणपणामुळें क्लेश भोगितो. १५ अत्यंत कष्ट सोसून जो अगणित द्रव्यसंचय केलेला असतो त्याचाहि अधर्मानें नाश होतो. तोच प्रकार आतां हरि सांगत आहे. ११६.

भूरिद–हे विपुल दान करणाऱ्या उद्धवा ! तदवध्यानविस्रस्तपुण्यस्कन्धस्य—त्यांच्या अनादरामुळें ज्याच्या केवल धनलाभाला कारण होणारा पुण्यांश नष्ट झाला आहे अशा त्याचा, बह्वायासपरिश्रमः अर्थः अपि निधन अगच्छत्–कृष्यादि अनेक आयासांनीं केवल परिश्रम हेंच ज्याचें फल आहे असा धनसंचयहि नष्ट झाला. १०.

जो कृपण पंचयज्ञदेवतांची उपेक्षा करितो, तो पुण्यक्षयामुळें द्रव्यलाभाचें मूळच आपल्या हातानें तोडितो, असें समजावें. १७ द्रव्यप्राप्ति करून देणारा पुण्यरूप सूर्य मावळतांच अधर्मामुळें द्रव्यलोभाचा गाढ अंधकार पसरतो. १८ मोठ्या प्रयासानें जी संपत्ति सांठवून ठेविलेली असते तिच्यावर अधर्मरूपी अंधकाराची रात्र पडतांच पांचहि यज्ञदेवता कोपतात व पांच प्रकारें महानाश करितात. १९ जो कुटुंबाला सुख देत नाहीं, जो अनेक सुखोपभोगानें स्वतःच्या जीवाला तृप्त करीत नाहीं, जो धर्मकृत्यांतहि द्रव्य खर्च करीत नाहीं, त्याच्या विरुद्ध पांच भागीदार उठतात. १२० भाऊबंद, चोर व राजा त्याचें द्रव्य हरण करितात. आगीनें त्याच्या संपत्तीचा नाश होतो आणि अधर्मामुळें त्याला एखादा रोग जडतो. अशा प्रकारें या पांच भागीदारांकडून त्याचा द्रव्यनाश केला जातो. २१ जो श्रद्धेनें द्विजांची पूजा करीत नाहीं, अवश्य असलेला लौकिकव्यवहार करीत नाहीं, दानादिकादि वेदोक्त धर्म आचरीत नाहीं, त्याच्या द्रव्याची खात्रीनें हानि होते. २२ उद्धवा ! जेथें वडिलांचा आदर नाहीं, पंचमहायज्ञ नाहींत

गुरूसी करी अभिमान । तेथ क्षयो जाण उद्धवा ॥ २३ ॥ ज्यांसी परांचा द्वेष सदा । जे बोलती परापवादा । जे चढती धनगर्वमदा । तेथ क्षयो सदा उद्धवा ॥ २४ ॥ त्याच द्रव्यक्षयाचें लक्षण । ग्रंथाधारीं निरूपण । स्वयें सांगताहे श्रीकृष्ण । दयाळू पूर्ण निजभक्ता ॥ २५ ॥

ज्ञातयो जगृहुः किंचिन् किञ्चिद्दस्यव उद्धव । दैवतः कालतः किंचिद्ब्रह्मबन्धोर्नृपार्थिवात् ॥ ११ ॥

स्त्री पुत्र होऊनि एक । तिंहीं ठेवा नेला कित्येक । गोत्रज मिळोनि सकळिक । बलात्कारें देख वांटा नेला ॥ २६ ॥ चोरीं फोडोनियां घर । काढूनि नेलें भांडार । आगी लागोनियां घर । वस्तु अपार जळाल्या ॥ २७ ॥ हिंवाळ्यानें गेलें शेत । प्रवर्त बुडाला जेथींचा तेथ । विश्वासू ठेवा घेऊनि जात । खतखूत हारपलें ॥ २८ ॥ भांडीं ठेविला कापूर उडे । समुद्रामाजीं तारूं बुडे । पातिकरावरी घाला पडे । चहूंकडे अपावो ॥ २९ ॥ ठक येऊनि एकांतीं । मुलाम्याचीं नाणीं देती । धनलोभाचे काकुळती । हातींची संपत्ती त्यांसी दे ॥ १३० ॥ स्वचक्रपरचक्रविरोधधाडी । खणती लावूनि घर फोडी । तळघरींचे ठेवे काढी । भरोनि कावडी धन नेती ॥ ३१ ॥ पाणी रिघे पेंवाआंत । तेणें धान्य नासे समस्त । धटू झोंबोनि हरी सेत । दैवहत तो झाला ॥ ३२ ॥ गोठणीं सेणयां रोगू पडे । निमाले गायी-म्हशींचे वाडे । उधारें नेले ठाणबंदी घोडे । तो रणीं पडे महायुद्धीं ॥ ३३ ॥ भूमिनिक्षेप जे करूं जाती । ते आपणियाकडे धूळी ओढिती । तेथ घालूनि निजसंपत्ती । तोंडी माती स्वयें घाली ॥ ३४ ॥ बुद्धि सांगती वाड वाड । येऊनि तोंडीं घाला दगड । ऐसे ठेवे बुजिले दृढ । त्याची चाड धरूं गेला ॥३५॥ ठेवे ठेविले जे अनेक । ते पृथ्वीं गिळिले निःशेख । भाग्य झालें जैं विमुख । झाले अनोळख ते ठाय

जो गुरूबरोबर स्पर्धा करितो तेथें खात्रीनें द्रव्यनाश होतो. २३ जो निरंतर दुसऱ्यांचा द्वेष करितो, दुसऱ्याची निंदा करितो, द्रव्यमदानें ताठतो, तेथें धनाचा खात्रीनें क्षय होतो. २४ आपल्या भक्तावर पूर्ण कृपाळू असलेला श्रीकृष्ण त्याच द्रव्यक्षयाचा प्रकार ग्रंथाच्या आधारानें स्वतः सांगत आहे. १२५.

उद्धव-हे उद्धवा! ब्रह्मबंधोः ज्ञातयः किंचिन् जगृहुः-त्या हीन ब्राह्मणाचें कांहीं धन त्याच्या ज्ञातीच्या लोकांनीं घेतलें, किंचित् दस्यवः—कांहीं चोरांनीं लुबाडिलें, किंचित् दैवतः कालतः नृपार्थिवात्—कांहीं गृहदाहादि दैवी आपत्तीनें, कांहीं भूमींत पुरून ठेविलेलें कालानें आणि कांहीं इतर लोक व राजे यांनीं लुबाडिल्यामुळें नष्ट झालें. ११.

उद्धवा! वर सांगितल्याप्रमाणें या कृपण ब्राह्मणाचें कांहीं द्रव्य त्याची स्त्री व पुत्र हीं एक होऊन घेऊन गेलीं, सगळे आप्त-इष्ट-गोत्रज-मिळून आपला हिस्सा घेऊन गेले. २६ चोरांनीं घर फोडून त्याची तिजोरी लुटून नेली, घराला आग लागून त्यांत असंख्य वस्तु जळाल्या, २७ शेतावर कीड पडली, व्यापारधंदा जेथल्या तेथें बसला, विश्वासु कुळांनीं ठेव बुडविली, खत-पत्रें हरवलीं. २८ भांड्यांत ठेविलेला कापूर जसा उडावा, समुद्रांत नाव जशी बुडावी, भागिदारावर संकट कोसळावें तशी चोहोंकडून त्याच्यावर आपत्ति आली. २९ लबाड लोकांनीं त्याला एकांतांत गाठून खोटें नाणें दिलें व त्या धनलोभ्याची संपत्ति लुबाडून नेली. १३० युद्धाच्या गडबडींत त्याच्या घरावर सैन्याची धाड आली, त्यानें कुदळीनें खणून त्यानें भूमींत पुरलेलें धन काढून नेलें व तळघरांत सांठवून ठेवलेल्या संपत्तीच्या तर कावडी भरून नेल्या. ३१ धान्यांच्या पेंवांमध्यें पाणी शिरून सगळें धान्य नासून गेलें. कांहीं धटिंगणांनीं भांडण करून त्याचें शेत घेतलें. ३२ गुरांढोरांना रोग होऊन गायी-म्हशींचे गाठ ओस पडले. त्याचीं घोडीं ज्यानें भाड्यानें नेलेलीं होतीं तो युद्धांत मरण पावला. ३३ याप्रमाणें जे जमिनींत द्रव्य ठेवितात, ते स्वतः आपल्या अंगावर धूळ ओढून घेतात. ते खड्ड्यांत द्रव्य घालतात व अखेर आपल्या हातांनीं आपल्या व तोंडांत माती घालून घेतात. ३४ द्रव्य पुरून ठेवितांना ते मोठमोठ्या गोष्टी सांगतात. असो; 'ठेव्याच्या तोंडावर चांगला मोठा धोंडा ठेवा' इत्यादि सांगून त्यानें जे मोठमोठे ठेवे बुजवून ठेविले होते, त्यांची चाड त्यानें धरिली; ३५ पण ती सर्व ठेव भूमीनें गिळून टाकिली,

॥ ३६ ॥ अधर्में अदृष्ट झालें क्षीण । विपरीत भासे देहींचें चिन्ह । पालटला निजवर्ण । ब्राह्मणपण लक्षेना ॥ ३७ ॥ देखे तो पुसे ज्ञाति कोण । तो सांगे जरी मी ब्राह्मण । ऐकत्याचें न मनी मन । वर्णाग्रपण मावळलें ॥ ३८ ॥ एवं निःशेष नासलें धन । ब्रह्मवर्चस्व गेलें जाण । म्लानवदन हीनदीन । खेदखिन्न अतिदुःखी ॥ ३९ ॥

स एवं द्रविणे नष्टे धर्मकामविवर्जितः । उपेक्षितश्च स्वजनैश्चिंतामाप दुरत्ययाम् ॥ १२ ॥

गेलें शेत निमाली कुळवाडी । घर पाडिलें परचक्रधाडीं । धन नासलें नाहीं कवडी । अधर्माचे जोडी हे दशा ॥ १४० ॥ नाहीं स्वधर्मकर्म ना दान । विहित भोग न करी आपण । त्या धनलोभ्याचें नासलें धन । जेवीं कां स्वप्न रंकाचें ॥ ४१ ॥ दैव झालें पराङ्मुख । त्या हातभाग्याची दशा देख । स्त्रीपुत्रें झालीं विमुख । तिंहीं निःशेख दवडिला ॥ ४२ ॥ ऐक धनलोभाच्या ठायीं । इष्ट मित्र पूर्वींचि नाहीं । गोत्रजांसी त्याचें सुख कायी । दवडिला पाहीं उपेक्षितू ४३ ॥ निंदा प्रत्यक्ष करिती लोक । रांडा पोरें थुंकती देख । खावया नाहीं निःशेख । मागतां भीक मिळेना ॥ ४४ ॥ भिकेलागीं जेथ जेथें गेला । म्हणती काळमुखा येथें कां आला । होता धनलोभें भुलला । भला नागविला ईश्वरें ॥ ४५ ॥ यापरी धिक्कारिती लोक । धन जाऊनि झाला रंक । चिंतावर्ती पडला देख । दुःखें महादुःख पावला ॥ ४६ ॥

तस्यैवं ध्यायतो दीर्घं नष्टरायस्तपस्विनः । खिद्यतो बाष्पकण्ठस्य निर्वेदः सुमहानभूत् ॥ १३ ॥

भाग्य त्याला पारखें झालें व ती पुरलेली जागा अनोळखी झाली. ३६ अधर्मामुळें पूर्व सुकृताचा लोप झाला. त्याच्या देहाची आकृति विपरीत दिसूं लागली. त्याचा पूर्वींचा वर्ण पालटला. त्याचा ब्राह्मणपणा ओळखूंहि येईनासा झाला. ३७ त्याला जो भेटे तो त्याची जात विचारीत असे. त्यानें 'मी ब्राह्मण आहें' असें जरी सांगितलें तरी तें कोणाला खरें वाटत नसे. कारण त्याचा ब्राह्मणपणा नष्ट झाला होता. ३८ अशाप्रकारें द्रव्याची हानि झाली, ब्रह्मतेज मावळलें व तो म्लानवदन करून हीन-दीन अवस्थेंत अत्यंत खिन्न होऊन दुःख भोगीत राहिला. १३९.

एवं द्रविणे नष्टे धर्मकामविवर्जितः स्वजनैः च उपेक्षितः सः दुरत्ययां चिंतां आप–याप्रमाणें धन नष्ट झालें असतां धर्म व काम यांनीं रहित व स्वजनाकडून उपेक्षा केला गेलेला असा तो अतिशय अनुलंघनीय चिंतेला प्राप्त झाला. १२.

शेत गेलें, कुळवाडी बुडाली, परचक्राच्या धाडीनें घर लुटलें, द्रव्य नाहींसें झालें व जवळ एक कवडीहि राहिली नाहीं. त्याला अधर्माचरणामुळें अशी दशा प्राप्त झाली. १४० स्वधर्मकर्म करीत नाहीं, दान नाहीं, त्यानें स्वतःच्या देहाला अवश्य असलेलें अन्न-वस्त्रादिकहि भोगिलें नाहीं, त्यामुळें त्या धनलोभ्याचें द्रव्य, दरिद्री माणसाच्या स्वप्नाप्रमाणें नाहींसें झालें. ४१ दैव फिरल्यामुळें त्या हतभाग्याची काय अवस्था झाली पहा ! स्त्री-पुत्रादि विमुख होऊन त्याला कायमचीं सोडून गेलीं. ४२ त्या द्रव्यलोभ्याला अगोदरच कोणी स्नेही नव्हते. त्याच्या आप्त-गोत्रजांनाहि त्याच्यापासून कांहीं लाभ नसल्यामुळें त्यांनीं त्याची उपेक्षा केली. ४४ लोक तोंडांवर निंदा करूं लागले. पोरें तोंडावर थूंकूं लागली. त्याला भीक मागूनहि खावयास कांहीं मिळेनासें झालें. ४४ तो जिकडे-जिकडे भिक्षा मागावयास जाई तिकडे-तिकडे त्याला 'हा काळतोंड्या कशाला इकडे आला, धनलोभाला कोण भाळला होता; देवानें चांगला नागविला.' ४५ असें म्हणून लोक त्याचा धिक्कार करीत. त्याचें धन जाऊन तो भिकारी झाला व चिंतेच्या भोंवऱ्यांत सांपडून अतिशय दुःखी झाला. १४६.

एवं दीर्घं ध्यायतः नष्टरायः तपस्विनः खिद्यतः बाष्पकंठस्य तस्य सुमहान् निर्वेदः अभूत्-याप्रमाणें दीर्घकाल चिंता करणाऱ्या, ज्याचें धन नष्ट झालें आहे व त्यामुळें जो अतिशय संतप्त झाला आहे, अशा खेद करणाऱ्या व ज्याचा कंठ दाटून आला आहे अशा त्याला तीव्र वैराग्य आलें. १३.

धनलोभ्याचें गेलें धन । धनासवें न वचे आठवण । तें आठवता फुटताहे मन । तळमळी जाण अतिदुःखें ॥ ४७ ॥ कांटा रुतल्या भुजंगकपाळीं । पुच्छ तुटल्या सापसुरळी । हो कां जळावेगळी मासोळी । तैसा तळमळी अतिदुःखें ॥ ४८ ॥ मनें आठवितांचि धन । हृदयीं चालिलें स्फुंदन । अश्रुधारा स्रवती नयन । मूर्च्छापन्न क्षणक्षणां ॥ ४९ ॥ पोटीं दुःखें अति चरफडे । धाय मोकलूनियां रडे । उठे बैसे पाहे पडे । लोळे गडबडे आरडत ॥ १५० ॥ मग म्हणे रे कटकटा । झालों एक वेळ करंटा । अहा विधातया दुष्टा । काय अदृष्टा लिहिलेंसी ॥ ५१ ॥ मज ठावो नाहीं कोणीकडे । विचार संभवेना पुढें । अतिदुःख आलें जी रोकडें । तेणें विचारें रडे महादुःखी ॥ ५२ ॥ हें अल्पदुःख पावलों येथें । पुढें थोर दुःख आहे मातें । यम दंडील निष्ठुर घातें । कोण तेथें सोडवी ॥ ५३ ॥ म्यां नाहीं दीधलें दान । मी नाहीं स्मरलों नारायण । मज येती नरक दारुण । तेथ कोण सोडवी ॥ ५४ ॥ म्यां नाहीं केलें पंचमहायज्ञ । नाहीं दीधलें अतिथीसी अन्न । नाहीं केलें पितृतर्पण । माझें दुःख कोण निवारी ॥ ५५ ॥ म्यां नाहीं केली द्विजपूजा । नाहीं भजलों अधोक्षजा । नाहीं वंदिलें वैष्णवरजा । माझे दुःखसमाजा कोण नाशी ॥ ५६ ॥ मी सर्वथा अकर्मकारी । बुडालों बुडालों अघोरीं । धांव पाव गा श्रीहरी । मज उद्धरी दीनातें ॥ ५७ ॥ कृष्णा माधवा मुरारी । अच्युता अनंता श्रीहरि । गरुडध्वजा गोवर्धनधारी । मज उद्धरीं दीनातें ॥ ५८ ॥ तुवां रक्षिलें प्रल्हादासी । अंबरीषासी गर्भवासीं । उदरीं राखिलें परीक्षितीसी । तैसें मज दीनासी उद्धरीं ॥ ५८ ॥ तुवां तारिलें अहल्येसी । उद्धरिलें नष्टा अजामिळासी । उडी घातली गजेंद्रासी । तेणें वेगेंसी मज तारीं ॥ १६० ॥ महादोषांची श्रेणी । नामें तारिली कुंटिणी । तेणें

त्या धनलोभ्याचें द्रव्य जरी गेलें तरी त्याबरोबर त्याचें पूर्वस्मरण गेलें नाहीं. संपन्न स्थितीची त्याला क्षणोक्षणीं आठवण होऊन त्या आठवणीनें त्याचें हृदय फुटत असे व अंतःकरणाची तळमळ होत असे. ४७ सापाच्या मस्तकाला कांटा खुपला किंवा सापसुरळीची शेपूट तुटली किंवा मासा पाण्याच्या बाहेर काढला म्हणजे त्यांची जशी तळमळ होते, तसा तो दुःखानें अतिशय तळमळूं लागला. ४८ मनांत धनाची आठवण होतांच तो स्फुंदून स्फुंदून रडूं लागला. डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहूं लागल्या व घटको-घटकीं मूर्च्छित झाला. ४९ अंतःकरणांतील दुःखानें अतिशय तडफडूं लागला. धाय मोकलून रडूं लागला. उठला, बसला, पाहूं लागला, गडबडां लोळला, ओरडला १५० व बोलला कीं, हाय रे देवा ! मी कपाळकरंटा झालों. हे ब्रह्मदेवा ! माझ्या नशीबीं तूं काय हें लिहून ठेविलेंस ! ५१ मला कोठें टेकावयाला जागा नाहीं. पुढें काय करावें तें सुचत नाहीं, अति कठिण प्रसंग आला. हा विचार मनांत येतांच तो दुःखानें रडूं लागला. ५२ मी येथें हें थोडेंसें दुःख भोगीत आहें, पण पुढें फार मोठें दुःख होणार आहे. जेव्हां यम निर्दयपणानें मला शिक्षा करील तेव्हां त्यांतून मला कोण सोडवील ! ५३ मीं कधीं कोणाला दान दिलें नाहीं, कधीं नारायणाचें स्मरण केलें नाहीं, मला मरणोत्तर दारुण नरक सोसावा लागेल. तेव्हां त्यांतून मला कोण सोडवील ! ५४ मीं पंचमहायज्ञ केले नाहींत. कधीं अतिथीला अन्न दिलें नाहीं, पितरांचें तर्पण केलें नाहीं, आतां माझ्या दुःखाचें निवारण कोण करील ! ५५ मीं कधीं द्विजांची पूजा केली नाहीं, परमात्म्याची भक्ति केली नाहीं. भगवद्भक्तांच्या चरणधूळीला कधीं वंदन केलें नाहीं. तेव्हां माझ्या या दुःखाच्या राशींचा नाश कोण करील ! ५६ मी सर्वथा अकर्मच करणारा असल्यामुळें अघोर पातकामध्यें बुडालों आहें. हे श्रीहरे ! धांव, पाव बाबा ! मज दीनाचा उद्धार कर. ५७ हे श्रीकृष्णा, माधवा, मुरारे, अच्युता, अनंता, श्रीहरे, गोवर्धनधारिन् गरुडध्वजा ! मज दीनाला उद्धरून ने. ५८ तूं जसें प्रल्हादाचें रक्षण केलेंस, अंबरीषाचे गर्भवास चुकविलेस, परीक्षितिराजाला गर्भांतच सुदर्शनानें संरक्षिलेंस, तसाच आतां मज दीनाचा उद्धार कर. ५९ तूं अहल्येला तारिलेंस, पातकी अजामिळाचा उद्धार केलास, गजेंद्राच्या हाकेसरशी उडी घातलीस, तसें आतां मला सत्वर तारून ने. १६० महादोषांची खाणच

लाघवें चक्रपाणी । मज दुष्टालागोनि उद्धरीं ॥ ६१ ॥ जळो जळो हा धनकाम । गेलें वृथा माझें जन्म । फुकाचें जें रामनाम । तें मी अधम न म्हणेंचि ॥ ६२ ॥ रामनामाच्या प्रतापासाठीं । जळती महापापांच्या कोटी । थोर अधम मी एक सृष्टीं । नाम वाक्पुटीं न म्हणेंचि ॥ ६३ ॥ ऐसा मानोनि अपराध । अनुतापें करितां खेद । उपजला अतिनिर्वेद । तेंचि गोविंद स्वयें सांगे ॥ ६४ ॥

स चाहेदमिदं कष्टं वृथाऽऽत्मा मेऽनुतापितः । न धर्माय न कामाय यस्यार्थायास ईदृशः ॥ १४ ॥

हात चुरूनि म्हणे कटकटा । ब्राह्मणदेवो मोक्षाचा वांटा । तो लाहोनि मी अतिकरंटा । धनलोभचेष्टा नाडलों ॥ ६५ ॥ जेणें देहें लाभे मोक्षसुख । त्या देहासी म्यां दीधलें दुःख । धनलोभी मी परम मूर्ख । मजऐसा आणिक असेना ॥ ६६ ॥ न वेंचितां धर्मकामासी । अर्थ जोडिला सायासीं । त्या अर्थाची दशा ऐसी । अतिदुःखेंसीं मज फळला ॥ ६७ ॥ बाप धनलोभाचें कवतिक । नाहीं इहलोक ना परलोक । थितें अंतरलें मोक्षसुख । भोगवी नरक अनिवार ॥ ६८ ॥ देखे ज्या नरकाचे ठायीं । आकल्प बुडतां ठावो नाहीं । धनलोभ घाली तैसें ठायीं । ते म्यां नरदेहीं जोडिलें ॥ ६९ ॥ जो जन्मला ब्राह्मणदेहीं । तो पूज्य होय लोकीं तिहीं । मोक्ष लागे त्याच्या पायीं । म्यां अभाग्यें नाशिला ॥ १७० ॥ लोभें जें धन संचिलें । तें निःशेष नासोनि गेलें । परी मजलागीं अतिदुःखी केलें । बांधोनि दीधलें महानरका ॥ ७१ ॥ उत्तम देहो झाला प्राप्त । तो धनलोभें केला व्यर्थ । आयुष्य गेलें हातोहात । अतिसंतप्त अनुतापें ॥ ७२ ॥ धनलोभेंचे अचाट । वृथा गेले माझे कष्ट । वैराग्य उपजलें उद्भट । अतिचोखट सविवेक

अशा पातकी पिंगलेचा जसा सहज लीलेनें उद्धार केलास, तसा हे चक्रपाणे ! मज दुष्टाचा उद्धार कर. ६१ जळो, आग लागो या धनलोभाला. त्यानें माझा जन्म फुकट गेला. मीं अधमानें फुकटच्या रामनामाचाहि उच्चार केला नाहीं. ६२ रामनामाच्या प्रभावानें कोट्यवधि महापातकांच्या राशी जळून जातात; परंतु या सृष्टींत मीच काय तो एक अधम निघालों व तें पवित्र नांव तोंडानें नुस्तें उच्चारिलेंहि नाहीं. ६३ अशा प्रकारें आपले अपराध आठवून पश्चात्तापानें तो खेद करीत असतां त्याला तीव्र वैराग्य उत्पन्न झालें. तेंच आतां गोविंद सांगत आहे. १६४.

सः च इदं आह—आणि तो असें म्हणाला, इदं कष्टं—अरे अरे, ही मोठी वाईट गोष्ट झाली. मे आत्मा वृथा अनुतापितः—मीं आपल्या देहाला व्यर्थ ताप दिला. [आत्मानुतापाचेंच वर्णन—] यस्य ईदृशः अर्थायासः न धर्माय न कामाय—ज्या माझा हा अशा प्रकारचा धनसंबंधी आयास धर्माच्याहि उपयोगी नाहीं व विषयोपभोगाच्याहि उपयोगी नाहीं. [त्या मीं आपल्या जीवाला वृथा शिणविलें.] १४.

तो कृपण हात चोळून म्हणाला कीं, मोक्षाचा वांटाच असा ब्राह्मणजन्म प्राप्त होऊन मी कपाळकरंटा धनलोभाच्या भ्रांतीनें नाडला गेलों. ६५ ज्या मनुष्यदेहानें मोक्षसुख लाभतें, त्या देहाला मीं दुःख दिलें. माझ्यासारखा परम मूर्ख धनलोभी दुसरा कोणी नसेल. ६६ मीं धर्मकृत्यांत एक कवडीहि खर्च न करितां मोठ्या प्रयासानें त्या द्रव्याचा संचय केला, त्या द्रव्याची ही अशी वाट लागली. तो अति दुःखरूपानें मला फळला. ६७ धनलोभाचा प्रभाव मोठा जबर आहे. इहलोक नाहीं व परलोक नाहीं. असलेलें मोक्षसुख अंतरतें व अनिवार नरकाची प्राप्ति होते. ६८ ज्या नरकांत एकदां पडलें कीं, तेथून प्रलयकालापर्यंत बाहेर निघतां येत नाहीं; हें प्रत्यक्ष पहात असूनहि मीं या मनुष्य-जन्मास येऊन धनलोभानें तो नरक मिळविला. ६९ जो ब्राह्मणजातींत जन्म घेतो, तो तिन्ही लोकीं पूज्य होतो व मोक्ष त्याच्या पायांशीं येतो; पण मीं अभाग्यानें आपलाच नाश करून घेतला. १७० मीं लोभानें जो द्रव्यसंचय केला तो तर निःशेष नाहींसा झाला. पण त्यानें मला मात्र अतिशय दुःखी करून महा नरकांत टाकिलें. ७१ उत्तम जन्म लाधला असतां मीं तो धनलोभानें व्यर्थ घालविला. बोलतां-बोलतां आयुष्य निघून गेलें व पश्चात्तापानें मी पोळत आहें. ७२ धनलोभानें माझे सगळे कष्ट व्यर्थ गेले. आतां मला

॥ ७३ ॥ धनलोभी जो कां नर । तो सकळ दुःखांचें भांडार । धनबद्धक तो पामर । स्वमुखें साचार निंदित ॥ ७४ ॥

प्रायेणार्थाः कदर्याणां न सुखाय कदाचन । इह चात्मोपतापाय मृतस्य नरकाय च ॥ १५ ॥

प्रायशा जे धनबद्धक । त्यांसी इहलोकीं नाहीं सुख । धनरक्षणीं अतिदुःख । तें जातां देख प्राणांत ॥ ७५ ॥ धनागमनीं अतिकष्ट । धनरक्षणीं कलह श्रेष्ठ । धननाशें होय हृदयस्फोट । इहलोकीं कष्ट धनलोभ्या ॥ ७६ ॥ यापरी इहलोकीं दुःख । अधर्में खुंटला परलोक । मरतां उरीं आदळे नरक । आवश्यक धनलोभ्या ॥ ७७ ॥ जो धर्म करीना स्वयें न खाये । जो मजसारिखा कदर्यु होये । त्यासी चढतें वाढतें दुःख पाहें । नाहीं सुखसोये कदर्या ॥ ७८ ॥ लोभाची वस्ती जिये ठायीं । तेथ स्वप्नींही सुख नाहीं । लोभ अतिशयें निंद्य पाहीं । तें आपण स्वमुखेंही सांगत ॥ ७९ ॥

यशो यशस्विनां शुद्धं श्लाघ्या ये गुणिनां गुणाः ।
लोभः स्वल्पोपि तान् हन्ति श्वित्रो रूपमिवेप्सितम् ॥ १६ ॥

रणीं पडतां मुख्य धुरेसी । जो अंगें विभांडी त्या रणासी । खांदीं वाऊनि आणी रायासी । येवढी कीर्ति ज्यासी जोडिली ॥ १८० ॥ लोभ संचरोनि त्यापाशीं । एक शेत मागवी रायासी । तेचि अपकीर्ति होय त्यासी । जग उपहासी मूर्खत्वा ॥ ८१ ॥ त्यासी न मागतां राजा जाण । करूं पाहे आपणासमान । त्यासी लोभें आणोनि नागवण । मूर्खपण स्थापिलें ॥ ८२ ॥ स्वयें करितां कन्यादान ।

उत्तम विवेकासह तीव्र वैराग्य उत्पन्न झालें आहे. ७३ जो मनुष्य धनलोभी असतो तो सगळ्या दुःखांचें भांडारच होय. धनानें बद्ध झालेला तो मूढ आपल्याच मुखानें आपली आणखी अशी निंदा करूं लागला. १७४.

प्रायेण कदर्याणां अर्थाः सुखाय कदाचन न–प्रायः कृपणांचें धन त्यांच्या सुखाला केव्हांहि कारण होत नाहीं. इह च आत्मोपतापाय मृतस्य नरकाय च–तर तें या लोकीं देहाला संताप देण्यास व धन असूनहि धर्मानुष्ठान न केल्यामुळें मरणोत्तर नरकाला कारण होतें. १५.

प्रायः जो धनलोभी असतो, त्याला या लोकीं सुख मिळत नाहीं. द्रव्याचें रक्षण करण्यांत तो अतिशय कष्ट भोगितो व जर कां तें धन गेलें तर त्याचा प्राणान्तच ओढवतो. ७५ धन मिळविण्यास अतिशय कष्ट करावे लागतात. त्याचें रक्षण करितांना कलह करावे लागतात आणि त्या धनाचा नाश झाला कीं, छाती फुटून जाते. धनलोभ्याला या लोकीं इतके कष्ट होतात ७६ व असें दुःख होतें. अधर्मामुळें परलोक अंतरतो. धनलोभ्याच्या अंगावर मरतांक्षणीं नरकच कोसळतो. ७७ जो दान-धर्म करीत नाहीं, स्वतःच्या पोटाला खात नाहीं, माझ्यासारखा जो कृपण असतो त्याला वाढतें दुःख भोगावें लागतें. कृपणाला सुख कधींहि होत नाहीं. ७८ जेथें लोभाची वस्ती असते तेथें स्वप्नांतहि सुख मिळत नाहीं; असा हा लोभ अतिशय निंद्य आहे. तेंच आतां स्वतःच्या मुखानें तो कृपणच सांगत आहे. १७९.

यशस्विनां यत् शुद्धं यशः गुणिनां ये श्लाघ्याः गुणाः–यशस्वी लोकांचें जें शुद्ध यश, गुणवानांचे जें प्रशंसनीय गुण, तान् स्वल्पः अपि लोभः श्वित्रः ईप्सितं रूपं इव हन्ति–त्यांना स्वल्पहि लोभ, श्वेतकुष्ठ अत्यंत अभीष्ट रूपाला जसें नाहींसें करितें, तसा नाहींसे करितो. १६.

मुख्य सेनापति रणांगणांत मरून पडला असतां जो मोठ्या शौर्यानें आघाडीला जाऊन शत्रूला जिंकतो व राजा त्याला खांद्यावर बसवून आणितो त्याची मोठी कीर्ति होते; १८० पण जर कां त्याच्या मनांत लोभानें संचार केला व त्यानें राजापाशीं एक शेतच मागितलें तर त्यांत त्याची अपकीर्ति होऊन सगळें जग त्याच्या मूर्खपणाचा उपहास करूं लागतें. ८१ कारण त्यानें न मागतांच राजानें त्याला स्वतःप्रमाणें संपन्न केलें असतें; पण त्याच्या लोभामुळें तो नागवला जातो व वर आणखी मूर्खपणा पदरीं येतो. ८२ किंवा स्वतः कन्यादान केल्यानें सगळें

सकळ कुळ होय पावन । तेथेंही लोभें घेतां धन । अधःपतन धनलोभिया ॥ ८३ ॥ दाता देऊनियां दान । दानप्रसंगें उपार्जी धन । तेंचि दात्यासी दूषण । लोभ लांछन दानासी ॥ ८४ ॥ वेदशास्त्रें करूनि पठण । पंडित झाले अति सज्ञान । तेही धनलोभें छळिले जाण । ज्ञानाभिमान प्रतिष्ठे ॥ ८५ ॥ देहप्रतिष्ठेचिये सिद्धी । पंडित पंडितां वादविधी । नाना छळणोक्ती विरोधीं । ठकिले त्रिशुद्धी ज्ञाते लोभें ॥ ८६ ॥ सविवेक सज्ञान ज्ञात्यासी । लोभ आणी निंदास्पदासी । इतरांची गति काइसी । ते लोभाची दासी होऊनि ठाती ॥ ८७ ॥ लोभ शुद्धासी करी अशुद्ध । लोभ तेथ निंदास्पद । तोचि दृष्टांत विशद । ऐक प्रसिद्ध सांगत ॥ ८८ ॥ कुलशील अतिसुकुमार । रूपें सर्वांगमनोहर । नाकीं श्वेतता अणुमात्र । निंद्य सुंदर तेणें होय ॥ ८९ ॥ तेवीं अल्पही लोभाची जे वस्ती । नाशी गुणौदार्ययशकीर्ती । लोभाऐसा त्रिजगतीं । कर्ता अपकीर्ती आन नाहीं ॥ १९० ॥ धनलोभीं सदा विरोधू । धनलोभ तोडी सखे बंधू । धनलोभाऐसा नाहीं बाधू । अतिअशुद्ध आणिक असेना ॥ ९१ ॥

अर्थस्य साधने सिद्ध उत्कर्षे रक्षणे व्यये । नाशोपभोग आयासस्त्रासश्चिन्ता भ्रमो नृणाम् ॥ १७ ॥

प्रथम शिणावें द्रव्य जोडितां । दुसरें शिणावें तें वाढवितां । द्रव्य जरी झालें उत्कर्षतां । तरी लोभ सर्वथा पुरे न म्हणे ॥ ९२ ॥ द्रव्यालागीं भावार्थतां । जैसे कष्टती सर्वथा । तैसा जरी कष्टे परमार्था । तैं ब्रह्म तत्त्वतां खेळणें होय ॥ ९३ ॥ एवं कष्टीं जोडल्या द्रव्यासी । रक्षणीं अतिचिंता मानसीं । अतिशय लागली जीवासी । अहर्निशीं धुकधुकी ॥ ९४ ॥ स्त्री पुत्र हो माता पिता । त्यांसी पातिजेना सर्वथा । आपणाहूनि

कुल पावन होतें, पण तेंच जर कां लोभानें तिचें शुल्क म्ह० द्रव्य घेतलें तर त्या धनलोभ्याचा उलट अधःपात होतो. ८३ दान देणारा दान देऊनहि त्या दानप्रसंगींच जर धन मिळवूं लागेल तर त्यांत त्याला दोष लागेल; याप्रमाणें लोभ दानालाहि लांछनच आणितो. ८४ वेदशास्त्राचा अभ्यास करून पंडित मोठे ज्ञानसंपन्न झाले, तर त्यांनाहि ज्ञानाभिमानामुळें धनलोभ छळीत असतो. ८५ देहाची प्रतिष्ठा होण्यासाठीं विद्वान् आपसांत वाद-विवाद करितात. त्यांत मतभेद झाला म्हणजे परस्परांस दुरुक्ति बोलतात व अशा प्रकारें ते पंडितहि लोभाला बळी पडतात. ८६ विचारयुक्त विद्वान्‌हि जर लोभामुळें निंदेस पात्र होतात, तर मग इतरांची काय कथा ! ते बापडे लोभाचे दास होऊन रहातात. ८७ लोभ पवित्र माणसालाहि अपवित्र करितो. जेथें लोभ तेथें निंदेची कायमची वस्ती होते. त्याविषयीं एक प्रसिद्ध दृष्टान्त सविस्तर सांगतों. ८८ कन्या कितीहि कुलीन, सुशील, सुकुमार, सर्वांग-सुंदर असली व तिच्या नाकावर जर कां कोडाचा बारिकसा पांढरा डाग असला तर तिचें तें सगळें सौंदर्य जसें निंद्य ठरतें, त्याप्रमाणें मनांत थोडासा जरी लोभ असला तरी तो सर्व गुण, औदार्य, यश व कीर्ति यांचा नाश करितो. लोभासारखा अपकीर्ति करणारा या त्रैलोक्यांत दुसरा कोणीहि नाहीं. १९० धनलोभी सर्वांच्या विरुद्ध असतो. लोभ सख्ख्या भावाची ताटा-तूट करितो. धनलोभासारखें बाधक व अपवित्र दुसरें कांहींच नाहीं. १९१.

सिद्धे अपि अर्थस्य साधने उत्कर्षे रक्षणे व्यये नाशोपभोगे नृणां आयासः त्रासः चिन्ता भ्रमः—धनाचें साधन जरी मिळालें तरी तें मिळवितांना व त्याचें संवर्धन, रक्षण व व्यय करितांना, नाश झाला असतां व उपभोग घेतांना मनुष्यांना क्रमानें आयास, भीति व भ्रम होतो. १७.

पहिल्यानें द्रव्य मिळविण्यासाठीं अतिशय कष्ट सोसावे; नंतर तें वाढविण्यासाठीं श्रम करावे; पण अगणित संपत्ति जरी मिळविली तरी लोभ कधीं पुरें म्हणतच नाहीं. ९२ लोक द्रव्य मिळविण्यासाठीं जसे मनापासून झटतात, तसे जर कां ते परमार्थासाठीं देह कष्टवितील तर ब्रह्म त्यांच्या हातचें खेळणेंच होईल. ९३ अशा महा-सायासानें मिळविलेल्या धनाचें रक्षण करण्याची मनाला मोठी चिंता लागून रहाते. रात्रंदिवस जीवाला मोठी धाक-धुक वाटत असते. ९४ स्त्री, पुत्र, माता, पिता यांतील कोणाचाच त्या धनिकाला विश्वास वाटत नाहीं. स्वतःवांचून दुसऱ्या कोणावर तो आपली संपत्ति विश्वासीत नाहीं. ९५ स्वतःच्या जीवावर बेतेल हें विसरून तो चोरांपासूनहि

परता। विश्वास अर्थी मानेना ॥ ९५ ॥ विसरोनियां निजघाता। चोरापासोनि राखे वित्ता। वित्तरक्षणीं निजचिंता। तिन्ही अवस्था एकाग्र ॥ ९६ ॥ ऐसी एकाग्रता करूनी। जरी लागता भगवद्भजनीं। तरी वश्य होता चक्रपाणी। अर्धक्षणीं साधका ॥ ९७ ॥ उचितानुचित विवाहासी। द्रव्य वेंचितां उदरासी। अतिशय होय कासाविसी। धन व्ययो त्रासासी उपजवी ॥ ९८ ॥ एवं जोडूनि रक्षितां द्रव्यासी। अवचटें नाश होय जैं त्यासी। तैं अतिभ्रम चढे मानसीं। होती धनपिशीं बद्धक ॥ ९९ ॥ द्रव्यार्जनीं वसे प्रयास। द्रव्यरक्षणीं चिंतेचा वास। द्रव्यव्ययीं वळसा त्रास। भ्रमाचा रहिवास धननाशीं ॥ २०० ॥ आदिमध्यावसानीं पाहीं। द्रव्य तें समूळ अपायी। तेथ सुखाचा लेश नाहीं। हें ना तें ऐसें पाहीं मज जाहलें ॥ १ ॥ आयासत्राससचिंतेसहित। धनापाशीं भ्रम नांदत। अर्थ तितुका अनर्थयुक्त। तोचि अर्थ स्वयें सांगे ॥ २ ॥

स्तेयं हिंसाऽनृतं दम्भः कामः क्रोधः स्मयो मदः। भेदो वैरमविश्वासः संस्पर्धा व्यसनानि च ॥ १८ ॥
एते पञ्चदशानर्था ह्यर्थमूला मता नृणाम्। तस्मादनर्थमर्थाख्यं श्रेयोर्थी दूरतस्त्यजेत् ॥ १९ ॥

अर्थ सर्वांगें अनर्थभूत। हें माझें वचन त्रिसत्य। पृथ्वीमाजीं जे जे अनर्थ। ते ते अर्थांत उपजती ॥ ३ ॥ पुसाल अर्थींचे अनर्थ। ते सांगतां असंख्य अनंत। संक्षेपें सांगेन येथ। पंधरा अनर्थ अर्थासी ॥ ४ ॥ प्रथम अनर्थ अर्थासी। चोरी वसे अर्थापाशीं। अर्थ नाहीं गा जयापाशीं। चोरापासून त्यासी भय नाहीं ॥ ५ ॥ द्रव्य नाहीं ज्याच्या हातीं। त्यातें देखोनि चोर भिती। कांहीं मागेल आम्हांप्रती। म्हणोनि लपती त्या भेणें ॥ ६ ॥ अतर्क्य नेत्रांतरें नेणें। कां धातुवादें सर्वस्व घेणें। परस्व भोळ्यांनीं बुडवणें। कां

धनाचें रक्षण करीत असतो. जाग्रत्-स्वप्न-सुषुप्ति या तीन्ही अवस्थांमध्यें तो एकाग्र चित्तानें धनरक्षणाची काळजी वहात असतो. ९६ अशा एकाग्र चित्तानें त्यानें जर भगवद्भजन केलें असतें तर अर्ध्या क्षणांत श्रीहरि त्याला वश झाला असता. ९७ लग्नकार्यांत कोठें अधिक-उणा खर्च झाला किंवा खाण्या-पिण्यांत दोन पैसे जास्त खर्च झाले, तर त्याचा जीव कासावीस होतो. द्रव्य खर्चण्याचें नांव काढलें कीं, त्याच्या मस्तकांत तिडिक उठते. ९८ अशा प्रकारें कवडी-कवडी जोडून द्रव्याचें रक्षण करीत असतां अकस्मात् जेव्हां त्या धनाचा नाश होतो, तेव्हां त्याच्या मनाला भ्रम होतो आणि तो द्रव्यलोभी धनशोकानें वेडा बनतो. ९९ द्रव्य मिळविण्यांत प्रयास पडतात. द्रव्याचें रक्षण करण्यांत चिंता ग्रासते. द्रव्य खर्च करण्यांत जीवाला त्रास होतो आणि द्रव्याचा नाश झाला असतां मन कायमचें भ्रांत होतें. २०० यावरून आरंभ, मध्य व अखेर या तीन्ही अवस्थांमध्यें द्रव्य सर्वथा अपायकारक आहे. त्यांत सुखाचा लेशहि मिळत नाहीं. होंहि नाहीं व तेंहि नाहीं, अशी माझी स्थिति झाली आहे १ द्रव्यापाशीं श्रम, त्रास काळजी यांसह भ्रम नांदत असतो. अर्थ तितका अनर्थकारक आहे. हेंच आतां तो कृपण स्वतः सांगतो. २०२.

स्तेयं०......व्यसनानि च एते पंचदश अनर्थाः नृणां अर्थमूलाः हि मताः—धनप्राप्तीसाठीं चोरी, हिंसा, मिथ्या भाषण, दंभ, काम व क्रोध असे महा व तें प्राप्त झालें असतां गर्व, मद, भेद, वैर, अविश्वास, स्पर्धा व स्त्री, द्यूत, मद्य अशीं तीन व्यसनें मिळून नऊ, असे एकंदर पंधरा अनर्थ मनुष्यांना धनामुळें प्राप्त होतात, असें मानिलें आहे. तस्मात् श्रेयोर्थी अनर्थाख्यं अर्थं दूरतः त्यजेत्—म्हणून परम पुरुषार्थाची इच्छा करणाऱ्या पुरुषानें या अनर्थाख्य अर्थाचा सर्वथा त्याग करावा. १८–१९.

द्रव्य सर्वस्वी क्लेशकारक आहे, हें माझें म्हणणें त्रिवार सत्य आहे. पृथ्वीवर जेवढे अनर्थ होतात, तेवढे सर्व धनामुळें उद्भवतात. ३ द्रव्यापासून होणारे अनर्थ जर विचारशील तर ते असंख्य आहेत. त्यांतील मुख्य पंधरा अनर्थ थोडक्यांत सांगतों, ते ऐक. ४ धनाचा पहिला अनर्थ म्हणजे जेथें द्रव्य असतें तेथें निरंतर चोरीचें भय असतें. ५ ज्या माणसापाशीं द्रव्य नसतें त्याला चोरांची मुळींच भीति नसते. द्रव्यहीन माणसाला पाहून उलट चोरच भितात. ६

विजनीं हरणें सर्वस्व ।। ७ ।। मार्गीं पडलें धन पराचें । स्वयें जाणोनि अमकियाचें । नाहीं देणें त्यासी साचें । हेही चोराचें लक्षण ।। ८ ।। स्वर्णस्तेयें नरकप्राप्ती । ऐसे विवेकीही चोरी करिती । मा इतरांची कायशी गती । चोरींची वस्ती धनापाशीं ।। ९ ।। जगीं महापापिणी चोरी । तीस कोणी बैसों नेदी द्वारीं । तें राहिली सुवर्णामाझारीं । धन तेथ चोरी निश्चित ।। २१० ।। देखतांचि त्या धनासी । विकल्पी होती संन्यासी । इतरांची कथा काइसी । चोरी धनापाशीं स्वयें ।। ११ ।। प्रथम अनर्थलक्षण । धनापाशीं चोरी जाण । धन हिंसेचें आयतन । तेंही निरूपण अवधारीं ।। १२ ।। धनालागीं द्वंद्व दारुण । पुत्र पौत्र मारिती जाण । धनालागीं घेती प्राण । सुहृदपण सांडोनी ।। १३ ।। धनलोभाचें कवतिक । कन्या बापासी देतसे विख । पितृघाताचें न मानी दुःख । निष्ठुर देख धनलोभ ।। १४ ।। धनलोभी सांडी बापमाये । स्त्री घेऊनि वेगळा राहे । तेथही धनलोभ पाहें । वैर होये स्त्रीपुरुषां ।। १५।। धनलोभाची नवलपरी । पुत्र पित्यातें जीवें मारी । पिता पुत्रातें संहारी । कठिण भारी धनलोभ ।। १६ ।। जे नवमास वाहे उदरांत । जे सदा सोशी नरकमूत । ते मातेचा करी घात । द्रव्यानिमित्त निजपुत्र ।। १७ ।। अभिनव धनलोभाची त्राय । नवल तें मी सांगों काय । पोटींचा पुत्र मारी माय । ऐसा अनर्थ होय धनासाठीं ।। १८ ।। एवं हिंसा ते हे संपूर्ण । दुसरें अनर्थलक्षण । आतां असत्याचें विंदान । तेंही निरूपण स्वयें सांगे ।। १९ ।। असत्य जन्मलें अर्थाच्या पोटीं । अर्थबळें तें दाटुगें सृष्टीं । अर्थासवें असत्य उठी । असत्याची गांठी अर्थेसीं ।। २२० ।। तो अर्थ असे जयापाशीं । कां अर्थअपेक्षा जयासी । तेथ असत्य वसे कुटुंबेंसीं । धन तें मिरासी मिथ्यात्वीं ।। २१ ।। अर्थबळ थोर

हा आमच्या जवळच कांहीं मागतो कीं काय, या धास्तीनें त्याला पहातांच चोर लपून बसतात. एखाद्याचें द्रव्य किंवा वस्तु त्याची नजर चुकवून घेऊन जाणें; कोणाला किमयेच्या नादीं लावून त्याचें सर्वस्व लुबाडून घेणें; किंवा एखाद्याच्या भोळेपणाचा फायदा घेऊन त्याला फसविणें; कोणाला जंगलांत एकटें गांठून त्याचें सर्वस्व हरण करणें; ७ एखाद्याचें धन वाटेंत पडलेलें सांपडलें व तें कोणाचें आहे हें ठाऊक असूनहि ज्याचें त्यास परत न देणें; हीं सर्व चोरीचींच लक्षणें होत. ८ सोन्याची चोरी करणारास नरकप्राप्ति होते, हें जाणत असूनहि विवेकी लोकसुद्धां जर चोरी करितात, तर मग इतरांची काय कथा! धनाजवळ चोरीची वस्तीच असते. ९ जगामध्यें चोरी महापातकी असल्यामुळें तिला कोणी दारांत बसूं देईना; तेव्हां ती सोन्याजवळ जाऊन राहिली. तेव्हांपासून 'जेथें द्रव्य तेथें चोरी' ही गोष्ट निश्चित ठरली. २१० द्रव्य दृष्टीस पडतांच संन्याशांचीहि बुद्धि जेथें भ्रष्ट होते, तेथें इतरांची काय प्रतिष्ठा! कारण द्रव्याजवळ चोरी स्वतःच रहात असते. ११ 'धनाजवळ चोरी असणें,' हें पहिलें लक्षण झालें. आतां धनच हिंसेचें आश्रयस्थान आहे. याविषयींचें निरूपण ऐक. १२ द्रव्यामुळें भयंकर द्वेष उत्पन्न होतो. पुत्र-पौत्र आपल्या वाड-वडिलांना मारतात. ते आप्तपणा विसरून परस्परांचा प्राण घेतात. १३ द्रव्यलोभाचा असा चमत्कार आहे कीं, कन्या आपल्या पित्याला विष घालिते. तिला पितृघाताचें दुःख वाटत नाहीं. इतकी ती धनलोभानें निष्ठुर होते. १४ द्रव्यलोभी पुरुष आपल्या माता-पित्यांस सोडून देतो. स्त्रीला घेऊन वेगळा रहातो पण तेथेंहि धनलोभानें त्या पति-पत्नींत वैर उत्पन्न होतें. १५ धनलोभाचा प्रभाव इतका विचित्र आहे कीं, पुत्र पित्याचा वध करितो व पिता पुत्राचा जीव घेतो. असा द्रव्यलोभ मोठा कठिण आहे. १६ ज्या मातेनें नऊ महिने गर्भाचा भार सहन केला, बाळपणीं मल-मूत्र काढून खस्ता खाल्या तिचा द्रव्यलोभानें घात करण्यास पुत्र कचरत नाहीं. १७ धनलोभाचें सामर्थ्य किती विलक्षण आहे तें काय सांगावें! प्रत्यक्ष माता आपल्या पोटच्या बाळाचा प्राण घेते. एका द्रव्यासाठीं इतका अनर्थ होतो. १८ याप्रमाणें दुसरें अनर्थलक्षण जी हिंसा ती सविस्तर सांगितली. आतां असत्याचा प्रताप सांगतों, तो ऐक. १९ द्रव्याच्या पोटींच असत्याचा जन्म झाला. द्रव्याच्या बळावर तें सगळ्या सृष्टींत अत्यंत प्रबल झालें . जेथें द्रव्य असेल तेथें असत्य रहातें. त्या दोहोंची अगदीं गट्टी आहे. २२० ज्याच्यापाशीं द्रव्य असेल, किंवा ज्याला द्रव्य मिळविण्याची इच्छा असेल त्याच्याजवळ असत्य सहकुटुंब रहात असतें. धन असत्याचें मिराशी आहे. २१ असत्याला द्रव्याचा मोठा आधार असतो. तें पित्यापाशीं मिथ्या भाषण करण्यास

असत्यासी । मिथ्या बोलवी बापासी । धनलोभें झकवी मातेसी । सत्यत्व धनापाशीं असेना ॥ २२ ॥ क्रयविक्रयीं धनलोभें जाण । मिथ्या बोलती साधारण । परी वेदशास्त्रसंपन्न । धनार्थ सज्ञान बोलती मिथ्या ॥ २३ ॥ वेदींचा आठव न ये पूर्ण । तो संभावनेलागीं जाण । म्हणवी मी वेदसंपन्न । कराया यजन नीचाचें ॥ २४ ॥ भाग देऊनि मध्यस्था । मी चतुःशास्त्रीं विख्याता । ऐसें मिथ्यात्वें छळी पंडितां । राजद्रव्यार्थालागूनी ॥ २५ ॥ विरक्त म्हणविती परमार्थी । तेथही असत्यें घातली वस्ती । नाथल्या सिद्धी दाविती । अर्थप्राप्तीलागोनी ॥ २६ ॥ अर्थीं असत्याचा बडिवारू । सद्भावें केला जो सद्गुरू । त्यासी मिथ्या नास्तिक विचारू । एकांतीं नरू प्रतिपादी ॥ २७ ॥ अर्थ नाहीं जयापाशीं । ना अर्थकल्पना जयासी । असत्य स्पर्शेना तयासी । कदाकाळेंसी कल्पांतीं ॥ २८ ॥ अर्थापाशीं असत्य जाण । त्याचें सांगीतलें लक्षण । आतां अर्थापाशीं दंभ संपूर्ण । तेही बोळखण अवधारीं ॥ २९ ॥ पोटीं नाहीं परमार्थ । धरोनियां अर्थस्वार्थ । स्वयें म्हणविती हरिभक्त । या नांव निश्चित भजनदंभू ॥ २३० ॥ धन जोडावयाकारणें । टिळे माळा मुद्रा धारणें । धनेच्छा उपदेश देणें । या नांव जाणणें दीक्षादंभू ॥ ३१ ॥ देखोनि धनवंत थोरू । त्याचे उपदेशीं अत्यादरू । नेमूनि गुरुपूजाकरभारू । सांगे मंत्र तो दांभिक ॥ ३२ ॥ जयांपासोनि होय अर्थप्राप्ती । ते समर्थ शिष्य आवडती । दीन शिष्यातें उपेक्षिती । हे दांभिकस्थिति गुरुत्वा ॥ ३३ ॥ गुरूसी द्यावें तनु मन धन । ऐसें उपदेशूनि जाण । जो द्रव्यसंग्रहीं आपण । तें दांभिकपण गुरुत्वा ॥ ३४ ॥ जेथ धनलोभ गुरूपाशीं । तो काय तारील शिष्यांसी । धनलोभाची जाती ऐसी । करी गुरुत्वासी दांभिक ॥ ३५ ॥ अखंड भूतीं ऐसा जाण । गुरूपाशील न्यावया धन । उपदेश घे होऊनि दीन । तो दांभिक जाण शठ शिष्य ॥ ३६ ॥

लाविते. द्रव्यलोभानें मातेलाहि फसवावयास लाविते. कारण द्रव्यापाशीं सत्य केव्हांहि रहात नाहीं. २२ द्रव्यलोभानें कन्याविक्रय करितेवेळीं सामान्य लोक तर खोटें बोलतातच; पण वेद-शास्त्रसंपन्न विद्वान्‌हि द्रव्यासाठीं असत्य भाषण करितात. २३ ज्यानें वेद पुरता म्हटलेलाहि नसतो तो संभावनेसाठीं स्वतःला वेदसंपन्न म्हणवून घेतो व द्रव्यलोभानें नीच माणसाच्या घरीं यज्ञ-याग करितो. २४ मध्यस्थ माणसाला लांच कबूल करून स्वतःला प्रसिद्ध चतुःशास्त्री (चार वेद जाणणारा) म्हणवितो व राजद्रव्याच्या आशेनें पंडितांना व्यर्थ छळीत असतो. २५ जे विरक्त परमार्थी म्हणवितात, त्यांजपाशींहि असत्यानें आपली वस्ती केलीच आहे. कारण ते द्रव्यप्राप्तीसाठीं खोट्याच दांभिकपणाच्या सिद्धि दाखवीत असतात. २६ द्रव्यापाशीं असत्याची मोठी बडेजाव असते. सद्भावानें जो गुरु केलेला असतो, त्याच्यापाशीं एकान्तात शिष्य मिथ्या नास्तिक विचार प्रकट करितो. २७ ज्याच्यापाशीं द्रव्य नाहीं किंवा द्रव्याची कल्पना नाहीं त्याला असत्य कधीं स्पर्शहि करीत नाहीं. २८ धनापाशीं असत्याची पूर्ण वस्ती कशी असते, त्याचें सर्व लक्षण सांगितलें. आतां द्रव्याजवळ दंभहि पूर्णपणें कसा असतो, त्याचेंहि वर्णन ऐक. २९ मनांत तर परमार्थाचें नांवहि नाहीं, पण द्रव्य मिळविण्याच्या तीव्र इच्छेनें हरिभक्त म्हणवून घेणें याला भजनदंभ असें म्हणतात. २३० धन मिळविण्यासाठीं टिळे, माळा, मुद्रा धारण करणें, द्रव्याच्या इच्छेनें गुरुपदेश देणें याला दीक्षादंभ म्हणतात. ३१ जो मनुष्य एखादा धनाढ्य गृहस्थ पहातांच त्याला मोठ्या आदरानें उपदेश करितो व गुरुपूजेचें अमुक द्रव्य किंवा दक्षिणा दिली पाहिजे, असा करार करून मग उपदेशांचा मंत्र सांगतो, तो दांभिक होय. ३२ ज्याच्याकडून द्रव्याची प्राप्ति होते, ते श्रीमान् शिष्य त्याला आवडतात व जे बिचारे द्रव्यहीन दीन असतात त्यांची तो उपेक्षा करितो. हाच गुरूचा दांभिकपणा होय. ३३ 'गुरूला तन, मन, धन सर्वस्व अर्पण करावें' असा शिष्यांना उपदेश करून द्रव्याचा संग्रह करणारा गुरु दांभिक होय. ३४ गुरूच जेथें द्रव्यलोभी तेथें तो शिष्यांना काय तारणार ! धनलोभाचा स्वभावच मुळीं असा आहे कीं, तो शिष्याला दांभिक बनवितो. ३५ तो सर्व भूतांशीं असाच वागतो. गुरूजवळचें धन नेण्यासाठीं जो दीन होऊन उपदेश घेतो, तोहि ढोंगी व लबाड शिष्य समजावा. ३६ गुरूपदेशानें ज्ञानसंपादन केल्यावर जो ज्ञानाभिमानी होतो व गुरूला

गुरूपदेशें शिकोनि युक्ती। स्वयें ज्ञानाभिमाना येती। गुरूतें मानी प्राकृतस्थिती। तोही निश्चितीं दांभिकू ॥ ३७ ॥ मी एक सधन सज्ञान। ऐसा सूक्ष्मरूप ज्ञानाभिमान। करी गुरुआज्ञेचें हेळण। हेंही लक्षण दंभाचें ॥ ३८ ॥ अहं ब्रह्म हेही स्फूर्ती। न साहे जेथ स्वरूपस्थिती। तेथ मी ज्ञाता हे धोंगडी युक्ती। स्फुरे निश्चितीं सूक्ष्मदंभें ॥ ३९ ॥ जीवासी देहाचें मध्यस्थान। तेथ दंभाचें अधिष्ठान। त्यासी मिळोनियां मन। ज्ञानाभिमान उपजवी ॥ २४० ॥ नवल दंभाचें कवतिक। आम्ही अग्निहोत्री याज्ञिक। तेचि जीविका करूनि देख। नाडले वेदपाठक धनलोभें ॥ ४१ ॥ सोडूनि परमार्थाची पोथी। ब्रह्मज्ञान सांगे नाना युक्तीं। तेही ज्ञाते दंभें नाडिजेती। द्रव्यासक्ती धनलोभें ॥ ४२ ॥ मंत्रतंत्रांची कथा कोण। मुख्य गायत्री वेंचिती ब्राह्मण। आम्ही स्वधर्मनिष्ठापावन। म्हणती जाण दांभिक ॥ ४३ ॥ दंभें नाडिलें संन्यासी। लौकिक राखणें पडे त्यासी। ज्यालागीं मुंडिले शिरीं। त्या अर्थासी विसरले ॥ ४४ ॥ दृष्टि सूनि अन्नसन्मान। संन्यासी करिती शौच स्नान। शुद्ध न करवेचि निजमन। वादव्याख्यान अतिदंभें ॥ ४५ ॥ घ्यावया परद्रव्य परान्न। कां देहप्रतिष्ठेलागीं जाण। मिथ्या दाखवी सात्त्विकपण। हें दंभलक्षण पैं चौथें ॥ ४६ ॥ द्रव्यापाशीं वसे काम। अतिशयें अतिदुर्गम। द्रव्य तेथ कामसंभ्रम। अतिविषम सांगत ॥ ४७ ॥ द्रव्य नसतां अपेक्षा काम। तीं सबाह्य करवी अतिश्रम। अनेक कष्टांचें विषम। अतिदुर्गम भोगवी ॥ ४८ ॥ धन झालिया उन्माद काम। करूं लागे अगम्यागम। उपजवी नाना अधर्म। निंद्य कर्म धनवंता ॥ ४९ ॥ कामू जडलासे धनेंसीं। तो सदा छळी धनवंतासी। काम खवळे धनापाशीं। अहर्निशीं मुसमुशित ॥ २५० ॥ धनापाशीं अति उद्धतू। काम पांचवा अनर्थु। काम तेथ निश्चितू। क्रोध नांदतू सैन्येंसीं ॥ ५१ ॥ कामप्राप्तीसी आडवी काडी। होतां

सामान्य अज्ञ समजतो, तोहि दांभिक शिष्य जाणावा. ३७ 'मीच काय तो धनिक, ज्ञानी' असा ज्याच्या अंतःकरणांत अभिमान असतो व जो गुरूच्या आज्ञेचा अनादर करितो, तो शिष्य ढोंगी होय. ३८ खऱ्या ब्रह्मस्वरूपाची स्थिति प्राप्त झाली म्हणजे 'अहं ब्रह्म' म्ह० मीच ब्रह्म आहें, ही स्फूर्तीहि व्यर्थच होते. कारण मग त्या ठिकाणीं 'मी ज्ञाता' असें म्हणणें हेंहि कपटच होय. ती वृत्ति अंतःकरणांतील सूक्ष्म दंभानेंच उत्पन्न होते. जीवाचें स्थान देहाच्या मध्यभागीं आहे. तेथेंच दंभाचें अधिष्ठान असतें. ३९ मन त्यांत मिळून ज्ञानाभिमान उपजवितें. २४० दंभाची लीला मोठी विलक्षण खरी! मोठे याज्ञिक व अग्निहोत्री म्हणविणारेहि भिक्षेवर निर्वाह करितात. वेदपठण करणारेहि असेच धनलोभानें नाडले गेले आहेत. ४१ ते परमार्थाची पोथी सोडून अनेक प्रकारें ब्रह्मज्ञान सांगावयास लागतात. पण तेहि विद्वान् धनलोभानें व द्रव्याच्या आसक्तीनें दंभामुळें नाडिले जातात. ४२ मंत्र-तंत्रांची गोष्ट तर काय सांगावी! ब्राह्मण तर मुख्य गायत्री मंत्राचाच विक्रय करितात आणि स्वतःला स्वधर्मनिष्ठ, पवित्र म्हणवितात. ते खरोखर दांभिक होत. ४३ दंभानें संन्याशांनाहि नाडिलें आहे. कारण त्यांनाहि लौकिक राखावा लागतो. ज्या मुख्य हेतूनें त्यांनीं संन्यास घेतलेला असतो तें ब्रह्मचिंतन ते विसरतात. ४४ केवल चमचमीत अन्न व सन्मान यांकडेच दृष्टि ठेवून संन्यासी वरून स्नान, शौच इत्यादि पवित्रपणा दाखवितात; पण त्यांना स्वतःचे अंतःकरण कांहीं शुद्ध करतां येत नाहीं. ते अत्यंत दंभानें वृथा वादविवाद करीत बसतात. ४५ परद्रव्य व परान्न मिळावें, आपल्या देहाची प्रतिष्ठा वाढावी म्हणून वरून खोटाच सात्त्विकपणा दाखवितात. हें चौथें दंभलक्षण झालें. ४६ द्रव्याजवळ कामाची निरंतर वस्ती असते. तो अत्यंत प्रबल असल्यामुळें त्याला जिंकणें फार कठिण आहे. जेथें द्रव्य असतें तेथें कामासक्तीहि अनिवार असते. ४७ द्रव्य नसणाऱ्यालाहि जर काम छळीत असतो व त्याला अंतर्बाह्य पीडा देऊन अनेक क्लेश भोगवितो, ४८ तर मग धनिकाची गोष्ट काय सांगावी! द्रव्यमदानें तो हव्या त्या स्त्रीशीं व्यवहार करवितो व अनेक अधर्म माजवितो. धनवान् वाटेल तें निंद्य कर्म करितो. ४९ काम द्रव्याला कायमचा जडलेला असल्यामुळें तो धनिकाला छळीत असतो. जेथें द्रव्य असेल तेथें काम खवळतो. कारण रात्रंदिवस धनापाशीं कामेच्छा मुसमुसत असते. २५० असा जो हा पांचवा अनर्थ व अत्यंत उन्मत्त असलेला काम तो द्रव्याजवळ असतो. जेथें काम असतो तेथें क्रोध ससैन्य वस्ती करितो. ५१ इच्छित वस्तु प्राप्त होण्याच्या आड एक काडी आली कीं, लगेच क्रोध उडी टाकून तेथें

क्रोधाची पडे उडी । खवळला अतिकडाडी । तपाच्या कोडी निर्दाळित ॥ ५२ ॥ जप तप निष्ठा नेम । शिणोनि साधिलें दुर्गम । क्रोध अतिखवळल्या परम । ते करी भस्म क्षणार्धें ॥ ५३ ॥ धनाकडे कोणी दावी बोट । तेथ क्रोध उठी अचाट । वाढवी प्राणांत कचाट । क्रोध अतिदुष्ट धनेंशीं ॥ ५४ ॥ धनागमनीं अवरोधू । कां धनव्ययाचा संबंधू । ते संधीं खवळे क्रोधू । अतिविरोधू उन्मत्त ॥ ५५ ॥ धनापाशीं क्रोध समर्थू । हा सहावा अतिअनर्थू । धनापाशीं गर्व अद्‌भुतू । तेंचि निश्चितू सांगत ॥ ५६ ॥ धनगर्वाचिये पुष्टी । सखा बाप नाणी दृष्टीं । मातेतें म्हणे करंटी । इतरांच्या गोष्टी त्या काय ॥ ५७ ॥ सिद्ध साधक तापसी । त्यातें देखोनि उपहासी । म्हणे करंटे ते होती संन्यासी । हरिदासासी विटावी ॥ ५८ ॥ अंगीं धनाचें समर्थपण । त्याहीवरी जैं झालें ज्ञान । तैं गर्वाचा ताठा चढे पूर्ण । जेवीं आरें धारणू गिळिला ॥ ५९ ॥ धनज्ञानगर्वाची जात कैशी । गर्व करी सद्‌गुरूसी । त्याच्या वचनातें हेळसी । शेखीं धिक्कारेंसीं निर्भर्त्सी ॥ २६० ॥ धनज्ञानगर्वाचें लक्षण । देखे सद्‌गुरूचे अवगुण । गुरूसी ठेवी मूर्खपण । मी एक सज्ञान हे मानी ॥ ६१ ॥ जो भ्रांत म्हणे सद्‌गुरूसी । गुरू मानी त्यातें द्वेषी । बाप गर्वाची जाती कैशी । देखे गुणदोषांसी सर्वांच्या ॥ ६२ ॥ नवल गर्वाची पैं काहणी । गुणु सर्वथा सत्य न मानी । दोष पडतांचि कानीं । सत्य मानी निश्चित ॥ ६३ ॥ सात्त्विक ये गर्वितापुढें त्यासी सर्वथा मानी कुडें । अतिसात्त्विकता दृष्टी पडे । तरी मानी वेडें अर्बुज ॥ ६४ ॥ अंगीं भवंडी भरे लाठी । तैं भूमी लागे ललाटीं । साष्टांग नमावया सृष्टीं । पात्र गर्वदृष्टी दिसेना ॥ ६५ ॥ तेथें कोण दे सन्मान श्रेष्ठा । कायसी वृद्धाची प्रतिष्ठा । धनगर्वें चढला ताठा । मी एक मोठा ब्रह्मांडीं ॥ ६६ ॥

प्रकट होतो. तो एकदां खवळला म्हणजे कोट्यवधि तपांच्या राशी नाहींशा करितो. ५२ एकदां क्रोध खवळला कीं, तो जप, तप, भक्ति, व्रतादि नियम हें जें सर्व मोठ्या कष्टांनीं जोडलेलें असतें त्या सर्वांचें एका क्षणांत भस्म करितो. ५३ धनाकडे कोणी नुसतें बोट जरी दाखविलें तरी क्रोध अत्यंत खवळतो आणि त्यामुळें प्राणावरहि संकट ओढवतें. असा दुष्ट क्रोध धनापाशीं रहातो. ५४ धन मिळविण्यांत कांहीं अडथळा आला, किंवा धन खर्च करण्याचा संबंध आला कीं, क्रोध तत्काळ खवळतो आणि उन्मत्तपणानें वैर करितो. ५५ द्रव्यापाशीं दारुण क्रोध हा सहावा महान् अनर्थ आहे. द्रव्याजवळ विलक्षण गर्व असतो. आतां त्याविषयींहि सांगतों, ऐक. ५६ एकदां धनाच्या गर्वाची धुंदी डोळ्यावर चढली कीं, त्या माणसाला प्रत्यक्ष आई-बापहि दिसेनासे होतात. आईलाहि तो कपाळकरंटी म्हणतो. मग इतरांचा काय पाड ! ५७ सिद्ध, साधक, तापसी यांना पाहून त्यांचा उपहास करितो. ५८ ‘ जे दरिद्री असतात तेच संन्याशी होतात ’ असें तो म्हणतो व हरिदासांची टवाळी करितो. आधींच द्रव्यमदानें उन्मत्त झालेला, त्यांत जर कां विद्या प्राप्त झाली, तर मग तो गर्वानें इतका फुगतो कीं, जणुंकाय अजगरानें मुसळ गिळल्याप्रमाणें त्याची अवस्था होते. ५९ धन आणि ज्ञान यांच्या गर्वाचें लक्षण ऐक. सद्‌गुरूशीं ताठ्यानें वागतो, त्याच्या शब्दाची अवहेलना करितो आणि शेवटीं त्याचा धिःकार करून निर्भर्त्सना करितो, २६० सद्‌गुरूचे दोष काढून, त्याला मूर्ख मानून स्वतःला मोठा ज्ञाता समजणें हेंच द्रव्य व ज्ञान यांच्या गर्वाचें लक्षण आहे. ६१ तो सद्‌गुरूला भ्रांत म्हणतो. गुरूला जो मानितो त्याचा द्वेष करितो. गर्वाचा स्वभावच असा आहे कीं, तो सर्वांचे गुण-दोष पहात असतो. ६२ गर्वाचें दुसरें एक आश्चर्य असें आहे कीं, तो कोणाचे गुण खरे मानीत नाहीं. पण दोष कानीं पडतांच ते मात्र लगेच खरे समजतो. ६३ गर्विष्ठ माणसापुढें एखादा सामान्य सात्त्विक मनुष्य असल्यास त्याला तो वाईट ठरवितो व अत्यंत सात्त्विक जर त्याच्या दृष्टीला पडला तर तो त्याला व्यवहारशून्य मूर्खच मानितो. ६४ गर्विष्ठ माणसाला एकाएकीं भोंवळ येऊन तो जर खालीं पडला, तरच त्याचें कपाळ जमिनीला टेंकणार. एरवीं साष्टांग नमस्कार घालण्यास योग्य असें त्याला जगांत कोणीच दिसत नाहीं. ६५ ‘ मीच काय तो एका सगळ्या ब्रह्माण्डांत श्रेष्ठ आहें ’ असा धनगर्वाचा ताठा चढल्यावर तेथें वरिष्ठाचा सन्मान व वडिलांची प्रतिष्ठा कोण ठेवितो ! ६६ एखादा शिष्य गुरुसेवेवर निष्ठा

एक गुरुसेवाविश्वासकू । निजसेवा झाला वश्यकू । त्यासी गर्व चढे मी सेवकू । तो अतिबाधकू सेवका ॥ ६७ ॥ ऐसा गर्व उन्नद्ध । हा सातवा गर्वबाध । आतां धनापाशीं महामद । तोही संबंध द्विज सांगे ॥ ६८ ॥ जयासी चढे धनमदू । तो उघडे डोळां होय अंधू । कानीं नायके शब्दबोधू । धनमदें स्तब्धू सर्वदा ॥ ६९ ॥ धनमदें अतिअहंता । धनमदें उद्धतता । धनमदें अद्वातद्वतां । करी सर्वथा अधर्म ॥ २७० ॥ धनमद अतिअपवित्र । तो चढल्या होय अतिदुस्तर । न म्हणे पात्र अपात्र । विचरे विचित्र योनीसी ॥ ७१ ॥ जो धनमदा वश होय । तो न मानी कोणाचेंही भय । न जावें तेथ स्वयें जाय । न खावें तें खाय यथेष्ट ॥ ७२ ॥ न धरावा तो संग धरी । न करावें तें कर्म करी । न बोलावें तें उच्चारी । जनाभीतरीं उद्धतू ॥ ७३ ॥ न देखे आपुलें केलें । परापवाद स्वयें बोले । नायके बापाचें शिकविलें । वेडें केलें धनमदें ॥ ७४ ॥ शिकविलें तें नायके । वारिलें तें करी आवश्यकें । साधु-निंदा निजमुखें । यथासुखें जल्पत ॥ ७५ ॥ न मानी स्वयाती स्वाचारू । न मानी दोष अनाचारू । न मानी वडिलांचा विचारू । धनमदें थोरू मातला ॥ ७६ ॥ आधींच तारुण्यें अतिलाठा । वरी धनमदें चढला ताठा । यापरी मातला मोठा । न चाले वाटा सुपथीं ॥ ७७ ॥ स्त्रीकामें अतिविव्हळ । न विचारी कुळशीळ । न म्हणे सकाळ सांज वेळ । विचरे केवळ खरू जैसा ॥ ७८ ॥ अभिलाषूनि परनारी । दिवसा विचरे दुपारीं । गतालकाही अंगीकारी । भय न धरी पापाचें ॥ ७९ ॥ जो मातला करूनि मद्यपान । तो मद तत्काळ उतरे जाण । त्याहूनि धनमद दारुण । आल्याही मरण उतरेना ॥ २८० ॥ अकर्म करितां आपण । तेंचि निजाघातें घेईल प्राण । हेही नाठवे आठवण । धनमदें जाण भुलला ॥ ८१ ॥ महाअनर्थीं धनमद जाण । हें आठव्या अनर्थाचें लक्षण । आतां धनापाशीं भेद पूर्ण ।

ठेवितो व त्याच्या सेवेंत तत्पर असतो; पण 'गुरुसेवा करणारा काय तो मीच' असा त्याला गर्व चढतो. तो गर्वच त्याला अखेर बाधक होतो. ६७ गर्वाचा उन्माद हा सातवा अनर्थ झाला. आतां द्रव्याजवळ असणारा जो महामद त्याचाहि प्रभाव तो द्विज सांगत आहे. ६८ ज्या माणसाला द्रव्यमद चढतो, तो उघड्या डोळ्यांनीं अंध बनतो. कानांनीं त्याला बोधाचे शब्द ऐकूं येत नाहींत. तो धनमदानें निरंतर स्तब्ध होऊन रहातो. ६९ धनमदानें त्याला अत्यंत अहंकार येतो. तो उन्मत्त होतो. हवें तें बडबडतो व सर्वथा अधर्म करितो. २७० द्रव्यमद अतिशय अपवित्र आहे. तो एकदां चढला कीं, त्याचें निवारण करतां येत नाहीं. तो पात्र-अपात्र म्हणत नाहीं. तो विचित्र योनींशींहि संबंध ठेवितो. ७१ जो द्रव्यमदाच्या वश होतो तो कोणतेंहि भय मानीत नाहीं. जेथें जाऊं नये तेथें स्वतः जातो. जें खाऊं नये तें खातो. ७२ धरूं नये त्याची संगत धरितो. करूं नये तें कर्म करितो. चार मंडळींत जें उच्चारूं नये तें उद्दामपणानें बोलतो. ७३ आपलें स्वतःचें कृत्य पहात नाहीं, पण दुसऱ्याचे दोष मात्र काढीत बसतो. पित्यानें चांगलें शिकविलें तरी त्याचें ऐकत नाहीं. इतका तो धनमदानें वेडा होतो. ७४ जें शिकवावें तें ऐकत नाहीं. जें न करण्याविषयीं बजावावें, तें अवश्य करितो. तोंडानें साधूंची निंदा यथा-स्थित करीत असतो. ७५ आपली जात, आपला आचार यांचा विचार करीत नाहीं. आचारांत दोष पहात नाहीं. वडिलांची सल्लामसलत कधीं ऐकत नाहीं. इतका तो धनमदानें उन्मत्त होतो. ७६ आधींच तारुण्याचा अंगांत संचार झालेला, त्यांत द्रव्यमदाची भर पडली कीं, तो त्या ताठ्यामुळें सरळ मार्गानें मुळीं चालतच नाहीं. ७७ तो स्त्री-सुखा-साठीं अति विव्हल होतो. कुल-शीलाचा विचार करीत नाहीं. सकाळ-संध्याकाळ, काळ-वेळ कांहीं पहात नाहीं. शुद्ध गाढवासारखा वागतो. ७८ परस्त्रीचा अभिलाष ठेवून दिवसां, दुपारीं तिच्याशीं विलास करितो. वपन केलेल्या विधवेलाहि पत्करितो. इतका तो निर्ढावलेला असतो कीं, पापाची भीतीच बाळगीत नाहीं. ७९ मद्यपानाची धुंदी थोड्या वेळानें तरी उतरते; पण द्रव्यमद त्याहूनहि भयंकर आहे. मरण आलें तर तो उतरत नाहीं. २८० आपण अधर्माचरण केल्यास शेवटीं त्यानें आपलाच घात होईल व प्राणावर बेतेल, याचीहि त्याला आठवण रहात नाहीं. इतका तो द्रव्यमदानें भ्रमांत पडतो. ८१ असा हा द्रव्यमद महा अनर्थ करणारा आहे. हें आठव्या अनर्थाचें

तेंचि निरूपण द्विज सांगे ।। ८२ ।। भेद जन्मला धनाचे कुशीं । धन तेथ भेदाची मिराशी । भेद सपरिवार धनापाशीं । अहर्निशीं जागत ।। ८३ ।। हाता आलिया बहु धन । मातेहूनि राखे भिन्न । पित्यासी करी वंचन । स्त्रियेसीही जाण कळों नेदी ।। ८४ ।। अर्थ पुत्रासी अतर्क्यता । तेथ इतरांची कोण कथा । भेद तो अर्थापरता । जगीं सर्वथा असेना ।। ८५ ।। माथां साहोनि शस्त्रघात । बंधु बंधूसी रणीं साह्य होत । तेंचि बंधू अनाप्त होत । वांटितां अर्थविभाग ।। ८६ ।। मित्र मित्रांसी वेंचिती प्राण । तेथें प्रवेशोनियां धन । विकल्पा आणी मित्रपण । भेद दारुण धनापाशीं ।। ८७ ।। आपणचि गांठीं बांधिलें धन । तें क्षणक्षणां पाहे आपण । येथवरी धनापाशीं जाण । विकल्प पूर्ण नांदत ।। ८८ ।। ऐसा धनापाशीं भेद जाण । हें नववें अनर्थलक्षण । अतिशयें अतिनिर्वाण । वैर दारुण धनेंसीं ।। ८९ ।। धनापाशीं वैर पूर्ण जाण । हें अंगें भोगूनि आपण । सांगे कदर्यु ब्राह्मण । वैरलक्षण धनाचें ।। २९० ।। पित्यापुत्रांमाजीं विरोधू । पाडितो हा द्रव्यसंबंधू । वैरी करी अति सखे बंधू । तो हा प्रसिध्द धनलोभ ।। ९१ ।। आपुल्या कळवळ्याचे सुहृद । त्यांसी धनलोभ पाडी द्वंद्व । धनास्तव अतिसुबद्ध । वैर विरुद्ध सर्वांसी ।। ९२ ।। प्राणाहूनि पढिये मित्र । त्यांसी धनलोभ करी शत्रू । धनलोभ अतिअपवित्रू । वैरी दुस्तरू जगीं हा ।। ९३ ।। बंधुकलहें धन वांटितां । अधिक न ये आपुल्या हाता । तैं वांटा करिती जे धर्मतां । त्या साधूसी तत्त्वतां वैर चाळी ।। ९४ ।। जिचे उदरीं जन्मला आपण । जिचें सदा केलें स्तनपान । मातेसी धनलोभें जाण । वैर संपूर्ण चालवी ।। ९५ ।। आपली जे कां निजजननी । अर्थ तीतें करी वैरिणी । बाहेर घाली घरांतूनी । मुख परतोनी पाहेना ।। ९६ ।। ज्याचेनि तुटे भवबंधन । ज्याचेनि बोलें होईजे पावन । त्या सद्गुरूसी अबोला जाण । धनाभिमान धरवित ।। ९७ ।।

लक्षण झालें. धनाजवळ भेद पूर्णपणें रहात असतो, आतां त्याचेंहि निरूपण ब्राह्मण करितो. ८२ धनाच्या कुशींतून भेद उत्पन्न झाल्यामुळें जेथें धन, तेथें भेद आपल्या सर्व परिवारासह हक्कानें रात्र-दिवस जागत असतो. ८३ एखाद्याच्या हातीं अकस्मात् विपुल द्रव्य आलें, तर तो मातेला तें कळूं देत नाहीं. पित्याला फसवितो. स्त्रीच्याहि न कळत त्याचा संग्रह करितो. ८४ पुत्रालाहि आपल्या संपत्तीचा थांग लागूं देत नाहीं. तेथें इतरांची काय कथा ! जगांत द्रव्यासारखा दुसरा कोणीहि भेद करणारा दिसत नाहीं. ८५ मस्तकावर होणारे शस्त्रप्रहार सोसून जे बांधव युद्धामध्यें परस्परांस साह्य करितात, तेच द्रव्याचा विभाग करण्याची वेळ आली असतां एकमेकांचे वैरी बनतात. ८६ एरवीं मित्र मित्रासाठीं प्राण देतात. पण द्रव्याचा प्रश्न आला कीं, त्या मित्रत्वांतहि विकल्प प्रवेश करितो. असा द्रव्याजवळ भयंकर भेद भरलेला असतो. ८७ आपल्याच पदराला बांधून ठेविलेल्या धनाकडे आपण क्षणोक्षणीं तें सुरक्षित आहे कीं नाहीं, म्हणून पहात असतों. इतका धनापाशीं पूर्ण विकल्प नांदत असतो. ८८ अशा प्रकारचा भेद हें नववें अनर्थलक्षण झालें. धनापाशीं अनिवार वैर भरलेलें आहे. ८९ त्याचा स्वतः अनुभव घेऊन तो कृपण ब्राह्मण वैराचें लक्षण सांगत आहे. २९० द्रव्याचा संबंध आला कीं, पिता-पुत्रांतहि वैर उत्पन्न होतें. सख्खे भाऊ परस्परांचे वैरी बनतात. असा हा धनलोभ प्रसिद्ध आहे. ९१ आपल्या जीवाचें जे सहृद् असतात, त्यांच्यातहि हा धनलोभ कलह उत्पन्न करितो. द्रव्यासाठीं चांगल्या समंजस लोकांतहि अनिवार वैर उत्पन्न होतें. ९२ प्राणाहूनहि प्रिय असलेल्या स्नेह्यांना हा धनलोभ शत्रु बनवितो. असा हा धनलोभ या जगांत अत्यंत अपवित्र व दुस्तर वैरी आहे. ९३ बंधूंचा आपसांत कलह लागला असतां द्रव्याचा न्यायानें विभाग करून देणाऱ्या त्रयस्थ माणसाला एका कवडीचाहि लाभ होत नाहीं. परंतु त्या सज्जनानें निःपक्षपातानें विभाग केला म्हणून त्याच्याशींहि वैर उत्पन्न होतें. ९४ ज्या मातेच्या पोटीं जन्म घेतला, जिच्या दुधावर आपलें पोषण झालें तिच्याशींहि हा धनलोभ वैर करवितो. ९५ द्रव्यासाठीं पुत्र त्या जन्मदात्या जननीला वैरिण म्हणून घरांतून बाहेर घालवितो. पुनः तिचें मुखावलोकनहि करीत नाहीं. ९६ हा धनाभिमान भवबंध तोडणाऱ्या व पावन करणाऱ्या सद्गुरूचाहि शिष्यांकडून द्वेष करवितो. ९७ धनाभिमान इतका प्रबल आहे

धनाभिमानाचा बडिवार । सद्‌गुरुमाजीं पाडी वैर । धनाभिमानी अणुमात्र । नव्हे निर्वैर कोणासी ॥ ९८ ॥ जें सांगीतलें निरूपण । त्या नांव वैर संपूर्ण । हें दहावें अनर्थलक्षण । अविश्वासी धन तें ऐक ॥ ९९ ॥ धनाभिमानाचा विलास । न मानी पित्याचा विश्वास । पूर्ण बंधूचा अविश्वास । केवीं सुहृदांस पातेजे ॥ ३०० ॥ 'आत्मा वै पुत्रनामासी' । जो साचार धणी सर्वस्वासी । त्या पातेजेना निजपुत्रासी । अतिअविश्वासी धनलोभ ॥ १ ॥ धर्म अर्थ काम संपूर्ण । त्रिसत्यें सत्यें अवंचन । पूर्वजांची भाक निर्वाण । देऊनि आपण जें पर्णी ॥ २ ॥ जिणें जीवू प्राण सर्वस्वेंसीं । साचार अर्पिला भ्रतारासी । ऐशि-येही धर्मपत्नीसीं । अविश्वासी धनलोभ ॥ ३ ॥ जे उदरीं वाहे नवमासीं । जे सर्वदा विष्ठामूत्र सोशी । धनलोभाची जाती कैशी । तेही मातेसी न विश्वासे ॥ ४ ॥ धनाभिमान ये जयापाशीं । तो विश्वासेना सद्‌गुरूसी । इतरांची कथा कायसी । पूर्ण अविश्वासी धनमानी ॥ ५ ॥ अविश्वासाचें मुख्य कारण । धन आणि दुसरी स्त्री जाण । तेथ मोहावलें ज्याचें मन । तो अतिसंपन्न अविश्वासें ॥ ६ ॥ जो धनमानी आणि स्त्रीजित । त्यासी विमुख होय हृदयस्थ । त्यातें सद्‌गुरुही उपेक्षित । परम अनर्थ अविश्वासें ॥ ७ ॥ सकळ दोषां मुकुटमणी । अविश्वास बोलिला पुराणीं । जो प्रकटतां अर्धक्षणीं । करी धुळधाणी वृत्तीची ॥ ८ ॥ अविश्वासा अभिमान भेटे । तैं मुक्ताची मुक्तता तुटे । मग विकल्पाचेनि नेटें । घाली उफराटें देहबंदीं ॥ ९ अविश्वासें कवळिल्या चित्ता । अभिमानें म्हणे मी ज्ञाता । तेव्हां उभउभ्यां पळे आस्तिकता । देखे नास्तिकता सर्वत्र ॥ ३१० ॥ अविश्वास येतां पहा हो । सकुटुंब पळे सद्भावो । मग लोकत्रयीं अभावो । नांदवी निर्वाहो विकल्पेंकरूनी ॥ ११ ॥ वाडेंकोडें अविश्वासी । विकल्पू नांदे अहर्निशीं । जेथ रिगाव अविश्वासासी । विकल्प त्यासी नागवी ॥ १२ ॥ अंगोबांगीं

कीं, तो सद्‌गुरूमध्येंहि वैर उत्पन्न करितो. धनाभिमान कोणालाच वैररहित ठेवीत नाहीं. ९८ हें जें मीं निरूपण केलें तें वैर या नांवाच्या दहाव्या अनर्थाचें लक्षण आहे. धनाजवळ अविश्वासहि पूर्णपणें रहात असतो. द्रव्यवान् मनुष्य प्रत्यक्ष पित्याचाहि विश्वास धरीत नाहीं. ९९ सख्ख्या भावाचा अविश्वास करितो. मग सुहृद मित्रांवर कोठचा विश्वास ठेवणार ! ३०० असा धनाभिमानाचा प्रभाव आहे. 'आत्मा वै पुत्रनामासि०' म्ह० पुत्र हा आत्माच आहे, असें ज्या पुत्राचें श्रुतीनें वर्णन केलें आहे, जो सर्वस्वाचा खरा धनी असतो, त्याचाहि विश्वास धरीत नाहीं. १ असा धन-लोभी अति अविश्वासु असतो. 'धर्मे चार्थे च कामे च०' धर्म, अर्थ व काम या तीन्हींत तुझ्यावांचून अतिक्रमण करणार नाहीं, अशी अग्नि, ब्राह्मणांच्या साक्षीनें पूर्वजांची शपथ वाहून जिच्याशीं विवाह केलेला असतो, २ जिनें आपला जीव-प्राण व सर्वस्व पतीला अर्पण केलेलें असतें. अशा धर्मपत्नीचाहि तो धनलोभानें अविश्वास करितो. ३ जी नऊ महिने गर्भांत वाढविते, खस्ता खाते त्या मातेचाहि विश्वास धरीत नाहीं. ४ असा धनलोभाचा स्वभाव आहे पहा ! ज्याच्यापाशीं धनाभिमान असतो, त्याला सद्‌गुरूचाहि विश्वास वाटत नाहीं. मग इतरांची काय कथा ! धनाभिमानी अत्यंत अविश्वासी असतो. ५ एक स्त्री व दुसरें धन, हीं दोन अविश्वासाचीं मुख्य कारणें आहेत. त्यांचा ज्याच्या मनाला मोह पडतो, त्याच्या मनांत दृढ अविश्वास उत्पन्न होतो. ६ जो धनाचा गर्व वहाणारा व स्त्रीलंपट असतो त्याला हृदयस्थ परमात्मा विमुख होतो व सद्‌गुरूंहि त्याची उपेक्षा करितो. अविश्वासा-पासून असा परम अनर्थ होतो. ७ अविश्वास सर्व दोषांचा मुकुटमणि आहे, असें पुराणांतहि म्हटलें आहे. अविश्वास उत्पन्न होतांच तो अर्ध्या क्षणांत वृत्तीची नासाडी करून टाकितो ८ आणि त्या विश्वासाला अभिमान भेटला कीं, मुक्तांची मुक्तता नाहींशी होते व तो त्याला विकल्पाच्या बळावर उलट देहाच्या बंदींत टाकितो. ९ अविश्वासानें एकदां चित्ताला घेरलें, कीं, तो मोठ्या अभिमानानें 'मी ज्ञाता' असें म्हणूं लागतो. त्या वेळीं आस्तिकपणा पहातां पहातां पळ काढतो आणि सर्वत्र नास्तिकपणा दिसूं लागतो. ३१० अविश्वास उत्पन्न झाला म्हणजे सद्भाव सहकुटुंब पळून जातो. मग त्याच्या अभावीं त्रिभुवनांत विकल्प नांदूं लागतो. ११ अविश्वासाजवळ विकल्प मोठ्या आवडीनें रात्रं-दिवस रहात असतो. जेथें अविश्वासाचा प्रवेश होतो, तेथें विकल्पानें नाडिलेंच म्हणून समजावें. १२ अविश्वास एकदां रोम-रोमांतून भिनला म्हणजे तो परमार्थाचें राज्य ओस पाडितो. सद्‌गुरूचेहि दोष दाखवितो. ब्रह्मदेवाचाहि

अविश्वास । परमार्थराष्ट्र पाडी वोस । सद्गुरूचेही दावी दोष । न मनी विश्वास ब्रह्मयाचा ॥ १३ ॥ यालागीं सकळ दोषांचा राजा । अविश्वासाहूनि नाहीं दुजा । तो रिगोनियां निजपैजा । विभांडी वोजा महासिद्ध ॥ १४ ॥ जिकडे अविश्वासें चाली केली । तिकडे परमार्था पळणी झाली । विकल्पाची धाडी आली । ते संधी नागवली बहुतेकें ॥ १५ ॥ सिद्धाचें गेलें सिद्धिभूषण । साधकें सपाई नागवली जाण । रानभरी झाले साधारण । श्रद्धेचें उद्यान छेदिलें ॥ १६ ॥ यमनियमांचीं नगरें जाळी । क्रोधू तापसां करी होळी । मोक्षफळें सफळिता केळी । समूळ उन्मळी मोहगजू ॥ १७ ॥ शमदमाचें घरटें । खाणोनि सांडिलें आव्हाटे । वोस विवेकाचे चोहटे । कोणी ते वाटे वागेना ॥ १८ ॥ व्रतोपवास यांचीं साजिरीं । निष्काम उपवनें चौफेरीं । तीं जाळिलीं उपराउपरी । नानापरी विकल्पें ॥ १९ ॥ ऐशिया अविश्वासासी । ज्ञानाभिमानी आला भेटीसी । विकल्पें अभय देऊनि त्यासी । आपणियापाशीं राहविलें ॥ ३२० ॥ ऐशिया अविश्वासापुढें । परमार्थ काइसें बापुडें । विकल्पाचें बळ गाढें । तो करी कुडें तत्काळ ॥ २१ ॥ पोटांतून जो अविश्वासी । तो सदा देखे गुणदोषांसी । अखंड द्वेषी परमार्थासी । हा त्यापाशीं स्वभावो ॥ २२ ॥ यापरी अविश्वासी । बद्धवैर पडे परमार्थासी । जो पोटींचा अविश्वासी । हांसल्याही त्यापाशीं नवचावें दीनीं ॥ २३ ॥ सकळ दोषांमाजीं समर्थ । सकळ दोषांचें राजत्व प्राप्त । तो हा अकरावा अनर्थ । असे नांदत धनामाजीं ॥ २४ ॥ अकराहि इंद्रियांसी । पूर्ण करी अविश्वासेंसी । यालागीं अकरावें स्थान यासी । वस्ति अविश्वासासी मनामाजीं ॥ २५ ॥ मुख्यत्वें स्पर्धेचें आयतन । बहुविद्या कां बहुधन । हेंचि स्पर्धेचें जन्मस्थान । येथूनि जाण तें वाढे ॥ २६ ॥ विद्या झालिया संपन्न । पंडित पंडितां हेळण । मुख्य गुरूसींच स्पर्धा करी जाण । हें स्पर्धालक्षण विद्येचें ॥ २७ ॥ गांठीं झालिया धन । स्पर्धा खवळे दारुण । कुबेर परधनें संपन्न । मी

विश्वास धरीत नाहीं. १३ यास्तव सगळ्या दोषांचा राजा अविश्वासावांचून दुसरा कोणी नाहीं. तो मोठ्या निश्चयानें पैज मारून निकरानें लढतो. १४ जेथें अविश्वास चाटून जातो तेथून परमार्थ पळ काढतो व विकल्पाची धाड येते. या संधींत बहुतेकांची नागवण होते. १५ सिद्धाचें सिद्धिरूपी भूषण नाहींसें होतें. साधक तर बिचारे सर्वस्वीं बुडतात. सामान्यजन रानोमाळ पळत सुटतात. कारण श्रद्धेचे उपाय सगळे साफ तोडलेले असतात. १६ यमनियमांचीं नगरें जळून जातात. क्रोध तापसांच्या तपाची होळी करितो; मोहरूपी मत्त हत्ती मोक्षफलाच्या केळी समूळ उपटून टाकितो. १७ शम-दमांचें घरटें मोडून तें आड वाटेंत फेकून देतो. विवेकाचे चवाठे ओस पडतात. त्या बाजूला कोणी फिरकतहि नाहीं. १८ चोहों बाजूला असलेल्या व्रतें-उपवास, यांच्या सुंदर बागा, अनेक प्रकारचे विकल्प वरच्यावर जाळून टाकितो १९ अशा अविश्वासाच्या भेटीला ज्ञानाभिमान आला, तेव्हां विकल्पानें त्याला अभय देऊन आपल्यापाशीं ठेवून घेतलें. ३२० अशाप्रकारच्या या अविश्वासापुढें बापडा परमार्थ तो काय ! विकल्पाचें सामर्थ्य फार दांडगें असल्यामुळें तो तत्काळ उलट-सुलट करून टाकितो. २१ ज्याच्या अंतःकरणांत अविश्वास असतो, तो सतत गुण-दोष पहात असतो. परमार्थाचा अखंड द्वेष करणें, हाच त्याचा स्वभाव आहे. २२ याप्रमाणें अविश्वासाचें तीव्र वैर असतें. ज्याच्या मनांत अविश्वास असतो, तो मनुष्य वरून कितीहि गोड बोलून हंसत असला, तरी त्याच्याशीं केव्हांहि गरिबीनें वागूं नये. २३ असा सगळ्या दोषांतील अत्यंत प्रबल, सगळ्या दोषांचा राजा, असा हा अकरावा अनर्थ द्रव्यापाशीं रहात असतो. २४ अविश्वासी मनुष्य अकराहि इंद्रियांना पुरून उरतो. म्हणून अविश्वासाला अकरावें स्थान दिलें आहे. अकरावें इंद्रिय जें मन त्यांतच त्याची वस्ती असते. २५ अविश्वास स्पर्धेचा आश्रयस्थानच आहे. बहुविद्या आणि बहुधन यांच्यापासून स्पर्धेचा जन्म होतो. येथूनच पुढें तिची वाढ होते. २६ विद्यासंपन्न होतांच विद्वानामध्यें परस्पर स्पर्धा सुरू होते. मुख्य गुरूबरोबरच स्पर्धेला आरंभ होतो. हें विद्येचें स्पर्धालक्षण झालें. २७ तोच एखादा मनुष्य धनसंपन्न झाला कीं, त्याच्या मनांतील स्पर्धा भयंकर खवळते.

स्वसत्ता जाण धनाढ्य ॥ २८ ॥ माझिया निजधनापुढें । गणिता अल्प गंगेचे खडे । माझिये धनाचेनि पाडें । कोण बापुडें उभें राहे ॥ २९ ॥ मग जे जे देखे धनवंत । ते ते हेळूनि सांडी तेथ । यापरी स्पर्धा अद्भुत । धरूनि अर्थ उल्हासे ॥ ३३० ॥ एवं धरूनियां अर्थ । स्पर्धा बारावा अनर्थ । सदा नांदे धनाआंत । तो हा वृत्तांत सांगीतला ॥ ३१ ॥ आतां तीन अर्थांचा मेळा । एके पदीं झाला गोळा । तोही नांदे धनाजवळा । ऐक वेगळा विभाग ॥ ३२ ॥ स्त्री द्यूत आणि मद्यपान । या तिहींतें वाढवी धन । हे तीन अनर्थ दारुण । धनवंता पूर्ण आदळती ॥ ३३ ॥ जो कां पुरुष निर्धन । तो स्त्रियेस जडिसासमान । देखोनि निर्धनाचें वदन । प्रत्यक्ष जाण स्त्री थुंकी ॥३४॥ धनहीन पुरुषाचे घरीं । कलहो स्त्रीपुरुषांमाझारीं । निर्भर्त्सूनि नानापरी । दवडी घराबाहेरी पुरुषातें ॥३५॥ धनवंता पुरुषासी । स्त्री लवोटवो करी कैशी । कुटका देखोनि श्वुनी जैसी । हालवी पुच्छासी कुंकात ॥ ३६ ॥ त्या धनाची झालिया तुटी । स्त्री वसवसोनि लागे पाठी । आतां नावडती तुमच्या गोठी । रागें उठी फडफडोनी ॥ ३७ ॥ दिवसा पोरांची तडातोडी । रात्रीं न सोसे तुमची वोढी । हातीं नाहीं फुटकी कवडी । जळो गोडी जिण्याची ॥ ३८ ॥ ऐशापरी कडोविकडी । निर्भर्त्सूनि दूरी दवडी । निर्धन पुरुषाची आवडी । न धरी गोडी स्वदारा ॥ ३९ ॥ यापरी निर्धन पुरुषासी । स्वस्त्री वश्य नव्हे त्यासी । स्त्रीबाधा धनवंतासी । अहर्निशीं अनिवार ॥ ३४० ॥ लक्षूनि धनवंत नर । वेश्या मिरवी श्रृंगार । हावभाव चमत्कार । त्यासी धनाढ्य थोर भाळले ॥ ४१ ॥ वेश्याकामसंगें जाण । अखंड लांचावलें मन । तद्योगें मद्यपान । करिती सधन धनमदें ॥ ४२ ॥ मद्यपानें जो उन्मत्त । तो स्वेच्छा खेळे द्यूत । एवं हेहीं तिन्ही अनर्थ । जाण निश्चित अर्थासी ॥ ४३ ॥ अर्थापाशीं पंधरा अनर्थ । ते सांगीतले इत्थंभूत । सुखाचा लेशू येथ । नाहीं निश्चित धनवंता ॥ ४४ ॥

'कुबेर तर केवळ दुसऱ्याच्या धनानेंच संपन्न आहे; पण मी तर माझ्या स्वतःच्या संपत्तीनें धनाढ्य झालों आहें. २८ माझ्या अलोट संपत्तीपुढें गंगेतील वाळूचे कण मोजिले तर तेहि कमी भरतील. माझ्या संपत्तीपुढें उभें रहाण्याची कोणाची छाती आहे!' असें म्हणून तो धनिक सर्वांच्या संपत्तीला तुच्छ लेखितो व आपल्या द्रव्याभिमानानें त्याच्याशीं स्पर्धा करितो. ३३० याप्रमाणें द्रव्याजवळ स्पर्धा हा बारावा अनर्थ आहे. तो निरंतर धनापाशींच असतो. तोच वृत्तांत तुला मीं सांगितला. ३१ आतां मूळ श्लोकांतील 'व्यसनानि' या पदांत तीन अनर्थांचा समूह एकत्र झाला आहे, तोहि धनाजवळच नांदत असतो. त्याचा विभाग सांगतों, तो ऐक. ३२ द्रव्य स्त्री, जुगार व मद्यपान या तीन व्यसनांना उत्तेजन देऊन वाढवीत असतें. हे तीन दारुण अनर्थ धनवानावर येऊन कोसळतात. ३३ कारण निर्धन पुरुष स्त्रीला ओझ्यासारखा जड वाटतो. निर्धन पतीच्या तोंडावर प्रत्यक्ष त्याची स्त्री थुंकते. ३४ द्रव्यहीन पुरुषाच्या घरांत स्त्री-पुरुषांचा नित्य कलह होत असतो. पुरुषाची अनेकप्रकारें निर्भर्त्सना करून ती त्याला घराबाहेर घालवीत असते. ३५ तोच पुरुष धनवान् असला तर भाकरीचा तुकडा पहातांच कुत्री जशी शेंपूट हलवीत कूं कूं करीत धांवत येते, ३६ तशी स्त्री आपल्या श्रीमान् पतीचीं आर्जवें करीतअसते. पण तेंच त्याच्याजवळचें द्रव्य संपलें कीं, ती त्याच्या अंगांवर दांत ओठ खाऊन धांवते. 'मला तुमच्या गोष्टी आवडत नाहींत' म्हणून चडफडून उठून जाते. ३७ 'दिवसा पोरांची वसवस आणि रात्रीं तुमची ही लगट मला सोसवत नाहीं. हातांत एक फुटकी कवडीहि नाहीं. जळो हें जिणें!' ३८ अशा तऱ्हेनें त्याची निर्भर्त्सना करून फणकाऱ्यानें ती त्याला दूर लोटिते. स्वतःची स्त्री देखील निर्धन पतीवर प्रीति ठेवीत नाहीं. ३९ अशाप्रकारें निर्धन पुरुषाला त्याची स्त्री सुद्धां अनुकूल नसते. परंतु धनिकाला मात्र रात्रंदिवस स्त्रियांपासून फार पीडा होत असते. ३४० एखादा श्रीमान् गृहस्थ दिसतांच वेश्या मोठ्या थाटा-माटानें हाव-भाव करून त्याला भुरळ घालीत असतात. ४१ वेश्यांच्या नादानें मन लांचावतें. त्यामुळें पुढें धनिक मदानें मद्यपान करूं लागतात. ४२ मद्यपानानें उन्मत्त झाल्यावर ते आपण होऊन जुगार खेळूं लागतात. सारांश द्रव्यामुळें हे तीन अनर्थ होतात. ४३ अशाप्रकारें द्रव्यापासून होणारे पंधरा अनर्थ मीं तुला सविस्तर सांगितले. हे उद्धवा! धनवानाला सुखाचा लेशहि नसतो, हें निश्चयानें जाणावें. ३४४.

एवं हे पंधराही अनर्थ । मूर्ख अथवा पंडित । जे अर्थसंग्रह करीत । अवश्य हे तेथ उठती ॥ ४५ ॥ यासी नाममात्र हा अर्थ । येऱ्हवीं मूर्तिमंत अनर्थ । यालागीं श्रेयार्थी जे हरिभक्त । तिहीं निश्चित त्यागावा ॥ ४६ ॥ जेवीं कां बोळ हुंगेना माशी । ढेंकुण न ये तेलापाशीं । वोळंबा न लगे अग्नीसी । तेवीं जो अर्थासी नातळे ॥ ४७ ॥ जेवीं कां अग्नीमाजीं लवण पडे । तें तडफडोनि बाहेर उडे । तेवीं मोक्षाचिये चाडे । जो त्यागीं रोकडें निजधन ॥ ४८ ॥ बचनाग मुखीं घालितां आपण । क्षणार्ध दावी गोडपण । तोचि परिपाकीं आणी मरण । तैसा अर्थ जाण अनर्थी ॥ ४९ ॥ यालागीं जो मोक्षार्थी । तेणें अर्थ न धरावा हातीं । काया वाचा चित्तवृत्ती । अर्थ निश्चितीं त्यागावा ॥ ३५० ॥ अर्थमूळ सकळ भेद । पूर्वीं बोलिला एवंविध । तोचि पुनः पुनः गोविंद । करूनि विशद सांगत ॥५१॥

भिद्यन्ते भ्रातरो दाराः पितरः सुहृदस्तथा । एकास्निग्धाः काकिणिना सद्यः सर्वेऽरयः कृताः ॥ २० ॥

इष्टमित्रांचें मित्रत्व मोडी । बंधुबंधूंचा स्नेह विघडी । सुहृदांचें सौजन्य तोडी । फुटकी कवडी अर्थाची ॥ ५२ ॥ पित्यापुत्रांमाजीं विरोध । स्त्रीपुत्रांमाजीं द्वंद्व । तो हा जाण अर्थसंबंध । विभांडी हार्द सुहृदांचें ॥ ५३ ॥ काकिणी म्हणजे वीसकवडी । ते आप्तांचा स्नेह तोडी । त्यांतील एक फुटकी कवडी । भेद पाडी सुहृदांसी ॥ ५४ ॥

अर्थेनाल्पीयसा ह्येते संरब्धा दीप्तमन्यवः । त्यजन्त्याशुस्पृधो घ्नन्ति सहसोत्सृज्य सौहृदम् ॥ २१ ॥

असे हे पंधरा अनर्थ आहेत.जो कोणी मूर्ख किंवा पंडित द्रव्याचा संग्रह करितो, त्याच्यापाशीं हे अनर्थ खात्रीनें उद्भवतात. ४५ द्रव्य केवळ नांवाचा अर्थ आहे; पण वास्तविक तो मूर्तिमंत अनर्थच आहे. यास्तव स्वहिताची (किंवा मोक्षाची) इच्छा करणाऱ्या हरिभक्तानें तो अवश्य टाकावा. ४६ माशी जशी बोळाला हुंगूनहि पहात नाहीं, ढेकूण जसा तेलापाशीं येत नाहीं, मुंग्या किंवा वाळवी जशी अग्नीजवळ जात नाहीं, तसा हरिभक्तानें द्रव्याला स्पर्शहि करूं नये. ४७ विस्तवांत मिठाचा खडा पडतांच तो जसा तडफडून बाहेर उडतो, तसें त्यानें मोक्षाच्या इच्छेनें स्वतःच्याहि द्रव्याचा त्याग करावा. ४८ बचनाग तोंडांत घातला असतां क्षणभर गोड लागतो; पण शेवटीं मरण ओढवतें. तसें हें द्रव्य शेवटीं अनर्थांत टाकितें. ४९ यास्तव मोक्षाची इच्छा करणारानें द्रव्य हातांतहि घेऊं नये. काया-वाचा-मनानें त्याचा पूर्ण त्याग करावा. ३५० सगळ्या भेदाचें मूळ धन आहे, हें पूर्वीं सांगितलें होतें. तोच अर्थ गोविंद पुनः पुनः स्पष्ट करून सांगत आहे. ३५१.

—या पुढील दोन श्लोकांनीं भेद वैर व स्पर्धा याचें वर्णन करितात—

भ्रातरः दाराः पितरः तथा सुहृदः **एकास्निग्धाः भिद्यन्ते**—भ्राते, स्त्रिया, पितर व सुहृद, (ते कसे ! तर–) **एक**जीव व अतिप्रिय असूनहि धनामुळें स्नेहाचा त्याग करितात. कारण, **सर्वे काकिणिना सद्यः अरयः कृताः**—ते सर्व एका कवडीसाठींहि तत्काल शत्रु केले जातात. २०.

एक फुटकी कवडी जरी संग्रहाला असली तरी त्यामुळें इष्टमित्रांतील मैत्री तुटते, बंधु-बंधूंतील प्रेमांत बिघाड होतो, सुहृदांचा स्नेह नाहींसा होतो, ५२ पिता-पुत्रांत विरोध उत्पन्न होतो, स्त्री व पुत्र यांमध्यें दुही उद्भवते. याप्रमाणें हा द्रव्यसंबंध सुहृदांच्या अंतःकरणांतील प्रेम नाहींसें करितो. ५३ काकिणी म्ह० वीस कवड्या; पण त्यांतील एक फुटकी कवडी देखील सुहृदांत द्वेष माजवितें. ३५४.

अल्पीयसा अर्थेन हि एते संरब्धाः दीप्तमन्यवः स्पृधः आशु त्यजन्ति—थोड्याशा धनासाठींहि ते क्षुब्ध **होतात,** त्यांचा क्रोध वाढता, ते स्पर्धा करूं लागतात व सत्वर त्याग करितात. **सौहृदं उत्सृज्य सहसा घ्नन्ति**—आणि स्नेह सोडून एकाएकीं प्राण घेतात. २१.

अतिअल्प अर्थासाठीं । सुहृदता सांडोनि पोटीं । कोपें खवळला उठी । शस्त्रमुठी उद्यत ॥ ५५ ॥ तेथें आप्त होऊनि अनाप्त । परस्परें करिती घात । अर्थ अनर्थी प्राणांत । निजस्वार्थ घातकू । ॥ ५६ ॥ जितां अर्थ अनर्थ करी । मेल्या ने नरकद्वारीं । उत्तम देहाची बोहरी । अर्थ करी ते ऐक ॥ ५७ ॥

लब्ध्वा जन्मामरप्रार्थ्यं मानुष्यं तद्द्विजाग्र्यताम् । तदनादृत्य ये स्वार्थं घ्नन्ति यान्त्यशुभां गतिम् ॥२२॥

कोटि जन्मांचें शुद्ध सुकृत । तेणें कर्मभूमीं नरदेह प्राप्त । तेथेंही वर्णाग्र्यजन्म समर्थ । सत्कुळप्रसूत ब्राह्मणत्वें ॥ ५८ ॥ ऐसें जन्म पावावया येथ । अमरही मरण मागत । इंद्रादि देव जे स्वर्गस्थ । तेही वांछित हें जन्म ॥ ५९ ॥ जे सत्यलोकपर्यंत । ऐश्वर्य पावले अद्भुत । तेही हें जन्म वांछित । उत्कंठित अहर्निशीं ॥ ३६० ॥ येथ करितां भगवद्भक्ती । पायां लागती चारी मुक्ति । यालागीं हे जन्मप्राप्ती । अमर मागती अहर्निशीं ॥ ६१ ॥ ऐसें उत्तम जन्म पावोनी । अति-अभाग्य मी त्रिभुवनीं । निजस्वार्थातें उपेक्षूनि । भुललों धनीं धनलोभें ॥ ६२ ॥ धनलोभाचिया भ्रांतीं । कां लोकेषणा लौकिकस्थिती । जो उपेक्षी भगवद्भक्ती । अशुभ गती तयासी ॥ ६३ ॥ तेचि कैशी अशुभ गती । धनलोभ्यां नरकप्राप्ती । चौऱ्यायशीं लक्षयोनीप्रती । गर्भ भोगिती अतिदुःखें ॥ ६४ ॥ जयां ब्राह्मणजन्माआंत । स्वर्गमोक्ष सहजें प्राप्त । तेचि अर्थांचा इत्यर्थ । स्वयें सांगत धनलोभी ॥ ६५ ॥

ते अत्यंत अल्प द्रव्यासाठींहि अंतःकरणांतील स्नेहभाव सोडून, क्रोधानें खवळून, हातांत शस्त्र घेऊन मारा-वयास तयार होतात. ५५ जे आप्त असतात ते अनाप्त होऊन एकमेकांचा घात करितात. असें हें द्रव्य आपल्या खऱ्या स्वार्थाचा घात व प्राणान्त अनर्थ करणारें आहे. ५६ हें द्रव्य जिवंतपणीं अनर्थ करितें व मेल्यावर नरकाला नेतें. हें उत्तम मनुष्यजन्माची राखरांगोळी कसें करितें, तेंच आतां ऐक. ३५७.

—याप्रमाणें या लोकीं धनामध्यें तत्पर असलेल्या लोकांना कोणते अनर्थ प्राप्त होतात तें सांगून परलोकींहि त्यांना अनर्थप्राप्तीच होते, असें पुढील तीन श्लोकांनीं सांगतात—

अमरप्रार्थ्यं मानुष्यं जन्म तद्द्विजाग्र्यतां लब्ध्वा—देवांनाहि इष्ट असलेला मनुष्यांचा जन्म, त्यांतहि ब्राह्मण्य प्राप्त झालें असतां, **तत् अनादृत्य**—त्याचा आनादर करून **ये स्वार्थं घ्नन्ति ते अशुभां गतिं यान्ति**—जे आत्महित करीत नाहींत, ते अशुभ गतीला प्राप्त होतात. २२.

कोट्यवधि जन्मींचें पुण्य जेव्हां उभें रहातें तेव्हां या कर्मभूमींत मनुष्यदेहाची प्राप्ति होते. त्यांतहि चार वर्णांतील उत्तम व समर्थ अशा ब्राह्मणाच्या सत्कुलांत जन्म होणें हें फारच मोठ्या पुण्याचें फल आहे. ५८ या लोकीं असा जन्म प्राप्त होण्यासाठीं अमरहि मरण मागतात. इंद्रादि देवहि या जन्माची इच्छा करितात. ५९ सत्यलोकां-पर्यंत ज्यांना अद्भुत ऐश्वर्य प्राप्त झालें आहे, ते सुद्धां मनुष्यजन्माची इच्छा करितात. इतकेंच नव्हे तर रात्रं-दिवस त्यासाठीं उत्कंठित असतात. ३६० अशा या जन्मांत भगवद्भक्ति केली असतां चारी मुक्ति पायां पडतात. यास्तव देव या नरदेहाची इच्छा रात्रं-दिवस करीत असतात. ६१ अशा उत्तम जन्माला प्राप्त होऊन मी त्रिभुवनांत अतिशय अभागी झालों. खऱ्या स्वार्थाची उपेक्षा करून धनलोभानें द्रव्याला भाळलों. ६२ द्रव्यलोभाच्या भ्रांतीने किंवा लौकिक प्रतिष्ठेच्या इच्छेनें जो भगवद्भक्ताची उपेक्षा करितो त्याला अशुभ गति प्राप्त होते. ६३ ती अशुभ गति कोणती, तें ऐक ! द्रव्यलोभी नरकवास भोगून अत्यंत दुःखानें चौऱ्यायशीं लक्ष योनींत गर्भवासाच्या यातनांत पडतो. ६४ ज्या ब्राह्मणजन्मामध्यें स्वर्ग व मोक्ष सहज प्राप्त होतो, त्याविषयींच स्वतः तो धनलोभी आतां सांगत आहे. ३६५.

स्वर्गापवर्गयोर्द्वारं प्राप्य लोकमिमं पुमान् । द्रविणे कोऽनुषज्जेत मर्त्योऽनर्थस्य धामनि ॥ २३ ॥

ब्राह्मणें करितां स्वधर्म । वासना झळंबे स्वर्गकाम । तैं इंद्रचंद्रादिकांचें धाम । पावे द्विजोत्तम सहजचि ॥६६॥ ज्याचिया याजनस्थिती । इतरांसी होय स्वर्गप्राप्ती । एवं स्वर्ग तो ब्राह्मणांच्या हातीं । त्यांसी ते गति सहजचि ॥६७॥ सांडूनि ईषणात्रयासी । निष्काम स्वधर्म ज्या द्विजासी । मोक्ष पायां लागती त्यासी । तिष्ठे अहर्निशीं आज्ञाधारी ॥ ६८ ॥ तो अनुग्रही जयांसी । ते पावती निजमोक्षासी । एवढें सामर्थ्य ब्राह्मणापाशीं । अनायासी सहजचि ॥ ६९ ॥ स्वर्ग जयाची पायरी । मोक्ष ज्याचा आज्ञाधारी । एवढी ब्राह्मणत्वाची थोरी । धनलोभावारी नाशिती ॥ ३७० ॥ ब्राह्मणजन्म पावल्या जाण । निःशेष खुंटे जन्ममरण । तेथ मी नाडलों जाण । जोडूनि धन धनलोभें ॥ ७१ ॥ दुर्लभ येथें माणूसपण । त्यामाजीं अतिदुर्लभ ब्राह्मण । तेंही पावोनि मी आपण । धनलोभें पूर्ण नागवलों ॥ ७२ ॥ पावोनि ब्राह्मणशरीर । धनें नाडलें थोरथोर । अर्थ अनर्थाचें मुख्य घर । दुःख दुर्धर वाढवी ॥ ७३ ॥ अर्थ अनर्थाचें भाजन । तें निःशेष त्यागावें धन । वैराग्यें तापला पूर्ण । स्वयें ब्राह्मण बोलत ॥ ७४ ॥ आशंका ॥ दैवें जोडिलें संपत्तीसी । नेऊनि सांडावें त्रिदीसी । कां घालावें जळप्रवाहेंसीं । त्याग अर्थासी तो कैसा ॥ ७५ ॥ तें अर्थत्यागनिरूपण । स्वयें सांगताहे ब्राह्मण । जे असतील सधन । तिंहीं सावधान परिसावें ॥ ७६ ॥

देवर्षिपितृभूतानि ज्ञातीन्बन्धूंश्च भागिनः । असंविभज्य चात्मानं यक्षवित्तः पतत्यधः ॥ २४ ॥

—देवहि मनुष्यदेहाची इच्छा करितात, हेंच दाखविणारा तो भिक्षु म्हणतो—

मर्त्यः पुमान् स्वर्गापवर्गयोः द्वारं इमं लोकं प्राप्य—मरणधर्मा असलेला हा पुरुष स्वर्ग व मोक्ष यांचें द्वारच अशा या मनुष्यदेहास प्राप्त होऊन, **अनर्थस्य धामनि द्रविणे कः अनुषज्जेत**—अधर्माचें स्थानच अशा धनामध्यें कोण आसक्त होईल. २३ ।

ब्राह्मण आपल्या धर्मानें चालला कीं, त्याला स्वर्गप्राप्तीची इच्छा होते व तो श्रेष्ठ ब्राह्मण इंद्रचंद्रादिकांचें स्थानहि सहज मिळवूं शकतो. ६६ त्याच्या यज्ञकर्मामुळें इतरांनाहि स्वर्गप्राप्ति होते. याप्रमाणें स्वर्ग ब्राह्मणांच्या हातीं असल्यामुळें ते सहज तेथें जाऊन पोंचतात. ६७ लोकैषणा, पुत्रैषणा व वित्तैषणा या तीन एषणा टाकून जो द्विज निष्काम होऊन स्वधर्म आचरितो, त्याच्या पायांशीं मोक्ष चालून येतो व रात्रंदिवस आज्ञाधारक होऊन रहातो. ६८ तो ज्यांच्यावर कृपा करितो त्याला तत्काल मोक्ष प्राप्त होतो. इतकें सामर्थ्य ब्राह्मणापाशीं स्वभावतःच असतें. ६९ स्वर्ग ही ज्याची पायरी आहे, मोक्ष ज्याच्या आज्ञांकित आहे अशी ब्राह्मणत्वाची थोरवी असून मूढ धनलोभानें ती घालवितात. ३७० ब्राह्मणजन्म प्राप्त झाला कीं, जन्म-मरण समूळ नाहींसें होतें, असें असतां मी धनलोभानें द्रव्याचा संग्रह करून नाडला गेलों. ७१ जेथें मनुष्यजन्म मिळणेंच अतिशय दुर्लभ आहे, तेथें उत्तम ब्राह्मणजन्म मिळाला असतांहि मी धनलोभानें पूर्णपणें नागावलों. ७२ ब्राह्मणशरीर लाभलें असतांहि मोठे-मोठे धनलोभानें नाडतात. द्रव्य अनर्थाचें घर असून तें दुर्धर दुःख वाढवितें. ७३ द्रव्य अनर्थाचें साधन आहे. त्याचा निःशेष त्याग करावा, असें वैराग्यानें पश्चात्ताप पावलेला ब्राह्मण स्वतः सांगत आहे. ७४ (आशंका—) भाग्यानें जर संपत्ति मिळाली तर ती काय रस्त्यावर नेऊन टाकावी ! कां नदींत नेऊन सोडावी ! द्रव्याचा त्याग कशा प्रकारें करावा ! ७५ आतां त्या द्रव्यत्यागाचें निरूपण स्वतः ब्राह्मण सांगत आहे. तरी जे धनिक असतील, त्यांनीं तें लक्षपूर्वक ऐकावें. ३७६.

देवर्षिपितृभूतानि ज्ञातीन् बंधून् भागिनः आत्मानं च असंविभज्य यक्षवित्तः अधः पतति—देव, ऋषि, पितर, भूतें, या पञ्चयज्ञदेवता, इतर सगोत्र, विवाहादिकांनीं संबद्ध झालेले बांधव, अन्नाच्या अंशाला पात्र असलेले पितर व स्वतः आपला देह, यांस अन्नादिकांच्या योगानें तृप्त न करितां यक्षाप्रमाणें धनाचें केवळ रक्षण करणारा अधोगतीला जातो. २४.

दैवें जोडिलिया धन। आचरावे पंचमहायज्ञ। करावें भगवत्पूजन। उल्हासें जाण महोत्साहें ॥ ७७ ॥ स्वयें करावें पितृतर्पण। षण्णवति श्राद्धें जाण। पितर उद्धरावे आपण। गयावर्जन करोनियां ॥ ७८ ॥ जित्यां पितरां त्रिकाळीं नमन। कदा न करावें हेळण। त्यांची अवज्ञा आपण। प्राणांतीं जाण न करावी ॥ ७९ ॥ त्यांसी गौरवूनि आपण। यथारुचि द्यावें अन्न। यथाशक्ति द्यावें धन। सेवेनें संपूर्ण सुखी करावीं ॥ ३८० ॥ पिता स्वयमेव नारायण। माता प्रत्यक्ष लक्ष्मी आपण। ऐसें भावें ज्याचें भजन। सुपुत्र जाण तो एक ॥ ८१ ॥ ज्याचे सेवेनें सुखी पितर। तेंचि पितृतर्पण साचार। जितां अवज्ञा तो अनाचार। मेल्या श्राद्धविचार तो लौकिक ॥ ८२ ॥ जो पितृवचन अविश्वासी। तेणें केल्या पापराशी। जो पितृवचन विश्वासी। मोक्ष त्यापाशीं बोळंगणा ॥ ८३ ॥ जितमृतपितृतर्पण। ते सांगीतली उणखूण। या नांव गा पितृभजन। ऋषिपूजन तें ऐक ॥ ८४ ॥ सन्मानें आणूनि ब्राह्मण। श्रद्धा कीजे चरणक्षाळण। चरणतीर्था अभिवंदन। सबाह्य जाण स्वयें कीजे ॥ ८५ ॥ धूपें दीपें यथोक्त पूजन। यथारुचि तृप्ति सदन्न। यथाशक्ति द्यावें धन। ऋषिपूजन या नांव ॥ ८६ ॥ ब्राह्मण तेचि ऋषीश्वर। ब्राह्मणें तृप्त सनत्कुमार। ब्राह्मणमुखें शार्ङ्गधर। धाला ढेंकर देतसे ॥ ८७ ॥ बंधु स्वगोत्र स्वजन। त्यांची दरिद्रपीडा दारुण। निरसावी देऊनि धन। हा मुख्य धर्म जाण श्रेष्ठत्वें ॥ ८८ ॥ कुटुंब पीडूनि आपण। अन्यत्रां द्यावें अन्न धन। तोचि अधर्म परिपूर्ण। शुद्ध पुण्य तें नव्हे ॥ ८९ ॥ कुटुंबासी यथोचित। सुखी करूनि समस्त। याहूनि उरला जो अर्थ। तो श्रेयार्थ वेंचावा ॥ ३९० ॥ अतिथि आलिया देख। अन्न द्यावें आवश्यक। तो झालिया पराङ्मुख। पुण्य निःशेष हरासे ॥ ९१ ॥ सकळ दानांमाजीं जाण। अतिश्रेष्ठ अन्नदान। दीनास देऊनि सन्मान। द्यावें सदन्न अतिश्रद्धा ॥ ९२ ॥ कुटुंब सुखी करी आपण। स्वेच्छा दे दीनभोजन। परी कदर्थवी जो निजप्राण।

सुदैवानें जर संपत्ति प्राप्त झाली, तर भूतयज्ञ, पितृयज्ञ, देवयज्ञ, ब्रह्मयज्ञ, व मनुष्ययज्ञ असे पंच महायज्ञ करावे. मोठ्या उत्साहानें भगवत्पूजन करावें. ७७ स्वतः पितृतर्पण करावें. षण्णवति श्राद्धें. म्ह० एका वर्षांत शहाण्णव श्राद्धें करावींत. गयावर्जन इत्यादिकांच्या योगानें पितरांचा उद्धार करावा. ७८ जिवंत असलेल्या पितरांना त्रिकाल वंदन करावें. त्यांची कधीं अवहेलना करूं नये. प्राणान्तींहि त्यांची अवज्ञा करूं नये. ७९ त्यांचा गौरव करून त्यांना यथाशक्ति अन्न द्यावें. यथाशक्ति धन द्यावें, आणि त्यांची सेवा करून त्यांना पूर्ण सुखी करावें. ३८० पिता प्रत्यक्ष नारायण आहे व माता साक्षात् लक्ष्मी आहे, अशा भावनेनें जो त्यांची सेवा करितो, तो खरा सुपुत्र होय. ८१ ज्याच्या सेवेनें वडील माणसें सुखी होतात तेंच खरें पितृतर्पण होय. जिवंतपणीं त्यांची अवज्ञा व अनादर करून मरणोत्तर श्राद्ध करणें हें केवल लौकिक होय. ८२ जो पितृवचनावर विश्वास ठेवीत नाहीं तो पापाच्या राशीच जोडितो आणि जो पितृवचनावर विश्वास ठेवतो त्याच्यापाशी मोक्ष तिष्ठत बसतो. ८३ याप्रमाणें जिवंत व मृत पितरांचें तर्पण सांगितलें. यालाच पितृसेवा म्हणतात. आतां ऋषींचें पूजन ऐक. ८४ ब्राह्मणाला सन्मानानें बोलावून आणून श्रद्धेनें त्याचे पाय धुवावे. त्या चरणतीर्थाला स्वतः वंदन करावें. ८५ त्याचे धूप-दीपादिकांनीं शास्त्रोक्त पूजन करून, त्याच्या रुचीप्रमाणें मिष्टान्न देऊन त्याला तृप्त करावें आणि यथाशक्ति दक्षिणा द्यावी. याला ऋषिपूजन असें म्हणतात. ८६ जे ब्राह्मण तेच श्रेष्ठ ऋषि होत. ब्राह्मणांच्या तृप्तीनेंच सनत्कुमार तृप्त होतो. परमात्माहि ब्राह्मणमुखानेंच तृप्त होऊन ढेंकर देतो. ८७ आप्त, इष्ट, बांधव, स्वजन या सर्वांना धन देऊन त्यांना दारिद्यामुळें होणारे दारुण क्लेश दूर करावेत. हाच सर्वांत श्रेष्ठ धर्म आहे. ८८ आपल्या कुटुंबाला पीडा देऊन इतरांना अन्न व धन देणें हा खरोखर अधर्म आहे. तें शुद्ध पुण्य नव्हे. ८९ आप्त-इष्टादि सगळ्या कुटुंबाला योग्य प्रकारें सुखी करून राहिलेलें द्रव्य परोपकारार्थ खर्च करावें. ३९० दाराशीं कोणी अतिथि आल्यास त्याला अवश्य अन्न द्यावें. तो विमुख गेला असतां सगळें पुण्य नाहींसें होतें. ९१ सगळ्या दानांत अन्नदान अतिशय श्रेष्ठ आहे. करितां दीन जनांस मोठ्या श्रद्धेनें व आदरानें चांगलें अन्न द्यावें, ९२ जो मनुष्य आपल्या आप्त-इष्टांना सुखी करितो, दीन लोकांना संतोषानें भोजन

तोहि दारुण अधर्म ॥ ९३ ॥ जैसें कीजे दीनतर्पण । त्यांत आपणही एक दीन । तेथ न करूनि अधिकन्यून । करावें भोजन समभागें ॥ ९४ ॥ पंक्तीमाजीं प्रपंचपण । तें अन्नदानीं अतिविघ्न । यालागीं करावें भोजन । समभागी आपण सकळांसी ॥ ९५ ॥ धनाचा सद्व्ययो खरा । द्यावें अनाथ-प्रेतसंस्कारा । अर्पावें दीनांच्या उद्धारा । धाडावें घरा अयाचितांच्या ॥ ९६ ॥ अंध पंगु मुके दीन । यांसी संरक्षी जो आपण । त्याचेंचि सार्थक धन । शुद्ध पुण्य तयाचें ॥ ९७ ॥ साधुसज्जनां विचंबू जी अडी । तो विचंबू जो सधन तोडी । त्याच्या निजधर्माची गुडी । उभारे रोकडी वैकुंठीं ॥ ९८ ॥ दुर्बळ जो कां भगवद्भक्त । त्यासी संरक्षी जो धनवंत । येणें तुष्टला भगवंत । त्यातें उद्धरीत भक्ता-आधीं ॥ ९९ ॥ सकळमंगळां मंगळ पूर्ण । सकळ कल्याणांचें कल्याण । ते हे सद्गुरुश्रीचरण । तेथ निजधन जयांचें अर्पे ॥ ४०० ॥ तयांच्या निजधर्माचें निशाण । सत्यलोकीं लागलें जाण । वैकुंठीं कैलासीं संपूर्ण । भेरीनिशाण त्राहाटिलें ॥ १ ॥ स्वधर्में जोडलें निजधन । जो करी सद्गुरूसी अर्पण । तोचि कर्मीं निष्कर्म जाण । परम पावन तो एक ॥ २ ॥ जो चढत्यावाढत्या भगवद्भक्ती । गुरूसी अर्पी निजसंपत्ती । त्यातें अंगीकारूनि लक्ष्मीपती । आपुली निजभक्ती त्यासी दे ॥ ३ ॥ ज्यासी अनन्य गुरुभक्ती । त्याच्या द्वारीं चारी मुक्ती । दासीत्वें उभ्या असती । त्यापासोनि श्रीपति परता नव्हे ॥ ४ ॥ ज्याचें तनु मन धन । गुरुचरणीं अर्पे पूर्ण । त्यासी भवभयाचें भान । कल्पांतीं जाण दिसेना ॥ ५ ॥ दैवें जोडली जे संपत्ती । ते वेंचोनि ऐशा निगुतीं । अर्थें परमार्थ प्राप्ती । सभाग्य लाहती निजनिष्ठा ॥ ६ ॥ ऐसें न वेंचोनियां धन । स्वयाति कुटुंब पीडी पूर्ण । जो पोटा न खाय आपण । तें यक्षधन संचित ॥ ७ ॥ एवं कदर्थूनि निजप्राण । जें संचिलें यक्षधन । तें अधःपातासी कारण । दुःख दारुण धनलोभ्या ॥ ८ ॥ म्हणे मीहि

देतो पण स्वतःच्या प्राणांना खाण्यापिण्यावांचून व्यर्थ तळमळवितो, तोहि भयंकर अधर्मच आहे, असें समजावें. ९३ यास्तव आपण दीन माणसांना जसें भोजन देतों तसेंच आपणहि त्यांतीलच एक दीन आहोंत असें समजून त्यांत न्यूनाधिक न करितां समभागानें भोजन करावें. ९४ पंक्तिप्रपंच हें अन्नदानांतील मोठें विघ्न आहे. यास्तव आपण सर्वांबरोबर समभावानें भोजन करावें.९५ अनाथ प्रेताला अग्निसंस्कार करविणें, दीनांच्या साह्यार्थ द्रव्य देणें किंवा अयाचित वृत्तीनें रहाणाऱ्याच्या घरीं (द्रव्याची देणगी किंवा धान्याचा शिधा) पाठवून देणें हा धनाचा खरा सद्व्यय होय. ९६ जो आंधळे, पांगळे, मुके, दरिद्री यांचें स्वतः रक्षण करितो, त्याच्याच धनाचें खरें सार्थक्य होतें. त्याचें पुण्य खरोखर शुद्ध होय. ९७ जो धनवान् साधु-संतांच्या अडचणी दूर करितो त्याच्या धर्माची पताका वैकुंठांत फडकते. ९८ जो धनिक माझ्या दुर्बल भक्तांचें रक्षण करितो; त्यांवर भगवान् अत्यंत संतुष्ट होऊन, भक्तांच्या आधीं त्याचा उद्धार करितो. ९९ ज्याचें धन सगळ्या मंगलांतील मंगल, कल्याणाचेंहि कल्याण अशा सद्गुरुचरणीं अर्पण होतें ४०० त्याच्या धर्माचें निशाण सत्यलोक, वैकुंठ, कैलास यांनाहि व्यापून टाकितें. त्याच्या धर्माचा नगाराच दुमदुमत असतो. १ ज्यानें स्वधर्माचरणानें द्रव्य मिळविलेलें असतें, त्यानें तें सद्गुरूला अर्पण केलें असतां तो निष्काम कर्म करणारा परम पावन होतो. २ जो माझ्या भक्तीच्या चढा-ओढींत गुरूला आपली सगळी संपत्ति अर्पण करितो, त्यांच्या संपत्तीचा स्वीकार करून श्रीहरि आपली भक्ति देतो. ३ जो एकनिष्ठेनें गुरूची भक्ति करितो, त्याच्या दारांत चारी मुक्ति दासी होऊन उभ्या रहातात. श्रीहरि त्या भक्तापासून कदापि दूर जात नाहीं. ४ जो आपलें तनु-मन-धन गुरुचरणीं पूर्णपणें अर्पण करितो, त्याला संसारभयाचें भान कल्पान्तींहि होत नाहीं. ५ दैवानें ज्यांना संपत्ति मिळते, त्यांनीं अशा रीतीनें तिचा व्यय केला असतां त्या भाग्यवानांस आत्मनिष्ठेनें द्रव्याच्या योगानेंहि परमार्थ जोडितां येतो. ६ परंतु अशा प्रकारें धनाचा उपयोग न करितां, आपल्या स्वजन-आप्तेष्टांना पीडा देऊन स्वतःहि पोटाला न खाणारा धनिक खरोखर ब्रह्मराक्षसासारखा धनरक्षकच होय. ७ याप्रमाणें स्वतःच्या जीवाचीहि उपासमार करून ज्या धनाचें रक्षण करून ठेवावें तें धन शेवटीं अधःपाताला कारण होतें. धनलोभी माणसाला दारुण दुःख भोगावें

याच निष्ठा । यक्षवित्तें झालों करंटा । हातींचा स्वार्थ गेला मोटा । वंचलों कटकटां निजमोक्षा ॥ ९ ॥ सांचोनियां यक्षवित्त । म्यां माझें केलें अनहित । ऐसा तो खेदयुक्त । कष्टें बोलत निजदुःख ॥ ४१० ॥

व्यर्थयार्थेहया वित्तं प्रमत्तस्य वयो बलम् । कुशला येन सिध्यन्ति जरठः किं नु साधये ॥ २५ ॥

निजभोगविवर्जित । शिणोनि काया वाचा चित्त । कष्टें मिळवावया वित्त । झालों उन्मत्त अविवेकी ॥ ११ ॥ करितां वित्ताचे आयास । गेलें तारुण्य बळ आयुष्य । शरीर क्षीण झालें निःशेष । तरी वित्ताचा शोष शमेना ॥ १२ ॥ अर्थें अर्थ वाढवितां । अनिवार वाढली चिंता । तेणें विसरलों निजस्वार्था । अर्थलोभता कदर्यू ॥ १३ ॥ जेणें वित्तें जीवितें साचार । भूतदया परोपकार । करूनियां विवेकी नर । भवाब्धिपरपार पावले ॥ १४ ॥ मज निर्दैवाचें येथ । वृथा वित्त वृथा जीवित । आयुष्यही गेलें व्यर्थ । निजस्वार्थ बुडाला ॥ १५ ॥ म्हणाल असतां जीवें जीत । साधूनि घेऊं निजस्वार्थ । तें आतां न चले येथ । अर्थ सामर्थ्य दोनी गेलीं ॥ १६ ॥ अधर्मास्तव गेलें वित्त । जरेनें गिळिलें सामर्थ्य । केवळ मी जरठ येथ । दैवहत उरलों असें ॥ १७ ॥ कटकटा जोडितां अर्थ । लोक नाडले समस्त । ऐसें जाणोनि प्रस्तुत । स्वयें सांगत कदर्यु ॥ १८ ॥

कस्मात्संक्लिश्यते विद्वान् व्यर्थयाऽर्थेहया सकृत् । कस्यचिन्मायया नूनं लोकोयं सुविमोहितः ॥ २६ ॥

येथ अज्ञानाची कोण गती । जे अर्थ अनर्थी म्हणती । तेही अर्थार्थी होती । ज्ञाते भ्रमती अर्थासी ॥ १९ ॥ ऐसे भ्रमले जे सज्ञान । तेही अर्जावया धन । युक्तायुक्त प्रयत्न । अनुदिनीं जाण

लागतें.८ मीहि अशाच लोभानें 'यक्षवित्त' रक्षण करून अभागी झालों. हातचा मोठा स्वार्थ घालविला ! अरेरे ! अखेर मी मोक्षाला आंचवलों. ९ हें 'यक्षवित्त' राखून मीं माझें केवढें अहित केलें तें पहा ! असें म्हणून तो मोठ्या खेदानें आपलें दुःख सांगूं लागला. ४१०

—असा विचार करून संतप्त झालेला तो म्हणतो—

व्यर्थया अर्थेहया प्रमत्तस्य मम वित्तं वयः बलं (गतं)—व्यर्थ धनेच्छेनें पुरुषार्थाकडे दुर्लक्ष करणाऱ्या माझें धन, वय व बल गेलें. **येन कुशलाः सिध्यन्ति**—ज्याच्या योगानें विवेकी पुरुष मुक्त होतात, तें माझें वित्तादि गेल्यावर, **जरठः किं नु साधये**—मी आतां म्हातारा काय साधूं ! २५.

स्वतः कसलाहि उपभोग न घेतां काया-वाचा-मन यांना शिणवून, मोठे कष्ट करून मीं द्रव्य मिळविलें व उन्मत्त, अविवेकी बनलों. ११ द्रव्य मिळविण्यासाठीं कष्ट करण्यांत तारुण्य, शक्ति व आयुष्य खर्चीं पडलें, शरीर दुर्बल झालें, तरी द्रव्याची तृष्णा कांहीं शांत होईना. १२ धनानेंच धन वाढवीत असतां अनिवार चिंता वाढली. त्यामुळें मी खरा स्वार्थ विसरलों. धनलोभानें केवळ कृपण बनलों. १३ ज्या द्रव्याच्या योगेंन विवेकी लोक भूतदया, परोपकार इत्यादि साधनांनीं भवसागराच्या परतीराला गेले, तेंच द्रव्य मज अभाग्याच्या हातीं येतांच तें व्यर्थ झालें. जीवितहि व्यर्थ झालें. आयुष्य व्यर्थ गेलें व खरा स्वार्थहि बुडाला. १४ जिवंत असतांनाच आपला खरा स्वार्थ साधून घेऊं म्हणावें, तर तें आतां होऊं शकत नाहीं. कारण द्रव्य व शक्ति दोन्हीं गेलीं. १६ अधर्मानें धन गेलें, जरेनें सामर्थ्य गेलें आणि मी वृद्ध अभागी होऊन येथें बसलों आहें. १७ द्रव्यसंचय करण्याच्या धडाक्यांत मीं सगळ्या लोकांना नाडिलें, अशी जाणीव होऊन कृपण स्वतः तो वृत्तान्त सांगत आहे. ४१८.

—दुसऱ्याहि आपल्यासारख्या कृपणाला उद्देशून भिक्षु शोक करितो—

तस्मात् विद्वान् व्यर्थया अर्थेहया असकृत् कस्मात् संक्लिश्यते—याप्रमाणें अनर्थाला जाणणारा विद्वान या वृथा धनेच्छेनें वारंवार क्लेश कां बरें भोगितो ! (कारणाची संभावना दाखवितो—) **नूनं अयं लोकः कस्यचित् मायया सुविमोहितः**—खरोखर हा लोक कोणाच्या तरी मायेनें असा अत्यंत मोहित झालेला आहे. २६.

जे आपणाला मोठे विद्वान् म्हणविणारे व द्रव्याला अनर्थकारक समजणारे असतात तेहि जर धनार्जनाच्या मागें लागतात, १९ असे ज्ञातेहि जर द्रव्याला भाळतात, तर मग अज्ञान लोकांची काय कथा ! जे विद्वान् द्रव्याला

स्वयें करितीं ॥ ४२० ॥ सज्ञान भ्रमावया कारण । ईश्वराची माया पूर्ण । अघटघटी जीचें लक्षण । त्या आधीन सज्ञान मोहिले ॥ २१ ॥ कृष्णमाया मोहिले पंडित । नव्हे म्हणाल हा इत्यर्थ । ते जोडिताति अर्थ । निजसुखार्थ भोगेच्छा ॥ २२ ॥ भोगांमाजीं जे म्हणती सुख । ते जाणावे केवळ मूर्ख । येच अर्थीचा विवेक । कदर्यु देख बोलत ॥ २३ ॥

किं धनैर्धनदैर्वा किं कामैर्वा कामदैरुत । मृत्युना ग्रस्यमानस्य कर्मभिर्वोत जन्मदैः ॥ २७ ॥

कटकटा वर्णाग्र्यें पूज्य पहा हो । त्या द्विजासी भुलवी मायामोहो । भोगीं वाढविजे जो देहो । तोचि पहा हो नश्वर ॥ २४ ॥ त्या देहासी जे नाना भोग । तोच त्यासी क्षयरोग । धन जोडणें अनेग । तोचि मार्ग निधनत्वा ॥ २५ ॥ तें धन मिळे अनायासीं । यालागीं धनवंत उपासी । अर्थ जोडोनियां प्रयासीं । भोगितां कामासी सुख काय ॥ २६ ॥ कामसुख कामिनीमेळीं । सुखार्थ स्त्रियेतें प्रतिपाळी । तेचि नानापरी सळी । देतां किंकळी सुटेना ॥ २७ ॥ स्त्री पुत्र काम भोगादिक । तेणें देहासी द्यावें सुख । तो देहोचि मरणोन्मुख । नित्य अंतक लागला ॥ २८ ॥ जे जे अतिक्रमे घडी । ते ते काळ वयसा तोडी । तेथ कोण भोगाची गोडी । धनकामें वेडीं सज्ञानें केलीं ॥ २९ ॥ सर्पमुखीं दर्दुर जातां । तो दर्दुर होय माशा खाता । तेणें न सुटे सर्पग्रासतां । जाण तत्त्वतां जयापरी ॥ ४३० ॥ तेवीं नानाभोगमेळें । देहींचा मृत्यु मागें न टळे । हें जाणोनि आंधळे । धनकामें झाले सज्ञान ॥ ३१ ॥

भाळतात ते रात्रंदिवस द्रव्य संपादनासाठीं अनेक प्रकारचे बरे-वाईट प्रयत्न करीत असतात. ४२० जाणत्या माणसांना भ्रमांत पाडावयास ईश्वराची मायाच कारण होते. अघटित गोष्टी घडवून आणणाऱ्या तिच्या स्वभावामुळें सज्ञानहि मोहांत पडतात. २१ श्रीकृष्णाच्या मायेमुळें हे पंडित मोहित होतात, असें जर म्हणाल, तर तें खरें नव्हे. ते स्वतःची विषयासक्ति पूर्ण करण्यासाठीं द्रव्याचा संचय करितात. २२ जे लोक 'विषयोपभोगांत सुख आहे' असें म्हणतात, ते केवळ मूर्ख समजावे. याविषयींच तो कृपण आतां सांगत आहे. ४२३.

—'अहोपण, हा मोहित होऊन क्लेश भोगीत नाहीं, तर धनादिकांच्या योगानें विषयोपभोग घेण्याच्या इच्छेनें क्लेश भोगितो,' अशी आशंका घेऊन भिक्षु म्हणतो—

धनैः धनदैः वा किं कामैः कामदैः वा उत किं—विविध धनांनीं किंवा धन देणाऱ्या लोकांनीं काय करावयाचें आहे! (त्यांचा काय उपयोग!) कामांनीं किंवा काम देणाऱ्यांनींहि काय करावयाचें आहे! (त्यांच्या प्राप्तीनें तरी काय होणार!) **मृत्युना ग्रस्यमानस्य जन्मदैः कर्मभिः वा उत किं**—मृत्यूकडून ग्रासल्या जाणाऱ्या या पुरुषाला जन्म देणाऱ्या कर्मांच्या योगानें तरी कोणता लाभ होणार! २७.

अरेरे! सर्व वर्णांत अग्रगण्य असल्यामुळें पूज्य असलेल्या ब्राह्मणांनाहि माया व मोह भ्रमांत टाकितात. अहो, ज्या देहाला भोगांनीं वाढवावयाचें, तोच मुळीं नश्वर आहे. २४ त्या देहाचें जे नानाप्रकारचे भोग तोच त्याचा क्षयरोग आहे आणि अनेक प्रकारें केलेला धनसंचय, हाच मरणाचा मार्ग आहे. २५ द्रव्य अनायासानें मिळालेलें असतें, म्हणून धनवान् त्याच्या मागें लागतो. तेंच द्रव्य जर मोठ्या श्रमानें संपादावें लागलें, तर मग त्याच्या भोगांत सुख कसलें! २६ स्त्रीच्या संगतींत सुख होतें म्हणून पुरुष त्या सुखासाठीं स्त्रीचा प्रतिपाळ करितो. पण तीच स्त्री अनेक प्रकारें छळूं लागते व मग कितीहि आक्रोश केला तरी सुटत नाहीं. २७ स्त्री, पुत्र, कामादि भोग हे सर्व देहाच्या सुखासाठीं आहेत. पण तोच देह मरणोन्मुख आहे. मृत्यु त्याच्या पाठीस लागलेला असतो. २८ जेवढी घटका जाते तेवढें आयुष्य काळ तोडीतच असतो. तेव्हां त्यांतील सुखाची गोडी ती काय! परंतु ज्ञाते लोकहि द्रव्येच्छेनें वेडे होतात. २९ सर्प बेडकाला गिळीत असतां, तो बेडूक माशा खाण्याचें कार्य चालूच ठेवितो. पण त्यामुळें त्याचें सापाच्या तोंडांत पडणें जसें चुकत नाहीं, ४३० त्याप्रमाणेंच नानाप्रकारचे भोग घेत असले तरी देहाच्या मागचा मृत्यु टळत नाहीं. परंतु हें जाणत असूनहि ज्ञाते विद्वान् धनाच्या लोभानें आंधळे होतात. ३१ कर्तृत्व हाच स्वतः

स्वयें कर्ता तोचि मरणधर्म । त्यासी कोण निववी भोगकाम । हा केवळ मायेचा भ्रम । भ्रमले परम महासिद्ध ॥ ३२ ॥ धनें होईल परलोक । तोही भोगू दुःखदायक । भोगक्षयें कर्ममूर्ख । येती देख अधःपाता ॥ ३३ ॥ करितां भोग्य काम्य कर्म । पुढती मरण पुढती जन्म । भोगणें पडे अविश्रम । हें दुःख परम धनकामा ॥ ३४ ॥ धनकामासी निजसुख । सर्वात्मना नाहीं देख । मीही ऐसाचि होतो मूर्ख । निजभाग्यें देख धन गेलें ॥ ३५ ॥

नूनं मे भगवांस्तुष्टः सर्वदेवमयो हरिः । येन नीतो दशामेतां निर्वेदश्चात्मनः प्लवः ॥ २८ ॥

मी पूर्वीं होतों अतिअभाग्य । आतां झालों अतिसभाग्य । मज तुष्टला श्रीरंग । विवेकवैराग्य पावलों ॥ ३६ ॥ माझें संचित जें कां धन । तेंचि माझें मुख्य अज्ञान । तें हरीनें हरोनि आपण । कृपा पूर्ण मज केली ॥ ३७ ॥ भक्तांचें अज्ञान हरी । याचिलागीं नांवें तो 'हरी' । तेणें कृपा करून पुरी । विवेक अंतरीं उपजविला ॥ ३८ ॥ वैराग्य विवेकावीण आंधळें । विवेक वैराग्यावीण पांगळें । ते माझे हृदयीं जावळीं फळें । एक वेळें उपजविलीं ॥ ३९ ॥ ऐशी हरीनें कृपा करूनी । माझें धनेंसीं अज्ञान हरूनी । विवेक वैराग्य यें दोनी । माझे हृदयभुवनीं प्रकाशिलीं ॥ ४४० ॥ परी कोणें काळें कोणे देशीं । कोण समयविशेषीं । हरि कृपा करितो कैशी । हें कोणासी कळेना ॥ ४१ ॥ भक्तांचें हरावया चित्त । हरि हरितो त्यांचें वित्त । वित्तत्यागें करूनि सुचित्त । दे विवेकयुक्त वैराग्य ॥ ४२ ॥ ऐसें घेतेंदेतें विंदान । ब्रह्मादिकां अतर्क्य जाण । यालागीं तो भगवंत पूर्ण । त्यासी साही गुण वशवर्ती ॥ ४३ ॥ त्याचें अचिंत्यानन्तरूप । परी मजलागीं झाला सकृप । माझें धनेंसीं निरसूनि पाप । ज्ञानदीप

मरणधर्म आहे. त्याला कोणता सुखोपभोग शांत करणार! हा केवल मायेचा भ्रम आहे. परम महासिद्धहि या भ्रमांत पडले आहेत. ३२ द्रव्यानें यज्ञ-याग करून स्वर्गभोग मिळतील; पण स्वर्गांतील सुखहि दुःखदायकच असतें. कारण पुणक्षय होतांच ते मूर्ख कर्मठ अधोगतीला जातात. ३३ किंवा भोगाच्या इच्छेनें सकाम कर्म आचरिल्यास पुनः जन्म-मरण सतत पाठीस लागतें. धनलोभ्याला हें मोठें दुःखच आहे. ३४ धनलोभी माणसाला आत्मसुख खरोखर प्राप्त होत नाहीं. मीहि तसाच मूर्ख होतों; पण दैवयोगानें माझें सर्व द्रव्यच गेलें, पहा! ४३५.

—आतां विवेकानें संपन्न झालेला भिक्षु आनंदित होऊन पुढील तीन श्लोकांनीं म्हणतो—

येन एतां दशां नीतः आत्मनः प्लवः निर्वेदः च भवति सः भगवान् सर्वदेवमयः हरिः नूनं मे तुष्टः— संतुष्टः झालेल्या ज्यानें मला या दशेला पोंचविलें व ज्याच्या कृपेनें मला नौकारूप वैराग्य प्राप्त झालें तो भगवान् सर्वदेवमय हरि खरोखर मजवर संतुष्ट झाला आहे. २८.

मी पूर्वीं अत्यंत अभागी होतों व आतां अत्यंत भाग्यवान् झालों आहें. श्रीहरि मजवर संतुष्ट झाल्यामुळें मी विवेक-वैराग्याला प्राप्त झालों. ३६ माझें संचित धनच माझें मुख्य अज्ञान होतें. तें हिरावून घेऊन हरीनें माझ्यावर पूर्ण कृपा केली. ३७ भगवान् भक्तांच्या अज्ञानाचें हरण करितो म्हणून त्याला 'हरि' असें म्हणतात. त्यानें मजवर पूर्ण कृपा करून माझ्या अंतःकरणांत विवेक उत्पन्न केला. ३८ विवेकांवाचून आंधळें वैराग्य आणि वैराग्यावांचून पांगळा विवेक, अशीं माझ्या हृदयांत एकाच वेळीं जुळीं फळें उत्पन्न केलीं होतीं; ३९ परंतु हरीनें अशाप्रकारें कृपा करून माझें धनरूप अज्ञान नाहींसें केलें व माझ्या अंतःकरणांत विवेक व वैराग्य हीं दोन्हीं प्रकाशित केलीं. ४४० कोणत्या वेळीं, कोणत्या काळीं, कोणत्या देशीं, कोणत्या विशिष्ट समयीं हरि कशी कृपा करितो, हें कोणालाच कळत नाहीं. ४१ भक्तांचें चित्त आपल्याकडे लागावें म्हणून तो अगोदर त्याची संपत्ति घालवितो आणि द्रव्यत्यागानें त्याची चित्तशुद्धि झाली कीं, त्याला विवेकयुक्त वैराग्य प्राप्त होतें. ४२ असें हें देवाण-घेवाण करण्याचें त्याचें चातुर्य ब्रह्मदेवादिकांसहि अतर्क्य आहे, म्हणूनच तो भगवान् पूर्ण आहे व सहाहि गुण त्याच्या अधीन आहेत. ४३ त्याचें रूप अचिंत्य, अनंत आहे. तरी तो मजवर प्रसन्न झाला व माझें धनरूपी पाप नाहींसें करून त्यानें हा

उजळला ॥ ४४ ॥ हो कां कृपा उपजली भगवंता । परी म्यां वंचिल्या यज्ञदेवता । त्या क्षोभल्या करिती घाता । हेंही सर्वथा घडेना ॥ ४५ ॥ करीं चक्र धगधगित । ज्याचा पाठिराखा हरि समर्थ । विघ्नाचा वारा न रिघे तेथ । देव वंदीत तयासी ॥ ४६ ॥ देवीं वंदूनि प्रल्हादासी । शांत करविलें नृसिंहासी । तो पाठिराखा नरहरि ज्यासी । विघ्न त्यापाशीं रिघे केवीं ॥ ४७ ॥ जेणें देवांचिया कोडी । क्षणें सोडविल्या बांदवडी । त्याचे भक्तांची लोंव वांकडी । देवें बापुडीं केवीं करिती ॥ ४८ ॥ जो सकळ देवाचा नियंता । ज्याचे चरण देव वंदिती माथां । तो भगवंत साह्य असतां । विघ्न सर्वथा बाधीना ॥ ४९ ॥ ज्याचेनि बळें वाढले देव । देव जयाचे अवयव । तो हरि तुष्टला स्वयमेव । तेथ विघ्नसंभव कोणाचा ॥ ४५० ॥ सर्वदेवमय श्रीहरी । इंद्रचंद्ररूपें माझा हरी । ऐशिया मज दीनावरी । विघ्न संसारीं माज असेना ॥ ५१ ॥ ऐशिये कृपेचें कारण । ये जन्मीं नाहीं साधन हें माझें पूर्वील जुनें ऋण । देवापाशीं जाण ठेविलें होतें ॥ ५२ ॥ मी पूर्वीं कोण देशीं । तीर्थक्षेत्रीं कोण वंशीं । कोण आचरलों सत्कर्मासी । तेणें हृषीकेशी तुष्टला ॥ ५३ ॥ मातें अतिदुःखी देखोन । हरि तुष्टला कृपापूर्ण । त्याचे कृपेस्तव जाण । विवेकसंपन्न मी झालों ॥ ५४ ॥ हो कां धनक्षयें झालें दुःख । तेणें दुःखें पावलों निजसुख । भवाब्धि तरावया देख । वैराग्यविवेक दृढ तारूं ॥ ५५ ॥ हरिखें वोसंडूनि ब्राह्मण । म्हणे उरले आयुष्येनि जाण । वृथा जावों नेदी अर्ध क्षण । करीन निर्दळण सुखदुःखां ॥ ५६ ॥

सोऽहं कालावशेषेण शोषयिष्येऽङ्गमात्मनः । अप्रमत्तोऽखिलस्वार्थे यदि स्यात्सिद्ध आत्मनि ॥ २९ ॥

ज्ञानदीप लावून ठेविला. ४४ आतां भगवानाची मजवर कृपा झालेली असल्यामुळें मी ज्या यज्ञदेवतांना फसविलें होतें त्या क्षुब्ध होऊन माझा घात करतील, असें संभवत नाहीं. ४५ कारण हातांत चकचकणारें तीव्र धारेचें सुदर्शन चक्र घेऊन श्रीहरि ज्याचें रक्षण करण्यास समर्थ आहे, तेथें विघ्नांचें वारेंहि प्रवेश करीत नाहीं. देव त्याला वंदन करितात. ४६ देवानें प्रल्हादास वंदन करून नृसिंहाला संतुष्ट करविलें, असा श्रीहरि जेथें पाठीराखा आहे, तेथें विघ्न कोठून प्रवेश करणार ! ४७ ज्यानें कोट्यवधि देवांना बंदिखान्यांतून सोडविलें त्याच्या भक्ताच्या केसाला तरी बापडे देव धक्का कसा लावतील ! ४८ जो सगळ्या देवांचा नियंता ज्याच्या चरणांना देव शिरसा वंदन करितात, तो भगवान् साह्यकर्ता असल्यावर विघ्न सर्वथा बाधत नाहीं. ४९ ज्याच्या बळावर देव समर्थ होतात, देव जणूंकाय ज्याचे अवयवच आहेत, तो श्रीहरि स्वतःच प्रसन्न झाल्यावर तेथें कोण विघ्न करूं शकणार ! ४५० श्रीहरीच सर्व देवमय आहे. माझा श्रीहरीच इंद्र-चंद्ररूप आहे. अशा मज दीनावर संसारांत विघ्न कसें येणार ! ५१ श्रीहरीच्या अशा कृपेला कारण होईल असें पुण्याचरण या जन्मीं माझ्या हातून घडलें नाहीं. माझें पूर्वजन्मींचें फार जुनें ऋण देवापाशीं ठेविलें होतें. ५२ पूर्वजन्मीं मी कोणत्या तरी देशांत, कोणत्या तरी पुण्यक्षेत्रांत, कोणत्या तरी वंशांत सत्कर्म आचरिलें होतें. त्यामुळें श्रीकृष्ण संतुष्ट झाला. ५३ मला अतिशय दुःखी पाहून श्रीहरीचें दयाळु अंतःकरण द्रवलें व त्याच्या कृपेमुळें मीं विवेकसंपन्न झालों. ५४ अहो ! द्रव्यनाशामुळें जें दुःख झालें, त्यामुळें मला आत्मसुख प्राप्त झालें. भवसागर तरून जाण्यास विवेकयुक्त वैराग्य हें मोठें भक्कम जहाजच आहे. ५५ नंतर तो ब्राह्मण आनंदानें उसळून म्हणाला कीं, आतां माझ्या उरलेल्या आयुष्यांतील अर्धा क्षणहि मी व्यर्थ घालविणार नाहीं. सुख-दुःखांचा नाश करून टाकीन. ४५६.

सः अहं कालावशेषेण आत्मनः अङ्गं शोषयिष्ये–असा हा मी आतां अवशिष्ट राहिलेल्या कालानें तपाच्या योगानें आपलें अंग सुकवून टाकीन किंवा विद्येनें त्याचा लय करून घेईन. यदि कालावशेषः स्यात् (तर्हि) आत्मनि सिद्धः **सन् अखिलस्वार्थे अप्रमत्तः सन्**- आणि जर काल अवशिष्ट राहील तर आत्म्यामध्येंच संतुष्ट होऊन सर्व धर्मादि साधनांमध्यें सावधान राहून पुरुषार्थ साधीन २९.

काइसा भवभयाचा पाड । घेईन कोटि जन्मांचा सूड । नासल्या आयुष्याचा कैवाड । करीन निवाड येणें देहें ॥ ५७ ॥ देहासी आली वार्धक्यता । परी वृद्धत्व नव्हे माझिया चित्ता । तेणें चित्तें चिंतूनि भगवंता । भवबंध आतां छेदीन ॥ ५८ ॥ उरले आयुष्यें येथ । कळिकाळाचे पाडीन दांत । गर्भदुःखाचें खणेन खत । मरणाचा घात मी करीन ॥ ५९ ॥ जेणें देहें सत्यानृत । कर्में आचरलों समस्त । तें देह मी शोषीन येथ । विदेहस्थ निजभावें ॥ ४६० ॥ घालूनि निजबोधाची धाडी । फोडीन देहाची बांदवडी । तोडूनि सुखदुःखांची बेडी । उभवीन गुडी सायुज्याची ॥ ६१ ॥ आजि वैराग्यविवेकयुक्त । मी निजस्वार्थीं सावचित्त । जो जो साधीन परमार्थ । तो तो हस्तगत मज होय ॥ ६२ ॥ मजचि साधे निजस्वार्थ । हाचि नेम नाहीं येथ । जो जो वैराग्यविवेकयुक्त । त्यासी परमार्थ आंदणा ॥ ६३ ॥ वैराग्य विवेकाचें लक्षण । देहगेहस्त्रियादि धन । असतां आसक्त नव्हे मन । वैराग्य पूर्ण या नांव ॥ ६४ ॥ म्यां जो आरंभ केला पहा हो । यासी देवोदेवीसमुदावो । येणें सहित देवाधिदेवो । मज साह्य होवो हें प्रार्थित ॥ ६५ ॥

तत्र मामनुमोदेरन् देवास्त्रिभुवनेश्वराः । मुहूर्तेन ब्रह्मलोकं खट्वाङ्गः समसाधयत् ॥ ३० ॥

इंद्रियअधिष्ठात्री देवता । मज साह्य होतू समस्ता । सिद्धि पावावया परमार्था । इंद्रियजयता मज द्यावी ॥ ६६ ॥ जो त्रिभुवनेश्वर विख्यात । तो साह्य झालिया भगवंत । देवता साह्य होती समस्त । त्या अंतर्भूत हरिरूपीं ॥ ६७ ॥ देवतारूपें भावूनि हरी । सकळ देवांची सेवा करीं । साह्य होऊनि दीनोद्धारीं । मज भवसागरीं तारावें ॥ ६८ ॥ म्हणाल वयसेचा शेवट । केवळ झालासी तूं जरठ । वार्धकीं हे खटपट । वृथा कष्ट कां करिशी ॥ ६९ ॥ ऐसा न मानावा अर्थ । खट्वांगराजा विख्यात ।

भवभयाचा काय मोठासा पाड ! मी कोट्यवधि जन्मांचा सूड घेईन. वायां गेलेल्या आयुष्याची भरपायी करीन. याच देहांत मी सगळ्याची फेड करीन. ५७ माझ्या देहाला जरी वृद्धत्व आलें असलें तरी माझें मन अद्यापि तरुणच आहे. त्या मनानें भगवंताचें चिंतन करून आतां भवबंधाचा छेद करीन. ५८ यापुढें उरलेल्या आयुष्यांत कळिकाळाचे दांत पाडीन, गर्भव्यथेचा कर्जरोखा फाडून टाकीन आणि मी मरणाचा घात करीन. ५९ ज्या देहानें मी चांगलीं-वाईट कर्में आचारिलीं तो देह मी येथेंच देहरहित ईश्वराच्या आत्मभावनेनें–चिंतनानें कृश करीन. ४६० आत्मज्ञानाचा हल्ला चढवून देहरूपी कारागृह फोडीन आणि सुख दुःखांची बेडी तोडून सायुज्य मुक्तीची पताका उभारीन. ६१ आज मी विवेक-वैराग्ययुक्त होऊन आपल्या स्वार्थाविषयीं सावध झालों. जेवढा परमार्थ मी साधीन तेवढा मला प्राप्त होईल. ६२ मला परमार्थ साधेलच असा नेम नाहीं. कारण जो विवेकयुक्त वैराग्यानें संपन्न असतो त्यालाच परमार्थ सुलभ होतो. ६३ वैराग्य-विवेकाचें लक्षण असें आहे कीं, देह-घर-स्त्री-पुत्र-धन इत्यादि सर्वांची अनुकूलता असूनहि मन त्यांत आसक्त होऊं न देणें यालाच पूर्ण वैराग्य म्हणतात. ६४ मीं आतां जो आरंभ केला आहे त्यांत देव-देवींच्या समुदायासह देवाधिदेव मला सहाय होवो, अशी मी प्रार्थना करीत आहें. ४६५.

त्रिभुवनेश्वराः देवाः तत्र मां अनुमोदेरन्–त्रिभुवनाचे ईश्वर, असे देव या कार्यांत मजवर अनुग्रह करोत. (अरे पण, देवांनीं जरी अनुग्रह केला तरी वृद्ध झालेला तूं स्वल्प कालानें काय साधणार ! उत्तर—) खट्वाङ्गः मुहूर्तेन ब्रह्मलोकं समसाधयत्–खट्वांगानें एका क्षणांत ब्रह्मलोक साधिला. ३०.

इंद्रियांना प्रेरणा करणाऱ्या सर्व देवता मला साह्य होवोत. त्यांनीं मला परमार्थसिद्धीसाठीं इंद्रियें जिंकण्याचें सामर्थ्य द्यावें ६६ जो प्रसिद्ध त्रिभुवनेश्वर भगवान् तो सहाय झाला कीं, इतर देवता सहजच अनुकूल होतात. कारण त्या सर्व हरीच्या स्वरूपांतच अंतर्भूत होतात. ६७ देवतारूपानें हरि सर्वत्र आहे, अशा भावनेनें मी सगळ्या देवतांची सेवा करीन. तरी मला सर्वांनीं साह्य करून भवसागरांतून तारावें. ६८ यावर तुम्ही कदाचित् असें म्हणाल कीं, तुझें आयुष्य आतां संपत आलें. तूं अगदीं वृद्ध झाला आहेस. तेव्हां या म्हातारपणांत तुला ही खटपट कशाला हवी !

मुहूर्तें साधिला परमार्थ । निजस्वार्थ फावला ॥ ४७० ॥ त्याहूनि माझें तंव येथ । आयुष्य असेल बहुत । देव साह्य होत समस्त । निमेषें परमार्थ साधीन ॥ ७१ ॥ आजी विवेकवैराग्य जैसें आहे । हें जैं निर्वाहलें राहे । तैं कळिकाळ बापुडे काये । म्यां जिंतिला होये संसार ॥ ७२ ॥ हा पूर्वीं कैसा होता येथ । आतां पालटलें याचें वृत्त । झाला विवेकवैराग्ययुक्त । आश्चर्ये सांगत श्रीकृष्ण ॥ ७३ ॥

श्री० भ०—इत्यभिप्रेत्य मनसा ह्यावन्त्यो द्विजसत्तमः । उन्मुच्य हृदयग्रन्थीन् शान्तो भिक्षुरभून्मुनिः ॥३१॥

ऐसा तो अवंतीचा ब्राह्मण । अतिकदर्यु होता जाण । त्याच्या हातींचें गेलिया धन । वैराग्य चिन्ह पालटलें ॥ ७४ ॥ यालागीं वैराग्यविवेक चित्तीं । झाल्या आंदणी ब्रह्मप्राप्ती । कृष्ण सांगे उद्धवाप्रती । निजात्म स्थिती साधावया ॥ ७५ ॥ पूर्वीं होता ब्राह्मणाधम । धनलोभी निंद्यकर्म । तोचि झाला द्विजोत्तम । विवेकें परम वैरागी ॥ ७६ ॥ पूर्वीं केलिया निश्चितार्था । मी साधीन सर्वथा । ऐशिया अतिउल्हासता । निजपरमार्था साधक ॥ ७७ ॥ माझिया दुःखाचें कारण । माझा मीच झालों जाण । धरितां काम लोभ धनाभिमान । दुःख दारुण मज माझें ॥ ७८ ॥ मज दुःख देऊनि गेलें धन । धन तें दुःखाचें भाजन । स्त्रीपुत्रार्थ सलोभी आपण । तिंहींच जाण मज दवडिलें ॥ ७९ ॥ धरावा ज्ञातीचा अभिमान । तंव स्वयातीं मी सांडिलों जाण । मजसी विमुख झाले स्वजन । त्यांचा लोभ कैंचा मज आतां ॥ ४८० ॥ स्त्री पुत्र

तूं व्यर्थ कष्ट कशाला करितोस ! ६९ तर असा विकल्प मनांत आणूं नको. कारण प्रसिद्ध खट्वांगराजानें एका क्षणांत परमार्थ मिळवून आपला स्वार्थ साधिला. (पूर्वीं अयोध्येंत इक्ष्वाकु-कुलांत यज्ञ करण्याविषयीं अत्यंत विख्यात खट्वांग नांवाचा राजा होऊन गेला. त्याच्या यज्ञांत साठ हजार गंधर्व गायन करीत. सुवर्ण यूपाला पशु बांधीत. त्याच्या राजवाड्यांत स्वाध्यायघोष, ज्याघोष व 'दीयतां' हा याचकांचा घोष असा त्रिविध घोष नित्य ऐकूं येत असे. एकदां देवांनीं त्याला सहायार्थ स्वर्गीं नेले. तेव्हां त्यांचें कार्य झाल्यावर संतुष्ट झालेल्या देवांनीं प्रसन्न होऊन त्याला वर मागण्यास सांगितलें त्यावेळीं राजानें 'माझें आयुष्य किती आहे' असें त्यांस विचारून घेतलें व आतां 'एक मुहूर्त आयुष्य शिल्लक आहे' असें ऐकतांच त्यानें त्वरेनें मृत्युलोकीं येऊन आपल्या पुत्रास राज्याभिषेक केला व स्वतः आत्मस्वरूपांत निमग्न होऊन तो मुक्त झाला. 'ही सविस्तर कथा महाभारताच्या वनपर्वाच्या नवव्या अध्यायांत आहे.) ४७० त्या राजापेक्षां माझें आयुष्य कांहीं तरी अधिक असणार ! तेव्हां सगळ्या देवता सहाय झाल्यास एका पळांत मी परमार्थ साधीन. ७१ आज जें विवेक-वैराग्य प्राप्त झालें आहे, तें जर कायम टिकेल तर बापडा कळिकाळ काय करणार ! मीं प्रपंच जिंकल्यासारखाच होईल. ७२ हा ब्राह्मण पूर्वीं कसा होता, आतां याची वृत्ति कशी पालटली आणि तो विवेक-वैराग्ययुक्त कसा झाला ! हेंच आश्चर्य श्रीकृष्ण सांगत आहे. ४७३.

भग० ३० —भगवान् म्हणाले, **मनसा इति अभिप्रेत्य**—मनानें असा निश्चय करून **आवंत्यः द्विजसत्तमः भिक्षुः**—मालव देशांतील तो द्विजश्रेष्ठ भिक्षु, **हृदयग्रन्थीन् उन्मुच्य**—अहंकार व ममकार या हृदयग्रंथी तोडून **शान्तः मुनिः अभवत्**—शांत मुनि झाला ३१.

(श्रीकृष्ण म्हणाला कीं,) अशा प्रकारचा तो अवंतीचा ब्राह्मण अतिशय कृपण होता. त्याच्या हातचें सगळें धन गेल्यावर त्याची वृत्ति पालटली व तो विरक्त बनला. ७४ यास्तव मनांत विवेक-वैराग्य उत्पन्न झालें कीं ब्रह्मप्राप्ति हातीं आलीच म्हणून समजावें. असें श्रीकृष्णानें उद्धवाला आत्मज्ञान साधण्यासाठीं सांगितलें. ७५ पूर्वीं जो धनलोभी निंद्य कर्मे करणारा अधम ब्राह्मण होता तोच विवेक व वैराग्य, यांनीं द्विजोत्तम झाला. ७६ पूर्वीं केलेला निश्चय मी खात्रीनें पाळीन; अशा उल्हासानें तो परमार्थसाधनाकडे वळला. ७७ माझ्या दुःखाला मीच कारण झालो. काम; लोभ व धनाभिमान धरल्यामुळें माझें मलाच अत्यंत दुःख भोगावें लागत आहे. ७८ द्रव्य त्याला दुःख देऊन गेलें. यावरून द्रव्यच दुःखाचें मूळ आहे. मी स्त्री-पुत्रांचा लोभ धरून बसलों; पण त्यांनींच मला बाहेर घालविलें. ७९ बरें, जातीचा अभिमान धरावा तर माझ्या ज्ञातिबांधवांनीं मला सोडिलें. माझे आप्तस्वजन मला पारखे झाले, तेव्हां आतां मला त्यांचा लोभ कसला ! ४८० स्त्री-पुत्र-स्वजन-धन यांवरील आसक्तीचें मुख्य कारण माझा देहाभिमान. त्या

स्वजन धन । यांच्या लोभाचें मुख्य कारण । माझा मज देहाभिमान । त्यासी माझें नमन साष्टांग ॥ ८१ ॥ नमन स्त्रीपुत्रादि धनांसी । नमन स्वयातिस्वजनांसी । नमन देहाभिमानासी । संबंध तुम्हां-आम्हांसी असेना ॥ ८२ ॥ जेवीं कां जळा आणि चंद्रबिंबासी । एकत्र वास दिसे दोहींसी । परी चंद्र अलिप्त जळेंसीं । तेवीं संबंध तुम्हांसी मज नाहीं ॥ ८३ ॥ जेवीं कां अखंड अहर्निशीं । छाया जडलीसे रूपासी । पैं रूप न बैसे निजच्छायेसी । तेवीं संबंधू तुम्हांसीं मज नाहीं ॥ ८४ ॥ जेवीं तारुण्य ये देहापाशीं । तेणें तारुण्यें ये देहो मुसमुशी । शेखीं तारुण्य सांडी देहासी । तेवीं म्यां तुम्हांसी सांडिलें ॥ ८५ ॥ वनीं बसंताचें रिगवणें । वनश्री शोभा मिरवी तेणें । तो वसंतू जेवीं सांडी वनें । तेवीं म्यां सांडणें अहंममता ॥ ८६ ॥ बाप सववैराग्य विवेक । त्याग करविला अलोलिक । देहाभिमाना तिळोदक । दीधले देख ममतेसी ॥ ८७ ॥ जेवीं भ्रष्टलिया पुत्रासी । पिता घटस्फोटें त्यागी त्यासी । तेवीं त्यागूनि देहाभिमानासी । स्वयें संन्यासी तो झाला ॥ ८८ ॥ जेवीं कां ये फळ परिपाकातें । सांडी जन्मल्या निजदेहातें । देंठ न धरी त्या फळांतें । फळ देंठांतें धरीना ॥ ८९ ॥ तेवीं हा न धरी अहंतेसी । अहंता लाजली न ये यापाशीं । हाही देहाभिमानासी । सद्भावेंसीं नातळे ॥ ४९० ॥ जळीं जेवीं पद्मिनीपान । असोनि जळेंसीं अलिप्त जाण । तेवीं नातळोनि देहाभिमान । संन्यासग्रहण विध्युक्त ॥ ९१ ॥ अन्य संन्यासी करोनि होम । जाळिला म्हणती क्रोधकाम । शेखीं तिळ तूप होय भस्म । क्रोधकाम संचले ॥ ९२ ॥ तैशी नव्हेच याची होमस्थिती । जाळिल्या विकल्पाच्या वृत्ति । कामक्रोधांची पूर्णाहुती । केली अहंकृतीसमवेत ॥ ९३ ॥ होमूनि निजस्वभावासी । झाला त्रिदंडी संन्यासी । आज्ञा घेऊनि गुरुपाशीं । सुखें सुखवासी विचरत ॥ ९४ ॥

देहाभिमानाला साष्टांग नमस्कार असो. त्याचप्रमाणें स्त्री, पुत्र, धन, स्वजाति, स्वजन व देहाभिमान या सर्वांस हात जोडून नमस्कार असो. ८१ या पुढें तुमचा आमचा संबंध नको. ८२ ज्याप्रमाणें तळ्यांतील जल व त्यांत पडलेलें चंद्राचें प्रतिबिंब, या दोहोंचा एकत्र सहवास जरी आपल्याला दिसत असला तरी चंद्र त्या जलापासून अगदीं अलिप्त असतो, त्याप्रमाणें तुमच्याशीं माझा कांहीं संबंध नाहीं. ८३ किंवा एखाद्या पदार्थाची छाया रात्र-दिवस अखंड त्याच्यापाशींच असते, परंतु तो पदार्थ कांहीं छायेपाशीं बसून रहात नाहीं. तसा तुमच्याशीं माझा संबंध नाहीं. ८४ किंवा तारुण्य जेव्हां देहापाशीं येतें त्यावेळीं तो देह तारुण्यानें मुसमुसलेला दिसतो. परंतु शेवटीं तें तारुण्य जसें त्याला सोडून जातें, त्याप्रमाणें मी तुम्हांस सोडीत आहें. ८५ वसंतऋतूनें वनांत प्रवेश केला कीं, वनश्रीची शोभा रमणीय दिसते. पण तो वसंतहि आपला काल संपतांच जसा वनाला सोडून जातो, त्याप्रमाणेंच मी अहं-ममतेला सोडीत आहे. ८६ विरक्तीसह विवेकाचें सामर्थ्य मोठें विलक्षण खरें ! त्यानें मजकडून अलौकिक त्याग करविला. ममता आणि देहाभिमान यांना तिलांजलि देवविली. ८७ पिता जसा भ्रष्ट झालेल्या पुत्राचा घटस्फोट करून त्याचा त्याग करितो, त्याप्रमाणें तो देहाभिमान टाकून संन्याशी झाला. ८८ झाडावरील फळ पक्व झालें म्हणजे जन्मदात्या वृक्षाला जसें सोडितें व मग देंठ त्या फळाला धरीत नाहीं व फळ देंठाला धरीत नाहीं, ८९ त्याप्रमाणें हा भिक्षु अहंतेला स्पर्श करीनासा झाला व अहंता लाजून त्याच्यापाशीं येईनाशी झाली. हाहि सद्भावानें देहाभिमानाला स्पर्श करीना. ४९० कमलाचें पान जसें जलांत राहून जलानें लिप्त होत नाहीं, त्याप्रमाणें तो देहाभिमानापासून अलिप्त राहिला. त्यानें विधियुक्त संन्यासग्रहण केलें. ९१ इतर संन्याशी होम करून काम-क्रोधांस जाळिलें असें म्हणतात; पण खरोखर होमांत तिळा-तुपांचें भस्म होऊन त्यांच्या काम-क्रोधांचा संचय तसाच रहातो; ९२ पण यांचा होम तशा प्रकारचा नव्हता. त्यानें विकल्पाच्या वृत्ति जाळून टाकिच्या व अहंकारासहि काम-क्रोधांची पूर्णाहुति दिली. अशा प्रकारें आपल्या स्वभावाचा होम करून तो त्रिदंडी संन्याशी झाला व गुरूच्या आज्ञेनें त्यानें सुखानें सर्वत्र संचार केला. ४९४.

स चचार महीमेतां संयतात्मेन्द्रियानिलः । भिक्षार्थं नगरग्रामानसङ्गोऽलक्षितोऽविशत् ॥ ३२ ॥

जाणोनियां मनपवन । सांडोनियां मानाभिमान । परमानंदें परिपूर्ण । पृथ्वीमाजीं जाण विचरत ॥ ९५ ॥ ज्यासी नावडे देहसंगती । त्यासी कैंचा संगु सांगाती । एकला विचरे क्षिती । आत्मस्थिती निजबोधें ॥ ९६ ॥ अखंड वसे वनांतरीं । भिक्षेलागीं निघे नगरीं । खेटखर्वटग्रामीं पुरीं । भिक्षा करी यथाप्राप्त ॥ ९७ ॥ मी एक भिक्षेसी येता । ऐसा नेम न करी सर्वथा । अलक्ष्य येऊनि अवचितां । जें आलें हाता तेणें सुखी ॥ ९८ ॥ पंचागार सप्तागार । हाही नेम नाहीं निर्धार । कोणे विखींचा अहंकार । अणुमात्र धरीना ॥ ९९ ॥

तं वै प्रवयसं भिक्षुमवधूतमसज्जनाः । दृष्ट्वा पर्यभवन् भद्र बह्वीभिः परिभूतिभिः ॥ ३३ ॥

न करी देहमळक्षाळण । मुसलवत् करी स्नान । यालागीं तो धूसरवर्ण । अवधूतपण या हेतू ॥ ५०० ॥ ऐसा विचरतां पृथ्वीसी । अवचटें आला अवंतीसी । अतिवृद्ध आणि संन्यासी । अवधूत-वेशी देखिला ॥ १ ॥ संन्यास घेतलिया जाण । पूर्वभूमिका अवलोकन । एक वेळा करावी आपण । पद्धतिलेखन आचारीं ॥ २ ॥ ते नगरींचे म्हणती जन । अरे हा कदर्यु ब्राह्मण । याचें हारपल्या धन । संन्यासी जाण हा झाला ॥ ३ ॥ हें ऐकोनियां अतिदुर्जन । त्या सभोंवते मीनले जाण । परस्परें दावूनि खूण । विरुद्ध छळण मांडिलें ॥ ४ ॥ त्यासी बहुसाल उपद्र-वितां । क्षणार्थ पालट नव्हे चित्ता । क्रोधा न येचि सर्वथा । अतिविवेकता महाधीरू ॥ ५ ॥

सः संयतात्मेन्द्रियानिलः एतां महीं चचार–ज्यानें शरीर, इंद्रियें व प्राण यांचें नियमन केलें आहे, असा तो या पृथ्वीवर संचार करूं लागला. **असङ्गः अलक्षितः भिक्षार्थं नगरग्रामान् अविशत्**–तो आसक्तिशून्य होऊन, आपलें श्रेष्ठत्व प्रकट न करितां, भिक्षेसाठीं नगरांत व ग्रामांत प्रवेश करीत असे. ३२.

तो मन व प्राण यांना जिंकून, मानाभिमान टाकून, पूर्ण परमानंदानें पृथ्वीवर फिरूं लागला. ९५ ज्याला देहाची संगतीहि आवडत नाहीं त्याला इतरांची सोबत कशी रुचणार ! आत्मज्ञानानें संपन्न होऊन त्यानें पृथ्वी-पर्यटन केलें. ९६ तो सदोदित वनांत रहात असे. केवल भिक्षेसाठीं तेवढा गांवांत प्रवेश करीत असे. ज्या गांवांत बाजार भरतो, तेथें तो मिळेल ती भिक्षा मागून आणीत असे. ९७ मी एक भिक्षेकरी आहें, असा संकल्पहि तो करीत नसे. कोणाच्या लक्षात न येतां तो अकस्मात् भिक्षेस जात असे व जें कांहीं मिळेल त्यांत समाधान मानीत असे. ९८ पांचच घरें किंवा सातच घरें मागावयाचीं हाहि नेम त्यानें केला नव्हता. त्यानें कशाचाच यत्किंचित्‌हि अभिमान धरिला नाहीं. ४९९.

भद्र–हे साधो ! **ते असज्जनाः तं प्रवयसं अवधूतं भिक्षुं दृष्ट्वा बह्वीभिः परिभूतिभिः पर्यभवन् वै**–तेव्हां त्या ग्रामांतील व नगरातील ते दुर्जन त्या वृद्ध मलिन भिक्षूला पाहून अनेक प्रकारच्या तिरस्कारांनीं त्याचा अवमान करिते झाले. ३३.

तो शरीरावरील मळ धुवून न काढितां मुसळासारखें स्नान करीत असे. (अंग न चोळितां पाण्यांत नुसती बुडी मारून बाहेर येणें याला मुसलस्नान म्हणतात.) त्यामुळें त्याचें अंग मळकट दिसत असे. म्हणूनच त्याला अवधूत म्हणत असत. ५०० असा तो भिक्षु पृथ्वीवर फिरत असतां एकदां अकस्मात् अवंति नगरींत आला. अवधू-ताच्या वेशांत असलेल्या त्या अतिवृद्ध संन्याशाला लोकांनीं पाहिलें. १ 'संन्यास घेतल्यानंतर आपली जन्मभूमि एकदां पहावी' असें श्रेष्ठ आचार्यांनीं लिहून ठेविलें आहे. २ त्याला पहातांच त्या शहरांतील सगळे लोक जमा झाले आणि म्हणू लागले कीं, अरे हा तर तो कृपण ब्राह्मण, त्याचें सगळें धन गेल्यामुळें आतां संन्याशी झाला आहे. ३ हें ऐकून त्यांतील अतिशय दुर्जन लोक त्याच्याभोंवतीं जमले आणि एकमेकांस खुणा करून त्यांनीं दुष्टपणानें त्याला छळावयास आरंभ केला. ४ त्या लोकांनीं त्याला अतिशय उपद्रव दिला; पण त्याच्या मनोवृत्तींत क्षणभरहि बदल झाला नाहीं. तो अत्यंत विवेकानें धीर व गंभीर झाल्यामुळें त्याला यत्किंचित्‌हि क्रोध आला नाहीं. ५ लोकांनीं

त्याच्या उपद्रवाची कथा । आणि त्याची सहनशीलता । तुज मी सांगेन तत्त्वतां । सावधानता अवधारीं ॥ ६ ॥ दृष्टि ठेवूनि येथींच्या अर्था । विवेकें कुशळ होय श्रोता । अर्थ धरी भावार्थतां । शांति तत्त्वतां तो लाभे ॥ ७ ॥ विवेकचित्तचकोरचंद्रा । भागवतभाग्यें शुद्धमुद्रा । शांतिसौभाग्यनरेंद्रा । ऐक सुभद्रा उद्धवा ॥ ८ ॥ आकळावया निजशांतीसी । कृष्ण संबोधी उद्धवासी । ऐसें सावध करोनि त्यासी । दशा ते ऐशी शांतीची ॥ ९ ॥ अवरोधितां जीविकेसी । सन्मान देतां अपमानेंसीं । जो सर्वथा न ये क्षोभासी । शांति त्यापाशीं ते ऐक ॥ ५१० ॥

केचित्त्रिवेणुं जगृहुरेके पात्रं कमण्डलुम् । पीठं चैकेऽक्षसूत्रं च कन्थां चीराणि केचन ॥ ३४ ॥

दुर्जनी वेढूनि संन्यासी । छळणार्थ लागती पायांसी । तेणें नमनप्रसंगेंसीं । करिती स्पर्शासी अवघेही ॥ ११ ॥ एक म्हणती वृद्ध संन्यासी । एक म्हणती किती चातुर्मासी । एक पुसती संप्रदायासी । कोणे गुरूनें तुम्हांसी मुंडिलें ॥ १२ ॥ एक खुणाविती एकांसी । पूर्वभूमी पुसा यासी । एक म्हणती यापाशीं । धनसंग्रहासी पुसा रे ॥ १३ ॥ एक म्हणती अहो स्वामी । तुमची कवण पूर्वभूमी । तुम्ही व्यापारी कीं उदिमी । कोणे ग्रामीं निवासु ॥ १४ ॥ एक म्हणती कांहीं आहे धन । एक म्हणती आतां निर्धन । एक म्हणती न करा छळण । विरक्त पूर्ण संन्यासी ॥ १५ ॥ ऐसें करितां छळण । संन्यासी अनुद्वेग जाण । निःशब्दवादें धरिलें मौन । कांहीं वचन न बोले ॥ १६ ॥ एक म्हणती त्रिदंडाकारण । हा पूर्वी होता अतिसधन । कोरूनि भरिलें असेल धन । हेंचि लक्षण त्रिदंडा ॥ १७ ॥

त्याला दिलेला उपद्रव आणि त्याची सहनशीलता याचा वृत्तान्त मी तुला सांगतों, तो सावधान चित्तानें ऐक. ६ श्रोत्यानें त्यांतील अर्थाकडे दृष्टि ठेविली असतां तो विवेकसंपन्न होतो. श्रद्धेनें त्याच्या अर्थाचें ग्रहण केलें असतां तत्त्वतः शान्ति लाभते. ७ चकोररूपी चित्ताला शांत करणारा विवेकरूपी चंद्रच, भक्ताच्या भाग्यानें सुलक्षणी, शान्तिसौभाग्याचा राजाच, अशा हे भाग्यवान् उद्धवा ! ऐक. ८ उद्धवाला आत्मशांति ग्रहण करितां यावी म्हणून, श्रीकृष्णानें त्याला इतक्या संबोधनांनीं हांक मारिली व त्याला भानावर आणून म्हटलें कीं, शांतीचें स्वरूप असें असतें. ९ कोणीं निर्वाहाच्या साधनांत अडथळा आणिला किंवा सन्मानाच्या नांवानें अपमान केला, तरी ज्याला क्रोध येत नाहीं, अशा त्या भिक्षुकापाशीं शांति कशी होती, तें ऐक. ५१०.

—पुढील सात श्लोकांनीं त्याच्याच अवमानाचा प्रकार दाखवितात—

केचित् त्रिवेणुं जगृहुः—कोणीं त्याचा त्रिदंड हिसकावून घेतला, **एके पात्रं कमण्डलुं पीठं च** —कोणीं पात्र, **कमंडलु** व आसन घेतलें; एके अक्षसूत्रं कन्थां **केचन चीराणि** च—कोणीं त्याची जपमाला, गोधडी, व कोणी फटकीं **वस्त्रें ओढून** घेतलीं. ३४.

त्या संन्याशाच्या भोंवतीं ते सगळे दुर्जन जमले. त्याला त्रास देण्यासाठीं सगळे त्याला स्पर्श करून व चरणांवर मस्तक ठेवून वंदन करूं लागले. ११ कोणी म्हणत, 'हा म्हातारा संन्याशी आहे,' कोणी विचारीत 'संन्यास घेऊन किती चातुर्मास लोटले' कोणी त्याचा संप्रदाय विचारीत, तर कोणी 'कोणत्या गुरूनें तुम्हांस संन्यास दिला' असा प्रश्न करीत. १२ कांहींजण 'याची जन्मभूमि यास विचारा' असें दुसऱ्याला खुणावूं लागले. दुसरे कांहींजण 'अरे, यांच्यापाशीं किती द्रव्यसंचय आहे' म्हणून विचारा असें म्हणूं लागले. १३ तेव्हां कोणी म्हणाले 'अहो स्वामिमहाराज ! तुमची जन्मभूमि कोठची ! तुम्ही कोणी व्यापारी कीं उदमी ! तुम्ही रहाणार कोठचे' १४ कोणी म्हणे 'याच्या जवळ धन असेल' दुसरा म्हणे 'छे छे, हा निर्धन दिसतो.' कोणी म्हणत 'अरे, हा पूर्ण विरक्त संन्यासी दिसतो. १५ त्याचा उगाच छळ करूं नकारे !' अशा प्रकारें लोकांनीं नाना प्रकारच्या दुरुक्तीनें त्याची छळणूक चालविली होती. तरीहि त्या संन्याशाची शांत वृत्ति अणुभरहि ढळली नाहीं. तो तोंडांतून शब्दहि न काढितां मौन धरून बसला. एक अक्षरहि बोलेना. १६ कोणी म्हणत 'अहो, पूर्वीं हा मोठा श्रीमंत होता, त्यानें आपली सर्व संपत्ति हा दंड पोखरून त्यांत भरून ठेविली आहे, हेंच याच्या त्रिदंडी संन्यासाचें कारण

एक म्हणती सहस्रदोरीं। कंथा केली असे अतिथोरी। एक म्हणती त्यामाझारीं। धन शिरोवरी खिळिलेंसे ॥ १८॥ एक म्हणती काय पाहतां तोंड। येणें मांडिलेंसे पाखंड। ऐसा निर्भर्सिता वितंड। एकें त्रिदंड हरितला ॥ १९॥ एकें हरितलें पाणिपात्र। एकें नेलें पीठ पवित्र। एकें नेलें अक्षसूत्र। काषायवस्त्र तें एकें ॥५२०॥ एक म्हणे हा माझा ऋणायित। भला सांपडला येथ। म्हणोनि कंथेसी घाली हात। कौपीन युक्त तेणें नेली ॥ २१॥ ऐसें करितांही दुर्जन। त्याचें गजबजीना मन। कांहीं न बोले वचन। क्षमेनें पूर्ण निजधैर्य ॥ २२॥ तो म्हणे येणें जाणें दोनीं। केवळ अदृष्टाअधीनीं। यालागीं मागण्याची ग्लानी। न करूनि मुनि निघाला ॥ २३॥ संन्यासी जातां देखोनी। सभ्य सभ्य शठ येऊनी। साष्टांग नमस्कार करूनी। अतिविनीतपणीं विनवित ॥ २४॥ मग म्हणती हरहर। अपराध घडला थोर। मातले हे रांडपोर। पात्रापात्र न म्हणती ॥ २५॥ स्वामी कोप न धरावा मनीं। वस्त्रें घ्यावीं कृपा करूनि। परतविला पायां लागूनी। पूर्ण छळणीं छळावया ॥ २६॥

प्रदाय च पुनस्तानि दर्शितान्याददुर्मुनेः ।

संन्यासी आणूनि साधुवृत्ती। दंडकमंडलू पुढें ठेविती। एक वस्त्रें आणोनि देती। एक ते नेती हिरोनी ॥ २७॥ एक ते म्हणती वृद्ध संन्यासी। याचीं वस्त्रें द्यावीं यासी। एक म्हणती या शठासी। दंडितां आम्हांसी अतिपुण्य ॥ २८॥ वस्त्रें न देती उपहासीं। संन्यासी निघे सावकाशीं। एक परतवूनि त्यासी। देऊनि वस्त्रांसी जा म्हणती ॥ २९॥ एक धांवूनि हाणे माथां। वस्त्रें हिरोनि जाय

आहे. १७ याची ही हजारों दोरे भरून केलेली गोधडी पहा केवढी मोठी आहे! यांत त्यानें सगळें धन ठासून भरून सांठवून ठेविलें असेल. हेंच याच्या संन्यासाचें कारण दिसतें. १८ याचें तोंड कसलें पहातां! यानें सगळें पाखंड मांडिलें आहे.' अशा प्रकारें त्याची टवाळी चालविली. एकानें त्याच्या हातांतील दंड हिसकावून घेतला. १९ दुसऱ्यानें त्याचा कमंडलु लांबविला. कोणीं त्याचें पवित्र आसन, तर कोणी रुद्राक्षाची माळ तर कोणी भगवी छाटी पळविली. ५२० एकानें 'अरे, हा तर माझा ऋणको, भला आज सांपडला!' असें म्हणून त्याची गोधडी ओढून घेतली व त्याची नेसती लंगोटीहि सोडून नेली. २१ याप्रमाणें त्या दुर्जनांनीं त्याचा पिच्छा पुरविला, तरी त्याचें मन यत्किंचित्‌हि डळमळलें नाहीं. त्यानें तोंडांतून ब्रहि न काढितां मोठ्या धैर्यानें पूर्ण क्षमा दाखविली. २२ तो मनांत म्हणाला कीं, पदार्थ मिळणें किंवा नाहींसें होणें हें केवळ प्रारब्धाच्या अधीन आहे. यास्तव आपल्या वस्तु मागण्याच्या भानगडींत न पडतां आपण येथून जावें, असा विचार करून तो मुनि जाण्यास निघाला. २३ तो संन्यासी जात आहे असें पाहून कांहीं संभावित गुंडांनीं पुढें येऊन त्यास साष्टांग नमस्कार घातला व मोठ्या नम्रतेनें विनंति केली कीं २४ 'अरेरे, आमच्याकडून फार मोठा अपराध घडला. हीं उनाड पोरें फार माजलीं आहेत. त्यांना पात्र-अपात्र कांहीं कळत नाहीं. २५ स्वामिमहाराज! मनांत क्रोध न धरितां कृपा करून आपलीं वस्त्रें परत घेऊन जा.' याप्रमाणें त्याच्या पायां पडून त्या टवाळांनीं पुरतें छळण्यासाठीं त्याला परत फिरविलें. ५२६.

मुनेः दर्शितानि तानि प्रदाय च पुनः आददुः–हे भगवान्! हें घ्या, असें म्हणून त्या मुनीला दाखविलेलीं पात्रादिक त्याला देऊन, पुनः तीं त्याच्या हातांतून ओढून घेतलीं.

याप्रमाणें त्या संन्याशाला परतवून आणून मोठ्या सभ्यपणानें त्याच्या पुढें दंड-कमंडलु त्यांनीं ठेविला व एकानें वस्त्रें आणून दिलीं. इतक्यांत दुसऱ्यानें येऊन तीं हिसकावून नेलीं. २७ कोणी म्हणाले, 'अरे, बिचारा म्हातारा संन्याशी आहे. त्याचीं वस्त्रें त्याला देऊन टाका' तर कोणी म्हणाले, 'हा मोठा ढोंगी आहे, याला चांगली शिक्षा करण्यांतच आम्हांला मोठें पुण्य लागेल!' २८ अशा प्रकारें वस्त्रें न देतां ते लोक आपला उपहास करीत आहेत, हें पाहून तो संन्याशी मुकाट्यानें जावयास निघाला. तेव्हां पुनः एकानें जाऊन त्याला परतवून 'आपलीं वस्त्रें घेऊन जा' असें म्हणावें, २९ तर दुसऱ्यानें धांवत येऊन त्या संन्याशाच्या डोकीवर एक टपली मारून तीं

परता । एक म्हणती द्या रे आतां । वृद्धा कां वृथा शिणवाल ।। ५३० ।। यावरी संन्यासी आपण । गेला वस्त्रें वोसंडून । करोनियां संध्यास्नान । भिक्षार्थ जाण निघाला ।। ३१ ।।

अन्नं च भैक्ष्यसंपन्नं भुञ्जानस्य सरित्तटे ।। ३५ ।।

मूत्रयन्ति च पापिष्ठाः ष्ठीवन्त्यस्य च मूर्धनि । यतवाचं वाचयन्ति ताडयन्ति न वक्ति चेत् ।। ३६ ।।

भिक्षा मागोनि संपूर्ण । शास्त्रविभागें विभागून । सरितातटीं करितां भोजन । तें देखोनि दुर्जन तेचि आले ।। ३२ ।। अरे हा संन्यासी नव्हे साचा । कदर्यु आमुचे गांवींचा । होय नव्हे न बोले वाचा । हा ठकपणाचा उपावो ।। ३३ ।। यासी बोलविल्यावीण राहे । तो याचाचि दासीपुत्र होये । ऐशी शपथ करूनि पाहें । आले समुदायें तयापाशीं ।। ३४ ।। एक म्हणे याचें मौन । उडवीन मी न लागतां क्षण । हा जेणें करी शंखस्फुरण । तो उपावो जाण मी जाणें ।। ३५ ।। तो महापापी अतिदुर्मती । जेवितां त्याचे मस्तकीं मुती । तरी क्रोध न ये त्याचे चित्तीं । निजात्मास्थितीं निवाला ।। ३६ ।। जरी अंतरीं क्रोध आला । तरी तो अशांतचि झाला । बाहेरी न बोलेचि बोला । लोकलाजे भ्याला पोटास्थे ।। ३७ ।। तैसा नव्हे हा संन्यासी । धोऊनि सांडिलें निजलाजेसी । निजशांतीची दशा कैशी । क्रोध मानसीं बोळेना ।। ३८ ।। आंत एक बाह्य एक । या नांव मुख्य दांभिक । तैसा संन्यासी नव्हे देख । सबाह्य चोख निजशांती ।। ३९ ।। तंव ते दुर्जन म्हणती । अरे हा न बोले निश्चितीं । सन्मुख मुखावरी थुंकिती । अति निंदिती नोकूनी ।। ५४० ।। एक हाणिती लाता । एक टोले देती माथां । एक हाणिती न बोलतां । यासी सर्वथा न सोडा ।। ४१ ।।

वस्त्रें हिसकावून न्यावीं. तेव्हां कोणी म्हणाले कीं, 'द्या रे आतां ! व्यर्थ म्हाताऱ्याला कां कष्टवितां !' ५३० हा प्रकार पाहून संन्यासी वस्त्रें तशींच टाकून स्नान-संध्या करून भिक्षेला निघाला. ५३१.

सरित्-तटे भैक्ष्यसंपन्नं अन्नं च भुञ्जानस्य पापिष्ठाः मूत्रयन्ति अस्य मूर्धनि च ष्ठीवन्ति—नदीतीरावर भिक्षेनें मिळविलेलें अन्न भक्षण करीत असलेल्या याच्या अन्नांत ते अत्यंत पापी लोक लघ्वी करीत व त्याच्या मस्तकावर थुंकत. यतवाचं वाचयन्ति च न वक्ति चेत् ताडयन्ति—ज्यानें मौन धरिलें आहे अशा त्याला बोलावयास लावीत आणि तो न बोलल्यास त्याला ताडन करीत. ३५-३६.

तो संन्याशी भिक्षा मागून आणून, तिचे यथाशास्त्र विभाग करून नदीतीरावर भोजन करीत बसला आहे, हें पाहून तेच दुर्जन पुनः त्याच्यापाशीं आले. ३२ एक म्हणाला, 'अरे ! हा खरा संन्याशी नव्हे. हा आमच्या गांवचा कृपण; तो हूं कीं चूं करीत नाहीं; हेंच त्याच्या ढोंगाचें कारण आहे. ३३ जो कोणी याला बोलतां केल्यावांचून राहील तो याचा दासीपुत्रच समजावा.' असें म्हणून त्या टवाळांची टोळी त्याच्यापाशीं आली. ३४ एक म्हणाला कीं, 'मी एका क्षणांत याचें मौन नाहींसें करितों, याला शंखध्वनि करावयास लावण्याचा उपाय मी जाणतों.' ३५ असें म्हणून त्या महा पातकी दुष्टानें तो संन्यासी जेवीत असतां त्याच्या मस्तकावर लघ्वी केली. तरीहि त्याच्या मनांत क्रोध उद्भवला नाहीं. तो आत्मज्ञानांतच शांत होता. ३६ कारण एखाद्याच्या मनांत जरी क्रोध आला, तरी तो अशान्त झालाच. केवल पोटाकरितां लोकलज्जेला भिऊन तो बाहेर कांहीं बोलत नाहीं इतकेंच; ३७ पण तो संन्यासी तसा नव्हता. त्यानें लज्जा धुवून टाकली होती. क्रोध त्याच्या मनाला स्पर्शहि करीत नव्हता. ३८ इतक्या परमावधीला त्याची आत्मशांति पोंचली होती. आंत एक व बाहेर एक अशी वृत्ति ठेवणारांसच दांभिक म्हणतात. तसा हा संन्याशी नव्हता. त्याची आत्मशान्ति आंत-बाहेर शुद्ध होती. ३९ हें पाहून ते दुर्जन म्हणूं लागले कीं, अरे, हा 'खरोखरच बोलत नाहीं. तेव्हां ते त्याच्या तोंडावर थुंकले, टोचून बोलूं लागले व हवी तशी निंदा करूं लागले. ५४० कोणीं त्याला लाथा मारिल्या; कोणीं डोकीवर टोले दिले, कोणीं मारूं लागले व 'याला बोलता केल्यावांचून मुळींच सोडावयाचें नाही.' असें म्हणूं लागले ५४१.

तर्जयन्त्यपरे वाग्भिः स्तेनोऽयमिति वादिनः । बध्नन्ति रज्ज्वा तं केचिद्बध्यतां बध्यतामिति ॥ ३७ ॥

आणिक दुरूनि जाण । वर्मीं विंधूनि वाग्बाण । याच्या वेषाचें लक्षण । आम्हीं संपूर्ण जाणीतलें ॥ ४२ ॥ याचे वेषाचा विचारू । शठ नष्ट दांभिक थोरू । भिक्षामिसें हिंडे हेरू । धरा चोरू निश्चितीं ॥ ४३ ॥ ऐसे विकल्पवाक्यें गर्जती । एक बांधा बांधा म्हणती । एक दृढदोरी बांधिती । दोहीं हातीं अधोमुख ॥ ४४ ॥

क्षिपन्त्येकेऽवजानन्त एष धर्मध्वजः शठः । क्षीणवित्त इमां वृत्तिमग्रहीत्स्वजनोज्झितः ॥ ३८ ॥

त्याचें पूर्ववृत्त जे जाणती । ते अपमानूनि निंदिती । पूर्वीं कदर्यू याची ख्याती । हा आम्हांप्रती संन्यास मिरवी ॥ ४५ ॥ येणें सूक्तासूक्तीं संचिलें धन । अधर्में वित्त झालें क्षीण । स्वजनीं सांडिला दवडून । पोटासी अन्न मिळेना ॥ ४६ ॥ अन्न मिळावया पोटासी । झाला कपटवेष संन्यासी । लाज नाहीं या निर्लज्जासी । योग्यता आम्हांसी दावितां ॥ ४७ ॥ पूर्वीं लागूनि हा वंचकू । झाला संन्यासी दांभिकू । याचें मत नेणे हा भोळा लोकू । महाठकू दृढमौनी ॥ ४८ ॥ हो कां बहुरूप्याचीं सोंगें जैसीं । तेवीं हा उत्तमवेषें संन्यासी । होऊनि ठकूं आला आम्हांसी । मारितां यासी दोष नाहीं ॥ ४९ ॥

अहो एष महासारो धृतिमान् गिरिराडिव । मौनेन साधयत्यर्थं बकवद्दृढनिश्चयः ॥ ३९ ॥

स्तेनः अयं इति वादिनः अपरे वाग्भिः तर्जयन्ति हा चोर आहे, असें बोलणारे कित्येक कठोर शब्दांनें त्याला धाक दाखवीत. केचित् बध्यतां बध्यतां इति तं रज्ज्वा बन्धन्ति–कित्येक बांधा, बांधा, असें म्हणून त्याला दोरीनें बांधीत. ३७.

कांहीं लोक दुरूनच त्याला असे मर्मभेदक शब्द बोलूं लागले. 'आम्हीं याच्या या संन्यासवेषाचें लक्षण पुरतें ओळखलें आहे. ४२ हा लबाड, नष्ट, मोठा दांभिक आहे. हा भिक्षेच्या निमित्तानें गुप्त हेर आला आहे. पकडा या चोराला,' ४३ असें ते मोठ्यानें ओरडून विकल्पानें भाषण करूं लागले. तेव्हां कांहींजणांनीं 'धरा, बांधा याला' असें म्हणून व त्याला अधोमुख करून त्याचे दोन्ही हात दोरीनें करकचून बांधले. ५४४.

एके एषः धर्मध्वजः शठः इति अवजानन्तः क्षिपन्ति–कित्येक हा संन्यासाचा वेष घेतलेला ढोंगी लोकांना फसवीत आहे, असें बोलून त्याची अवज्ञा करीत होत्साते त्याची निंदा करीत. क्षीणवित्तः स्वजनोज्झितः इमां वृत्तिं अग्रहीत्– अहो, याचें धन नाहींसें झालें, त्यामुळें याच्या आप्तांनीं याला सोडिलें आहे, म्हणून यानें ही भिक्षावृत्ति स्वीकारिली आहे. (असें कित्येक म्हणत.) ३८.

त्या संन्याशाचा पूर्व वृत्तांत ज्यांना माहीत होता ते त्याचा अपमान करून अशी निंदा करूं लागले–पूर्वीं हा प्रसिद्ध कृपण होता आणि आतां मोठा संन्याशी म्हणून आमच्या पुढें मिरवतो आहे. ४५ यानें बरीं-वाईट कर्में करून द्रव्य मिळविलें. त्या अधर्मामुळें सगळी संपत्ति गेली. मुलां-माणसांनीं याला घरांतून घालवून दिलें. पोटाला अन्न मिळेनासें झालें. ४६ तेव्हां पोट भरण्यासाठीं हा कपट वेष घेऊन संन्यासी झाला आहे. या निर्लज्जाला आम्हांपुढें अशी प्रौढी मिरविण्याची लाज नाहीं वाटत ! ४७ पहिल्यापासूनच हा ढोंगी. आतां मोठा दांभिक संन्याशी बनला आहे. या भोळ्या लोकांना याचा हेतु कळत नाहीं. हा महाठक आहे. म्हणून इतकें दृढ मौन धरून बसला आहे. ४८ बहुरूप्याचीं सोंगें जशीं असतात तसा हा संन्याशाचा उत्तम वेष घेऊन आम्हांला फसविण्यास आला आहे. याला मारण्यांत मुळींच दोष नाहीं. ५४९.

अहो एषः गिरिराडिव महासारः धृतिमान् बकवत् दृढनिश्चयः मौनेन अर्थं साधयति—अहो, हा महापर्वताप्रमाणें मोठा बलाढ्य, धैर्यवान् दृढनिश्चयी आहे. बकाप्रमाणें मौनानें आपलें कार्य साधीत आहे. ३९.

हा दांभिकांमाजीं महाबळी । धरिल्या वेषातें प्रतिपाळी । आम्ही पीडितां न डंडळी । जेवीं का टोळीं महामेरू ॥ ५५० ॥ याच्या धैर्याचें शहाणपण । साधावया अन्नआच्छादन । बकाच्या ऐसें धरिलें मौन । स्वार्थ पूर्ण लक्षूनी ॥ ५१ ॥ बक गिळावया मासा । मौन धरोनि राहे जैसा । हाही जाणावा तैसा । भोळ्या माणुसां नाडील ॥ ५२ ॥ आतां हा धनलोभार्थ जाणा । पूर्वील उपद्रव नाणी मना । तेंचि झालीसे दृढ धारणा । उपद्रवगणना या नाहीं ॥ ५३ ॥ एक म्हणती धैर्यमूर्ती । म्हणोनियां लाता हाणिती । एक ते नाकीं काड्या खुपसिती । याची निजशांती पाहों पां ॥ ५४ ॥ ऐसऐसे उपद्राविती । नानापरी उपहासिती । तरी द्वेष नुपजे चित्तीं । निजशांती निश्चळ ॥ ५५ ॥ जंव जंव देखती त्याची शांती । तंव तंव दुर्जन क्षोभा येती । नाना उपद्रव त्यासी देती । तेंचि श्रीपति सांगत ॥ ५६ ॥

इत्येके विहसन्त्येनमेके दुर्वातयन्ति च । तं बबन्धुर्निरुरुधुर्यथा क्रीडनकं द्विजम् ॥ ४० ॥

कदर्या बाणली पूर्ण शांती । ऐसे एक उपहासिती । एक नाकीं चुना लाविती । एक मुख माखिती काजळें ॥ ५७ ॥ एक अतिशठ साचोकारे । पुढां ठाकोनि पाठिमोरे । श्रद्धा करिती अधोद्वारें । नाकीं तोंडीं भरे दुर्गंध ॥ ५८ ॥ तरी त्याचिया निजस्थिती । अणुमात्र क्षोभ न ये चित्तीं । तोचि संन्यासी त्रिजगतीं । ज्याची ढळेना शांती क्षोभविल्याही ॥ ५९ ॥ एवं क्षोभेना त्याचें मन । देखोनि खवळले दुर्जन । त्यासी गळां शृंखळा निरोधून । आणिला बांधून चौबारा ॥ ५६० ॥ यासी वोळखा रे कोणी तुम्ही । हा धनलोभी जो अकर्मी । तो आजी सांपडविला आम्हीं । अतिअधर्मी दांभिक ॥ ६१ ॥ जेवीं

हा दांभिकांतील अट्टल दांभिक आहे. घेतलेल्या सोंगाची बतावणी याला बेमालुम करितां येते. टोळधाडीनें पर्वत जसा डळमळत नाहीं, तसा आम्ही इतके छळीत असतां तो मुळींच डगमगत नाहीं. ५५० आपल्या स्वार्थाकडे पूर्ण लक्ष ठेवून यानें अन्न-वस्त्र मिळविण्यासाठीं बकासारखें मौन धरिलें आहे. असें धैर्य दाखविण्याचें याचें हें शहाणपण खरें ! ५१ बगळा जसा मासा मिळविण्यासाठीं मौन धरून बसतो, तसा हा भोळ्या लोकांना फसविण्यासाठीं मौन धरून बसला आहे. ५२ आतां हा धनलोभासाठीं पूर्वींचा उपद्रव मनांत आणीत नाहीं. त्याला संवयीमुळें आतां कितीहि त्रास दिला तरी तो जाणवत नाहीं. ५३ असें बोलून कोणी त्याला धैर्याची मूर्ति म्हणून लाथा मारीत. कोणी त्याच्या नाकांत काड्या खुपशीत. तरी याच्या चित्ताची शांति पहा ! ५४ अशा प्रकारें त्यांनीं त्याला उपद्रव दिला व अनेकप्रकारें उपहास केला. तरी त्याच्या मनांत द्वेष उपजला नाहीं इतकी त्याची आत्मशांति दृढ होती. ५५ ते दुर्जन जों जों त्याची शान्तवृत्ति पहात, तों तों ते अधिकच क्षुब्ध होत व त्याला अनेक प्रकारचा उपद्रव देत. तेंच आतां श्रीहरि सांगत आहे. ५५६.

इति एके एनं विहसन्ति—याप्रमाणें कित्येक त्याचा उपहास करीत. एके दुर्वातयन्ति—कित्येक त्याच्यापुढें येऊन अपान वायु सोडीत. यथा क्रीडनकं तथा तं द्विजं बबन्धुः निरुरुधुः—जसें एकादें शुक-सारिकादि खेळणें असावें त्याप्रमाणें त्या ब्राह्मणाला दुर्जनांनीं श्रृंखलांनीं बांधिलें व कारागृहांत टाकिलें. ४०.

ज्या कृपणाच्या मनांत पूर्ण शांति बाणली आहे, अशा त्याचा कोणी उपहास करीत होते. कोणी त्याच्या नाकाला चुना लावीत. कोणी त्याच्या तोंडाला काजळ फांशीत. ५७ कांहीं अतिशय प्राकृत लोक त्याच्या पुढें पाठमोरे उभे राहून अपानवायु सोडीत. त्यामुळें त्याच्या नाकां-तोंडांत दुर्गंध भरत असे. ५८ तरीहि त्याच्या शान्त-वृत्तींत अणुमात्र क्षोभ उत्पन्न झाला नाहीं. लोकांनीं क्षुब्ध करण्याचा इतका भगीरथ प्रयत्न चालविला असतांहि ज्याची चित्तवृत्ति शांत रहाते, तोच त्रिभुवनांत खरा संन्याशी होय. असो; ५९ शेवटीं इतकें करूनहि याची शान्ति ढळत नाहीं, हें पाहून ते दुर्जन खवळले व त्यांनीं त्याच्या गळ्यांत सांखळी बांधून त्याला ओढीत चव्हा-ट्यावर आणिलें. ५६० आणि 'अरे, तुम्ही कोणी याला ओळखतां का ! हा दुष्कर्म करणारा धनलोभी अधर्मी, दांभिक आज चांगला आम्हांला सांपडला.' ६१ असें बोलून गारुडी माकडाला जसा बांधितो, त्याप्रमाणें त्या

गारुडी बांधी माकडा । तेवीं संन्यासी बांधिला गाढा । मिळोनियां चहूंकडा । मागांपुढां वोढिती ॥६२॥ एक ओढिती पूर्वेसी । एक ओढिती पश्चिमेसी । संन्यासी हांसे निजमानसीं । सुख सर्वांसी होये येणें ॥ ६३ ॥ देह प्रारब्ध भोगवी जाण । याचा मजसी संबंध कोण । येणें विवेकें क्षमापूर्ण । कोणाचें मन दुखवीना ॥ ६४ ॥ जेथ स्वगोत्र सोइरे स्वजन । जिहीं दीधला अतिसन्मान । त्यांदेखतां अपमान । अनुद्विग्न जो साहे ॥ ६५ ॥ त्यापाशीं शांति संपूर्ण । उद्धवा निश्चयेंसीं जाण । ज्याचें लोकेषणे लाजे मन । अशांति जाण ते ठायीं ॥ ६६ ॥ ऐसा क्षोभवितां पहा हो । क्षोभा न चढे त्याचा भावो । त्या संन्याशाचा अभिप्रावो । स्वयें देवाधिदेवो सांगत ॥ ६७ ॥

एवं स भौतिकं दुःखं दैहिकं दैविकं च यत् । भोक्तव्यमात्मनो दिष्टं प्राप्तं प्राप्तमबुध्यत ॥ ४१ ॥

भिक्षु बोले निजविवेक । त्रिविध प्रारब्धें बांधले लोक । तेणें भोगणें पडे आवश्यक । रावो रंक सुटेना ॥ ६८ ॥ भूतांची पीडा ते भौतिक । देवांची पीडा ते दैविक । देहीं उपजती ज्वरादिक । हे पीडा देख दैहिक ॥ ६९ ॥ यापरी त्रिविध दुःख । प्रारब्ध झालें जनक । तें भोगितां मानी असुख । तो केवळ मूर्ख अतिमंद ॥ ५७० ॥ जे भोग आले प्रारब्धेंसीं । तेथें साह्य केल्या हरिहरांसी । भोग न चुकती प्राण्यासी । हें जाणोनि संन्यासी क्षमावंत ॥ ७१ ॥ कृष्ण साह्य पांडवांसी । ते भोगिती नष्टचर्यासी । तेथें साह्य केल्या हरिहरांसी । प्रारब्ध कोणासी टळेना ॥ ७२ ॥

सर्वांनीं मिळून त्याला चोहोंबाजूंनीं करकचून बांधिलें व ते मागून-पुढून ओढूं लागले. ६२ एक पूर्वेला ओढूं लागला तर दुसरा पश्चिमेला ओढूं लागला. तेव्हां संन्याशी मनांत हंसून म्हणाला कीं, यांतच या लोकांना काय सुख वाटत आहे पहा! ६३ माझें प्रारब्धच मला हें भोगवीत आहे. नाहीं तर यांचा-माझा काय संबंध! अशा क्षमाशील विचारानें त्यानें कोणाचेंहि मन दुखविलें नाहीं. ६४ ज्या ठिकाणीं आपले आप्त-बांधव आहेत, ज्यांनीं आपला अत्यंत सन्मान केला होता, त्यांच्या समोर होत असलेला हा अपमान मनाला यत्किंचित् उद्वेग न येऊं देतां जो सहन करितो, ६५ त्याच्यापाशींच शांतता नांदते, असें, हे उद्धवा! तूं खात्रीनें जाण. ज्याच्या मनाला लौकिक अप्रतिष्ठेची लाज वाटते, त्याच्या ठिकाणीं शान्ति नाहीं, असें समजावें. ६६ अशा प्रकारें त्या दुर्जनानें त्याची छळणूक चालविली असतां त्याचें चित्त अणुभरहि क्षुब्ध झालें नाहीं. तोच वृत्तान्त श्रीकृष्ण पुढें सांगत आहे. ५६७.

एवं यत् दिष्टं भौतिकं दैहिकं च दैविकं दुःखं (तत्) प्राप्तं प्राप्तं आत्मनः भोक्तव्यं इति सः अबुध्यत— याप्रमाणें दैवानें प्राप्त झालेलें जें दुर्जनादिकृत, ज्वरादिनिमित्त व शीतोष्णादिकृत दुःख तें जसें प्राप्त होईल तसें स्वतःला भोगिलें पाहिजे असें तो समजला. ४१.

तो भिक्षु विवेकानें बोलूं लागला कीं, तीन प्रकारच्या प्रारब्धांनीं सर्व लोक बद्ध झालेले आहेत. त्यामुळें त्या कर्मांचें फल अवश्य भोगावें लागतें. त्यांतून श्रीमंत किंवा गरीब कोणीहि सुटत नाहीं. ६८ वाय्वादि पंचमहाभूतांपासून होणारी जी पीडा तिला भौतिक म्हणतात. देवांकडून येणाऱ्या आपत्तीला दैविक पीडा म्हणतात आणि ज्वरादि शरीराला होणारे रोग ही दैहिक पीडा होय. ६९ याप्रमाणें तीन प्रकारचें दुःख प्रारब्धापासून उद्भवतें. वास्तव तें दुःख भोगिते वेळीं जो खिन्न होतो, तो केवळ मंदबुद्धि महामूर्ख समजावा. ५७० हरि-हरांनीं जरी साह्य केलें तरी प्रारब्धानें प्राप्त झालेले भोग प्राण्याला चुकवितां येत नाहींत. हें जाणून तो संन्यासी पूर्ण क्षमाशील बनला. ७१ श्रीकृष्ण साह्यकर्ता असूनहि पांडवांना अनेक प्रकारचीं संकटें भोगावीं लागलीं. यावरूनच हरि-हरानें साह्य केलें तरी प्रारब्ध कोणालाहि सोडीत नाहीं, हें ठरतें. ५७२.

परिभूत इमां गाथामगायत नराधमैः । पातयद्भिः स्वधर्मस्थो धृतिमास्थाय सात्त्विकीम् ॥ ४२ ॥

दुर्जनांच्या उपद्रवाहातीं । निजशांति न सांडीच यती । धरोनियां सात्त्विकी धृती । स्वधर्मस्थिति न ढळेचि ॥ ७३ ॥ तेणें भिक्षूनें गायिली गाथा । ते तुज मी सांगेन आतां । उद्धवा अतिसावधानता । तो बोध तत्त्वतां अवधारीं ॥ ७४ ॥ तो बोधू धरितां चित्तीं । द्वंद्वसाम्या पावे स्थिती । सहजें उल्हासे निजशांती । सायुज्यमुक्ति घर रिघे ॥ ७५ ॥ जगीं उद्धवाचें भाग्य पूर्ण । ज्यासी श्रीकृष्ण करी सावधान । काय बोलिला भिक्षु आपण । तें निरूपण अवधारीं ॥ ७६ ॥

द्विज उवाच—नायं जनो मे सुखदुःखहेतुर्न देवतात्मा ग्रहकर्मकालाः ।
मनः परं कारणमामनन्ति संसारचक्रं परिवर्तयेद्यत् ॥ ४३ ॥

सुजन दुर्जन साधारण । ऐसे जे त्रिविध जन । माझ्या सुखदुःखांसी कारण । सर्वथा जाण ते नव्हती ॥ ७७ ॥ जन तितुके पांचभौतिक । माझाही देहो तोचि देख । जनांसी मज सहजें ऐक्य । उपजे सुखदुःख मनापाशीं ॥ ७८ ॥ देवता सुखदुःखदायक । ऐसें म्हणावें आवश्यक । तीं दैवतें मनःकाल्पनिक । त्याचें सुखदुःख मजसी न लगे ॥ ७९ ॥ देवतारूपें मन आपण । मनें कल्पिलें देवतागण । ते जैं सुखदुःखें देती जाण । तैं मुख्य कारण मन झालें ॥ ५८० ॥ जेथ जैसा मनाचा सद्भावो । तेथ तद्रूपें भासे देवीदेवो । जेथ मनाचा विकल्प पहा हो । तेथ थिता देवो दिसेना ॥ ८१ ॥ यालागीं सकळ देवता । त्या जाण मनःकल्पिता । त्यांपासाव सुखदुःखव्यथा । ते मनाचे

पातयद्भिः नराधमैः परिभूतः स्वधर्मस्थः सात्त्विकीं धृतिं आस्थाय इमां गाथां अगायत—याप्रमाणें धर्मापासून च्युत करणाऱ्या नराधमाकडून जरी तो तिरस्कृत केला गेला, तरी स्वधर्मांतच स्थित होऊन, सात्त्विकी धृतीचा आश्रय करून पुढील गाथा गाता झाला. [सात्त्विक धृतीचें लक्षण भगवानांनीं गीतेंत सांगितलें आहे. सु. गी. १८—३३ पृ. ३२९ पहा.] ४२.

दुर्जनांनीं इतका उपद्रव दिला तरी त्या यतीनें आपल्या मनाची शांति ढळूं दिली नाहीं. सात्त्विक धैर्यानें त्यानें स्वधर्म सोडिला नाहीं. ७०३ त्या भिक्षूनें जें जें गीत गाईलें, तें मी तुला आतां सांगतों. उद्धवा ! तो उपदेश तूं सावधान चित्तानें ऐक. ७४ कारण त्याचा तो बोध मनांत ठसला म्हणजे सुख-दुःखादि द्वंद्व सम होतें. शांतीचा स्वभावतःच उत्कर्ष होतो आणि सायुज्य मुक्ति घरीं चालून येते. ७५ उद्धवाचें भाग्य थोर म्हणून श्रीकृष्णानें त्याला सावध करून ' भिक्षूनें स्वतः गाईलेलें गीत मी तुला सांगतों, तें ऐक. ' असें म्हटलें ५७६.

—आतां तीच त्याची अठरा श्लोकांची गाथा सांगतात—

द्विजः उवाच—द्विज म्हणाला, अयं जनः मे सुख-दुःखहेतुः न—हे लोक माझ्या सुख-दुःखाचें निमित्त नाहींत. देवता आत्मा ग्रहकर्मकालाः न—देवता, आत्मा, ग्रह, कर्म व कालहि त्याचें निमित्त नाहीं व, यत् संसारचक्रं परिवर्तयेत् तत् मनः परमं कारणं आमनन्ति—जें या संसारचक्राला सतत चालवितें तें मन हेंच केवल सुख-दुःखाचें कारण आहे, असें श्रुति सांगतात. ४३.

सज्जन, दुर्जन व उदासीन असे तीन प्रकारचे लोक असतात; परंतु माझ्या सुख-दुःखाचे ते सर्वथा कारण नव्हेत. ७७ कारण जेवढा मनुष्यप्राणी तेवढा पंचभूतांचा बनलेला आहे व माझाहि देह त्याचाच आहे. त्यामुळें त्यांचें व माझें सहजच ऐक्य आहे. सुख-दुःख मनांत उत्पन्न होतें. ७८ देवता सुख-दुःख देणाऱ्या आहेत, असें अवश्य म्हणावें; परंतु तीं दैवतेंच मनःकल्पित असल्यामुळें त्यांचें सुखदुःख मला कसें लागणार ! ७९ मनच देवतारूप आहे. त्याच मनानें देवतांची कल्पना केली आहे. तीं दैवतें जें सुख-दुःख देतात त्याचें कारण मनच आहे. ५८० मनाचा जेथें जसा सद्भाव असेल, तेथें त्या रूपानें त्याला देवी किंवा देव भासत असतो. जेथें मनाचा नुसता विकल्प असतो, तेथें असलेलाहि देव दिसत नाहीं. ८१ यास्तव सगळ्या देवता मनःकल्पित आहेत. त्यांपासून

माथां निश्चित ॥ ८२ ॥ आत्मा सुखदुःखांसी कारण । हें समूळ मिथ्या वचन । आत्म्याचे ठायीं द्वैतभान । त्रिशुद्धी जाण असेना ॥ ८३ ॥ मी एक सुखदुःखांचा दाता । हा एक सुखदुःखांचा भोक्ता । हें आत्म्याचें ठायीं तत्त्वतां । जाण सर्वथा असेना ॥ ८४ ॥ जन्मकाळींचे ग्रह दारुण । म्हणों सुखदुःखांसी कारण । ग्रहांचा ग्रहो मन आपण । जन्ममरण भोगवी ॥ ८५ ॥ ग्रहां ग्रहगती देहांतवरी । मनाची ग्रहगती त्याहूनि थोरी । दुःख भोगवी नाना प्रकारीं । जन्मजन्मांतरीं सोडीना ॥ ८६ ॥ दुष्ट ग्रह चारी दिवस पीडी । मनाची पीडा जन्मकोडी । दुष्ट ग्रहो भोगूनि सोडी । मन न सोडी कल्पांतीं ॥ ८७ ॥ जैं मन न धरी देहाभिमान । तैं ग्रहांची पीडा मानी कोण । यालागीं सुखदुःखां कारण । मनचि जाण महाग्रहो ॥ ८८ ॥ येथ निजकर्म दुःखदायक । हेंही म्हणतां न ये देख । कर्म कर्मबंधमोचक । तें दुःखदायक घडे केवीं ॥ ८९ ॥ स्वकर्म शुद्ध स्वाभाविक । त्यासी मनें करूनि सकामिक । नानापरी अतिदुःख । योनि अनेक भोगवी ॥ ५९० ॥ हो कां कर्मांचेनि क्रियायोगें । जैं मनःसंकल्प कर्मीं न लगे । तैं सुखदुःखांचीं अनेगें । विभांडीं वेगें निजकर्म ॥ ९१ ॥ देह सुखदुःखांसी काय जाणे । आत्मा सुखदुःख सर्वथा नेणें । येथ सुखदुःखांचे गाडे भरणें । मनें भोगवणें निजसत्ता ॥ ९२ ॥ येथ सुखदुःखदायक । मनचि झालें असे एक । मनाअधीन होऊनि लोक । मिथ्या सुखदुःख भोगिती ॥ ९३ ॥ काळ सुखदुःखांचा दाता । हेंही न घडे गा सर्वथा । मनःसंकल्पसंकेता । काळाची सत्ता लागली ॥ ९४ ॥ अजरामर असतां आपण । मनें घेतलें मज आहे मरण । तेथचि काळ लागला जाण । क्षणेंक्षण निर्दाळित ॥ ९५ ॥ आपुलेनि हातें आपण । पठाडे खोंविलें दाभण । रात्रीं रुततांचि तें जाण । सर्पभयें प्राण

होणारी सुख-दुखांची व्यथा वस्तुतः मनामुळेंच आहे. ८२ आत्मा सुख-दुःखांचें कारण आहे, हें वचनच समूळ मिथ्या आहे. कारण आत्म्याला द्वैताचें भान केव्हांहि नसतें. ८३ मी एक सुख-दुःख देणारा, हा एक सुखदुःख भोगणारा हें आत्म्याच्या ठिकाणीं सर्वथा संभवत नाहीं. ८४ जन्मकाळचे दारुण ग्रहच सुख-दुःखांचें कारण आहेत. मन ग्रहांचाहि ग्रह आहे. तें जन्म-मरण भोगावयास लावितें. ८५ ग्रहांची पीडा देहाचा नाश होईपर्यंतच असते; परंतु मनाची ग्रहगति त्याहूनहि थोर आहे; ती अनेक प्रकारचें दुःख भोगविते आणि जन्मोजन्मीं सोडीत नाहीं. ८६ दुष्ट ग्रह फार तर चार दिवस पीडा देतात; पण मनाची पीडा कोट्यावधि जन्म पुरवते. दुष्ट ग्रहांचा भोग संपला कीं, ते निघून जातात, परंतु मन कल्पांतींहि सोडीत नाहीं. ८७ मनानें जर देहाभिमान धरिला नाहीं, तर मग ग्रहाची पीडा तरी कोण मानणार ! यास्तव मनच सुख-दुखांस कारण होणारा महाग्रह आहे. ८८ आपलें कर्मच दुःख देणारें आहे, असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण कर्म तर बंधापासून सोडवितें; मग तें दुःख देणारें कसें होईल ! ८९ वस्तुतः स्वकर्म शुद्ध व स्वाभाविक असतां मनच त्याला सकाम बनवितें व त्यामुळें अनेक प्रकारचें दुःख भोगवितें व अनेक योनींतून जन्म घ्यावयास लावितें. ५९० किंवा मन कर्मांचा क्रियासंबंधानें जेव्हां संकल्प करीत नाहीं, तेव्हां तें सुख-दुःखांचे अनेक प्रकार उत्पन्न करूं शकत नाहीं. ९१ जड देह सुख-दुःखाला काय जाणणार ! आत्म्याला तर सुख-दुःख कधीं ठाऊकच नाहीं. तेव्हां मनच आपल्या सत्तेनें सुख-दुःखाचे गाडे भरून ते जीवाला भोगावयास लावीत असतें. ९२ यावरून मनच काय तें एक सुख-दुःख देणारें आहे, असें ठरतें. त्या मनाच्या अधीन होऊन लोक व्यर्थ खोटीच कल्पना करून सुख-दुःख भोगितात. ९३ बरें, काळ सुख-दुःख भोगविणारा आहे, असें म्हणावें तर तेंहि संभवत नाहीं. कारण मन जेव्हां संकल्प करितें, तेव्हांच काळाची सत्ता चालते. ९४ आत्मा जरा-मरणांपासून मुक्त असतां ' मला मरण आहे ' असें एकदां मनानें घेतलें कीं, काळाचा अम्मल बसलाच. तो प्रत्येक क्षणीं आयुष्याचा नाश करीत असतो. ९५ कोणा एकानें आपणच आपल्या हातानें अंथरुणांत दाभण खोचून ठेविला आणि रात्रीं त्यावर निजतांच तो टोंचला तेव्हां ' साप चावला ' असें समजून त्या भीतीनें बिचारा मरण पावला. ९६ खरें पाहिलें तर तेथें साप मुळीं नव्हताच;

सांडिला ॥ ९६ ॥ त्यासी सर्प नाहीं लागला । मा विखें केवीं तो घारिला । परि निज-शंके स्वयें निमाला । तैसा काळ लागला जनांसी ॥ ९७ ॥ एकासी सर्प झोंबला पाठीसी । काय रुतलें म्हणे सांगा त्यासी । तो म्हणे कांटी लागली कैसी । ते म्यां अनायासें उपडिली ॥ ९८ ॥ तो नव्हे सर्पा साशंक । यालागीं त्यासी न चढेचि विख । निजव्यापारीं देख । यथासुख वर्तत ॥ ९९ ॥ त्यासी सांगोनि बहुकाळें खूण । देतां सर्पाची आठवण । तत्काळ विषें आबळोन । आशंका प्राण सांडिला ॥ ६०० ॥ तेवीं निर्विकल्पपुरुखा । उठी संकल्पाची आशंका । ते काळीं काळ देखा । बांधे आवांका निर्दळणीं ॥ १ ॥ निःशंकपणें साचार । ज्याचें मन म्हणे मी अमर । त्याचें काळ वर्जी घर । काळ दुर्धर मनःशंका ॥ २ ॥ जो निर्विकल्प निजनिवाडें । काळ सर्वथा न ये त्याकडे । नश्वर नाहीं तयापुढें । काळ कोणीकडे रिघेल ॥ ३ ॥ यापरी गा काळ देख । नव्हे सुखदुःखदायक । सुखदुःखांचें जनक । मनचि एक निश्चित ॥ ४ ॥ मनःकल्पित संसार जाण । मनें कल्पिलें जन्ममरण । संसारचक्रीं आवर्तन । मनास्तव जाण पुनःपुनः ॥ ५ ॥ हे साही प्रकार जाण । म्हणती सुखदुःखासी कारण । विचारितां हें प्रमाण । मनोजन्य सुखदुःखें ॥ ६ ॥ नवल लाघवी कैसें मन । शुद्धि उपजवी मीपण । चिद्रूपा लावूनि जीवपण । सुखदुःखें जाण भोगवी ॥ ७ ॥ डोळींचा कणू अल्प एक । तो शरीरासी दे अतिदुःख । तेवीं वासनामात्रें मन देख । दारुण सुखदुःख भोगवी ॥ ८ ॥ म्हणाल येथ अविद्या देख । ते होय सुखदुःखदायक । अविद्या ब्रह्म असतां देख । मनेंवीण सुखदुःख कदा नुपजे ॥ ९ ॥ अविद्या ब्रह्म असतां पाहीं । मन लीन सुषुप्तीच्या ठायीं । तेव्हां सुखदुःखचि नाहीं । भोग कोणेंहि कंहीं देखिजेना

मग त्याला विष कोठून चढलें, असें जर म्हणावें तर त्याला निव्वळ संशयामुळें मरण आलें. त्याप्रमाणें हा काळ लोकांच्या पाठीस लागला आहे. ९७ दुसऱ्या एका माणसाच्या पाठीला एकदां खराच साप चावला; तेव्हां त्यानें त्याच्या सोबत्याला विचारिलें कीं, माझ्या पाठीला काय बोचलें पहा रे; तसा तो सोबती म्हणाला, 'कसलासा कांटा लागला होता. तो मी सहज काढून फेंकून दिला!' ९८ या माणसाच्या मनांत सर्पाचा संशयहि नव्हता; म्हणून त्याला खरोखर सर्प चावलेला असूनहि विष चढलें नाहीं. तो मोठ्या समाधानानें आपल्या उद्योगाला लागला. ९९ पुढें बराच काळ लोटल्यानंतर एकानें त्याला ती आठवण देऊन साप चावल्याची खूण दाखविली, तसा तो घाबरला. त्याला संशयानें घेरलें व त्यामुळें त्यानें ताबडतोब प्राण सोडिला. ६०० त्याचप्रमाणें निर्विकल्प पुरुषाला जेव्हां संकल्पाचा संशय येतो तेव्हां काळ त्याच्या नाशाला प्रवृत्त होतो. १ जो मनुष्य 'मी अमर आहें' असें निश्चित समजून निःशंक असतो, त्याचें घरच काळ वर्ज्य करितो. मनाची शंका हाच दुर्धर काळ आहे. २ जो स्वतःच निर्विकल्प असतो, त्याच्याकडे काळ कधीं पहातहि नाहीं. कारण त्याच्यापाशीं कांहींच नश्वर नसतें. तेव्हां काळ प्रवेश तरी कशांत करणार! ३ असा विचार केला म्हणजे काळ सुख-दुःख देणारा नाहीं, मनच सुख-दुःख देणारें आहे, असा निश्चय होतो. हा संसारहि मनःकल्पितच आहे. मनानेंच जन्म-मरण कल्पिलें आहे आणि मनामुळेंच या संसारचक्रांत पुनः पुनः फेरे करावे लागतात. ५ यावरून जन, देवता, आत्मा, ग्रह, कर्म आणि काळ हीं सहा सुख-दुःखांचीं कारणें आहेत, जसें जें म्हणतात तें विचारानें खोटें ठरतें. खरोखर सुख-दुःख मनामुळें होतें. ६ हें मन कसें विलक्षण लाघवी आहे पहा! तें केवळ ज्ञानस्वरूप आत्म्यामध्यें 'मीपणा-'चें भान उत्पन्न करून त्याला जीवपणाची अवस्था देतें व त्याच्याकडून सुख-दुःख भोगवितें. ७ डोळ्यांत धुळीचा अगदीं बारीकसा कण जरी गेला, तरी तो सगळ्या शरीराला अस्वस्थ करितो, त्याप्रमाणें वासनांच्या योगानें मन दारुण सुख-दुःख भोगवितें. ८ अविद्या सुख-दुःख देणारी आहे, असें जर म्हणावें तर तेंहि बरोबर नाहीं. कारण अविद्या व ब्रह्म हीं दोन्हीं जरी असलीं तरी मना-वांचून सुख-दुःख कदापि उपजत नाहीं. ९ अविद्या व ब्रह्म असतांहि सुषुप्तींत म्ह० गाढ निद्रेंत मन जेव्हां लीन होतें तेव्हां सुख-दुःखांची कोणाला वार्ताहि नसते. कोणाला कधीं कोणताच भोग दिसतहि नाहीं. ६१० किंवा

॥ ६१० ॥ मन दुश्चिंत जेव्हां पाहीं । तेव्हां जो भोग भोगिजे देहीं । तें सुखदुःख न पडे ठायीं । स्वयें स्वदेहीं देखिजे ॥ ११ ॥ यालागीं सुखदुःखांचें कारण । मनचि आपण्या आपण । तेणें लावूनि जन्ममरण । भोवंडी दारुण भवचक्रीं ॥ १२ ॥ भवचक्रींचें प्रत्यावर्तन । कोणे रीती करवी मन । तेचि अर्थींचें निरूपण । भिक्षु आपण्या आपण निरूपी ॥ १३ ॥

मनो गुणान्वै सृजते बलीयस्ततश्च कर्माणि विलक्षणानि ।
शुक्लानि कृष्णान्यथ लोहितानि तेभ्यः सवर्णाः सृतयो भवन्ति ॥ ४४ ॥

मनें कल्पोनि निजसत्तें । उपजवी नाना वृत्तींतें । त्याचि त्रिगुण होती येथें । गुणविभागातें गुणवृत्ती ॥ १४ ॥ सत्त्वरजतमादि गुणीं । सुरनरतिर्यगादि योनी । मनें त्रिभुवन उभवूनी । संसारभुवनीं स्वयें नांदे ॥ १५ ॥ त्या मनाची प्रौढी गाढी । क्षणें रची क्षणें मोडी । मन ब्रह्मादिकां भुली पाडी । इतर बापुडीं तीं कायी ॥ १६ ॥ मनाचा बलात्कार कैसा । निर्गुण पाडी गुणाच्या फांसा । लावूनि जीवपणाचा झांसा । संसारवळसा आवर्तीं ॥ १७ ॥ केवळ विचारितां मन । तें जड मूढ अचेतन । त्यासें केवीं घडे सृजन । तेंचि निरूपण सांगत ॥ १८ ॥

अनीह आत्मा मनसा समीहता हिरण्मयो मत्सख उद्विचष्टे ।
मनः स्वलिङ्गं परिगृह्य कामान् जुषन्निबद्धो गुणसङ्गतोऽसौ ॥ ४५ ॥

मन जेव्हां थाऱ्यावर नसतें, तेव्हां शरीराला होणाऱ्या सुख-दुःखादि भोगाचें भानहि नसतें. हा अनुभव प्रत्येकाच्या देहांत येत असतो. ११ यास्तव मनच सुख-दुःखांचें कारण आहे. तेंच आपल्या मागें जन्म-मरणांची परंपरा लावून घेतें व भवचक्राचे भयंकर फेरे भोगविण्यास लावितें. १२ तें मनच भवचक्रांतून कशा रीतीनें फिरवितें त्याचें वर्णन भिक्षु स्वतःच करीत आहे. ६१३.

—मनाच्या संसारचक्रपरिवर्तनाचाच प्रकार भिक्षु सांगतो—

बलीयः मनः वै गुणान् सृजते—अतिशय बलवान् मनच सत्त्वादि गुणवृत्तींना उत्पन्न करितें. तत् च शुक्लानि कृष्णानि अथ लोहितानि विलक्षणानि कर्माणि—त्या गुणवृत्तींपासून सात्त्विक, तामस व राजस अशीं तीन प्रकारचीं कर्में उत्पन्न होतात. तेभ्यः सवर्णाः सृतयः भवन्ति—त्या कर्मांपासून त्या त्या कर्माप्रमाणें देव, तिर्यक्, मनुष्यादि प्राणिजाति उत्पन्न होतात. ४४.

मन आपल्या सत्तेनें कल्पना करून अनेक वृत्ति उत्पन्न करितें. या वृत्ति पुढें त्रिगुणात्मक होऊन गुणांच्या विभागाप्रमाणें गुणवृत्ति बनतात. १४ सत्त्व-रजस्तमादि गुणांनीं देव मनुष्यपश्वादि योनि उत्पन्न होतात व मनानेंच त्रिभुवन निर्माण करून संसारभुवनांत नांदत असतात. १५ त्या मनांचें सामर्थ्य मोठें विलक्षण खरें; तें क्षणांत प्रचंड मनोराज्य उभारतें व क्षणांत सगळें ढांसळून टाकितें. मन ब्रह्मदेवादिकांसहि जर भूल पाडितें तर इतर बापड्यांचा काय पाड ! १६ मनाचा प्रभाव किती विचित्र आहे, पहा ! तें निर्गुणाला गुणांच्या फासांत अडकवितें. त्याला जीवपणाची तंद्री लावून संसाराच्या भोंवऱ्यांत गिरक्या घ्यावयास लावितें. १७ केवल मनाचाच विचार केला तर तें जड, मूढ, अचेतन आहे. त्याची उत्पत्ति कशी होते, त्याचेंच निरूपण आतां भिक्षु करीत आहे. ६१८.

—तर मग संसार मनाचाच आहे, आत्म्याचा नव्हे, अशी आशंका घेऊन भिक्षु सांगतो—

आत्मा अनीहः—आत्मा निष्क्रिय आहे. अविद्येमुळें होणारा जो अध्यास त्याच्या योगानें हा आत्म्याचा संसार आहे. स्वाभाविक नव्हे. (कारण अविद्याध्यासरहित ईश्वराला संसार नाहीं, तर अविद्याध्यासवान् जीवालाच तो आहे. आतां तेंच सांगतो—) मनसा समीहता—सर्व क्रिया करणाऱ्या मनासह नियंतृत्वानें रहाणाराहि परमात्मा मनःक्रियासंगरहित आहे. हिरण्मयः— कारण तो विद्याशक्तिप्रधान आहे. मत्सखः—मज जीवाचा तो सखा म्ह० नियंता आहे. उद्विचष्टे—त्यामुळेंच आपल्या अलुप्त ज्ञानानें केवल पहातो. असौ स्वलिंगं मनः परिगृह्य गुणसंगतः कामान् जुषन् निबद्धः—पण हा जीव आपल्यामध्यें संसार दाखविणारें जें मन त्याच्या आत्मत्वानें स्वीकार करून मनाच्या कर्मांशीं संगत होऊन किंवा गुणांमध्यें आसक्त होऊन विषयांचें सेवन करीत अत्यंत बद्ध झाला आहे. ४५.

आत्मा चित्स्वरूपें परिपूर्ण। निःसंग निर्विकार निर्गुण। त्यासी संसारबंधन। सर्वथा जाण घडेना ॥ १९ ॥ जो स्वप्रकाशें प्रकाशघन। निजतेजें विराजमान। जो परमात्मा परिपूर्ण। त्यासी क्रियाचरण कदा न घडे ॥ ६२० ॥ विचारितां निजनिवाडें। मनाचें जडत्वचि जोडे। त्यासीही संसार न घडे। भवबंध घडे तो ऐका ॥ २१ ॥ नवल मनाचें विंदान। शुद्धी उपजवी मीपण। तेचि वस्तूसी जीवपण। सगुणत्वा जाण स्वयें आणी ॥ २२ ॥ मनःसंकल्पाचें बळ। शुद्धासी करी शबळ। लावूनि त्रिगुणांची माळ। भवबंधजाळ स्वयें बांधे ॥ २३ ॥ जेवीं घटामाजील घटजळ। आकळी अलिप्त चंद्रमंडळ। तेवीं मनःसंकल्पें केवळ। कीजे शबळ चिदात्मा ॥ २४ ॥ घटींचें हालतां जीवन। चंद्रमा करी कंपायमान। तेवीं शुद्धासी जन्ममरण। मनोजन्य सुखदुःखें ॥ २५ ॥ आत्मा स्वप्रकाश चित्स्वरूप। मन जड कल्पनारूप। तें मानूनि आपुलें स्वरूप। त्याचें पुण्यपाप स्वयें भोगी ॥ २६ ॥ जीवाचा आप्त आवश्यक। सुहृद सखा परमात्मा एक। तो मनाची वाचा नियामक। द्रष्टा देख साक्षित्वें ॥२७॥ अविद्या प्रतिबिंबें नेटका। जीव जो कां माझा सखा। तो मनोभ्रमें भ्रमोनि देखा। भोगी सुखदुःखां मनोजन्य ॥ २८ ॥ मनाची एकात्मता परम। जीवासी पडला थोर भ्रम। आपण असतांही निष्कर्म। कर्माकर्म स्वयें भोगी ॥ २९ ॥ मूळीं जीव मनाचा नियंता। तोचि मनाच्या एकात्मता। मनाचिया सुखदुःखव्यथा। आपुले माथां नाथिल्या सोशी ॥ ६३० ॥ जेवीं अतिआप्तता प्रधान। रायासी लावी दृढबंधन। मग राजा तो होय दीन। तो भोगवी तें आपण सुखदुःख भोगी ॥ ३१ ॥ ते दशा झाली जीवासी। मनें संसारी केलें तयासी। मग नाना जन्ममरणें सोशी। अहर्निशीं सुखदुःखें ॥ ३२ ॥ त्या मनासी निग्रहो न करितां। जीवाची न चुके व्यथा। मनाचेनि छंदें नाचतां। साधनें सर्वथा व्यर्थ होती ॥ ३३ ॥

आत्मा, ज्ञानस्वरूप, परिपूर्ण, निःसंग, निर्विकार व निर्गुण आहे. त्याला संसारबंधन केव्हांहि संभवत नाहीं. १९ जो स्वयंप्रकाश, प्रकाशघन आपल्या तेजानेंच देदीप्यमान, परिपूर्ण परमात्मा असल्यामुळें त्याचें कर्म केव्हांहि संभवत नाहीं. ६२० आपणच विचार केला असतां मन जड ठरतें. तेव्हां त्यालाहि संसार संभवत नाहीं. मग संसारबंधन कोणाला असतें, तें ऐक. २१ मनाची लीला मोठी अगाध आहे. तें शुद्ध आत्म्याला 'मीपणा' लावून त्याला जीवपणांत आणितें आणि तें स्वतःच त्या शुद्ध ब्रह्माला सगुणस्वरूप देतें. २२ मन आपल्या संकल्पबलानेंच परब्रह्माला उपाधियुक्त करितें. त्याच्या मागें त्रिगुणांची मालिका जोडून स्वतःच त्याला संसाराच्या जाळ्यांत अडकवितें २३ घटांतील पाणी जसें अलिप्त असलेल्या चंद्राचें प्रतिबिंब धारण करितें, त्याप्रमाणें मनःसंकल्प निरुपाधिक ब्रह्माला उपाधियुक्त बनवितें. २४ घटांतील पाणी हाललें म्हणजे त्यांतील प्रतिबिंब कांपत असलेलें जसें भासतें तसें शुद्ध परब्रह्माला मनानें उत्पन्न केलेलें सुख-दुःख, जन्म-मरण भोगावें लागतें. २५ मन कल्पनारूप जड आहे, हें जाणून ज्ञानस्वरूप स्वयंप्रकाश आत्मा त्याचें पुण्य-पाप स्वतः भोगितो. २६ जीवाचा आप्त, सखा, सोयरा सहृद् सगळा परमात्माच आहे. तो मनाचें व जीवाचें नियमन करणारा व साक्षित्वानें द्रष्टा आहे. २७ अविद्येंत प्रतिबिंबित होणारा जीव माझा स्नेही होय. तोच मनाच्या भ्रमानें भाळतो व मनापासून उत्पन्न होणाऱ्या सुख-दुःखांना भोगितो. २८ मनाचें जीवाशीं होणारें तादात्म्य कांहीं विलक्षण आहे. त्यामुळें जीव भ्रमांत पडतो व स्वतः निष्कर्मा असूनहि कर्म-अकर्म स्वतःच भोगीत असतो. २९ वास्तविक पाहिलें असतां जीव मनाचा नियंता आहे. पण तोच उलट मनाशीं एकरूप होतो व मनाच्या नसत्या सुख-दुःख व्यथा आपल्या माथीं मारून घेऊन सोसतो; ६३० ज्याप्रमाणें एखाद्या राजाला अति प्रिय असलेला प्रधान त्याला आपल्या अंकीत करून घेतो व मग तो राजाच त्या प्रधानानें दिलेलें सुख-दुःख भोगितो, ३१ त्याप्रमाणें या जीवाची स्थिति झाली आहे. जीवाला मनानें संसारी बनविलें; पण सुख-दुःख व नाना प्रकारचें जन्म-मरण जीवाच्या रात्रंदिवस पाठीस लागलें. ३२ अशा त्या मनाचा जर निग्रह केला नाहीं, तर जीवाची व्यथा केव्हांहि चुकणार नाहीं. मनाच्या नादानें नाचूं लागलें असतां सगळीं साधनें व्यर्थ होतात. ६३३.

दानं स्वधर्मो नियमो यमश्च श्रुतानि कर्माणि च सद्व्रतानि ।
सर्वे मनोनिग्रहलक्षणान्ताः परो हि योगो मनसः समाधिः ॥ ४६ ॥

न लक्षितां मनोनियमन । सर्वस्वही दिधल्या दान । एक मी दाता होय अभिमान । तेणें दानें मन दाटुगें होय ॥ ३४ ॥ चुकोनि मनोनिग्रहाचें वर्म । आचरतां वर्णाश्रमधर्म । तेणें उल्हासे मनोधर्म । माझें स्वकर्म अतिश्रेष्ठ ॥ ३५ ॥ मीचि एक तिहीं लोकीं । स्वाचारनिष्ठ स्वयंपाकी । यापरी स्वधर्मादिकीं । मन होय अधिकीं चाविरें ॥ ३६ ॥ मनोनियमनीं नाहीं बुद्धी । तैं यमनियम ते उपाधी । मी एक साधक त्रिशुद्धी । हेंचि प्रतिपादी मनोधर्म ॥ ३७ ॥ करितां वेदशास्त्रश्रवण । गर्वाचें भरतें गहन । पांडित्यीं अतिअभिमान । मनोनियमन तेथें कैंचें ॥ ३८ ॥ करूं जातां निजकर्म । कर्मक्रिया अतिदुर्गम । कर्मठतेचा चढे श्रम । मनोनियमन घडे केवीं ॥ ३९ ॥ कर्म केवळ देहाचे माथां । आत्मा देहीं असोनि विदेहता । त्यासी कर्मीं कर्मबद्धता । कर्मठ मूर्खता मानिती ॥ ६४० ॥ अनंतव्रतें झाले व्रती । तेणें धनधान्य वांछिती । मनोनिग्रहो नाहीं चित्तीं । सद्व्रतें जाती सुनाट ॥ ४१ ॥ व्रत दान स्वधर्म सकळ । यांसी मनोनिग्रहो मुख्य फळ । तेणेंवीण अवघे विकळ । साधनें निष्फळ साधकां ॥ ४२ ॥ दानादिक सप्त पदार्थ । हे ज्ञानाचे अंगभूत । तीं साधनें समस्त । निष्फळ येथ केवीं म्हणा ॥ ४३ ॥ दानादिकें जीं जीं येथें । इहामुत्र फळ ये त्यांतें । तें फळचि निष्फळ येथें । जन्ममरणांतें वाढवी ॥ ४४ ॥ येथ साधक होय सज्ञान । फळाशा निःशेष त्यागून । दानादि स्वधर्माचरण । चित्तशुद्धी

—वास्तव मनोनिग्रह केला असतां सर्व साधनें केल्यासारखीं होतात; पण त्याच्या अभावीं सर्व व्यर्थ आहे, असें भिक्षु दोन श्लोकांनीं सांगतो —

दानं०...सद्व्रतानि—दान, नित्यनैमित्तिक स्वधर्म, यम व नियम, श्रवण, एकादशीउपवासादि सद्व्रतें व दुसरींहि सर्व कर्में, सर्वे मनोनिग्रहलक्षणान्ताः—हे सर्व उपाय मनोनिग्रह हेंच ज्याचें फल आहे असे आहेत. [अहोपण, त्याचें ज्ञानांगत्व प्रसिद्ध आहे. उत्तर—] मनसः समाधिः परः हि योगः—मनाचा निग्रह हाच श्रेष्ठ योग म्ह० ज्ञान आहे. ४६.

मनाचें नियमन करण्याकडे लक्ष दिलें नाहीं व सर्वस्वाचें दान केलें तर 'मीच काय तो एक दाता' असा अभिमान उत्पन्न होतो व त्या दानाच्या गर्वानें मन ताठतें. ३४ किंवा मनोनिग्रहाचें तत्त्व न जाणतां जे वर्णाश्रमधर्माचें आचरण करितात त्यांची मनोवृत्ति 'माझें कर्म अतिशय श्रेष्ठ आहे' या भावनेनें उचंबळते. ३५ त्रैलोक्यांत मीच काय तो एक आचारसंपन्न आहें, मी स्वावलंबनानें स्वतः अन्न शिजवून खातें, याप्रमाणें स्वधर्मादिकांचें आचरण करणारांचें मनहि अधिकच बावरतें. ३६ ज्याला मनोनिग्रह करितां येत नाहीं त्याला यम-नियम ही एक उपाधीच होते. मीच काय तो एक साधक, असें त्याचें मन त्याला सांगत असतें. ३७ वेदशास्त्राचें श्रवण केलें असतां गर्वाची प्रचंड भरती येते व स्वतःच्या विद्वत्तेचा अभिमान अतिशय वाढतो. तेथें मनाचें नियमन कसें होणार ! ३८ आपलें कर्म करूं लागलें असतां कर्मानुष्ठान कठिण असल्यामुळें कर्मठपणाचा श्रम मात्र चढतो; मग मनोनिग्रह कसा होणार ! ३९ कर्माची जबाबदारी शरीरावर आहे. आत्मा देहांत असूनहि देहरहित आहे. परंतु कर्मठ लोक मूर्खपणानें आत्मा कर्मानें बद्ध होतो, असें मानितात. ६४० चतुर्थी, प्रदोष, एकादशी वगैरे अनंत व्रतें नियमानें करून ते व्रतपरायण लोक धन-धान्यादि फलाची इच्छा करितात परंतु त्यांच्या मनाचें नियमन झालेलें नसल्यामुळें त्यांचीं तीं सर्व सुव्रतें व्यर्थ होतात. ४१ व्रत, दान, स्वधर्म या सर्वांचें मनाचें नियमन हेंच मुख्य फळ आहे. त्यावांचून साधकांचीं सर्व साधनें दुर्बळ व निष्फळ आहेत. ४२ अहोपण ! दानादि सात धर्म हीं ज्ञानाचीं अंगभूत साधनें आहेत, त्यांना तुम्ही निष्फळ कसें म्हणतां ! ४३ येथें जीं दानादिक साधनें आहेत, त्यांचें या लोकीं व परलोकीं फल मिळतें; पण तें फलच निष्फल होतें व येथील जन्म-मरणाला वाढवितें. ४४ जो साधक ज्ञानसंपन्न असतो तो जर फळाची आशा समूळ टाकून

जाण उपेगा ते ॥ ४५ ॥ माझी व्हावी चित्तशुद्धी । ऐशी उपजावया बुद्धी । भगवत्कृपा पाहिजे आधीं । तैं साधनें सिद्धि पावती ॥ ४६ ॥ साधनीं माझी मुख्य भक्ती । त्यांत विशेषें नामकीर्ती । नामें चित्तशुद्धि चित्तीं । स्वरूपस्थिति साधकां ॥ ४७ ॥ नामापरतें साधन । सर्वथा नाहीं आन । नामें भवबंधच्छेदन । सत्य जाण उद्धवा ॥ ४८ ॥ स्वरूपस्थिति निश्चळ मन । जेथ लाजोनि जाय साधन । तेथ दानादिकांचें प्रयोजन । सहजचि जाण खुंटलें ॥ ४९ ॥

समाहितं यस्य मनः प्रशान्तं दानादिभिः किं वद तस्य कृत्यम् ।
असंयतं यस्य मनो विनश्येद्दानादिभिश्चेदपरं किमेभिः ॥ ४७ ॥

जेथ ज्या पुरुषांचें मन । ठाकी आपुलें जन्मस्थान । त्यासी दानादिकांचें कोण । प्रयोजन साधनीं ॥ ६५० ॥ पूर्णतृप्तापाशीं जाण । ओगरलिया सदन्न । तो जेवीं न पाहे हुंगोन । तेवीं साधन अमनस्का ॥ ५१ ॥ गंगा उतरावया महापूरीं । अतिप्रयासीं ताफा करी । तोचि पूर वोहटल्यावरी । ताफा अव्हेरी निःशेष ॥ ५२ ॥ तेवीं कामक्रोधादि वेगशून्य । ज्याचें निर्विकल्पीं निश्चळ मन । त्यासी दानादिकीं प्रयोजन । नाहीं जाण निश्चित ॥ ५३ ॥ जेवीं सूर्योदय झाल्यापाठीं । उपेगा न ये लक्ष दिवटी । तेवीं निर्विकल्पता मनीं उठी । तैं साधनें कोटी सुनाट ॥ ५४ ॥ एवं समाहित ज्याचें मन । त्यासी दानादि नाना साधन । करावया नाहीं प्रयोजन । कल्पना पूर्ण निमाल्या ॥ ५५ ॥ ज्याचें नेम न मनी चित्त । जें सदा विवेकरहित । जें अनिवार विषयासक्त । त्यासीही अनुपयुक्त साधनें ॥ ५६ ॥ जेवीं मदगजांच्या लोटीं । सैन्य पळे बारा वाटीं । तेवीं विषयासक्तापाठीं । साधनें हिंपुटी होऊनि ठाती ॥ ५७ ॥

दानादि स्वधर्माचरण करील तर तें त्याचें कर्म चित्तशुद्धीच्या उपयोगी पडेल. ४५ परंतु 'माझी चित्तशुद्धि व्हावी' अशी बुद्धि उत्पन्न होण्यासहि भगवानाची कृपा आधीं पाहिजे. तरच तीं साधनें सिद्धीस जातील. ४६ सर्व साधनांत माझी भक्ति मुख्य आहे व त्यांत माझ्या नांवाची कीर्ति तर त्याहूनहि श्रेष्ठ आहे. नामानें चित्तशुद्धि होते. साधकाला आत्मस्वरूपाची प्राप्ति होते. ४७ नामासारखें दुसरें साधन नाहीं. नामस्मरण संसारबंधाचा छेद करितें, असें हे उद्धवा ! तूं सत्य समज. ४८ आत्मस्वरूपाची प्राप्ति झाली कीं, मन निश्चल होतें. त्याच्यापुढें सर्व साधनें लाजतात. तेव्हां तेथें दानादिकांचें प्रयोजन सहजच खुंटतें. ६४९.

यस्य समाहितं मनः प्रशान्तं तस्य दानादिभिः किं **कृत्यं वद**—ज्याचें समाहित चित्त अत्यंत शान्त झालें आहे, त्याला दानादिकांचा काय उपयोग, सांग बरें ! **यस्य असंयतं मनः** विनश्येत् चेत् एभिः दानादिभिः किं अपरं—ज्याचें मन निग्रहशून्य असतें त्याचा जर विनाश झाला तर त्याला या दानादि इतर साधनांनीं दुसरें कोणतें फल मिळणार ! ४७.

ज्या पुरुषाचें मन आपल्या जन्मस्थानीं जाऊन स्थिर होतें, त्याला दानादि साधनांची तरी काय गरज ! ६५० एखादा पोटभर जेऊन तृप्त झाल्यावर त्याला सुग्रास अन्न वाढलें तर तो तें खात नाहीं. नुसता वास घेऊन उठून जातो. त्याप्रमाणें मनोजय केलेल्या साधकाला साधनें व्यर्थ होतात. ५१ गंगेला महापूर आलेला असतां पैलतीरावर जाणारा मोठ्या यत्नानें होडी करितो; पण नदीचा पूर एकदा उतरला कीं, मग तो होडी टाकून देतो. ५२ त्याप्रमाणें ज्याचें मन काम-क्रोधादिशून्य होऊन निर्विकल्पांत निश्चल होतें, त्याला दानादिकांची मुळींच आवश्यकता नाहीं, हें निश्चित जाणावें. ५३ सूर्योदय झाल्यावर लक्षावधि मशाली लाविल्या तरी त्या जशा व्यर्थ होतात, त्याप्रमाणें एकदां मनांत निर्विकल्प ठसल्यावर मग कोट्यावधि साधनें निष्फळ होतात. ५४ ज्याचें चित्त याप्रमाणें शांत असतें त्याला दानादि अनेक साधनें करण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. कारण त्याच्या सर्व कल्पना पूर्णपणें लीन झालेल्या असतात. ५५ ज्याचें मन ताब्यांत नसतें. जो निरंतर विवेकरहित असतो, ज्याच्या मनांत अनिवार विषयासक्ति असते त्यालाहि या साधनांचा तादृश उपयोग होत नाहीं. ५६ मत्त हत्तींचा कळप चाल करून आला असतां सैन्य जसें बारा वाटांनीं पळत सुटतें, त्याप्रमाणें विषयासक्त माणसापुढें साधनें बिचारीं दीन होऊन जातात. ५७ ज्याचें मन विषयासक्त आहे तो साधनांकडे कधीं पहातहि नाहीं व जरी त्यानें

॥ ५७ ॥ जो विषयासक्तमना । तो सर्वथा नातळे साधना । करी तैं तेथेंही जाणा । विषयकल्पना संकल्पीं ॥ ५८ ॥ स्वयें कारितां पैं साधना । जें जें फळ वांछी वासना । तें तेणेंचि फळे जाणा । करी उगाणा दानादिकांचा ॥ ५९ ॥ जेवीं कां बुद्धिबळाचा वारू । त्यावरी बैसला निर्बळ नरू । तो त्यासी सर्वथा अनावरू । नव्हे स्थिरू अणुमात्र ॥ ६६० ॥ तैसें ज्याचें अतिदुर्मन । सदा कामक्रोधीं परिपूर्ण । जो स्वयें झाला मनाचे अधीन । ज्याचा विवेक निमग्न महामोहीं ॥ ६१ ॥ तेथ साधनचि करी कोण । करी तें मोहास्तव जाण । तेणें वाढे तमोगुण । मनोनियमन घडेना ॥ ६२ ॥ श्रवणादि इंद्रियबंधन । करूनि कारितां साधन । तेणें वश्य नव्हे मन । मनाअधीन इंद्रियें ॥ ६३ ॥

मनो वशेऽन्ये ह्यभवन्स्म देवा मनश्च नान्यस्य वशं समेति ।
भीष्मो हि देवः सहसः सहीयान् युञ्ज्याद्वशे तं स हि देवदेवः ॥ ४८ ॥

मनें आकळिलें सर्वांसी । परी मन नाकळे कोणासी । मनें छळिलें देवांसी । तें केवीं इंद्रियांसी आटोपे ॥ ६४ ॥ चंद्र अधिष्ठाता मनासी । मनें छळिलें चंद्रम्यासी । व्यभिचारोनि गुरुपत्नीसी । क्षयरोगी त्यासी मनें केलें ॥ ६५ ॥ ब्रह्मा अधिष्ठाता बुद्धीसी । मनचि ब्रह्मयाची बुद्धि भ्रंशी । निजपुत्रीं वारितां त्यासी । स्वकन्येसी अभिलाषी ॥ ६६ ॥ चित्तीं वासुदेवाचें अधिष्ठान । त्यातेंही हळू ठकी मन । लावूनि वृंदेचें ध्यान । श्मशानीं जाण पाडिला ॥ ६७ ॥ रुद्र अधिष्ठाता अहंकारी । त्यातेंही मन सिंतरी । अभिलाषितां ऋषिनारी । शापिला ऋषीश्वरीं लिंगपातें ॥ ६८ ॥ ऐसें

तीं आचरिलीं तरी त्यांतहि तो विषयांचेंच चिंतन करीत असतो. ५८ साधनाचें अनुष्ठान करीत असतांना त्याची वासना ज्या ज्या फलाची इच्छा करिते तें तें फल त्याला तत्काल प्राप्त होतें आणि दानादिकांची वसुली होते. ५९ बुद्धिबळांतील घोडा खेळ न जाणणाऱ्या माणसाच्या हातीं असला तर तो जसा त्याला अनावर होतो व क्षणभरहि स्थिर रहात नाहीं, ६६० त्याप्रमाणें ज्याचें मन अत्यंत दुर्बल असतें, सदा काम क्रोधानें भरलेलें असतें, जो स्वतःच मनाच्या अधीन होतो, ज्याचा विचार महामोहांतच निमग्न असतो ६१ तो साधनें आचरणार तरी कसा ! तो मोहानें जीं कांहीं साधनें करितो, त्यांच्या योगानें तमोगुण वाढतो व मनाचें नियमन कांहीं केल्या घडत नाहीं. श्रवणादि इंद्रियांना ताब्यांत ठेवून साधनें जरी आचरिलीं तरी त्यानें मन केव्हांहि वश होत नाहीं. ६२ कारण इंद्रियें मनाच्या अधीन असतात. (मन इंद्रियांच्या स्वाधीन नसतें.) ६६३.

—अहो, दानादिकांच्या योगानें इतर इंद्रियांचा जय हें फल त्याला मिळेल, अशी आशंका घेऊन भिक्षु सांगतो—

अन्ये देवाः मनोवशे हि अभवन् स्म— इतर इंद्रियें किंवा त्यांचे अधिष्ठाते देव मनाच्या अधीनच झाले आहेत. **मनः च अन्यस्य वशं न समेति**—आणि मन दुसऱ्या कोणाच्याहि वश होत नाहीं. **भीष्मः हि देवः**—मनोरूप देव योग्यांनाहि भयंकर आहे, कारण, **सहसः सहीयान्**—तो बलवानाहूनहि अति बलाढ्य आहे. **यः तं वशे युञ्ज्यात् सः हि देवदेवः**—यास्तव त्या मनाला जो आपल्या स्वाधीन ठेवितो तोच देवांचाहि देव म्ह० सर्व इंद्रियांना जिंकणारा होतो. दुसरा कोणीहि तसा विजयी होत नाहीं. (याच अर्थाची श्रुतीहि आहे.) ४८.

मनानें सर्वांना अधीन ठेविलें आहे, पण मन मात्र कोणाच्या ताब्यांत रहात नाहीं. ज्या मनानें देवादिकांसहि छळिलें तें इंद्रियांच्या वश कसें रहाणार ! ६४ चंद्र मनाची नियामक देवता असतां त्या चंद्रालाहि मनानें छळिलें आहे. मनानें त्याला गुरूपत्नीशीं व्यभिचार करावयास लाविलें व त्यामुळें तो बिचारा जन्माचा क्षयरोगी होऊन बसला. (शापामुळें चंद्राची क्षयवृद्धि होत असते.) ६५ ब्रह्मदेव बुद्धीची अधिष्ठात्री देवता असून मनानें त्याचाहि बुद्धिभ्रंश केला, त्यामुळें स्वतःच्या कन्येनें निवारण केलें असतांहि त्यानें तिचा अभिलाष केलाच. ६६ चित्तांत वासुदेवाचें अधिष्ठान असतें, तरी मनानें त्यालाहि हळूच गोत्यांत आणिलें. त्याला वृंदेचा नाद लावून स्मशानांत पाडलें. ६७ रुद्र म्हणजे शंकर, ही अहंकाराची देवता आहे. त्यालाहि मनानें फसविलें. त्यानें ऋषिस्त्रियांचा अभिलाष धरिला व त्यामुळें ऋषीनें शाप देऊन त्याचा लिंगपात केला. ६८ असें देवतांनाहि अजिंक्य

देवां दुर्जय जें मन । त्यासी आवरी इतर कोण । म्हणाल इंद्रियें नेमित मन । ते मनाअधीन इंद्रियें ॥ ६९ ॥ जैं इंद्रियें धरोनि हातीं । मनें एकाग्र होइजे अर्थीं । तेव्हां इतर इंद्रियांची स्थिती । राहे निश्चितीं सुनाट ॥ ६७० ॥ इंद्रियविषयां होय संगती । ते काळीं जैं दुश्चिती मनोवृत्ती । तेव्हां न घडे विषयप्राप्ती । इंद्रियां स्फूर्ती स्फुरेना ॥ ७१ ॥ जेव्हां अनासक्त मनोधर्म । तेव्हां इंद्रियांचें न चले काम । मनाअधीन इंद्रियग्राम । इंद्रियां मनोनेम कदा न घडे ॥ ७२ ॥ इंद्रियांचा राजा मन । इंद्रियें न चालती मनेंवीण । पुरुषार्तेंही मन आपण । वश्य जाण स्वयें करी ॥ ७३ ॥ अतिबळियां बळी मन । तेथ इंद्रियें बापुडीं कोण । मनाचें करावया दमन । नव्हे आंगवण वरिष्ठां ॥ ७४ ॥ काळ निजसत्ता सर्व ग्रासी । परी मनाची लोंव नुपडे त्यासी । करितां उत्पत्तिस्थितिप्रळयांसी । मन काळासी नाटोपे ॥ ७५ ॥ शस्त्रें न तुटे सर्वथा मन । त्यासी विरवूं न शकेचि जीवन । मन जाळूं न शके दहन । मनातें गगन शून्य करूं न शके ॥ ७६ ॥ मनासी लागों न शके व्याधी । मन रोडेजे ऐशी नाहीं आधी । मन आकळावया सिद्धी । पाहतां त्रिशुद्धी दिसेना ॥ ७७ ॥ मन ब्रह्मादिकांच्या रची कोडी । मन ब्रह्मांडें घडीमोडी । मन निजकल्पनाकडाडीं । नाचवी धांदडी त्रैलोक्या ॥ ७८ ॥ मन कळिकाळातें छळी । मन प्रळयानळातें गिळी । मन बळियांमाजीं अतिबळी । मनातें आकळी ऐसा नाहीं ॥ ७९ ॥ मन देवांसी दुर्धर । मन भयंकरां भयंकर । मनें आकळिले हरिहर । मनासमोर कोण राहे ॥ ६८० ॥ मनाचा अनिवार मार । कोण राहे मनासमोर । मनास पर्जी ऐसा थोर । सूर नर असूर दिसेना ॥ ८१ ॥ मनासी मेळवी हातोफळी । ऐसा त्रिलोकीं नाहीं बळी । मन कळिकाळातें आकळी । प्रळयरुद्रातें गिळी न माखतां दाढ ॥ ८२ ॥ ऐसा मनाचा अगाध भावो । यालागीं यातें म्हणिजे देवो । मनाचा भयानकां

बसलल जें मन, त्याला इतर कोण आवरूं शकणार ! इंद्रियें मनाचें नियमन करतील म्हणावें, तर इंद्रियेंच मूळ मनाच्या अधीन आहेत. ६९ इंद्रियांना हातीं धरून जर मन एकाग्र होईल तरच इंद्रियांचें बळ कमी होईल. ६७० मनोवृत्ति स्थिर नसतां इंद्रियें व विषय यांचा जरी संयोग झाला तरी विषयोपभोग घडत नाहीं; कारण इंद्रियांना त्यांचें स्फुरण होतच नाहीं. ७१ मनोवृत्ति जेव्हां आसक्त नसते, तेव्हां इंद्रियांचें सामर्थ्य मुळींच चालत नाहीं. इंद्रियसमुदाय मनाच्या अधीन असतो. यास्तव इंद्रियांकडून मनाचें नियमन कदापि घडत नाहीं. ७२ मन इंद्रियांचा राजा आहे. इंद्रियें मनावांचून चालत नाहींत. मनुष्यालाहि मन आपल्या वश करून ठेवितें. ७३ मन अत्यंत बलिष्ठाहूनहि बलिष्ठ आहे त्याच्या पुढें बापड्या इंद्रियांचा काय पाड ! मोठ-मोठ्या सामर्थ्यांतहि मनाचें नियमन करण्याची शक्ति नसते. ७४ काळ सगळ्यांना ग्रासून आपली सत्ता जरी गाजवीत असला, तरी त्याला मनाच्या केंसालाहि धक्का लावण्याचें सामर्थ्य नाहीं. तो जगाचे उत्पत्ति-स्थिति-लय करितो. पण मनाला आवरूं शकत नाहीं. ७५ शस्त्रें मनाला तोडूं शकत नाहींत, जल विरघळवूं शकत नाहीं, अग्नि जाळूं शकत नाहीं किंवा आकाशहि त्याला शून्य करूं शकत नाहीं. ७६ मनाला कसलीहि व्याधि जडत नाहीं. तें रोडावत नाहीं किंवा मनाला वश करणारी सिद्धिहि कोठें सांपडत नाहीं. ७७ मन कोट्यवधि ब्रह्मदेवांना निर्माण करितें. मन ब्रह्माण्डांच्या घडा मोडी करितें. तें आपल्या कल्पनेनें गर्जना करीत असतें व त्रिभुवनाला जुलमानें नाचवीत असतें. ७८ मन कळि-काळांसहि छळीत असतें. तें प्रलयकालाच्या अग्नीस गिळतें. तस्मात् तें प्रबलांहूनहि अति-प्रबल आहे. मनाचें आकलन करणारें कोणीहि नाहीं. ७९ मन देवादिकांसहि भारी आहे. तें भयंकर प्राण्यांनाहि भयंकर आहे. मनानें हरि-हरांवरहि आपली छाप बसविली. अशा मनापुढें उभें तरी कोण रहाणार ! ६८० मनाचा मारा मोठा विलक्षण आहे. त्याच्या पुढें कोण टिकाव धरणार ! मनाचा पराभव करणारा सुर, नर व असुर यांत कोणीहि दिसत नाहीं. ८१ मनाशीं दोन हात करील असा एकहि पराक्रमी वीर सगळ्या त्रिभुवनांत दिसत नाहीं. मन कळि-काळांसहि बांधून ठेवितें. आपल्या दाढा न माखतां प्रलयरुद्रालाहि गिळून टाकितें. ८२ असा मनाचा अगाध महिमा आहे. म्हणून

भेवो। यालागीं भीष्मदेवो मनातें म्हणती ॥ ८३ ॥ ऐसी मनाची अनावर स्थिति । यासी आकळावयाची सवर्म युक्ती। साचार सांगेन तुम्हांप्रती। सावधान स्थितीं अवधारा॥ ८४॥ जेवीं हिरोनि हिरा चिरिजे। तेवीं मनेंचि मन धरिजे। हेंही तैंचि गा लाहिजे। जैं गुरुकृपा पाविजे संपूर्ण स्वयें ॥ ८५ ॥ मन गुरुकृपेची आंदणी दासी। मन सदा भीतसे सद्गुरूसी। तें ठेवितां गुरुचरणापाशीं। दे साधकसी संतोष ॥ ८६ ॥ या मनाची एक उत्तम गती। जरी स्वयें लागलें परमार्थीं। तरी दासी करी चारी मुक्ती। दे बांधोनि हातीं परब्रह्म ॥ ८७ ॥ मनचि मनाचें द्योतक। मनचि मनाचें साधक। मनचि मनाचें बाधक। मनचि घातक मनासी॥ ८८॥ जेवीं वेळु वाढवी वेळु जाळी। वेळु वेळुवां कांचणीमेळीं। स्वयें पाडूनि इंगळी। समूळ जाळी आपण्यातें ॥ ८९ ॥ तेवीं मन मनासी चिंती मरण। तैं सद्गुरूसी रिघवी शरण। त्याचे वचनीं विश्वासोन। करवी गुरुभजन निरभिमानें॥ ६९० ॥ सद्गुरुकृपा झालिया संपूर्ण। हें मनचि मनासी दावी खूण। तेणें निजसुखें सुखावोन। मनचि प्रसन्न मनासी होय॥ ९१ ॥ मन मनासी झालिया प्रसन्न। तेव्हां वृत्ति होय निरभिमान। ऐसें साधका निजसमाधान। मनें आपण साधिजे॥ ९२ ॥ पावोनि गुरुकृपेची गोडी। मनोविजयाची निजगुढी। मनें उभवूनि लवडसवडी। दीजे रोकडी साधकांहातीं ॥ ९३ ॥ यापरी साधकांसी संपूर्ण। मन आपला विजयो दे आपण। शेवटीं सद्गुरुनिजबोधीं पूर्ण। मन होय लीन निजात्मता॥ ९४ ॥ जेवीं कां सैंधवाचा खडा। रिघोनि सिंधूमाजिवडा। स्वयें विरोनियां रोकडा। सिंधूएवढा तो होय॥ ९५ ॥ यापरी साधक जाण। होतांच निरभिमान। स्वयें होती ब्रह्म पूर्ण। मीतूंपण गिळोनी॥ ९६ ॥ मग त्याचिया निजदृष्टीं। मीचि एक अवघे सृष्टीं। मावळली द्वंद्वत्रिपुटी। सुखदुःख पाठीं लागेना॥ ९७॥ तेथें कैंचें सुख कैंचें दुःख। कैंचा बंध कैंचा मोक्ष। कोण पंडित कोण मूर्ख। ब्रह्म एक एकलें॥ ९८॥

त्याला 'देव' असें म्हणतात. मोठ्या भयानकांनाहि मनाचें भय वाटतें. म्हणून मनाला भीष्मदेव म्हणतात. ८३ अशी मनाची स्थिति मोठी अनावर असते. त्याला ताब्यांत ठेविण्याची मार्मिक युक्ति तुम्हांला सांगतों, ती सावधान चित्तानें ऐका. हिऱ्यानेंच जसा हिरा कापावा, तसें मनानेंच मनाला जिंकावें. जेव्हां गुरुकृपा पूर्णपणें संपादन करावी,८४ तेव्हां हें साध्य होतें. ८५ कारण मन ही गुरुकृपेला आंदण दिलेली दासी आहे. त्यामुळें मन नेहमीं सद्गुरूला भीत असतें. तें सद्गुरुचरणीं अर्पण केलें कीं, साधकाला तत्काळ संतोष देतें. ८६ या मनाचा एक मोठा उत्तम गुण आहे. तें एकदां परमार्थाकडे लागलें कीं, चारी मुक्तींना दासी करितें आणि परब्रह्माला बांधून हातांत आणून देतें ८७ मनच मनाचें प्रकाशक आहे. तेंच साधकहि आहे. व बाधकहि आहे. मनच मनाचें घातक आहे. ८८ ज्याप्रमाणें वेळूच वेळूचें थोरलें बेट पसरवितें व एकमेकांच्या घर्षणानें अग्नि उत्पन्न करून स्वतःलाच समूळ जाळून टाकितें, ८९ त्याप्रमाणें मनाच्याच मनांत जेव्हां मरावेंसें येतें, तेव्हां तें सद्गुरूला शरण जातें व त्याच्या शब्दावर विश्वास ठेवून अभिमान टाकून साधकांकडून गुरुभजन करवितें. ६९० सद्गुरूची पूर्ण कृपा झाल्याची खूणहि मनच मनाला दाखवितें व संतुष्ट होऊन मनच मनावर प्रसन्न होतें. ९१ मनच मनावर प्रसन्न झालें कीं, त्याची वृत्ति निरभिमान होते. याप्रमाणें मनच साधकाला समाधान देतें. ९२ गुरुकृपेची गोडी लागल्यावर मनच मनोविजयाची गुढी उभारितें व ती मोठ्या गडबडीनें साधकाच्या हातीं देतें. ९३ अशा रीतीनें मनच साधकाला आपल्यावर विजय मिळवून देतें. शेवटीं सद्गुरूच्या आत्मज्ञानांत मन आत्मरूपानें लीन होतें. ९४ मिठाचा खडा समुद्रांत टाकिला असतां तो स्वतः त्यांत विरून जातो व समुद्ररूप होऊन जसा रहातो. ९५ त्याप्रमाणें साधक निरभिमान होतांच 'मी तूं-'पणा टाकून पूर्ण ब्रह्मरूप होतो. ९६ मग त्याच्या दृष्टीला मीच काय तो एक दिसतों. माझ्यावांचून इतर सर्व द्वंद्वत्रिपुटी मावळून जातात. सुख-दुःख त्याच्या पाठीस लागत नाहीं. ९७ तेथें सुख-दुःख कोठचें ! बंध-मोक्ष कोठचा ! पंडित कोठचा आणि मूर्ख कोठचा ! सगळें परिपूर्ण

तेथ कोण देव कोण भक्त । कोण शांत कोण अशांत । मावळलें द्वैताद्वैत । वस्तु सदोदित स्वानंदें ।। ९९ ।। तेथ उगाणले क्रियाकर्म । लाजा विराले धर्माधर्म । कैंचें अधम उत्तम मध्यम । परिपूर्ण ब्रह्म कोंदलें ।। ७०० ।। तेथ कैंचें शास्त्र कैंचा वेद । कैंची बुद्धि कैंचा बोध । निःशेष निमाला भेद । परमानंद कोंदला ।। १ ।। यापरी मनोविजयें पहा हो । ऐशिया स्थितीं पावला भावो । तेंचि स्वयें वदे देवो । ये अर्थी संदेहो असेना ।। २ ।। मनोजयाचा सद्भावो । ब्रह्मादिकां अगम्य पहा वो । जो स्वांगें करी स्वयमेवो । तो देवाधिदेवो निजबोधें ।। ३ ।। जो निजमनातें जिंकोनि । जनीं पावला जनार्दनीं । तो धन्य धन्य त्रिभुवनीं । त्याचेनि अवनि पवित्र ।। ४ ।। तेणेंचि पूर्वज तारिलें । तेणें सकळ कुळ उद्धरिलें । तेणेंचि परब्रह्म आंगविलें । जेणें जिंकिले मनातें ।। ५ ।। मनोजयें जे अतिसमर्थ । शांति सर्वस्वें विकली तेथ । त्यांसीं सुखदुःखांचें आवर्त । गेले न लगत निजात्मतां ।। ६ ।। ऐसी भिक्षूची निजवाणी । उल्हासें सांगे शार्ङ्गपाणी । उद्धवास म्हणे संतोषोनी । धन्य त्रिभुवनीं मनोजय ।। ७ ।। जेणें निजमनातें जिंकिलें । त्यासी मी किती वानूं बोलें । तेणें मज आपुलें पोसणें केलें । कीं विकत घेतलें उखितेंचि ।। ८ ।। मज सुखरूपा त्याचेनि सुखप्राप्ती । मज नित्यतृप्ता त्याचेनि तृप्ती । मज अनंता त्यामाजीं वस्ती । मी दाटुगा त्रिजगतीं त्याचेनि ।। ९ ।। 'मी तो' या शब्दकुसरी । त्याही जाण आम्हांबाहेरी । आंतुवटे निजविचारीं तोचि मी निर्धारीं निजऐक्यतां ।। ७१० ।। मनोजयें हें पदवी प्राप्त । तो मनोजय न करूनि येथ । प्राकृत रिपुजयें जे गर्वित । त्यांतें निर्भर्त्सित स्वयें भिक्षू ।। ११ ।।

तं दुर्जयं शत्रुमसह्यवेगमरुंतुदं तं न विजित्य केचित् ।
कुर्वन्त्यसद्विग्रहमत्र मर्त्यैर्मित्राण्युदासीनरिपून्विमूढाः ।। ४९ ।।

एक ब्रह्मच असतें. ९८ तेथें मग देव-भक्त, शांत-अशांत, द्वैत-अद्वैत हें सर्व मावळतें. एक आत्मवस्तुच शिल्लक रहाते. ९९ तेथें क्रिया-कर्म स्वस्थ बसतें. अधर्म लाजेनें विरून जातो. परिपूर्ण ब्रह्म भरल्यावर तेथें उत्तम-मध्यम-अधम कोठचें ! ७०० तेथें शास्त्र-वेद; बुद्धि-बोध; भेद-अभेद कोठचा ! परमानंद सर्वत्र पसरलेला असतो. १ याप्रमाणें मनावर जय मिळविला असतां त्याचा आशय या स्थितीला पोंचतो. स्वतः देवानेंच हें सांगितल्यामुळें यांत मुळींच संशय नाहीं. २ मनोजयाची स्थिति ब्रह्मदेवादिकांसहि अतर्क्य आहे. असें असतां जो स्वतः मनोजय मिळवितो, तो आत्मज्ञानानें देवाधिदेवच होऊन रहातो. ३ जो आपल्या मनाला जिंकून या जन्मांतच जनार्दनाशीं एकरूप झाला, तो त्रैलोक्यांत धन्य होय. त्याच्यामुळें पृथ्वी पवित्र होते. ४ ज्यानें मनाला जिंकिलें त्यानेंच पूर्वजांना तारिलें, सगळ्या कुलाचा उद्धार केला आणि परब्रह्म स्वाधीन करून घेतलें. ५ जो मनोजयानें समर्थ असतो, त्याला शान्ति सर्वस्वीं विकलेली असते. त्याच्या आत्मबोधामुळें सुख-दुःखाचे भोंवरे त्याला स्पर्श न करितां निघून जातात. ६ असें हें भिक्षूच्या तोंडचें भाषण श्रीकृष्णानें मोठ्या उल्हासानें सांगितलें आणि तो उद्धवास संतोषानें म्हणाला कीं, त्रिभुवनांत मनोजय धन्य होय. ७ ज्यानें स्वतःचें मन जिंकिलें आहे त्याची मी शब्दानें काय स्तुति करूं ! त्यानें मला उक्तेंच विकत घेऊन आपला दास करून ठेविलेलें असतें. ८ मी जो सुखस्वरूप त्या मला त्याच्यापासून सुख होतें व नित्य तृप्त असलेल्या माझी त्याच्याकडूनच तृप्ति होते. मी स्वतः अनंत असूनहि माझी त्यांच्यातच वस्ती असते. त्याच्यामुळेंच मी त्रिभुवन व्यापितों. ९ 'मी तो' इत्यादि शब्दांची कुशलता आपच्या पलीकडेच आहे. वास्तविक ऐक्यरूपानें तो व मी एकच आहों. ८१० मनोजयानें एवढी योग्यता प्राप्त होते. पण मनोजय न करितां जो लौकिक शत्रूंवर जय मिळवून गर्विष्ठ होतो, त्याची भिक्षु स्वतःच आतां निर्भर्त्सना करीत आहे. ७११.

तं दुर्जयं असह्यवेगं अरुंतुदं शत्रुं तं न विजित्य—दुर्जय व ज्याचे रागादि वेग असह्य आहेत अशा व त्यामुळेंच मर्माला व्यथा देणारा, अशा या मनोरूपी शत्रूला न जिंकितां, केचित् मर्त्यैः असद्विग्रहं कुर्वन्ति—जे कोणी कांहीं मर्त्यांशीं मिथ्या वैर करितात व, अत्र मित्राणि उदासीनरिपून् विमूढाः—त्यांत जे अनुकूल असतात त्यांना मित्र करितात व जे प्रतिकूल असतात त्यांना उदासीन किंवा शत्रु करितात ते मूढ होत. ४९.

पार्थिव शत्रु सबळ येती । तेथ समदामादिकां स्थिती । कारणीं लावोनियां ख्याती । जिंकिले जाती निजांगें ॥ १२ ॥ हे प्रकार मनाच्या ठायीं । करितां न चलती पाहीं । मनासी करावी शिष्टाई । तें कोणाचें कंहीं ऐकेना ॥ १३ ॥ मनासी द्यावें विषयदान । परी विषयीं तृप्त नव्हे मन । तेणें अधिकरुचि होय दारुण । आवरी कोण तयासी ॥ १४ ॥ न चले शमदमादि प्रकारू । तरी मनासी करावा मारू । तेथ न चले हातियेरू । मारणीं विचारू स्फुरेना ॥ १५ ॥ यापरी हा मनोवैरी । दुर्जयत्वें कठिण भारी । त्या सुखदुःखांच्या भरोवरी । सर्वदा मारी जन्ममरणें ॥ १६ ॥ इतर शत्रु नावरती । तरी पळों ये हातोहातीं । रिघोनियां गडदुर्गाप्रती । वांचती गती देखिजे ॥ १७ ॥ परी पळावया मनापुढें । पळतां त्रैलोक्य होय थोडें । जेथ लपावें अवघडें । तेथही रोकडें मन पावे ॥ १८ ॥ मनाचे सेनापति शूर । कामक्रोधादि महावीर । त्यांचा मार अतिदुर्धर । घायीं थोरथोर लोळविती ॥ १९ ॥ बाह्य शत्रु ते दूरदेशीं । येतां बहु दिन लागती त्यांसी । मनःशत्रु तो अंगेंसीं । अहर्निशीं जडलासे ॥ ७२० ॥ आसनीं भोजनीं एकांतीं । जपीं अथवा ध्यानस्थितीं । मनाची उडी पडे अवचितीं । विभांडी सर्वार्थीं वैराकारें ॥ २१ ॥ बाह्य शत्रूचें अल्प दुःख । मनाची पीडा विशेख । जन्ममरणांचे आवर्त देख । मन आवश्यक भोगवी ॥ २२ ॥ बाह्य शत्रु मरणात्मक । मन मरणासी अटक । हा वैरी न जिंकितां देख । जीवाचें अतिदुःख टळेना ॥ २३ ॥ मनाचे सवेग वेगासी । न साहवे सुरनरांसी । कदा न जिंकवे कोणासी । यालागीं मनासी दुर्जयत्व ॥ २४ ॥ ऐशिया मनातें न जिंकित । बाह्य शत्रु जिणोनि येथ । जे होती अतिगर्वित । ते निश्चित जाण महामूर्ख ॥ २५ ॥ मनेंचि जिंकावें मनासी । हें गत श्लोकीं तुजपाशीं । सांगीतलें यथार्थेंसीं । मनोजयासी उपावो ॥ २६ ॥ एवं मनातें ऐशियापरी । न साधवेचि करूनि वैरी । तरी मनासी करोनि मैत्री । मन सुखी करी मित्रत्वें ॥ २७ ॥ प्राकृत मित्रांची

बलाढ्य राजे जेव्हां सैन्यासह चालून येतात तेव्हां नीतिज्ञ राजे साम, दाम, दंड व भेद या उपायांचा योग्य उपयोग करून त्यांना जिंकितात. १२ परंतु हे उपाय मनापुढें मुळींच चालत नाहींत. मनाला उपदेशाच्या चार गोष्टी सांगाव्या तर तें कोणाचेंहि कांहीं ऐकत नाहीं. १३ बरें, मनाला विषयांची लालुच दाखवावी तर मन विषयांनीं तृप्त होत नाहीं, तें अधिकच बिथरतें. त्याला कोण आवरणार ! १४ शम-दमादि प्रकारांचा मनावर कांहीं परिणाम होत नाहीं. त्याला मारावें तर त्यावर कोणतेंच शस्त्र चालत नाहीं. १५ याप्रमाणें हा मनरूपी वैरी जिंकणें फार कठिण आहे. तोच उलट सुखदुःखांच्या साह्यानें सतत जन्ममरणानें मारीत असतो. १६ इतर शत्रु अनावर झाले तर तत्काळ पळ काढितां येतो. डोंगरांतील किल्ल्यांत लपून प्राण वांचवितां येतो; १७ पण मनापुढें पळतांना त्रिभुवनहि पुरें पडत नाहीं. ज्या अवघड जागीं जाऊन लपावें, तेथें मन हजर होतें. १८ काम-क्रोधादि महावीर मनाचे शूर सेनापति आहेत. त्यांचा मारा अतिशय दुःसह असतो. ते एका घावानें मोठ-मोठ्या योद्ध्यांना लोळवितात. १९ बाहेरचा शत्रु दूर देशाहून येण्यास कांहीं काल तरी लागतो; पण हा मनरूपी शत्रु रात्रं-दिवस अंगाशीं भिडला आहे. ७२० आसनीं, भोजनीं, एकान्तांत, जप, ध्यान करीत असतां मनःशत्रु अकस्मात् छापा घालितो आणि तो वैऱ्याप्रमाणें जेरीस आणतो. २१ बाहेरच्या शत्रुचें दुःख अल्प असतें; पण मनाची पीडा असह्य होते. तें जन्म-मरणांचे फेरे अवश्य भोगावयास लावितें. २२ बाहेरचा शत्रु मरणाधीन असतो; पण मन मरणांतहि विघ्न आणितें. या मनरूपी प्रबल शत्रूला जिंकिलें नाहीं तर जीवाचें अनिवार दुःख टळावयाचेंच नाहीं. २३ मनाचा वेग देवादिकांसहि सहन होत नाहीं. कितीहि कष्ट सोशिले तरी कोणीहि त्याला जिंकूं शकत नाहीं. म्हणून मन दुर्जय आहे. २४ अशा अजिंक्य मनाला न जिंकतां बाह्य शत्रूंवर जय मिळविल्याचा जे गर्व वहातात, ते महामूर्ख होत, असें खात्रीनें जाणावें. २५ मनानेंच मनाला जिंकावें हा मनोजयाचा स्पष्ट उपाय मीं तुला मागच्या श्लोकांत सांगितलाच आहे. २६ मनाशीं वैर करून त्याला जिकतां येत नाहीं. म्हणून त्याच्याशीं मैत्री करावी, म्हणजे तें मित्रत्वानें सुखी करितें. २७ सामान्यतः जगांतील मित्रांची मैत्री म्हटली म्हणजे प्रत्युपकाराच्या

मैत्री । उपकारीं प्रत्युपकारी । तेही विषयसुखावरी । येरयेर घरीं उचितानुकाळें ॥ २८ ॥ तैसी नव्हे मनाची मैत्री । उपकारेंवीण प्रत्युपकारी । सकळ दुःखांतें निवारी । सुखसागरीं नांदवी ॥ २९ ॥ प्राकृतीं अतिमित्रत्व ज्यासी । निजदुःख सांगतां त्यापाशीं । सर्वथा निवारेना त्यासी । म्हणे हें आम्हांसी असाध्य ॥ ७३० ॥ तैसें मित्रत्वा नव्हे मन । मना बैसवूनि सावधान । करितां निजदुःख निवेदन । हरी जन्ममरणमहाबाधा ॥ ३१ ॥ मरणभय असतां चित्तीं । कनककामिनींची आसक्ती । स्त्रिया अतिशयें निर्भर्त्सिती । तरी निर्लज्जवृत्ति लाजेना ॥ ३२ ॥ परदारा परधन । परद्रोहो परनिंदा जाण । लागल्या न सांडिती क्षण । नरक दारुण भोगावया ॥ ३३ ॥ उसंत नाहीं क्षुधेहातीं । द्वंद्वदुःखांची अतिप्राप्ती । नावरे इंद्रियवृत्ती । ऐसें मनाप्रती सांगतां ॥ ३४ ॥ ऐसें ऐकतां स्वयें मन । वैराग्यें खवळे पूर्ण । वेंचूनि विवेकाचें धन । दुःखनिर्दळण करूं पावे ॥ ३५ ॥ चोर भांडारी करितां पूर्ण । चोर चोरातें निवारी जाण । तेवीं मनासी करितां मित्रपण । मनाचे अवगुण मनचि नाशी ॥ ३६ ॥ अधर्मीं प्रवर्ततां आपण । मनचि मनासी निवारी जाण । असत्याची वाचेसी आण । आपण्या आपण मन घाली ॥ ३७ ॥ कैशी मनाची मैत्री परम । निःशेष जाळावया कर्माकर्म । जोडावया चित्तशुद्धीचें वर्म । स्मरे हरिनाम अहर्निशीं ॥ ३८ ॥ श्रीराम जयराम दों अक्षरीं । महापातका होय बोहरी । नाम न विसंबे क्षणभरी । अखंडाकारीं हरि स्मरे ॥ ३९ ॥ तेव्हां असत्याचें शीस तोडी । अधर्माची साली काढी । कल्पनेचे पाय मोडी । तटका तोडी आशेचा ॥ ७४० ॥ विकल्पाचा घरठाव मोडी । प्रपंचाचे दांत पाडी । अविश्वासू तीं ठायीं तोडी । विश्वासाची गुढी उभवी मन ॥ ४१ ॥ ऐसेनि परिपक्व विश्वासीं । येऊनि सद्गुरुचरणांपाशीं । तनु मन धन

अपेक्षेनें ते परस्परांवर उपकार करीत असतात. ती मैत्री केवळ विषयसुखासाठींच असते. ती योग्यप्रसंगीं देवाण व घेवाण, या स्वरूपाची असते. २८ पण मनाची मैत्री तशी नसते. तें उपकारावांचूनच प्रत्युपकार करितें, सगळ्या दुःखाचें निवारण करितें आणि सुखसागरांत ठेवितें. २९ लौकिकांतील सामान्य मित्रापाशीं आपलें दुःख सांगितलें असतां त्याला त्याचें निवारण करितां येत नाहीं. 'ही गोष्ट आम्हांला असाध्य आहे.' असें तो म्हणतो. ७३० मनाचें मित्रत्व तशा प्रकारचें नाहीं. स्वस्थपणानें बसून मनाला आपलें दुःख निवेदन केलें तर तें जन्म-मरणांच्या महाबाधेचें निवारण करितें. ३१ मनांत मरणाचें भय असतांहि कनक व कांता यांची आसक्ति असते. स्त्रिया अत्यंत तिरस्कार करितात तरी निर्लज्ज वृत्तीला लाज वाटत नाहीं. ३२ परस्त्री, परद्रव्य, परद्रोह, परनिंदा यांचा एकदां छंद लागला कीं, भयंकर नरक भोगण्यास एका क्षणाचाहि विलंब लागत नाहीं. ३३ क्षुधेपुढें तर घटकेचा धीर निघत नाहीं. द्वंद्वदुःखांची अतिशय प्राप्ति होते. पण इंद्रियवृत्ति आवरत नाहीं, असें मनाला सांगितलें असतां ३४ तें ऐकून मन स्वतः वैराग्यानें पूर्णपणें खवळतें आणि तें पूर्ण विवेकाचें भांडवल खर्चीं घालून दुःखाचें निवारण करावयास धांवतें. खजिना राखण्यास चोराची नेमणूक केली, म्हणजे तो चोरच इतर चोरांचें जसें निवारण करितो, ३५ तसें मनाशीं मित्रत्व जोडिलें कीं, तें मनच स्वतःचे दोष नाहींसे करितें. ३६ आपण अधर्मांत प्रवृत्त झाल्यास मनच 'वाणीला असत्य बोलूं नको' अशी शपथ घालितें. ३७ मनाची मैत्री कशी विलक्षण आहे पहा! (मन जसें अधोगतीला नेणारें आहे तसेंच तें मोक्ष देणारेंहि आहे.) कर्म-अकर्मास निःशेष जाळून टाकण्यासाठीं आणि चित्तशुद्धीचें वर्म जाणण्यासाठीं मन रात्रंदिवस हरिनामाचें स्मरण करीत असतें. ३८ 'श्रीराम, जयराम' या दोनच शब्दांनीं महा पातकांचा नाश होतो. मन त्या नामाला क्षणभरहि विसंबत नाहीं. अखंड हरिस्मरणांतच तल्लीन होऊन रहातें. ३९ तेव्हां तें असत्याचें मस्तक कापून टाकितें, अधर्माला सोलून त्याची सालटी काढितें, कल्पनेचे पाय मोडून टाकितें, आशेचा संबंध तोडून टाकितें. ७४० विकल्पाचें घर जमिनदोस्त करितें, प्रपंचाचे दांत पाडतें, अविश्वासाचा मागमूस ठेवीत नाहीं व विश्वासाची गुढी उभारितें. ४१ तें

सर्वस्वेंसीं । गुरुवचनासी विश्वासे ।। ४२ ।। पूर्ण विश्वासाचें लक्षण । होतां गुरुवाक्यश्रवण । परिसीं लोह पालटे जाण । तैसें अंतःकरण पालटे ।। ४३ ।। गुरुवचन सांगोन राहे । परी मनींचें मनन न राहे । कीटकी भ्रमरी ऐसा पाहे । तद्रूप होये निदिध्यासें ।। ४४ ।। तेव्हां कमनीय कामिनी धन । तें देखे विष्ठेसमान । निंदा द्वेष मानाभिमान । हे मनाचे अवगुण मनाचि नाशी ।। ४५ ।। धन्य धन्य मनाची मैत्री । विश्वास धरोनि निर्धारीं । जन्ममरण जीवें मारी । जीवातें करी अजरामर ।। ४६ ।। ऐसी मनासी करितां मैत्री । मन परम उपकारी । जीवातें धरोनि निजकारीं । स्वानंदसागरीं बुडी दे ।। ४७ ।। तेथ मनाचें मनपण सरे । जीवाचें जीवपण विरे । बंधमोक्षांची धांव पुरे । समूळ ओसरे भवभय ।। ४८ ।। मनाचें मित्रत्व यापरी । आपुलें कुळ स्वयें संहारी । आपणही मरे मित्रोपकारीं । मन मित्राचारीं अवंचक ।। ४९ ।। ऐसें मैत्रीसी मन सादर । जवळी असतां निरंतर । त्यातें वोसंडूनि पामर । प्राकृत नर मित्र करिती ।।७५०।। वैर करोनि मनाचि मारावें । मित्रत्वें मनें मन साधावें । इयें दोनीं जैं न संभवे । तैं उपेक्षावें मनातें ।।५१।। मन म्हणेल तें न करावें । मनातें हातीं न धरातें मनानें कांहीं नातळावें । जीवेंभावें निःशेष ।।५२।। मन म्हणेल जें सुख । तें सांडावें आवश्यक । मन म्हणेल जें दुःख । तेही निःशेख त्यजावें ।। ५३ ।। ऐसें उदास मन देख । जो करी आवश्यक । तरी तो झाला अमनस्क । शांति अलोलिक ते ठायीं ।। ५४ ।। शत्रु मित्र उदासीन । करूनि वश्य न करी मन । जो धरी देहाभिमान । त्याचें भवभ्रमण सरेना ।। ५५ ।।

दृढ विश्वासानें सद्गुरुचरणांपाशीं येऊन त्यांस तन-मन-धनादि सर्वस्व अर्पण करून गुरुवचनावर विश्वास ठेवितें. ४२ परीसाचा स्पर्श होतांच लोखंडाचें मूळस्वरूप पालटून त्याचें जसें सोनें बनतें, त्याचप्रमाणें गुरुवाक्याच्या श्रवणानें त्याचें अंतःकरण पालटतें. ४३ हेंच पूर्ण विश्वासाचें लक्षण आहे. गुरूचें वचन एकदां सांगितल्यावर थांबतें; पण मनाचें चिंतन मात्र थांबत नाहीं. त्यामुळें कुंभारणीच्या ध्यासानें रूप बदलणाऱ्या अळीप्रमाणेंच तें सतत चिंतनानें तद्रूप बनतें. ४४ त्या वेळीं सुंदर कामिनी आणि कनक यांस तें विष्ठेसमान त्याज्य मानूं लागतें. निंदा, द्वेष, मानाभिमान या मनाच्या दोषांचा मनच नाश करितें. ४५ मनाची मैत्री धन्य आहे. तें विश्वास धरून जन्म-मरणांचा प्राण घेतें आणि जीवाला अजरामर करितें. ४६ मनाशीं अशी मैत्री केली असतां मन अत्यंत उपकार करितें, तें जीवाला आपल्या हातीं धरून स्वानंदसागरांत बुडी मारितें. ४७ तेथें मनाचा मनपणा नाहींसा होतो. जीवाचा जीवपणा विरून जातो. बंध-मोक्षांची धांव संपते आणि संसारभय समूळ ओसरून जातें. ४८ मनाचें मित्रत्व अशा प्रकारचें आहे. तें स्वतःच आपल्या कुलाचा संहार करितें. आपणहि मित्रावर उपकार करण्यांतच मरण पावतें. ४९ असें तें मन मैत्रींत लबाडी करणारें नाहीं. अशा प्रकारचें मैत्री करण्यास योग्य असलेलें मन सतत जवळ असतां मूर्खलोक त्याला टाकून सामान्य मनुष्याशीं मैत्री करितात. ७५० एक तर वैर करून मनाला ठार मारावें किंवा मित्रत्वानें त्याला अनुकूल करून घ्यावें. हीं दोन्हीं जर संभवत नसलीं तर मनाची उपेक्षा करावी. ५१ मन जें म्हणेल तें केव्हांहि करूं नये. मनाचे लाड करूं नयेत. मनाला जीवाभावानें मुळींच स्पर्श करूं नये. ५२ मन ज्याला 'सुख' म्हणेल, तें अवश्य टाकावें. मन ज्याला 'दुःख' म्हणेल तेंहि पूर्णपणें सोडावें. ५३ असा जो मनाविषयीं उदासीन होतो तो अमनस्क म्ह० मनाला ताब्यांत ठेवणारा होय. त्याच्याच ठिकाणीं अपूर्व शान्ति वास करिते. ५४ पण जो मनाला याप्रमाणें शत्रु-मित्र-उदासीन करून वश करीत नाहीं आणि जो देहाभिमान धरितो त्याचे संसारांतील फेरे चुकत नाहींत. ७५५.

देहं मनोमात्रमिमं गृहीत्वा ममाहमित्यन्धधियो मनुष्याः
एषोऽमहन्योऽयमिति भ्रमेण दुरन्तपारे तमसि भ्रमन्ति ॥ ५० ॥

आत्मा विदेही चिद्घन । तेथ मी देही हें मानी मन । त्या देहासवें मी माझेपण । जन्ममरण सुखदुःखें ॥ ५६ ॥ आत्मा नित्यमुक्त विदेही । तो मनाची एकात्मता पाही । विदेही तो म्हणवी देही । शेखीं देहाच्या ठायीं आत्मत्व मानी ॥ ५७ ॥ मी देह हें मानी मन । तेणें दृढ होय देहाभिमान । तेव्हां देहचि होय आपण । मी माझेपण ते ठायीं ॥ ५८ ॥ मी सच्चिदानंद परिपूर्ण । हें आपलें विसरे आपण । मी वैश्य शुद्र क्षत्रिय ब्राह्मण । मूर्ख सज्ञान मी एक ॥ ५९ ॥ मी रोडका बोडका कुब्ज काण । मी धाटा मोटा विचक्षण । हे नाथिले घेऊनि देहगुण । माणुसपण स्वयें मिरवी ॥ ७६० ॥ स्वप्नामाजीं संन्यासी । आपणा देखे अंत्यजवंशीं । तो आतळों मी ब्राह्मणासी । जीवास तैसी दशा झाली ॥ ६१ ॥ स्वयें परमात्मा भेदशून्य । तेथ भी माझे स्त्री पुत्र धन । स्वजन दुर्जन उदासीन । त्रिविध भेद पूर्ण सत्यत्वें मानी ॥ ६२ ॥ ऐसी देहात्मभावसिद्धी । सत्य मानितां भेदविधी । जीवाची निजात्मबुद्धी । झाली त्रिशुद्धी आंधळी ॥ ६३ ॥ जैसा स्वप्नींचा मिथ्या वेव्हार । तैसा मनःकल्पित संसार । तो मानितांचि साचार । देहअहंकार दृढ झाला ॥ ६४ ॥ दृढ होतां देहाभिमान । पुढतीं जन्म पुढतीं मरण । भवचक्रीं परिभ्रमण । निजभ्रमें जाण जीवासी ॥ ६५ ॥ जेवीं केवळ अग्नीप्रती । घणघाय कदा न लागती । तेचि लोहाचिया संगतीं । घण वरी घेत सुबद्ध ॥ ६६॥ तेवीं नित्यमुक्त परिपूर्ण । धरितां देहाभिमान । अंगीं लागलें जीवपण । जन्ममरण तेणें सोशी ॥ ६७ ॥ जेवीं डोळे बांधोनि व्यापारू । भंवे

—आणि त्यानंतर अशाप्रकारें ते संसारांत भ्रमण करितात असें भिक्षु सांगतो—

मनोमात्रं इमं देहं मम अहं इति गृहीत्वा अंधधियः मनुष्याः एषः अहं अयं अन्यः इति **भ्रमेण** दुरन्तपारे **भ्रमन्ति**–केवळ मनानें परिकल्पिलेल्या या देहाला अहं असें मानून व पुत्रादिकांच्या देहाला 'हा माझा' असें समजून ज्यांची बुद्धि विवेकशून्य झाली आहे. अशीं मनुष्यें 'हा मी व हा 'अन्य अशा भ्रमानें' ज्याचा अंत लागत नाहीं अशा संसारांत भ्रमण करितात. ५०.

आत्मा ज्ञानरूप विदेही असतां मन 'मी देही' असें समजतें आणि त्या देहाबरोबर 'मी-माझेंपण' उत्पन्न होऊन जन्म-मरण, सुख-दुःख भोगितें. ५६ आत्मा नित्यमुक्त, विदेही आहे. पण तो मनाशीं एकरूप होऊन, विदेही असून स्वतःला देही म्हणवितो. शेवटीं देहावर स्वत्व ठेवितो. ५७ मन 'मी देह' असें मानितें, त्यामुळें त्याचा देहाभिमान दृढ होतो व त्यावर 'मी, माझें' हा अभिमान ठेवून तें मन स्वतःच देह बनतें. ५८ 'मी परिपूर्ण सच्चिदानंद आहें' हें तें विसरतें आणि मी वैश्य, मी शूद्र, मी क्षत्रिय, मी ब्राह्मण, मी मूर्ख, मी ज्ञानी असा व्यर्थ अभिमान धरितें. ५९ मी रोडावलेला, मुंडन केलेला, कुबडा, काणा, धीट, चतुर, इत्यादि स्वतःच्या ठिकाणीं नसलेले देहाचे गुण आपल्यावर ओढून घेऊन तें मनुष्यपणानें मिरवीत असतें. ७६० एखादा संन्याशी स्वप्नांत स्वतःला अंत्यज समजून ब्राह्मणाला शिवत नाहीं. तशी मनामुळें जिवाची स्थिति झाली आहे. ६१ तो स्वतः भेदरहित परमात्मा असतां 'मी, माझें, व स्त्री, पुत्र, धन, स्वजन, दुर्जन, उदासीन इत्यादि तीन प्रकारचे भेद पूर्णपणें खरे मानितो. ६२ अशा प्रकारें देहात्मबुद्धि झाली म्हणजे, सगळे भेद खरेच भासतात आणि जिवाची आत्मबुद्धि आंधळी बनते. ६३ स्वप्नांतलि सगळा व्यवहार जसा मिथ्या, तसा हा मनानें कल्पिलेला संसारहि मिथ्याच आहे; पण त्याला सत्य मानितांच देहाभिमान दृढ होतो. ६४ एकदां देहाभिमान दृढ झाला म्हणजे पुनः जन्म, पुनः मरण हे भवचक्राचे फेरे आपल्याच भ्रमामुळें जीवाच्या मागें लागतात. ६५ शुद्ध अग्नीवर कधीं घणाचे घाव बसत नाहींत, पण लोखंडाच्या संगतीनें अग्नीला ते मुकाट्यानें जसे सोसावे लागलात, ६६ त्याचप्रमाणें नित्ययुक्त परिपूर्ण आत्म्याला केवल देहाभिमानामुळें जीवपणा प्राप्त होतो आणि मग त्या जीवाला जन्म मरण सहन करावें लागतें. ६७ तेल्याच्या घाण्याचा बैल डोळे बांधल्यामुळें घाण्याच्या भोंवतीं फिरून जसा आंधळ्यासारखा

तेलियाचा ढोरू । तेवीं अहंकारें अंध नरू । परिभ्रमे थोरू भवचक्रीं ॥ ६८ ॥ तेथ सोशितां जन्ममरण । अतिदुःखी होय आपण । तरी न सांडी देहाभिमान । अंधतमीं जाण तो घाली ॥ ६९ ॥ ज्याचे दुःखें न पविजे पार । जो तरवेना अतिदुस्तर । जो भोग भोगवी अघोर । तो संसार मनोजन्य ॥ ७७० ॥ मनचि सुखदुःखांसी कारण । हें आठवे श्लोकीं निरूपण । भिक्षु बोलोनि आपण । जनादि दुःखकारण मिथ्यात्वें दावी ॥ ७१ ॥

जनस्तु हेतुः सुखदुःखयोश्चेत् किमात्मनश्चात्र हि भौमयोस्तत् ।
जिह्वां क्वचित्संदशति स्वदद्भिस्तद्वेदनायां कतमाय कुप्येत् ॥ ५१ ॥

जननी जठरीं ज्यासी जनन । त्या नांव बोलिजेति जन । तें सुखदुःखांसी कारण । सर्वथा जाण मज नव्हेचि ॥ ७२ ॥ जन जनासी दे दुःखबाधू । तेथ आत्म्यासी काय संबंधू । आत्मा देहातीत शुद्धू । सुखदुःखबाधू त्या न लगे ॥ ७३ ॥ देहें देहासी होईल दुःख । देहो तितुका पांचभौतिक । त्यासी परस्परें असे ऐक्य । सर्वथा सुखदुःख घडेना ॥ ७४ ॥ जळामाजीं जळ सूतां । जेवीं जळासी नव्हे व्यथा । कां दीपू दीपें एकवटतां । दीपासी सर्वथा दुःख न बाधी ॥ ७५ ॥ तेवीं पार्थिवें पार्थिवासी । सुखदुःखबाधा न घडे त्यासी । आत्मा नातळे सुखदुःखांसी । तो देहासी स्पर्शेना ॥ ७६ ॥ म्हणाल जीव जो देहाचा अभिमानी । सुखदुःखें होती त्यालागोनी । दुख-भोक्ता दुजेपणीं । पाहतां कोणी दिसेना ॥ ७७ ॥

व्यापार करीत असतो, ६८ तसा पुरुष अहंकारानें अंध होऊन भवचक्रांत सारखे फेरे करीत असतो. या संसारांत जन्म-मरणांचे क्लेश सोशितेवेळीं तो अत्यंत दुःखी होतो. पण देहाभिमान सोडित नाहीं व शेवटीं घोर नरकांत पडतो. ६९ ज्याच्या दुःखाचा अंत लागत नाहीं, जो तरून जाण्यास अत्यंत दुस्तर आहे, जो भयंकर भोग भोगवितो तो संसार मनःकल्पितच आहे. ७७० मनच सुःख-दुखाचें कारण आहे. यांचें सविस्तर निरूपण भिक्षूनें आठव्या श्लोकांत केलें आहे. आतां लोक, वगैरेहि दुःखाचें कारण नव्हेत, असें तो सांगत आहे. ७७१.

—याप्रमाणें ' मनालाच दुःखकारणत्व आहे ' असें उपपादन करून आतां जनादि सहा जणांचें अकारणत्व पुढील सहा श्लोकांनीं सविस्तर सांगतात—

जनः तु सुखदुःखयोः हेतुः चेत् अत्र आत्मनः किं—लोक जर सुख व दुःख यांचें कारण असतील तर यापक्षींहि आत्म्याला काय आहे ! त्याला सुख-दुःखांचें कर्तृत्व नाहीं व कर्मत्वहि नाहीं. कारण, भौमयोः तत्—विकाररूप दोन देहांनाच तें आहे. आत्म्याला नाहीं. [अमूर्त व अक्रिय आत्म्याच्या ठिकाणीं कोणत्याहि क्रियेचें कर्तृत्व किंवा कर्मत्व संभवत नाहीं. तथापि दुःखाचें आत्म्यामध्येंच पर्यवसान होतें, असें जरी म्हटलें तरी दोन्ही देहांमध्यें परमात्म्याचें एकत्व असल्यामुळें पीडा देणारा देह पीडिलेल्या देहाच्या कोपाचा विषय होत नाहीं, असें दृष्टान्तपूर्वक भिक्षु सांगतो—] क्वचित् स्वदद्भिः जिव्हां संदशति—एखादा पुरुष कांहीं खात असतांना आपल्या दांतांनीं जीभ चावतो तद्वेदनायां कतमाय कुप्येत्—तेव्हां तिला वेदना झाली असतां कोणावर रागवावें ! ५१.

लोक जननीच्या उदरांत जन्म घेतात, म्हणून त्यांस ' जन ' असें म्हणतात. ते जन माझ्या सुख-दुःखाचें सर्वथा कारण नव्हेत. ७२ मनुष्य मनुष्यालाच पीडा देतो; पण तेथें आत्म्याचा काय संबंध ! आत्मा देहाहून भिन्न व शुद्ध आहे. त्याला सुख-दुःखांची बाधा केव्हांहि होत नाहीं. ७३ देहानें देहाला दुःख होईल म्हणावें तर जेवढें शरीर तेवढें पांच भूतांचें कार्य आहे. तेव्हां त्यांचें परस्पर ऐक्य असतां त्यांस एकमेकांपासून सुख-दुःख कसें होणार ! ७४ पाण्यांतच पाणी ओतिलें किंवा एक दिवा प्रकाशत असतां तेथें दुसरा दिवा आणिला तर त्यांच्या स्वाभाविक ऐक्यानें पाण्याला किंवा दिव्याला कांहीं दुःख होत नाहीं. ७५ त्याचप्रमाणें पार्थिव वस्तूपासून जड वस्तुला सुख-दुःखाची बाधा होत नाहीं आणि आत्मा तर देह व सुख-दुःख यांस स्पर्शहि करीत नाहीं. ७६ ' देहाभिमानी जो जीव त्याला सुख-दुःख होतें. त्यावांचून दुसरा कोणी दुःख भोगणारा दिसत नाहीं, ' असें जर

आपुली जिव्हा आपुले दांतीं । रगडिली होय अवचितीं । तया कोपाची अतिप्राप्ती । कोणाप्रति करावी ॥ ७८ ॥ तेथील कोपाच्या कडाडीं । दांत पाडी कीं जीभ तोडी । तैसी जगीं एकात्मता धडफुडी । कोप यावया सवडी असेना ॥ ७९ ॥ जो पुढिलाचे ढक्यांनीं पडे । तो त्यावरी कोपें वावडे । स्वयें निसरोनि गडबडे । तो लाजिला मागेंपुढें न कोपतां निघे ॥ ७८० ॥ तेवीं मीचि भूतें मीचि भोक्ता । माझ्या दुःखाचा मी दाता । जगीं मीच मी एकात्मता । कोणावरि आतां कोपावें ॥ ८१ ॥ माझ्या सुखदुःखांसी कारण । यापरी नव्हती जन । म्हणाल जरी देवतागण । तेंही प्रमाण घडेना ॥ ८२ ॥

दुःखस्य हेतुर्यदि देवतास्तु किमात्मनस्तत्र विकारयोस्तत् ।
यदङ्गमङ्गेन निहन्यते क्वचित्क्रुध्येत कस्मै पुरुष स्वदेहे ॥ ५२ ॥

आतां दुसरें कारण मतीं । देवांपासोनि दुःखप्राप्ती । देवांची देहामाजीं वस्ती । आत्मा निजस्थितीं विदेही ॥ ८३ ॥ देहींच्या इंद्रियविकारीं । देव झाले अधिष्ठात्री । आत्मा अखंड अविकारी । सुखदुःखांमाझारीं अलिप्त ॥ ८४ ॥ भूमि सहजें निर्विकार । तिची भिंती तीवरी सविकार । तेवीं वस्तु नित्य निर्विकार । तेथ भासती सविकार अधिष्ठात्री देव ॥ ८५ ॥ भिंती पडल्या भूमीवरी । ते मेळवी आपण्यामाझारीं । तेवीं निर्गुणनिर्विकारीं । इंद्रियें अधिष्ठात्रीं येती ऐक्या ॥ ८६ ॥ स्वदेहीं परदेहीं जाण । इंद्रियें अधिष्ठात्रीं समान । इंद्रियांचें सुखदुःख दारुण । आपुलें आपण भोगिती देव ॥ ८७ ॥ हातें हाणतां तोंडावरी । तेथ इंद्र अग्नि अधिष्ठात्री । तेव्हां इंद्रचि अग्नीतें मारी । आत्मा अविकारी दुःखातीत

म्हणाल तर तें बरोबर नाहीं. ७७ कारण आपलीच जीभ जर आपल्याच दातांनीं चावली तर त्याबद्दल कोणावर संतापावें ! ७८ त्या क्रोधाच्या भरांत त्यानें जीभ तोडावी कीं दांत पाडावे ! त्याप्रमाणें सगळें ऐक्य असतां क्रोधाला अवसरच रहात नाहीं. ७९ दुसऱ्याचा धक्का लागून जो पडतो तो त्याच्यावर संतापतो; पण जो स्वतःच पाय निसरून पडतो, तो मागें-पुढें पहातो आणि न कोपतां लाजून निघून जातो. ७८० त्याचप्रमाणें सर्व भूतें मीच आणि भोक्ताहि मीच; माझ्या दुःखाचा दाताहि मीच; जगांत ऐक्यरूपानें मीच भरलेला असतां मीच कोणावर संतापावें ! ८१ याप्रमाणें हे लोक माझ्या सुख-दुःखांचें कारण नव्हेत, देवतांचा समुदाय दुःखाचें कारण असेल असें जर म्हणाल तर त्यालाहि प्रमाण नाही. ७८२.

दुःखस्य हेतुः यदि देवताः तु तत्र आत्मनः किं विकारयोः तत्—बरें देवता दुःखाचें कारण आहेत म्हणून म्हणावें तर त्यापक्षींहि आत्म्याला काय आहे ! (कारण विकार पावणाऱ्या दोन देवतांतील एकाच्या हातानें दुसऱ्याच्या मुखावर प्रहार केला किंवा एकाच्या दातांनीं दुसऱ्याच्या हाताला दंश केला, तर त्या त्या अवयवाचे अभिमानी जें अग्नि, इंद्र इत्यादि देव त्यांचेंच तें दुःख आहे. अविक्रिय व अनहंकार अशा आत्म्याला त्याचा स्पर्शहि होत नाहीं. देहांमध्यें देवता सर्व एकच असल्यामुळें कोपाचा विषयच नाहीं असें स्वदेहाच्या दृष्टान्तानें सांगतात) स्वदेहे यत् अङ्गंअङ्गेन क्वचित् निहन्यते पुरुषः कस्मै क्रुध्येत—जेव्हां आपल्याच देहांतील एका अंगाला दुसरें अंग एखादे वेळीं ताडन करितें तेव्हां पुरुषानें कोणावर रागवावें. ! ५२.

आतां दुसऱ्या कित्येकांच्या मतानें देवतांपासून दुःखप्राप्ति होते, परंतु तेंहि खरें नव्हे. कारण देवता शरीरांतच रहातात. आत्मा आत्मस्वरूपांत असून विदेही आहे. ८३ देहांतील इंद्रियांच्या विकारांनीं देवच दुःख देतात. आत्मा अखंड अविकारी असल्यामुळें सुख-दुःखांपासून अलिप्त असतो. ८४ भूमि स्वभावतःच निर्विकार आहे; परंतु तिच्यावर तिच्याच मातीची भिंत बांधली कीं, ती सविकार होते. त्याप्रमाणें आत्मवस्तु नित्य निर्विकार असून त्यांतील अधिष्ठात्री देवता सविकार भासते. ८५ भिंती पडल्या म्हणजे त्या जशा जमिनीशीं एकरूप होतात, त्याप्रमाणें निर्गुण व निर्विकार आत्म्याशींहि अधिष्ठात्री देवता एकरूप होतात. ८६ स्वतःच्या देहांतील व परक्याच्या देहांतील अधिष्ठात्री देवता एकच आहे. तेव्हां इंद्रियांचें दारुण सुख-दुःख देवता आपलें आपणच भोगितात. ८७ हातानें मुखावर प्रहार केला तर तेथें हाताची अधिष्ठात्री देवता इंद्र व मुखाची देवता अग्नि आहे. तेव्हां इंद्रानें अग्नीला

॥ ८८ ॥ हो कां मुखें डसल्या हातासी । अग्नीनें घाय केलें इंद्रासी । आत्मा अलिप्त इंद्रियदेवांसी । सुखदुःख त्यासी स्पर्शेना ॥ ८९ ॥ परमुखें स्वमुखावरी थुंकिजे । दोहीं मुखीं अग्निनें नांदिजे । तेथ कोणे कोणावरी कोपिजे । आत्मस्वरूपीं दुजे असेना ॥ ७९० ॥ थुंक आणि जें कां मूत । देहीं उपजे देहाचें आपत्य । तें देहींचें देहावरी लोळत । कोपे तेथ कोण कोणा ॥ ९१ ॥ स्वमुखें परामुखा चुंबन दीजे । तेथ अग्नीनें अग्नीसी चुंबिजे । तेणें सुखें कोण फुंजे । आत्मत्वीं दुजें असेना ॥ ९२ ॥ स्वदेहें परदेहां आलिंगन । उभयस्पर्शीं वायूचि जाण । तेणें सुखें सुखावे कोण । दुजेपण असेना ॥ ९३ ॥ यापरी देवतागण । नव्हे सुखदुःखांसी कारण । आत्म्याचे ठायीं दैवतें जाण । हारपती पूर्ण अभेदत्वें ॥ ९४ ॥ देवीं देहो पीडितां निःशेख । देहाभिमान्या होईल दुःख । हें मानिती ते अतिमूर्ख । तेंही देख घडेना ॥ ९५ ॥ पुर म्हणिजे देहो देख । ते पुरी पुरनिवासक । तो सकळ देहीं पुरुष एक । तेथ कोणाचें दुःख कोण मानी ॥ ९६ ॥ जेवीं संभ्रमें आवेशवेगीं ॥ निजकर हाणतां निजांगीं । तेथील व्यथेचा भागी । कोपावयालागीं आप आपण्या ॥ ९७ ॥ देखतां आपलें एकपण । कोणाची व्यथा मानी कोण । कोण कोणावरी कोपे जाण । आपण्या आपण एकला ॥ ९८ ॥ तेवीं विश्वात्मा मीचि एक । मीचि दैवतें मीचि लोक । तेथ कोण कोणा दुःखदायक । म्यां कोणावरी देख कोपावें ॥ ९९ ॥ यापरी स्वयें विचारितां । देवांपासाव सुखदुःखता । समूळ न घडे सर्वथा । दैविकी व्यथा घडेना ॥ ८०० ॥ आत्मा सुखदुःखांसी कारण । मूळीं मजचि हें अप्रमाण । आत्म्याच्या ठायीं कार्यकारण । सुखदुःख जाण असेना ॥ १ ॥

मारिलें असें होईल. कारण निर्विकार आत्मा दुःखातीत आहे. ८८ किंवा हातांनीं हात चावला म्हणजे अग्नीनें इंद्रावर घाव मारला असें होईल. आत्मा या इंद्रियदेवतांहून अलिप्त असल्यामुळें त्याला सुख-दुःख स्पर्शहि करीत नाहीं ८९ किंवा एखादा मनुष्य आपल्या तोंडावर थुंकला तर दोन्ही मुखांची देवता अग्निच आहे. तेव्हां कोणी कोणावर कोपावें ! त्यांच्या आत्मस्वरूपांत भेद नाहीं. ७९० थुंकी व दुसरा अमंगल पदार्थ हीं दोन्ही देहापासूनच उत्पन्न झालेलीं. तेव्हां तीं देहावरच लोळतात, तेथें कोण कोणावर रागावणार ! ९१ आपल्या मुखानें दुसऱ्याच्या मुखाला चुंबन दिलें म्हणजे अग्नीनेंच अग्नीचें चुंबन घेण्यासारखें आहे. तेथें कोण कोणाच्या सुखानें फुगणार ! कारण त्यांच्या आत्मस्वरूपांत दुजेपणा नाहीं. ९२ आपल्या देहानें दुसऱ्या देहाला आलिंगन दिलें म्हणजे वायूनेंच वायूला स्पर्श केला. त्या सुखानें कोण कोणाला सुखी करणार ! तेथें दुजेपणा रहातच नाहीं. ९३ याप्रमाणें देवतांचा समुदाय सुख-दुःखांचें कारण नाहीं. सगळीं दैवतें अभेदपणानें आत्म्यामध्यें लीन होतात. ९४ देवतांनीं देहाला पूर्णपणें पीडा दिली असतां देहाभिमान्याला दुःख होईल असें जे समजतात, ते महामूर्ख होत. कारण तसें कधींच घडत नाहीं. ९५ पुर म्हणजे देह, त्या पुरांत रहाणारा तो पुरुष. असा पुरुष सगळ्या देहांत एकच आहे. तेव्हां कोणीं कोणाचें दुःख मानावें ! ९६ आपणच आपलाच हात मोठ्या आवेशानें आपल्या अंगावर मारिला तर त्या दुःखाचे भागीदार आपणच व त्याबद्दल स्वतःवर रागावणारहि आपणच. ९७ याप्रमाणें आपलें ऐक्य पाहिल्यावर कोण कोणाची व्यथा मानणार आणि कोण कोणावर संतापणार ! कारण तो स्वतः सर्वत्र आपल्यालाच पहात असतो. ९८ त्याप्रमाणें सगळा विश्वात्मा मीच आहे. तेथें कोण कोणाला दुःख देणार ! तेव्हां मी कोणावर रागवावें ! ९९ अशा प्रकारें विचार केला असतां सुख-दुःखाची व्यथा देवतांपासून होत नाहीं. ती दैविक व्यथा नाहीं, अशी खात्री होते. ८०० आतां आत्मा सुख-दुःखांचें कारण आहे, असें म्हणावें तर तें मला मुळींच पटत नाहीं. कारण आत्म्याचे ठिकाणीं कार्य-कारण, सुख-दुःख हें कांहींच संभवत नाहीं. ८०१.

आत्मा यदि स्यात्सुखदुःखहेतुः किमन्यतस्तत्र निजस्वभावः ।
न ह्यात्मनोऽन्यद्यदि तन्मृषा स्यात्क्रुध्येत कस्मान्न सुखं न दुःखम् ॥ ५३ ॥

आत्मा केवळ एकला एक । तेथ कैंचें सुख कैंचें दुःख । आत्मा सुखदुःखदायक । म्हणती ते मूर्ख अविवेकी ॥ २ ॥ जेवीं विघुरलें घृत जाण । त्यासी नसे आकार ना वर्ण । तेंचि सहजें थिजोनि जाण । दिसे शुभ्रवर्ण कणिकारूपें ॥ ३ ॥ त्या घृतकणिका मिळतां देख । नाहीं परस्परें सुखदुःख । तेवीं निजात्मा एकला एक । तोचि अनेक स्वरूपें ॥ ४ ॥ जळीं जळाच्या जळलहरीं । आदळतांही परस्परीं । सुखदुःख नुमटे त्यांमाझारीं । तेवीं चराचरीं परमात्मा ॥ ५ ॥ परमात्मा एकला एक । एकपणेंचि तो अनेक । तेथ विजातीय नाहीं देख । मा सुखदुःख कोणाचें ॥ ६ ॥ आत्मा सुखरूप अवघा एक । तेथ आभासे जें अनेक । तें मायामय काल्पनिक । स्वप्नप्राय देख मिथ्यात्वें ॥ ७ ॥ मृगजळीं पाहतां दिसे जळ । परी तें कोरडें देख केवळ । तेवीं दिसे जें जगड्वाळ । तें मिथ्या समूळ मायिक ॥ ८ ॥ जेथ मिथ्या द्वैत मायिक । तेथ परमात्मा एकला एक । तेव्हांचि हारपलें सुखदुःख । कोपावया निःशेख ठावो नाहीं ॥ ९ ॥ जेथ निजात्मता एकपण । तेथ सुखदुःखें नाहीं जाण । कोणावरी कोपे कोण । आपल्या आपण एकला ॥ ८१० ॥ जेथ आत्म्याचा निजानुभावो । तेथ द्वैताचा अभावो । सुखदुःखें झाली वावो । कोपासी ठावो असेना ॥ ११ ॥ हे निजात्मता नेणोनि देख । सत्य मानिती जे सुखदुःख । ते होत कां वेदशास्त्रज्ञ लोक । तयां क्रोध देख विभांडी ॥ १२ ॥ ज्यासी सर्व भूतीं निजात्मता । तेथ

यदि आत्मा सुख-दुःखहेतुः स्यात् तत्र अन्यतः किं—आत्म्याचा सुख-दुःखाद्याकारानें परिणाम होतो, यास्तव तोच जर त्याचा हेतु असेल तर त्यापक्षीं दुसऱ्यापासून काय होणार किं ज्याच्यावर रागवावें ! (अर्थात् दुसऱ्यापासून सुख-दुःखादि कांहीं होणें शक्य नाहीं.) निजस्वभावः—कारण तो आत्म्याचाच स्वभाव आहे. ('अहोपण, आत्म्याचा सुख-दुःखाद्याकार परिणाम अन्य निमित्तानें होतो यास्तव तें अन्य निमित्त हाच कोपाचा विषय आहे असें जर म्हणाल तर सांगतों— आत्मनः अन्यत् न हि—आत्म्याहून भिन्न वस्तु नाहींच, यदि तत् स्यात मृषा एव—आत्मभिन्न वस्तु आहे असा प्रत्यय येतो म्हणून म्हणाल तर ती मिथ्याच आहे, कस्मात् क्रुध्येत—तेव्हां कोणत्या कारणानें क्रोध करावा ! कारण, न सुखं न दुःखं—सुख नाहीं दुःख नाहीं (व त्याचें निमित्तहि नाहीं, असा याचा भावार्थ.) ५३.

आत्मा केवल एकच एक आहे. तेथें सुख-दुःख कोठचें ! आत्मा सुख-दुःख देणारा आहे, असें जे म्हणतात ते अविवेकी मूर्ख होत. २ वितळलेल्या तुपाला जसा आकार किंवा रंग नसतो, पण तेंच तूप सहज थिजलें म्हणजे शुभ्र वर्णाचें व कण्यांच्या आकाराचें बनतें, ३ ते तुपाचे कण एकमेकांशीं मिळाले तरी त्यांस कांहीं परस्परांपासून सुख-दुःख होत नाहीं, त्याप्रमाणें परमात्मा एकच असून तो अनेक स्वरूपाचा भासतो. ४ समुद्रांत पाण्याच्या लाटा पाण्यावरच आदळतात; परंतु त्यापासून त्यांत जसें सुख-दुःख उद्भवत नाहीं, त्याप्रमाणेंच चराचर जगतांत हा परमात्मा असतो. ५ परमात्मा एकच असून तो एकपणानेंच अनेक होतो. त्याच्यांत भिन्नपणाच नाहीं, मग सुख-दुःख कसें असेल ! सुखस्वरूप आत्मा सगळा एकच आहे. त्यांत जे अनेक आभास होतात, ते मायामय काल्पनिक आहेत. स्वप्नाप्रमाणें मिथ्या आहेत. ७ मृगजळांत पाणी दिसतें, पण खरोखर ती कोरडी ठणठणीत माळ जमीन असते. त्याप्रमाणें हा सगळा जगाचा पसारा दिसतो; पण तो समूळ मिथ्या, निव्वळ मायिक आहे. ८ हें सर्व मिथ्या द्वैत मायिक आहे. केवल परमात्मा तेवढा एक व सत्य आहे. तेव्हां सुख-दुःख अर्थातच नाहींसें होतें. मग रागावण्यास जागाच उरत नाहीं. ९ जेथें एक आत्माच परिपूर्ण भरलेला आहे, तेथें सुख-दुःख नाहीं, हें निश्चित जाणावें. सगळें एकत्वच असल्यावर तेथें कोण रागावणार ! ८१० आत्म्याचाच आत्म्याला अनुभव आल्यावर मग द्वैताचा अभाव होतो व सुख-दुःखाला जागाच रहात नाहीं. ११ हें आत्म्याचें एकत्व न जाणतां जे लोक सुख-दुःखाला सत्य मानितात, ते वेद-शास्त्र जाणणारे मोठे विद्वान् जरी असले, तरी त्यांना क्रोध भंडावून सोडितो. १२ ज्याला सर्व प्राणिमात्रांत एकात्मता दिसते, तेथें कोण कोणाला दुःख देणार आणि कोण कोणावर

कोण कोणा दुःखदाता । कोण कोणावरी कोपता । निजात्मता एकली ॥ १३ ॥ आत्मा सुखदुःखांचा दाता । यापरी नव्हे गा तत्त्वतां । आपण्या आपण व्यथा । मूर्खही सर्वथा न देती ॥ १४ ॥ एथिलेनि चौथे मतें । ग्रह मानावे दुःखदाते । तेंही न घडे गा येथें । ऐक निश्चितें सांगेन ॥ १५ ॥

ग्रहा निमित्तं सुखदुःखयोश्चेत् किमात्मनोऽजस्य जनस्य ते वै ।
ग्रहैर्ग्रहस्यैव वदन्ति पीडां क्रुध्येत कस्मै पुरुषस्ततोऽन्यः ॥ ५४ ॥

जननीजठरीं जन्मे जाण । देहाचें जें नांव म्हणती जन । ते जन्मकाळीं जें होय लग्न । त्या जन्मापासून पूर्ण ग्रहगति लागे ॥ १६ ॥ तेथ द्वादशाष्टमजन्मस्थ । शुभाशुभ ग्रह जे येत । ते सुख-दुःखातें देत । आत्मा अलिप्त ग्रहगतीं ॥ १७ ॥ मूळीं आत्म्यासी जन्म नाहीं । मा ग्रह लागती कवणे ठायीं जेथ शेतचि पेरिलें नाहीं । तेथ उंदिरीं काय करडावें ॥ १८ ॥ मुख्यत्वें घर केलें नाहीं । तेथील माडी जळेल कायी । आत्म्यासी तंव जन्मचि नाहीं । मा ग्रहगती कैं लागेल ॥ १९ ॥ ग्रहांची ग्रहगती देहापासीं । आत्मा अलिप्त देहभावासी । जेवीं काउळा न चढे कैलासीं । तेवीं ग्रह आत्म्यासी न लागती ॥ ८२० ॥ जेवीं कां अग्नीतें न चाखे माशी । घारी झडपिना चंद्रासी । तेवीं लागावया आत्म्यासी । सामर्थ्य ग्रहांसी असेना ॥ २१ ॥ आत्मा सर्वांचा अवघा एक । तैं ग्रहांचा आत्मा तोचि देख । तया निजात्म्यासी देता दुःख । ग्रह पीडी आवश्यक आपआपण्या ॥ २२ ॥ देह जड मूढ अज्ञान । तें सखदुःखांचें नेणें ज्ञान । आत्म्यासी सुखदुःख देतां जाण । तैं आपण्या आपण पीडिती ग्रह ॥ २३ ॥ आपणचि आपणाप्रती ।

संतापणार ! सर्वत्र एकच आत्मत्व भरलेलें असतें, १३ याप्रमाणें आत्मा केव्हांहि सुखःदुःख देणारा नाहीं. कारण एखादा मूर्खहि स्वतःच स्वतःला कधीं पीडा देत नाहीं. १४ आतां यांतील चवथ्या मताप्रमाणें ग्रहच दुःख देणारे आहेत, असें मानावें तर तेंहि संभवत नाहीं. कसें तें ऐका. ८१५.

सुख-दुःखयोः ग्रहा निमित्तं चेत् अजस्य आत्मनः किं–सुख व दुःख यांचें निमित्त ग्रह जरी असलें तरी त्यापासून अज आत्म्याला काय होणार ! ते जनस्य वै–कारण ते देहाच्या जन्म लग्नाच्या अपेक्षेनें बारा, आठ इत्यादि राशींमध्यें स्थित होऊन सुख-दुःखांचें निमित्त होतात. शिवाय, ग्रहस्य ग्रहैः एव पीडां वदन्ति–दैवज्ञ अंतरिक्षस्थ ग्रहांच्या योगानें तेथेंच असलेल्या ग्रहांच्याच पादार्धादि व दृष्टयादि भेदांनीं पीडा सांगतात. (ग्रहकोणादिकांमध्यें स्थित असलेल्या, त्यामुळें त्यांच्या दृष्टीचा विषय न होणाऱ्या ग्रहांची पीडा दैवज्ञ सांगत नाहींत. अर्थात् ग्रहांमध्येंच असलेली पीडा त्यांच्या लग्नांत उत्पन्न झालेल्या देहामध्यें त्यांच्या अभिमानामुळें होते.) ततः अन्यः पुरुषः कस्मै क्रुध्येत–तेव्हां त्या ग्रहाहून किंवा देहाहून भिन्न असलेला पुरुष कोणावर रागवणार ! ५४.

जननीच्या उदरांत जन्म घेणाऱ्या देहाला ‘ जन ’ असें म्हणतात. त्या जन्मकाळीं जें नक्षत्रांचें लग्न असतें, त्यावरून ग्रहांची गति ठरते. १६ त्यांतील बाराव्या व आठव्या स्थानीं जसे शुभअशुभ ग्रह असतात, त्याप्रमाणें सुख-दुःखप्राप्ति होते. परंतु या ग्रहांच्या गतीपासूनहि आत्मा अलिप्तच असतो. १७ आत्म्याला मुळीं जन्मच जर नाहीं, मग त्याला ग्रह कोणत्या काळीं लागणार ! शेतच जर पेरिलें नाहीं तर उंदिरानें काय कुरतुडावें ! १८ घरच जर बांधिलें नाहीं, तर त्याची माडी जळणार कशी ! त्याप्रमाणें आत्म्याला जन्मच जर नाहीं, तर त्याला ग्रह कोणत्या स्थानीं लागणार ! १९ ग्रहांची ग्रहगति सगळी देहापाशींच असते. आत्मा देहधर्मापासून अगदीं अलिप्त असतो. कावळा जसा कैलासावर उडून जात नाहीं, तसा ग्रह आत्म्यापर्यंत पोंचत नाहीं. ८२० माशी जशी अग्नीवर बसत नाहीं, किंवा घार जशी चंद्रावर झडप घालीत नाहीं, त्याप्रमाणें ग्रह आत्म्याला स्पर्श करण्यास समर्थ होत नाहीं. २१ सगळ्यांचा आत्मा एकच आहे. तोच ग्रहांचाहि आत्मा आहे. तेव्हां ग्रह स्वतःच्याच आत्म्याला पीडा देऊं लागले तर आपणच आपल्याला क्लेश देण्यासारखें होणार. २२ देह जड, मूढ, अज्ञ आहे. त्याला सुख-दुःखांचे ज्ञान नाहीं. तेव्हां ग्रह जर आत्म्याला सुख दुःख-देऊं लागले तर ती आपणच आपल्याला पीडा दिल्याप्रमाणें होईल. २३ कोणाच्यानेंहि स्वतःला कधींहि दुःख देववत नाहीं. यावरून ग्रहदशा आत्म्याला कल्पां-

कदा न देखवे दुःखप्राप्ती । यालागीं आत्म्यासी ग्रहगती । जाण कल्पांतीं बाधीना ॥ २४ ॥ ग्रहग्रहांमाजीं वैरस्थिती । ग्रह ग्रहांतें पीडा देती । तेही अर्थांची उपपत्ती । यथानिगुती अवधारा ॥ २५ ॥ जोतिषशास्त्रसंमती । शनि भौम सूर्या वैरप्राप्ती । गुरु शुक्र दोनी वैरी होती । बुधसोमांप्रती महावैर ॥ २६ ॥ तेथ एकाची ते शीघ्र गती । एक ग्रह मंदगामी होती । अतिचार कां वक्रगती । मंडळभेदें येती एकत्र ॥२७॥ वैरी मीनल्या एके राशी । एके चरणीं एकत्रवासी । तैं राहु गिळी सूर्यासी । सूर्य चंद्रासी कुहू करी ॥ २८ ॥ ऐसे ग्रहचि ग्रहांसीं जाण । परस्परें पीडिती आपण । मी आत्मा त्याहूनि भिन्न । सुखदुःख कोण मज त्यांचें ॥ २९ ॥ अलंकार मोडितां खणाण । सोनें मोडेना आपण । तेवीं ग्रह ग्रहांतीं पीडितां जाण । मज आत्म्यासी कोण सुखदुःख ॥ ८३० ॥ रणभूमीं युद्धझोटधरणी । होतां घायवट नव्हे धरणी । तेवीं ग्रहपीडेपासूनी । मी अलिप्तपणीं निजात्मा ॥ ३१ ॥ रजस्वला चालतां भूमीसी । तो विटाळ बाधीना पृथ्वीसी । तेवीं ग्रहीं पीडितां ग्रहांसी । मी सुखदुःखांसी अलिप्त ॥ ३२ ॥ एवं ग्रहांनिमित्त जें कांहीं । सुखदुःख उमटे देहीं । तें मज आत्म्यासी न लगे कंहीं । मग कोणें पाहीं कोणा कोपावें ॥ ३३ ॥ सुखदुःख नुमटे ज्याच्या ठायीं । त्यासी क्रोधचि न ये कंहीं । एवं ग्रहनिमित्त दुःख कांहीं । सर्वथा नाहीं या हेतू ॥ ३४ ॥ सुखदुःखदातें निजकर्म । म्हणतां जनासी पडे भ्रम । आत्मा केवळ निष्कर्म । त्यासी जड कर्म केवीं बाधी ॥ ३५ ॥

> कर्मास्तु हेतु सुखदुःखयोर्वै किमात्मनस्तद्धि जडाजडत्वे ।
> देहस्त्वचित्पुरुषोऽयं सुपर्णः क्रुध्येत कस्मै न हि कर्ममूलम् ॥ ५५ ॥

तीहि बाधत नाहीं, हें उघड होतें. २४ आतां ग्रहांचें परस्पर वैर असतें, त्यामुळें एक ग्रह दुसऱ्या ग्रहाला पीडा देतो, याविषयींची युक्ति सांगतों, ती नीट ऐका. २५ ज्योतिषशास्त्राप्रमाणें शनि, मंगळ व सूर्य यांचें परस्परांशीं वैर असतें. गुरूचें शुक्राशीं वैर असतें. बुध व सोम हे दोघे कट्टे वैरी आहेत. २६ यांतील एक ग्रह अतिशय वेगवान् असतो, तर एक अगदीं मंद गतीनें जातो. कांहीं अतिशय त्वरेनें गमन करितात व कांहीं वक्रगतीनें जातात व मंडळभेदानें ते एकत्र येतात. २७ वैरी ग्रह एका राशींत येऊन एका चरणांत वास करूं लागल्यास राहु सूर्याला ग्रासितो व सूर्य चंद्राला लोपवितो. २८ (आत्मा म्ह० सूर्य-चंद्र एकत्र आले कीं, अमावास्या होते) याप्रमाणें एक ग्रह दुसऱ्या ग्रहाला परस्पर पीडा देत असतो. परंतु मी आत्मा त्या ग्रहांहून भिन्न आहें. तेव्हां मला त्यांचें सुख-दुःख कसलें ! २९ अलंकाराचे कडाकड तुकडे केले तरी त्यानें सोनें कांहीं मोडत नाहीं, त्याप्रमाणें मज आत्म्याला सुख-दुःख होत नाहीं. ८३० रणांगणांत योद्धे एकमेकांच्या झिंज्या पकडतात, पण त्यांच्या झोंबींत पृथ्वी कांहीं घायाळ होत नाहीं; त्याप्रमाणें ग्रहपीडेपासून मी आत्मा अलिप्त असतों. ३१ रजस्वला स्त्री जमिनीवर चालत असतां जमिनीला दोष लागत नाहीं, त्याप्रमाणें ग्रह परस्परांस पीडा देत असले तरी मी आत्मा सुख-दुःखापासून अलिप्तच असतों. ३२ याप्रमाणें ग्रहामुळें देहाला जें कांहीं सुख-दुःख भोगावें लागतें तें आत्म्याला बाधत नाहीं. तेव्हां कोणीं कोणावर कोपावें ! ३४ ज्याला सुख-दुःखांचा स्पर्शच होत नाहीं, त्याला कधीं क्रोधहि येत नाहीं. म्हणून ग्रहापासून सुख-दुःख सर्वथा होत नाहीं. आपलें कर्मच सुख-दुःख देणारें आहे, असा लोकांना भ्रम होतो; परंतु आत्मा निष्कर्म आहे. त्याला जड कर्म कसें बाधणार !

कर्म सुख-दुःखयोः हेतुः अस्तु—कर्म सुख-दुःखांचा हेतु असला तर असो, आत्मनः वै किं—त्याचें आत्म्याला काय ! (कर्मच नाहीं मग त्याला हेतुत्व कोठचें !) हि तत् (एकस्य) जडाजडत्वे सति (स्यात्)—कारण तें कर्म एकालाच जडत्व व अजडत्व असलें तर होणार. (जडत्वामुळें त्याचें विकारित्व संभवतें व अजडत्वामुळें हितानुसंधानपूर्वक प्रवृत्ति संभवते.) देहः तु अचित्—पण देह जड आहे. (त्यामुळें त्याची प्रवृत्ति संभवत नाहीं) अयं पुरुषः सुपर्णः—हा पुरुष शुद्ध ज्ञानस्वरूप आहे, कस्मै क्रुध्येत—तेव्हां कोणावर रागवावें ! हि कर्ममूलं न—कारण सुख-दुःखांचें मूलभूत कर्मच नाहीं ५५.

कर्म जडत्वें अतिबद्ध। आत्मा चिद्रूपें परम शुद्ध। त्यासी कर्माचा कर्मबाध। सर्वथा संबंध धरीना ॥ ३६ ॥ रवीसी अंधारीं लपवे। वणवा तृणामाजीं बांधवे। गोचिडाचोनि मुखलाघवें। जरी लागवे दीपासी ॥ ३७ ॥ चंडवातातें तुष राखे। थिल्लरचिखलें चंद्र माखे। तैं कर्मजन्य सुखदुःखें। आत्मा यथासुखें बद्धता भोगी ॥ ३८ ॥ आत्मा कर्माकर्म संहारी। सुखदुःखांची होळी करी। तो कर्मफळांचा फळाहारी। मूर्ख गव्हारीं मानिजे ॥ ३९ ॥ स्वप्नींची स्वप्नसंतती। जागृतीं कोणा भेटो येती। तरी कर्मांची सुखदुःखप्राप्ती। आत्म्याप्रती बाधक ॥ ८४० ॥ जेवीं अग्नीवरी मुंगी न चले। तेवीं आत्मा न माखे कर्ममळें। आकाश न खोंचे शस्त्रबळें। तेवीं आत्मा कर्मफळें स्पर्शेना ॥ ४१ ॥ कर्म तितुकें आविद्यक। आत्मा विद्याअविद्यातीत चोख। त्यासी कर्माचें सुखदुःख। मानिती मूर्ख देहमोहें ॥ ४२ ॥ कर्म अतिजड आत्मा शुद्ध। कर्म परिच्छिन्न आत्मा अगाध। कर्मठ कर्मठतां नित्यबद्ध। आत्मा चिदानंदस्वरूप ॥ ४३ ॥ कर्म मिथ्याभूत मायिक। आत्मा नित्य अमायिक। कर्मासी ब्रह्म अनोळख। ब्रह्म तेथ देख कर्म नाहीं ॥ ४४ ॥ दोराचे सर्पीं सर्पत्व नाहीं। मा तो डसोनि चढेल कायी। तेवीं स्वरूपीं कर्म मिथ्या पाहीं। ते आत्म्यासी कायी बाधील ॥ ४५ ॥ वांझ राणीचा लाडका नातू। राजबळें जगा दंडितू। तेवीं कर्मांची सुखदुःखमातू। कर्मठांतू दाटुगी ॥ ४६ ॥ एवं कर्मचि मिथ्या एथें। तें केवीं दे सुखदुःखांतें। हें जाणोनियां निश्चितें। कोणें कोणातें कोपावें ॥ ४७ ॥ कर्म सुखदुःखांचें दातें। यापरी न घडे एथें। म्हणाल काळ दे सुखदुःखांतें। तेंही निश्चितें घडेना ॥ ४८ ॥

कर्म जड असल्यामुळें अतिशय बद्ध करणारें आहे. आत्मा ज्ञानस्वरूप असल्यामुळें अत्यंत शुद्ध आहे. त्याला कर्मापासून होणारी बाधा केव्हांहि स्पर्श करीत नाहीं. ३६ सूर्य जर अंधारांत लपून बसेल, वणव्याला गवतानें बांधितां येईल, गोचिड आपल्या मुखानें जर दिव्याला चिकटेल, ३७ कोंडा झंझावातास प्रतिबंध करील, डबक्यांतील चिखलानें चंद्र माखेल, तर कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या सुख-दुःखांनीं आत्मा बद्ध होईल. ३८ आत्मा कर्म-अकर्मांचा संहार करणारा व सुख-दुःखांची होळी करणारा असतांना तो कर्मांचीं सुख-दुःखरूपी फलें भोगितो, हें म्हणणें अज्ञानी मूर्खांनींच खरें मानावें. ३९ स्वप्नांत झालेली संतति जर जागृतींत भेटावयास येईल, तर कर्मांच्या सुख-दुःखांनीं आत्मा बद्ध होईल. ८४० मुंगी जशी अग्नीवर चालत नाहीं, तसा आत्मा कर्मांच्या मलानें लिप्त होत नाहीं. शस्त्राच्या प्रहारानें आकाशाला जसें भोंक पडत नाहीं, त्याप्रमाणें आत्म्याला कर्मफलाचा स्पर्श होत नाहीं. ४२ कारण जेवढें कर्म तेवढें अविद्येपासून उत्पन्न होतें आणि आत्मा विद्या-अविद्या यांच्याहून भिन्न, अगदीं निर्मळ आहे. त्याला कर्मामुळें सुख-दुःख प्राप्त होतें, असें देहाच्या मोहानें मूर्ख झालेले लोक मानितात. ४२ कर्म अतिशय जड आहे, आत्मा शुद्ध आहे; कर्म मर्यादित आहे, आत्मा अगाध आहे; कर्माला कर्मठपणा असल्यामुळें तें नित्य बद्ध आहे आणि आत्मा चिदानंदरूप आहे; ४३ कर्म मिथ्याभूत मायिक आहे, आत्मा नित्य व मायारहित आहे; कर्माला ब्रह्मरूपाची ओळख नाहीं. जेथें शुद्ध ब्रह्म आहे, तेथें कर्म नाहीं. ४४ दोरीवर भासलेल्या मिथ्या सापाच्या अंगीं सापपणाच जर नाहीं, तर तो चावणार कसा! तेव्हां कर्माचें स्वरूपच जर मिथ्या आहे, तर तें आत्म्याला बाधणार कसें! ४५ वांझ राणीच्या लाडक्या नातवानें राजसत्तेनें प्रजेला जसा दंड करावा, त्याप्रमाणें कर्मांच्या सुख-दुःखांची गोष्ट कर्मठांना असह्य होते. ४५ याप्रमाणें कर्मच मिथ्या ठरल्यावर तें सुख-दुःख कसें देईल! हें एकदां निश्चित जाणलें कीं, मग कोणीं कोणावर कोपावें! ४७ अशा रीतीनें कर्म सुख-दुःख देणारें नाहीं, असें ठरल्यावर काळ सुख-दुःख देत असेल असें जर म्हणाल तर तेंहि खात्रीनें संभवत नाहीं. ८४८.

कालस्तु हेतुः सुखदुःखयोश्चेत् किमात्मनस्तत्र तदात्मकोऽसौ ।
नाग्नेर्हि तापो न हिमस्य तस्मात्क्रुध्येत कस्मै न परस्य द्वंद्वम् ।। ५६ ।।

काळ शीतकाळीं शीतें पीडी । उष्णकाळीं उबारा सोडी । वर्षाकाळीं पर्जन्यधाडी । त्रिमाळिकें पाडी धवळारें ।। ४९ ।। बैसवूनि सातवांकडी । अखंडधार डोळा नुघडी । जीवमात्रा तेणें पीडी । पडे सांकडी अन्नाची ।। ८५० ।। अन्नाचिया चिडाणीं । पीडती पशुपक्षिप्राणी । ते काळीं सुखदुःख न मानी कोणी । दुःखदाता जनीं निजकाळू ।। ५१ ।। अतिताप अतिशीत । सोडूनियां अतिवात । काळ जगातें खात । जग कांपत काळासी ।। ५२ ।। ऐकोनि काळाची गोठी । देव कांपती उठाउठी । इतरांची कायसी गोठी । धाके पोटीं विधाता ।। ५३ ।। अतिवृष्टि अनावृष्टी । जन पीडी नाना संकटीं । शेवटीं प्रळयो करी उठाउठी । दुःखदाता सृष्टीं महाकाळ ।। ५४ ।। ऐसें बोलती ज्ञाते लोक । ते ज्ञातेपणें झाले मूर्ख । काळ तोचि ईश्वरू देख । सुखदायक सर्वांसी ।। ५५ ।। ईश्वराहूनि काळ भिन्न । म्हणे तो जड मूढ अज्ञान । काळ तोचि ईश्वर जाण । कृपाळु पूर्ण विश्वात्मा ।। ५६ ।। काळ स्वकाळीं वर्षोनि जीवन । सुखी करी संतप्त जन । पृथ्वी निववूनियां जाण । नव धान्य वाफवी ।। ५७ ।। ते काळीं जैं शीत न वाहे । तैं वाफिलें धान्य राख होये । तेव्हां शीतकण वर्षोनि पाहें । करी लवलाहें सफळित धान्यें ।। ५८ ।। तीं आर्द्र धान्यें भूतांसी । उपेगा न येती संग्रहासी । यालागीं उष्ण काळेंसीं । काळ शोषी आर्द्रता ।। ५९ ।। यापरी शीतोष्णपर्जन्यांसी । काळ उत्पादी भूतहितासी । तेंचि

कालः तु सुख-दुःखयोः हेतुः चेत् तत्र आत्मनः किं—आतां काल जर सुख-दुःखांचा हेतु असेल तर त्यांत आत्म्याचें काय आहे ! **असौ तदात्मकः**—हा काल ब्रह्मांशत्वामुळें आत्मस्वरूपच आहे. [स्वांशाला स्वतःपासून पीड होत नाहीं याविषयीं दृष्टान्त] **अग्नेः हि तापः न**—अग्नीपासून अग्नीचा अंश अशी जी ज्वाला वगैरे त्यांना ताप होत नाहीं, हें प्रसिद्ध आहे. त्यामुळें त्याच्या अंशाचा नाशहि होत नाहीं. [पण या दृष्टान्तात उपाधिभूत काष्ठांशाच्या दाहामुळें ज्वालादिकांचा नाश होतो, असें कोणी म्हणेल म्हणून आणखी एक दृष्टान्त देतात—] हिमस्य तत् न स्यात्—हिमाचें शैत्य त्याच्या अंशभूत तुषारकणांचा नाश करीत नाहीं, **तस्मात् कस्मै क्रुध्येत**—तेव्हां कोणावर रागवावें ! **परस्य द्वंद्वं न**—वस्तुतः हा काल परमात्माच आहे व परमात्म्याला सुख-दुखादि द्वंद्व नाहीं. ५६.

काळ हिंवाळ्यांत थंडीची बाधा करितो. उन्हाळ्यांत उष्णतेनें पीडा देतो. पावसाळ्यांत पर्जन्यवृष्टीनें तीन मजली चुनेगची वाडे पाडून टाकितो. ४९ सात दिवस सारखी पावसाची झड लागली कीं, त्या सतत धारेनें डोळा उघडूं देत नाहीं. सगळ्या प्राणीमात्रांची दुर्दशा होते व अन्न मिळण्याचीहि अडचण पडते. ८५० अन्नाच्या दुर्भिक्षतेमुळें पशु, पक्षी व इतर प्राणी दीन होतात. त्या वेळीं कोणी सुख-दुःख मानीत नाहींत. कारण सगळ्या जगाला दुःख देणारा काळ असतो. ५१ अतिशय थंडी, अतिशय उष्णता, अतिशय वारा यांच्या योगानें काळ सगळ्या जगाला ग्रासीत असतो. म्हणून जगत् काळाला थरथरा कांपत असतें. ५२ काळाचें नांव ऐकतांच देवांनाहि कंप सुटतो. मग इतरांची काय कथा ! ब्रह्मदेवाला सुद्धां काळाचा धाक पडतो. ५३ तो अतिवृष्टि अनावृष्टि यांच्यायोगें लोकांना नाना प्रकारच्या संकटांत पाडितो व शेवटीं प्रलय करितो. असा महाकाळ हा सृष्टीला दुःख देणारा आहे. ५४ असें जे शहाणे लोक बोलतात ते आपल्या विद्वत्तेनें खरोखर मूर्खच बनलेले असतात. कारण काळच सर्वांना सुख देणारा ईश्वर आहे. ५५ ईश्वराहून काळ भिन्न आहे असें जो म्हणतो तो जड, मूढ, अज्ञ होय. (सु. गी. ११-३२पृ. २१९) काळ तोच पूर्ण कृपाळू विश्वात्मा ईश्वर आहे असें तूं जाण. ५६ काळ योग्य वेळीं पर्जन्यवृष्टि करून संतप्त लोकांना तृप्त करितो. जमिनीला भिजवून नवें धान्य पेरण्यास योग्य करितो. ५७ ज्या वेळीं ओलावा नसला तर पेरलेलें धान्य जळून भस्म होईल, त्या वेळीं दंवाच्या तुषारांनीं शेत पिकवितो. ५८ तीं ओलीं धान्यें लोकांना साठवून ठेवितां येणार नाहींत, म्हणून उन्हाळ्यांत उन्हानें त्यांतील ओलावा शोषून घेऊन धान्य सुकवितो. ५९ याप्रमाणें काळ भूतांच्या हितासाठीं हिंवाळा, उन्हाळा व पर्जन्य उत्पन्न करितो. परंतु देहभ्रमानें भाळलेल्या लोकांना तेंच अहित वाटत असतें. ५९ काळ

कठिण वाटे त्यासी । देहभ्रमासी भुलोनी ॥ ८६० हिरोनि अतिजीर्ण वस्त्रांसी । नवीं नेसवी जो साक्षेपेंसीं । ऐशिया हितकारिया काळासी । वैरी पिशीं म्हणताती ॥ ६१ ॥ तेवीं जराजर्जरित विकळ । तें देह निर्दळी सकाळें काळ । आणिक नवें दे तत्काळ । ऐसा कृपाळु काळ जनांसी ॥ ६२ ॥ जुनें घऊनि दे नव्यासी । ऐशा उपकारिया काळासी । अपकारी म्हणती पिशीं । देहमोहेंसीं लोभिटें ॥ ६३ ॥ जन जैशिया निजभावना जे जे धरी दृढ वासना । काळ कृपाळु तत्क्षणा । ते ते देह जाणा त्या देत ॥ ६४ ॥ महामहोत्साहें पिता पुत्रासी । सांडवूनि जीर्ण वासांसी । नवीं वस्त्रें दे तयासी तेवीं जगासी प्रळयकाळु ॥ ६५ ॥ तेवीं प्रळयकाळीं जगासी । काळ जीर्ण देह नाशी । मग नूतन देह सर्वांसी । अतिकृपेंसीं गौरवी ॥ ६६ ॥ यापरी काळ कृपाळु । त्यासी वैरी म्हणे जन बरळू । जगाचा निजात्मा स्वयें काळू । तो दुःखाचा सळू कोणासी नेदी ॥ ६७ ॥ जनाचा देहीं दृढ भावो । भावनानुसारें काळ पहा हो । देहापाठीं उपजवी देहो । जन्ममरणनिर्वाहो तेणें वाढे ॥ ६८ ॥ जो साचार वांछी विदेहभावो । त्याचा काळ निर्दळी अहंभावो । निजानन्दें निववूनि स्वयमेवो । जन्ममरणांचा ठावो विभांडी ॥ ६९ ॥ जैशी ज्यासी होय बुद्धी । काळ तैसी दे त्यासी सिद्धी । हें नेणिजे देहमोहांधीं । काळ त्रिशुद्धि कृपाळु ॥ ८७० ॥ काळ तोचि निजात्मा जनीं । ऐसें जाणे जो निजज्ञानी । तैं कोणाचें दुःख कोण कां मानी । दुसरें कोणी असेना ॥ ७१ ॥ मी एक एथें दुःखदाता । पैल तो एक दुःखभोक्ता । हेंही नाहीं द्वैतकथा । जगासी एकुलता निजात्मा काळ ॥ ७२ ॥ काळ निजात्मा दोनी एक । तैं कोणाचें कोणास होय सुख । कोण कोणाचा मानी शोक । द्वंद्वदुःख असेना ॥ ७३ ॥ जेवीं नाममात्र मृगजळ । तेथ नाहीं तिळभरी जळ । तेवीं आत्मत्वीं जगड्व्याळ । तो भ्रम केवळ मनाचा ॥ ७४ ॥ आत्मा

जुनीं फाटलेलीं वस्त्रें काढून घेऊन काळजीपूर्वक नवीं वस्त्रें देतो. परंतु अशा हितकर्त्या काळाला अविचारी वेडे लोक वैरी म्हणतात. ६१ जरेनें जर्जर झालेल्या दुर्बल देहाचा योग्य वेळीं नाश करून तत्काळ चांगला नवीन देह देतो. लोकांविषयीं काळ इतका कृपाळु आहे. ६२ तो जुनें घेऊन नवें देतो; पण अशा उपकारकर्त्या काळाला देहलोभानें मोहांत पडून मूर्खलोक अपकारकर्ता म्हणतात. ६३ लोक जशा भावनेनें जशी दृढ वासना धरितात त्यांस तसा-तसा देह दयाळु काळ तत्क्षणीं देतो. ६४ मोठ्या उत्सवाच्या किंवा समारंभाच्या प्रसंगीं पिता आपल्या पुत्राला त्याचीं जुनीं वस्त्रें टाकवून नवीं वस्त्रें जसा देतो, ६५ त्याप्रमाणें काळ प्रलयकालीं जगांतील जीर्ण देहाचा नाश करून सर्वांना मोठ्या कृपेनें नवीन देह देतो, व त्यांचा गौरव करितो. ६६ याप्रमाणें काळ कृपाळु असतां मूढ लोक त्याला वैरी म्हणतात. काळ स्वतःच जगाचा आत्मा आहे. तेव्हां तो दुःख देऊन कोणाचा छळ कसा करील ! ६७ लोकांचा देहावर दृढभाव असतो. त्यांच्या भावनेप्रमाणेंच काळ देहामागें देह उत्पन्न करीत असतो. त्यामुळें जन्ममरणांची परंपरा वाढत असते. ६८ जो मनुष्य खरोखरच विदेह स्थितीची इच्छा करितो, त्याचा अहंभाव काळ नाहींसा करितो आणि स्वतःच त्याला आत्मानंदांत शांत करून त्याच्या मागचे जन्म-मरणांचे फेरे चुकवितो. ६९ ज्याची जशी बुद्धि असते, त्याला काळ तशी सिद्धि देतो. परंतु काळ खरोखर कृपाळु आहे, हें देहाभिमानानें मोहान्ध झालेले लोक जाणत नाहींत. ८७० काळच जगाचा आत्मा आहे, असें जो आत्मज्ञानी जाणतो, तो कोणाचें दुःख कां मानील ! कारण तेथें दुजेपणाच नाहीं. ७१ मी एक दुःख देणारा आणि पलीकडे दुसरा दुःख भोगणारा आहे, हा द्वैताचा भाग तेथें उरतच नाहीं. एकटा काळच जगाचा आत्मा आहे. ७२ आत्मा आणि काळ हे दोन्ही जेथें एक आहेत, तेथें कोणाचें सुख कोणाला होणार ! आणि कोण कोणाचा शोक मानणार ! याप्रमाणें द्वंद्वाचें दुःखच तेथें रहात नाहीं. ७३ ज्याप्रमाणें नाममात्र मृगजळांत थेंबभरहि पाणी नसतें त्याप्रमाणें आत्म्यांतील जें हें मोठें जगत् तो केवळ मनाचा भ्रम आहे. ७४ आत्मा एकत्वानें अभिन्न आहे. तोच काळ या नांवानें प्रसिद्ध आहे.

एकत्वें अभेद् । काळनामें तोचि प्रसिद्ध । जीव तदंशें चिद्त्वें शुद्ध । त्यासी काळादि द्वंद्व बाधीना ॥ ७५ ॥ आगीनें काय आगी जळे । का उन्हाळेनि सूर्य पोळे । सागरू बुडे लहरीबळें । कीं अंधारातें काळें काजळें कीजे ॥ ७६ ॥ कीं हिमाचळ हिमकणें कांपे । तुपाशीं मोडशी होय तुपें । तैं काळसत्ता खटाटोपें । आत्मा अमूर्ध द्वंद्वें भोगी ॥ ७७ ॥ आप आपणियां आपदा । कोणा न करवे विरुद्धा । तेवीं आत्म्यासी द्वंद्वबाधा । काळाचेनि कदा करवेना ॥ ७८ ॥ एवं एकात्मता अभेद । तेथ काळाचा न चले बाध । अभेदीं सर्वथा नाहीं द्वंद्व । कोणावरी क्रोध करावा ॥ ७९ ॥ जीव शिवत्वें मी केवळ । मीचि आत्मा मीच काळ । मिथ्या द्वंद्वदुःखगोंधळ । क्रोधाचा कल्लोळ कोणावरी करूं ॥ ८८० ॥ काळ सुखदुःखांचा दाता । यापरी नव्हे विचारितां । सुखदुःखांची बाधकता । आत्म्यासी सर्वथा असेना ॥ ८१ ॥ सुखदुःखादि हेतुषट्क । ' नायं जनो ' इत्यादिक । याचा करितां निजविवेक । नव्हती बाधक आत्म्यासी ॥ ८२ ॥ यांहीवेगळी बाधकपणें । देशवासें त्रिगुणगुणें । आत्म्यासी बाधावयाकारणें । कोठें कोणी दिसेना ॥ ८३ ॥ निजात्म्यासी बाधकता । कासेनि न संभवे सर्वथा । जनासी बाधक देहअहंता । निजस्वार्था भिक्षु बोले ॥ ८४ ॥

न केनचित्क्वापि कथंचनास्य द्वन्द्वोपरागः परतः परस्य ।
यथाऽहमः संसृतिरूपिणः स्यादेवं प्रबुद्धो न बिभेति भूतैः ॥ ५७ ॥

त्या शुद्ध ज्ञानस्वरूप आत्म्याचाच अंश जीव होय. त्यामुळें त्याला काळादि द्वंद्व बाधत नाहीं. ७५ आगीनें आग कधीं जळते ! किंवा उन्हानें सूर्य कधीं पोळतो ! किंवा लाटेच्या जोरानें समुद्र कधीं बुडतो. ! किंवा अंधाराला काजळ फासून अधिक काळें करितां येतें ! ७६ किंवा हिमालयपर्वत बर्फानें कधीं कांपतो ! किंवा तुपानेंच तुपाला कधीं अपचन होतें ! या गोष्टी जेव्हां खरोखर घडतील, तेव्हां काळाच्या सत्तेनें आत्मा सुख-दुःखादि अपार दुःखें भोगील. ७७ कोणी आपणच आपल्यावर जशी कधीं आपत्ति आणीत नाहीं, किंवा कोणाला स्वतःच्या विरुद्ध कोणतीहि गोष्ट करवत नाहीं, त्याप्रमाणें काळाच्याने आत्म्याला केव्हांहि द्वंद्वाची बाधा देववत नाहीं. ७८ याप्रमाणें त्यांचा एकरूप अभेद असल्यामुळें आत्म्याला काळाची पीडा होत नाहीं. अभेदांत सर्वथा द्वंद्व नाहीं. तेव्हां कोणीं कोणावर क्रोध करावा ! जीव-शिवरूपानें मीच आहें. मीच आत्मा आणि मीच काळ आहे. तेव्हां खोटाच सुख-दुःखादि द्वंद्वाचा गोंधळ करून क्रोधाचा भडिमार कोणावर करूं ! ८८० अशा प्रकारें विचार केला असतां काळ सुख-दुःख देणारा होत नाहीं आणि आत्म्याला सुख-दुःखाची बाधा कधींहि होत नाहीं, असा निश्चय होतो. ' नायं जनः० ' या श्लोकाचा विचार केला असतां जन , देवता, आत्मा, ग्रह, कर्म व काळ हीं सहाहि सुख-दुःखांचीं कारणें आत्म्याला बाधत नाहींत, हें स्पष्ट होतें. ८२ याखेरीज देशवासानें किंवा त्रिगुणांच्या गुणानें आत्म्याला पीडा देणारें दुसरें कोणी दिसत नाहीं. ८३ आत्म्याला कोणत्याहि प्रकारें कसलीहि बाधा होणें शक्य नाहीं. लोकांना त्यांचा देहाभिमानच बाधक होत असतो. त्याविषयींच आतां भिक्षु सांगत आहे. ८८४.

—याप्रमाणें या प्रसिद्ध सहा हेतूंचें निरसन केलें. आतां याहून निराळया दुसऱ्या एखाद्या हेतूची जर कोणी कल्पना करील, तर वस्तुमाहात्म्याच्या अपेक्षेनें त्याचाहि संभव नाहीं असें सांगतात—

यथा संसृतिरूपिणः अहमः स्यात् तथा परतः परस्य अस्य केनचित् क्व अपि कथंचन द्वंद्वोपरागः न- ज्याप्रमाणें अविद्यमान असलेल्याच संसाराला प्रकाशित करणाऱ्या अहंकाराशीं द्वंद्वांचा संबंध होतो, तसा प्रकृतीहून पर असलेल्या या आत्म्याशीं कोणत्याहि निमित्तानें केव्हांहि व कोणत्याहि प्रकारें द्वंद्वांचा संसर्ग होत नाहीं. [अहंकारनिमित्तानें द्वंद्वसंबंध आहे वास्तविक नाहीं असा याचा भावार्थ-] **एवं प्रबुद्धः भूतैः न बिभेति**-असें ज्याला ज्ञान झालें आहे, तो कोणत्याहि भूताच्या निमित्तानें भीत नाहीं. ५७,

आत्मा गुणातीत शुद्ध । परात्पर स्वानंद । परिपूर्ण सच्चिदानन्द । तेथ द्वंद्वबोध रिघेना ॥ ८५ ॥ द्वंद्व रिघावया आत्मभुवनीं । कैसोनि कासेनि कोणाचेनी । कर्मकार्यक्रियाकरणी । बाधकपणीं असेना ॥ ८६ ॥ अभेदा नाहीं द्वंद्वबाध । स्वानंदासी दुःखसंबंध । पूर्णासी कैंचें विरुद्ध । परमानंद एकला ॥ ८७ ॥ ॥ आशंका ॥ आत्म्यासी न घडे द्वंद्वसंबंध । देहो जडत्वें नेणे द्वंद्व । तरी सुखदुःखांचा महाबाध । कोणासी प्रसिद्ध होतसे ॥ ८८ ॥ सुखदुःखभागासी जाण । सोसावया जन्ममरण । एक मुख्यत्वें देहाभिमान । तेंही लक्षण अतर्क्य ॥ ८९ ॥ जेवीं असोनि भर्तारापाशीं । व्यभिचार करितां अहेवेसी । पोट वाढल्याही परपुरुषीं । तें कोणासी कळेना ॥ ८९० ॥ तैसें अभिमानाचें विंदान । चित्स्वरूपीं जडोनि जाण । मिथ्या दावूनि जीवपण । सुखदुःखें आपण स्वेच्छा भोगी ॥ ९१ ॥ जेवीं रायापाशील कुडा मंत्री । राजबळें अधर्म करी । प्रजेतें छळी नानापरी । तैसा शरीरीं अभिमान ॥ ९२ ॥ कां अग्निसंगें लोह जाण । अग्निप्राय होय आपण । तया हातीं धरूं शके कोण । पोळी दारुण सर्वांसी ॥ ९३ ॥ तेवीं चिद्रूपाचा अभिमान । देहात्मता खवळोनि पूर्ण । सुखदुःखादि जन्ममरण । वाढवितां कोण आवरी ॥ ९४ ॥ स्वप्नींचा देह केवळ मन । त्याही देहासी असे मनपण । तैसा हाही देहो मनाचि जाण । अभिमानें कठिण स्थूळ केला ॥ ९५ ॥ कार्यकारणरूपें जाण । संसारचि मनोभिमान । वाढवूनि सुखदुःख दारुण । जन्ममरण स्वयें भोगी ॥ ९६ ॥ भोगिलेचि भोग भोगितां । नानापरींची पावे व्यथा । तरी न सांडी अहंता । देहात्मता वाढवी ॥ ९७ ॥ ब्रह्मप्रळय होतां जाण । देहअहंता नव्हे क्षीण । प्रळयीं विरेना अभिमान । सुखदुःख जाण तो भोगी ॥ ९८ ॥ यामाजीं जीव असे कैसा । जपाकुसुमीं स्फटिक जैसा । दिसोन त्या रंगाऐसा । स्वयें तैसा होयेना ॥ ९९ ॥ आत्मत्वीं सुखदुःख

आत्मा गुणातीत, निर्मल, मायेच्या पलीकडचा, आनंदरूप व सच्चिदानंद आहे. तेथें द्वंद्वाची बाधा प्रवेशहि करीत नाहीं. ८५ आत्मभुवनांत द्वंद्वाचा प्रवेश करून तेथें पीडा करणारे कोणत्याहि प्रकारचें क्रिया-कर्म, कार्य व करणी कोणालाहि केव्हांहि करितां येणें शक्य नाहीं. ८६ कारण अभेदाला द्वंद्व बाधत नाहीं. स्वानंदरूपाला दुःख कसलें ! परिपूर्ण आत्म्याच्या विरुद्ध काय असणार ! परमानंद एकाकीच असतो. ८७ (आशंका—) आत्म्याचा द्वंद्वाशीं संबंध नाहीं व देह जड असल्यामुळें त्याला द्वंद्व कळत नाहीं. मग ही सुख-दुःखांची बाधा होते तरी कोणाला ! ८८ सुख-दुःख भोगावयास आणि जन्म-मरणांचे क्लेश सहन करावयास देहाभिमानच मुख्य कारण आहे, असें जर म्हणावें तर तेंहि लक्षण अतर्क्यच आहे. ८९ कारण एखादी विवाहित स्त्री आपल्या पतीपाशीं रहात असतांना तिला व्यभिचारानें जरी गर्भ राहिला तरी तो परपुरुषाचा आहे, हें जसें कोणाला कळत नाहीं, ८९० तसा हा अभिमानाचा प्रकार आहे. तो चित्स्वरूपाशीं एकरूप होऊन मिथ्या जीवपणा दाखवून आपल्या इच्छेनें सुख-दुःख भोगितो. ९१ एखाद्या राजापाशीं कपटी दुर्बुद्धि प्रधान असला तर तो अधिकाराच्या बळावर दुष्कृत्यें करून प्रजेला अनेक प्रकारें जसा छळीत असतो, तसा हा अभिमान शरीरांत राहून वाटेल तें करीत असतो; ९२ किंवा लोखंड अग्नीच्या संसर्गानें अग्नीसारखेंच बनतें; मग त्याला कोण हात लावूं शकणार ! तें जसें सगळ्यांना तत्काल होरपळून टाकितें, ९३ त्याप्रमाणें अभिमान चिद्रूपाशीं एकरूप होऊन देहबुद्धीनें खवळतो आणि सुख-दुःखादि युक्त जन्म मरणांची व्यथा वाढवितो. तेव्हां त्याला कोण आवरूं शकणार ! ९४ स्वप्नांतील देह म्हणजे केवळ मनाचा खेळ आहे, पण त्याहि देहाला मनपण आहे. तसा हा जागृतींतील देहहि मनच आहे; पण अभिमान त्याला कठिणत्व आणून स्थूल बनवितो. ९५ कार्य-कारणरूपानें संसारच मनोभिमान आहे. तो भयंकर सुखदुःख वाढवून स्वतः जन्म-मरण भोगितो. ९६ भोगलेलेच भोग पुनः भोगिते वेळीं नाना प्रकारची व्यथा भोगीत असतो. तरी अहंकार न सोडितां देहात्मभाव मात्र वाढवीत असतो. ९७ ब्रह्मप्रलयकाळ जरी ओढवला तरी देहावरील अहंता जात नाहीं. प्रलयकालींहि अभिमान विरून जात नाहीं, तर तो सुख-दुःख भोगितो. ९८ तर मग प्रलयांत जीव कसा असतो, तर जासवंदीच्या फुलावरील स्फटिकासारखा असतो. त्याच्यासारखा लाल दिसूनहि तो तसा

नाहीं । तें प्रत्यक्ष दिसताहे देहीं । हें अविचाररमणीय पाहीं । कल्पनेच्या ठायीं आभासे ॥ ९०० ॥ तें देह माझें म्हणोनि तत्त्वतां । अभिमानें घेऊनि माथां । जन्ममरणादि आवर्ता । सुखदुःखभोक्ता स्वयें होय ॥ १ ॥ येणेंचि विवेकें निजज्ञानी । प्राप्ततत्त्व गुरुवचनीं । ते वर्ततांही जनींवनीं । देहाभिमानी कदा नव्हती ॥ २ ॥ ऐसे प्रबुद्ध जे आत्मप्रतीतीं । त्यांसी प्रारब्धाचिये निजगती । नाना सुखदुःखें देतां भूतीं । आत्मस्थिति ढळेना ॥ ३ ॥ त्यांसी द्वेष नुपजे भूतीं । कोप सर्वथा न ये चित्तीं । मी एक त्रिजगतीं । जाणोनि निश्चितीं निर्द्वंद्व ॥ ४ ॥ तो देखोनियां विषमासी । भय न धरी मानसीं । पारके न म्हणे कोणासी । आप्त सर्वांसी निजात्म ॥ ५ ॥ समविषमभाव ना भेद । ज्ञाता सर्वरूपें अभेद । तो न मानी कोणाचा भयखेद । सुखस्वानंद सर्वदा ॥ ६ ॥ निंदाउपद्रव अनुद्विग्न । साहोनियां सुखसंपन्न । हें सिद्धाचें मुख्य लक्षण । तेंचि साधन साधकां ॥ ७ ॥

एतां समास्थाय परात्मनिष्ठामध्यासितां पूर्वतमैर्महर्षिभिः ।
अहं तरिष्यामि दुरन्तपारं तमो मुकुन्दाङ्घ्रिनिषेवयैव ॥ ५८ ॥

माझ्या पूर्वापरभाग्योदयें । अद्वैतात्मनिष्ठा उपजली पाहें । जें निष्ठेचेनि समवायें ॥ नाना दुःखें साहें निर्द्वंद्व ॥ ८ ॥ द्वंद्वसुखदुःखसहिष्णुपण । हें सिद्धाचें सहज लक्षण । माझें मुख्यत्वें हेंचि साधन । मनोजयो जाण येणें होये ॥ ९ ॥ हेंचि परमार्थसाधन वरिष्ठा । हेचि महाऋषींची निजनिष्ठा । हेंचि निजभजन वैकुंठा । निजात्मनिष्ठा येणें साधे ॥ ९१० ॥ येणें न बाधे द्वंद्वदुःख । येणें पाविजे नित्य-सुख । दुस्तर संसारतारक । हा निजविवेक आम्हांसी ॥ ११ ॥ दुस्तर तरावया भवसागरू । हा विवेकु सुकल्प तारू । एथ सद्गुरु कर्णधारू । परात्परपारू पाववी ॥ १२ ॥ हा विवेक कैसेनि ये हाता । हेही

नसतो. ९९ तसेंच आत्म्यामध्यें सुख-दुःख नाहीं. तें देहामध्यें प्रत्यक्ष दिसतें. हे आपातरमणीयविषय नुसत्या कल्पनेनें भासतात. ९०० देह 'तें सुख-दुःख माझें' म्हणून आपल्या मस्तकावर अभिमानानें लावून घेतो; आणि जन्म-मरणांच्या भोंवऱ्यांत सांपडून स्वतः सुख-दुःखांचा भोक्ता होतो. १ याच विचारानें आत्मज्ञानी लोक गुरूपदेशाच्या द्वारा आत्मतत्त्व जाणून जनांत किंवा वनांत असले तरी देहाभिमान धरीत नाहींत. २ जे अशा आत्मज्ञानानें संपन्न असतात त्यांना आपल्या प्रारब्धानुसार प्राण्यांनीं कितीहि सुख-दुःख दिलें तरी ते आपल्या आत्मस्वरूपापासून ढळत नाहींत. ३ त्यांच्या मनांत त्या भूतमात्राविषयीं द्वेष उत्पन्न होत नाहीं. चित्तांत क्रोध उपजत नाहीं. त्रिभुवनांत मीच एक व्यापून राहिलों आहें असें निश्चित जाणून ते निर्द्वंद्व होतात. ४ ते संकटाला पाहून मनांत भय धरीत नाहींत. ते कोणालाच परका मानीत नाहींत.तोहि आत्मस्वरूप असल्यामुळें ते सर्वांना आप्तच समजतात. ५ त्यांना सम-विषम हा भेद नसतो. ज्ञाता सर्व प्रकारें अभेदरूपच असतो. तो कोणाचें भय किंवा कशाचा खेद मानीत नाहीं. तो सर्वदा स्वानंद-सुखांत असतो. ६ कोणीं निंदा किंवा उपद्रव केल्यास उद्विग्न न होतां त्याला सहन करून समाधानांत रहाणें हेंच सिद्धाचें मुख्य लक्षण आहे. साधकाला साधनहि तेंच आहे. ९०७.

—यास्तव मीहि परमार्थनिष्ठ होऊन संसाराचें उल्लंघन करून जाईन असें आतां भिक्षु सांगतो.

पूर्वतमैः महर्षिभिः अध्यासितां एतां परात्मनिष्ठां समास्थाय—अति प्राचीन महर्षींनीं अनुभविलेल्या या परमात्म-निष्ठेचा आश्रय करून, अहं मुकुन्दाङ्घ्रिनिषेवया एव दुरन्तपारं तमः तरिष्यामि—मी मुकुंदचरणाच्या नित्य सेवेनेंच ज्यांचा थांग लागत नाहीं अशा तमाचें उल्लंघन करून जाईन. ५८.

माझ्या पूर्व पुण्याईनें हा भाग्योदय झाला व ही अद्वैतयुक्त आत्मनिष्ठा माझ्या मनांत उद्भवली. या परमात्म निष्ठेच्या आश्रयामुळेंच मी नानाप्रकारचीं दुःखें निर्द्वंद्व होऊन सहन करीत आहें. ८ सुख-दुःखादि द्वंद्व सहन करणें हेंच सिद्धाचें सहज लक्षण आहे. माझें हेंच मुख्य साधन आहे. यानें मनोजय होतो. ९ हेंच परमार्थाचें श्रेष्ठ साधन आहे. महा ऋषींची आत्मनिष्ठा हाच आहे. विष्णूचें भजन हेंच आहे. यानेंच आत्मनिष्ठा साधते. ९१० यानें द्वंद्वाचें दुःख बाधत नाहीं. नित्यसुखाची प्राप्ती होते. असा हा आत्मविवेक आम्हांला दुस्तर संसारांतून तारणारा आहे. ११ हा दुस्तर संसारसागर तरून जाण्यास विवेक उत्तम नौका आहे. सद्गुरु त्याचा नावाडी आहे. तो मायेच्या पैल-

करणें न लगे चिंता । निजभावें एकाग्रता । शरण भगवंता रिघावें ॥ १३ ॥ सांडोनि लौकिकाचे लाजे । सांडोनि अभिमानाचें ओझें । भगवंता शरण रिघिजे । तैं लाहिजे विवेक ॥ १४ ॥ तानें बाळ जेवीं जननीसी । अनन्य शरण सर्वभावेंसीं । ऐसिया अनन्यता अहर्निशीं । शरण हरीसी रिघावें ॥ १५ ॥ हरीसी रिघालिया शरण । मुख न दाखवी जन्ममरण । तेथ बाधूं शके द्वंद्व कोण । हरि रक्षण निजभक्तां ॥ १६ ॥ मोक्षदाता मुकुंद पूर्ण । त्यासी कैसें रिघावें शरण । तो अनंतत्वें निजनिर्गुण । तेथ कोण पावेल ॥ १७ ॥ असो हरिरूप अतिनिर्गुण । त्याची मूर्ति चिंतितां सगुण । ध्यानीं स्थिरावल्या संपूर्ण । द्वंद्व-दुःखें जाण हारपती ॥ १८ ॥ ध्यानीं मूर्ति न ये संपूर्ण । तैं दृढ धरावे हरीचें चरण । तेणें उठोनि पळे जन्ममरण । आपभयें आपण पळती द्वंद्वें ॥ १९ ॥ जैं न धरवती दृढ चरण । तैं करावें नामस्मरण । ज्याचेनि नाममात्रें जाण । यम काळ पूर्ण कांपती ॥ ९२० ॥ जेथ हरिनामाचा नित्य घोख । तेथ मरणा मरण आलें देख । जन्माचें होय काळें मुख । लाजोनि निःशेख तें पळे ॥ २१ ॥ रामनामाच्या गजरापुढें । काइसें द्वंद्वदुःख बापुडें । अवघें भवभयचि उडे । नामपवाडे गर्जतां ॥ २२ ॥ अखंड नामें गर्जे वाणी । त्याचे बोलांमाजीं चक्रपाणी । तेथ ऋद्धिसिद्धि वाहे पाणी । मुक्ति आंदणी तयाची ॥ २३ ॥ निर्विकल्प भावार्थें आपण । सगुण निर्गुण कां नामस्मरण । भक्त भावार्थें आदरी जाण । तें तें होय पूर्ण सद्भावेंचि ॥ २४ ॥ भावार्थें जे भगवत्प्रीती । तेचि जाणावी साचार भक्ती । भावें तुष्टला श्रीपती । दे निजशांति साधकां ॥ २५ ॥ ते निजशांतीच्या पोटीं । हरपती द्वंद्वदुःखकोटी । परमानंदें कोंदे सृष्टी । मी तूं दृष्टीं दिसेना ॥ २६ ॥ ऐसेनि अभेदभावें जाण । सेवितां मुकुंदश्रीचरण । मी आपणिया आपण । तारीन जाण निश्चित ॥ २७ ॥ तारीन म्हणतां उद्धारू । बोलीं दिसताहे उशिरू । जो झाला हरीचा

तीराला नेऊन पोंचवितो. १२ हा विवेक कसा साध्य होईल, याविषयींहि चिंता करण्याचें कारण नाहीं. एकाग्र चित्त करून श्रद्धेनें भगवंताला शरण निघावें. १३ लौकिकाची लाज सोडून अभिमानाचें ओझें टाकून भगवंताला शरण गेलें असतां विवेक प्राप्त होतो, १४ तान्हें बाळ जसें अनन्यभावानें आईला शरण जातें, त्याप्रमाणें अहोरात्र एक-निष्ठेनें हरीला शरण जावें. १५ एकदां हरीला शरण गेलें कीं, जन्म-मरण तोंड दाखवीत नाहीं. आपल्या भक्ताचें रक्षण करणारा हरि समर्थ असल्यावर मग तेथें द्वंद्व कसें बाधणार ! १६ श्रीकृष्ण जरी पूर्ण मोक्ष-दाता असला तरी त्याला शरण कसें जावें ! तो अनंतस्वरूप असून निर्गुण आहे. तेथें कोण पोंचूं शकणार ! १७ (असें जर म्हणाल तर ऐका—) हरीचें स्वरूप निर्गुण असेना का ! त्याच्या सगुण मूर्तीचें जरी चिंतन केलें व तें ध्यान जरी चित्तांत स्थिर झालें, तरी द्वंद्वाचीं दुःखें नाहींशीं होतात. १८ ध्यानांत हरीची मूर्ति जर पूर्णपणें ठसली नाहीं तर हरिचरणांवर दृढ निष्ठा ठेवावी, म्हणजे जन्म-मरण उठून पळून जातें आणि द्वंद्वें आपल्याच भयानें पळूं लागतात. १९ हरिचरण जर दृढ धरवत नसले तर हरीचें नामस्मरण तरी करावें. त्या नांवाच्या प्रभावानेंच यम आणि काळ चळचळां कांपतात. ९२० जेथें हरिनामाचा नित्य घोष चालतो तेथें मरणालाच मरण आलें म्हणून समजावें. जन्माचें तोंड काळें होतें. तो लाजून पार पळून जातो. २१ रामनामाच्या गजरापुढें बापड्या द्वंद्वदुःखाचा काय पाड ! रामनामाच्या कीर्तीचा गजर ऐकतांच सगळें भवभय उडून जातें. २२ ज्याची वाणी अखंड रामनामाची गर्जना करीत असते, त्याच्या शब्दांतच परमात्म्याची वस्ती असते. त्याच्या घरीं ऋद्धि-सिद्धि पाणी भरितात. मुक्ति तर त्याची आंदण दिलेली दासीच होते. २३ भक्त स्वतःच निर्विकल्प भक्तीनें सगुण-निर्गुण भजन किंवा नामस्मरण यांतील जें जें कांहीं स्वीकारितो तें तें त्याच्या सद्भावनेनेंच पूर्ण होतें. २४ श्रद्धेनें भगवंतावरील प्रेम हीच खरी भक्ति होय. त्या भक्तीनेंच श्रीपति संतुष्ट होऊन साधकाला आत्मशांति देतो. २५ ती आत्मशांति प्राप्त झाली असतां कोट्यवधि द्वंद्वदुःखें नाहींशीं होतात. सगळी सृष्टि परमानंदानें भरून जाते. 'मी तूं-' पणा दृष्टीसहि पडत नाहीं. २६ अशा अभेदभक्तीनें श्रीहरिचरणांची सेवा केली असतां मी स्वतःच स्वतःला तारीन, हें निश्चित समजावें. २७ 'मी तारीन ' हे शब्द उच्चारण्यासहि कांहीं

डिंगरू । त्यासी संसारू असेना ।। २८ ।। ऐशी भिक्षुनें गाइली गाथा । ते अत्यंत रुचली श्रीकृष्णनाथा। हरिखें ओसंडोनि चित्ता । उद्धवाचा माथा थापटी ।। २९ ।। ऐशी जे हे निजशांती । माझ्या उद्धवासी व्हावी प्राप्ती । ऐसा कळवळोनि श्रीपती । काय उद्धवाप्रती बोलिला ।। ९३० ।।

श्रीभगवानुवाच–निर्विद्य नष्टद्रविणो गतक्लमः प्रव्रज्य गां पर्यटमान इत्थम् ।
निराकृतोऽसद्भिरपि स्वधर्मादकम्पितोऽमूं मुनिराह गाथाम् ।। ५९ ।।

ज्याचें निःश्वासें जन्मले वेद । ज्याचेनि चरणीं गंगा प्रसिद्ध । ज्याचें नाम छेदी भवबंध । तो उद्धवासी गोविंद स्वमुखें बोले ।। ३१ ।। यालागीं उद्धवाचें भाग्य थोर । ज्यासी तुष्टोनि शार्ङ्गधर । दाखवी निजशांतीचें घर । निरंतर वस्तीसी।। ३२ ।। उद्धवा ऐक सावधान । धनलोभ्याचें नासोनि धन । तो धननाश झाला प्रसन्न । केला विवेकसंपन्न वैरागी ।। ३३ ।। जो धनलोभी न खाता । ज्याचें नांव न घेती सर्वथा । तोचि वैराग्यें केला सरता । माझे मुखीं कथा तयाची ।। ३४ ।। त्याचें नाम माझे मुखीं जाण । त्याचें कर्म वर्णीं मी आपण । तो मज पढियंता जाण । जो विवेकसंपन्न वैरागी ।। ३५ ।। वैराग्यपरतें भाग्य थोर । जगीं नाहीं आन सधर । विवेकवैराग्यें जो साचार । तो माझें जिव्हार उद्धवा ।। ३६ ।। जो विवेकवैराग्यें आथिला । तो जाण मजमाजीं आला । मी अधीन त्याचिया बोला । तो मज विकला सर्वस्वें ।। ३७ ।। लोभ्याचें निःशेष गेलें धन । धनासवें गेले मानाभिमान । अभिमानासवें जाण । गेलें द्वंद्व दारुण सुखदुःख ।। ३८ ।। धन जातां झाली विरक्ती । तेणें नेमस्त झाला यती । भिक्षार्थ हिंडतां क्षितीं । दुर्जनीं दुरुक्तीं निर्भर्त्सिला ।। ३९ ।। पीडितां नाना विकारीं । उपद्रवितां

वेळ लागतो. परंतु हरिभक्ताला हा संसार तरून जाण्यास तेवढाहि अवकाश लागत नाहीं. २८.अशाप्रकारें त्या भिक्षूनें जें गीत गाईलें तें श्रीकृष्णनाथाला फार आवडलें. त्यानें आनंदानें मन आंवरून उद्धवाचें मस्तक थोपटिलें. २९. 'माझ्या उद्धवाला अशी आत्मशांति प्राप्त व्हावी ' अशा आशयानें श्रीहरि कळवळून उद्धवाला काय बोलला तें ऐका. ९३०.

—आतां भगवान् पुढील दोन श्लोकांनीं प्रस्तावासह या गाथेचा अर्थ संक्षेपतः सांगतात—

श्रीभग० उ०–भगवान् म्हणाले–इत्थं नष्टद्रविणः गतक्लमः प्रव्रज्य गां पर्यटमानः असद्भिः निराकृतः अपि स्वधर्मात् अकंपितः सन् **मुनिः अमूं गाथां आह** याप्रमाणें ज्याचें द्रव्य नष्ट झालें आहे, त्यामुळें विरक्त होऊन जो क्लेश-शून्य झाला आहे व संन्यास करून जो पृथ्वीवर पर्यटन करीत आहे आणि दुर्जनांनीं तिरस्कार केला असतांहि जो स्वधर्मापासून ढळला नाहीं, असा मुनि ही गाथा गाता झाला. ५९.

ज्याच्या श्वासोच्छ्वासापासून वेद उद्भवले; ज्याच्या चरणांपासून प्रसिद्ध गंगा उपजली; ज्याचें केवल नांव भवबंधाला तोडून टाकितें, तो गोविंद उद्धवाला स्वमुखानें सांगूं लागला. ३१ यास्तव उद्धव मोठा भाग्यवान् म्हटला पाहिजे. म्हणूनच त्याच्यावर संतुष्ट होऊन श्रीहरीनें आत्मशांतीचें घर त्याला कायमच्या वस्तीसाठीं दाखवून दिलें. ३२ हे उद्धवा ! लक्ष देऊन ऐक. त्या धनलोभ्याचें धन नाहींसें होतांच जणुंकाय तो धननाशच त्याच्यावर प्रसन्न झाला व त्यानें त्याला विवेकसंपन्न विरक्त बनविलें. ३३ जो धनलोभी कधीं पोटाला खात नव्हता, ज्याचें नांवहि कोणी घेत नव्हतें; तो पूर्ण विरक्त होतांच माझ्या तोंडीं ज्याची कथा आली त्याचें नांव माझ्या मुखांत आलें. ३४ त्याच्या कृतीचें मीं वर्णन केलें. तो विवेकसंपन्न विरक्त होतांच माझा अत्यंत आवडता झाला. ३५ विरक्तीसारखें दुसरें श्रेष्ठ भाग्य जगांत कोणतेंहि नाहीं, असें उद्धवा ! तूं समज. जो विवेकवैराग्यानें संपन्न झाला, तो माझा प्राणच आहे. ३६ त्यानें माझ्यामध्यें प्रवेशच केला, असें समजावें. मी त्याच्या प्रत्येक शब्दाच्या अधीन असतों. तो मला सर्वस्वीं विकतच घेतो. ३७ त्या लोभ्याचें निःशेष धन गेलें. धनाबरोबर मानाभिमानहि गेला, अभिमानाबरोबर सुख-दुःखादि दारुण द्वंद्वहि गेलें. ३८ धन जातांच विरक्ति आली. त्यामुळें तो नियमनिष्ठ यति झाला. भिक्षेसाठीं पृथ्वीवर हिंडत असतां दुर्जनांनीं दुरुक्तीनें त्याची निर्भर्त्सना केली, ३९ अनेक प्रकारें पीडा दिली, नानाप्रकारें उपद्रव केला, तरी तो

नानापरी । न डंडळीच निजनिर्धारीं । स्वधर्म धैर्य करी निर्द्वंद्व ॥ ९४० ॥ संन्याशाचा स्वधर्म पूर्ण । मी देहातीत नारायण । साचार हरविला देहाभिमान । यालागीं जाण न डंडळी ॥४१॥ जेवीं छायेसी लागतां घावो । पुरुषासी नाहीं भय संदेहो । तेवीं दुर्जनीं दंडितां देहो । नाहीं दुःखभेवो निरहंकारा ॥ ४२ ॥ देहासी होतां नाना व्यथा । आपुली जे देहातीतता । तेचि भिक्षूनें गायिली गाथा । ते तुज म्यां आतां निरूपिली ॥ ४३ ॥ येथ सुखदुःखांसी कारण । आपला भ्रम आपणा जाण । येचि अर्थींचें निरूपण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४४ ॥

सुखदुःखप्रदो नान्यः पुरुषस्यात्मविभ्रमः । मित्रोदासीनरिपवः संसारस्तमसः कृतः ॥ ६० ॥

आविद्यक जें निजज्ञान । तेथें मनपणें उठी मन । मनें भेद करूनियां पूर्ण । सुखदुःखें जाण भोगवी ॥ ४५ ॥ आत्मा केवळ भेदशून्य । तेथ शत्रु मित्र उदासीन । मनें कल्पूनियां जाण । मन संपूर्ण स्वयें चाळी ॥ ४६ ॥ ऐसें भेदीं ठसावलें मन । तेंचि पुरुषाचें अज्ञान । तेणें द्वंद्वदुःखेंसीं जाण । संसार दारुण सभ्रांता ॥ ४७ ॥ मन सुखदुःखांसी कारण । मनःकल्पित संसार जाण । त्या मनाचें निग्रहण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ४८ ॥

तस्मात्सर्वात्मना तात निगृहाण मनो धिया । मय्यावेशितया युक्त एतावान् योगसंग्रहः ॥ ६१ ॥

जो नासूं पाहे संसारदुःख । तेणें मन नेमावें आवश्यक । मनावेगळें दुःखदायक । नाहीं आणिक त्रिलोकीं ॥ ४९ ॥ मन अतिशयें चंचळ । तें सहसा नव्हे निश्चळ । त्यासी विवेक द्यावा मोकळ । अभेद-

---

आपल्या शांतीपासून रेसभरहि ढळला नाहीं. स्वधर्माच्या धैर्यानें तो निर्द्वंद्व झाला होता. ९४० त्या संन्याश्याची 'मी देहातीत नारायण आहें' या स्वधर्मावर पूर्ण निष्ठा होती. त्यामुळें त्याचा देहाभिमान पूर्णपणें गेला होता. म्हणून तो आपल्या निश्चयापासून ढळला नाहीं. ४१ छायेवर घाव पडला तर त्यापासून पुरुषाला जसा भयाचा संशयहि येत नाहीं, त्याप्रमाणें देहाला दुर्जनांनीं क्लेश दिले असतां निरहंकार मनुष्याला दुःखाचें भय वाटत नाहीं. ४२ देहाला अनेक प्रकारची व्यथा होत असतां, आपण देहाहून भिन्न आहोंत अशी भावना ठेवून भिक्षूनें जें गीत गाईलें, तेंच मीं तुला सांगितलें. ४३ आतां आपलाच भ्रम आपल्या सुख-दुःखाला कसा कारण होतो, या अर्थाचें निरूपण स्वतः श्रीकृष्ण करीत आहे. ९४४.

पुरुषस्य सुख-दुःखप्रदः अन्यः न—पुरुषाला सुख-दुःख देणारा दुसरा कोणीहि नाहीं, **मित्रोदासीनरिपवः संसारः तमसः आत्मविभ्रमः कृतः**—मित्र, उदासीन व शत्रु असा हा सर्वहि संसार अज्ञानामुळें केवल मनाच्या विभ्रमानें केलेला आहे. (तो तात्त्विक नव्हे, असा याचा भावार्थ.) ६०.

अविद्येमुळें उत्पन्न झालेलें जें आत्म्याविषयींचें अज्ञान तेंच मनाच्या रूपानें उचल खातें आणि मनानें भेद उत्पन्न करून सुख-दुःख भोगवितें. ४५ आत्मा केवल भेदशून्य आहे. तेथें शत्रु, मित्र, उदासीन इत्यादि भेद मनानें कल्पून तें स्वतःच आपल्याला चाळवितें. ४६ अशा प्रकारचा भेद मनावर ठसणें हेंच पुरुषाचें अज्ञान होय. त्या अज्ञानामुळेंच भ्रांत लोकांना द्वंद्वापासून होणाऱ्या दुःखासह दारुण संसार भासतो. ४७ मनच सुख-दुःखांचें कारण आहे. यास्तव संसार मनःकल्पितच आहे, हें खात्रीनें जाण. त्या मनाचें नियमन कसें करावें, हेंच आतां श्रीकृष्ण सांगत आहे. ९४८.

—या उक्त द्वंद्वोपायाचा उपसंहार करितात—

तस्मात् हे तात—यास्तव हे उद्धवा ! **मयि आवेशितया धिया युक्तः सन् मनः निगृहाण**—माझ्या ठिकाणीं स्थिर केलेल्या बुद्धीनें युक्त होऊन मनाचा निग्रह कर. **योगसंग्रहः एतावान्**—सर्व उपायांचा संक्षिप्त अर्थ हा एवढाच आहे. ६१.

ज्याला संसारदुःखाचा नाश करावयाचा असेल त्यानें मनाचें अवश्य नियमन करावें. सगळ्या त्रैलोक्यांत मनावांचून दुसरें कोणीहि दुःख देणारें नाहीं. ४९. मन अत्यंत चंचल आहे. तें केव्हांहि निश्चल होत नाहीं. म्हणून

शील अहर्निशीं ॥ ९५० ॥ मन सिंतरील विवेकासी । यालागीं हातकडिया दोहींसी । करूनिया अहर्निशीं । येरयेरांपाशीं राखावीं ॥ ५१ ॥ मन जेथ विकल्पूं धांवे । तेथ महामारी विवेकू पावे । मन जेथ अधर्मे संभवे । तेथ विवेक धांवे हांकित ॥ ५२ ॥ मन जाय कामक्रोधांपाशीं । विवेक ओढी धरोनि केशीं । मन रिघतां निंदेपाशीं । विवेक त्यासी बुकाली ॥ ५३ ॥ मन म्हणे विषय सुटी । विवेक हाणे वैराग्यकाठी । मन धांवतां कल्पनेपाठीं । विवेक उठाउठी झोंटाळी ॥ ५४ ॥ परदारा परधन । अभिलाषूं धांवे मन । तेथ विवेक पावोन । रणकंदन आरंभी ॥ ५५ ॥ ऐसा मनांविवेकांचा झगडा । गाऱ्हाणें आलें सद्गुरूपुढां । तेणें करावया निवाडा । अद्वैतवाडां कोंडिलीं ॥ ५६ ॥ तो दृष्टी देखतांचि ठावो । मनाचा मोडला स्वभावो । देहींचा सांडोनि अहंभावो । विवेकेंसीं पहा हो ऐक्य केलें ॥ ५७ ॥ तेथ मनाचें गेलें मनपण । विवेक विसरला आकळण । जीवांचें विरालें जीवपण । वस्तु संपूर्ण अद्वयें ॥ ५८ ॥ जेवीं सुवर्णाचीं नागभूषणें । फडा पुच्छ मिरवी नागपणें । तें न मोडितां नागत्वाचें लेणें । सोने सोनेपणें नागत्व विसरे ॥ ५९ ॥ तेवीं जाणोनि वस्तु पूर्ण । न मोडितां जग जाण । जीव विसरला जीवपण । मनत्वा मन मूकलें ॥ ९६० ॥ ऐशिया विवेकयुक्तीं जाण । माझे स्वरूपीं प्रवेशे मन । जेथ मनपणें नुठी मन । मनोनिग्रहण या नांव ॥ ६१ ॥ ऐक चतुरचित्तचिंतामणी । विवेकचक्रवर्तिचूडामणी । उद्धवा भक्तशिरोमणी । मनोनिग्रहणीं प्रवर्त ॥ ६२ ॥ आवडीं भुलला कृष्णनाथ । तो उद्धवासी म्हणे तात । मनोनिग्रहीं तूं एथ । होईं साक्षेपयुक्त सादर ॥ ६३ ॥ साक्षेपें निग्रहूनि मनासी । जो सांडवी मनोजन्य भेदासी । शांति सांडूं नेणे त्यासी । जेवीं तान्हयामी माउली ॥ ६४ ॥ निजशांति बाणल्या शुद्ध । त्यासी न बाधी कोणी द्वंद्व । हाचि योगसंग्रहो प्रसिद्ध । बोलिले

विवेकाला मोकळा सोडून त्यानें भेदभाव नाहींसा करून मनाला रात्रंदिवस स्वाधीन ठेवावें (म्ह० भेदभाव सोडून मनाला विवेकांत गुंतवून ठेवावें.) ९५० मन विवेकाला चुकवून जाईल म्हणून त्या दोघांनाहि हातकड्या घालून अहोरात्र एकमेकांपाशीं बांधून ठेवावें. ५१ त्यायोगें मन विकल्प करण्यास धांवूं लागलें म्हणजे विवेक त्याच्या पाठोपाठ जाऊन त्याला थप्पड देऊन परत फिरवितो. मन जेव्हां अधर्मांत प्रवृत्त होऊं लागतें, तेव्हां विवेक लगेच धांवत जाऊन त्याला परत वळवितो. ५२ मन काम-क्रोधांपाशीं जाऊं लागलें कीं, विवेक त्याचे केंस धरून त्याला मागें खेचतो. मन निंदेकडे वळूं लागलें कीं, विवेक त्याला ठोसे मारून जागेवर बसवितो. ५३ मनानें 'विषयांकडे जातों' असें म्हणतांच विवेक त्याच्या पाठींत विरक्तीची काठी घालितो. मन कल्पनेच्या मागें धांवूं लागतांच विवेक त्याच्या झिंझ्या धरून ओढितो. ५४ परदारा आणि परधन यांचा अभिलाष धरून मन तिकडे धांवूं लागलें म्हणजे विवेक त्याला अडवून त्याच्याशीं युद्धाला उभा रहातो. ५५ असा मन आणि विवेक यांचा झगडा चालला असतां ते दोघेहि सद्गुरूपाशीं गाऱ्हाणें सांगावयास जातात. तेव्हां गुरु त्यांचा न्याय निवडण्यासाठीं त्यांना अद्वैतवाड्यांत कोंडून ठेवितो; ५६ परंतु तें स्थान दृष्टीस पडतांच मनाचा मूळस्वभाव पार पालटून तें देहाभिमान सोडून विवेकाशीं ऐक्य करितें. ५७ तेथें मनाचा मनपणा नाहींसा होतो. विवेक मनाला ताब्यांत ठेवण्याचें विसरतो. जीवाचें जीवपण नाहींसें होतें व सगळी एक अद्वय वस्तु भरून रहाते. ५८ सोन्याचा नाग केला तर तो शेपटी, फडा वगैरे सर्व अवयवांनीं खऱ्या नागासारखाच शोभत असतो; परंतु तो मोडला कीं, नागाचा आकार नाहींसा होऊन सोनें आपल्या मुळच्याच स्वरूपांत जसें कायम रहातें, ५९ त्याचप्रमाणें परिपूर्ण आत्मवस्तूला जाणतांच जगत् मोडल्यावांचूनच जीव आपला जीवपणा विसरतो व मन आपल्या मनपणाला मुकतें. ९६० अशा विवेकयुक्तीनें मन माझ्या स्वरूपांत प्रवेश करितें. मनाचें मनपणानें न उठणें यालाच मनोनिग्रह म्हणतात. ६१ हे चतुर लोकांच्या चित्तचिंतामणे ! विवेकसम्राटांच्या चूडामणे, भक्तश्रेष्ठा उद्धवा ! ऐक. तूं मनोनिग्रह करण्यास प्रवृत्त हो. ६२ श्रीकृष्णनाथ प्रेमानें भाळला आणि उद्धवाला म्हणाला कीं, अरे बाबा ! तूं आतां मनोनिग्रह करण्यास आदरपूर्वक तयार हो. ६३ तान्ह्या बाळाला जशी त्याची आई सोडीत नाहीं, त्याप्रमाणें आदरपूर्वक मनोनिग्रह करून, मनापासून उद्भवणाऱ्या भेदाचा त्याग करणाराला शांति सोडीत नाहीं. ६४ एकदां अंतःकरणांत शुद्ध आत्मशांति

सिद्ध महायोगी ॥ ९६५ ॥ सांडूनि संसारस्फूर्ती । चित्स्वरूपीं जडे वृत्ती । जीव शिव एकत्वा येती । योगसंग्रहास्थिति या नांव ॥ ६६ ॥ ऐशिया योगसंग्रहशांती । साधकां द्वंद्वें न बाधिती । हे असो जया भिक्षुगीतभक्ती । द्वंद्वनिर्मुक्ति तया लाभे ॥ ६७ ॥

य एतां भिक्षुणा गीतां ब्रह्मनिष्ठां समाहितः । धारयन् श्रावयन् शृण्वन् द्वन्द्वैर्नैवाभिभूयते ॥ ६२ ॥

साधावया शांतीची प्राप्ती । कोटिसाधनें न लभे शांती । हा भिक्षुगीतार्थ धरितां चित्तीं । शांति आपैती साधकां ॥ ६८ ॥ योगनिष्ठा ब्रह्मज्ञान । तें हें भिक्षुगीतानिरूपण । जो हृदयीं धरी सावधान । शांति आंदण तयाची ॥ ६९ ॥ ये भिक्षुगीतेचा गीतार्थू । जो जीवीं धरी समाहितू । त्यासीं द्वंद्वांचा न बाधी घातू । अतिशांतू निजबोधें ॥ ९७० ॥ भिक्षुगीतार्थें समाधान । हें सांगतां नवल कोण । जो सादरें करी श्रवण । त्यासी द्वंद्वें जाण न बाधिती ॥ ७१ ॥ परदेशा गेला बहुकाळ भर्ता । त्याचें पत्र सादर ऐके कांता । तैशिया अतिएकाग्रता । भिक्षुगीता ऐकावी ॥ ७२ ॥ निघोनि गेलिया पुत्रासी । त्याची शुद्धि ये मातेपाशीं । ऐकोनियां उणखुणेसी । चरफडी जैसी विव्हळ ॥ ७३ ॥ तीजवळ ज्या सोयऱ्या असती । त्याही स्नेहें कळवळती । परी माता जैसी तळमळे चित्तीं । तें आणिकाप्रती असेना ॥ ७४ ॥ तैसें भिक्षुगीताश्रवण । करितां द्रवे ज्याचें मन । जो सात्त्विकें वोसंडे पूर्ण । तो

बाणली कीं, त्यास कोणतेहि द्वंद्व बाधत नाहीं. हाच प्रसिद्ध योगसंग्रह त्या महायोग्यानें सांगितला. ९६५ संसाराची स्फूर्ति नाहींशी करून आत्मस्वरूपाकडे वृत्ति लागणें आणि जीव-शिवांचें ऐक्य होणें यालाच योगसंग्रह म्हणतात. ६६ अशी योगसंग्रहशांति प्राप्त झाली असतां साधकाला द्वंद्वें बाधत नाहींत. असो; या भिक्षुगीतावर ज्यांची भक्ति जडते त्यांस द्वंद्वनिवृत्तीचा लाभ होतो. ९६७.

—मनोनिग्रह करण्यास असमर्थ असलेलाहि पुरुष जर या भिक्षुगीताच्या श्रवणादिकांमध्यें तत्पर झाला तर त्यालाहि द्वंद्वसहिष्णुत्व हें फल प्राप्त होतें, असें आतां सांगतात—

यः समाहितः सन् भिक्षुणा गीतां एतां ब्रह्मनिष्ठां धारयन् श्रावयन् शृण्वन् द्वंद्वैः न एव अभिभूयते–जो शान्त होऊन भिक्षूनें गाइलेल्या या ब्रह्मनिष्ठेचें धारण करितो, स्वतः श्रवण करितो व दुसऱ्यांना ऐकवितो, तो सुख-दुःखादि द्वंद्वांनीं अभिभूत होत नाहीं. ६२.

कोट्यावधि साधनें आचरिलीं असतां जी शांति लाभत नाहीं, ती या भिक्षुगीतांचा अर्थ मनांत धरिला असतां साधकाला सहज लाभते. ६८ योगनिष्ठा आणि ब्रह्मज्ञान हेच या भिक्षुगीताचें निरूपण आहे. तें जो लक्षपूर्वक मनांत धरील त्याची शांति आंदण दिलेली दासी होते. ६९ या भिक्षुगीताचा अर्थ जो स्वस्थ चित्तानें मनांत वागवील, त्याला द्वंद्वाची पीडा केव्हांहि बाधणार नाहीं. कारण तो आत्मज्ञानानें शांत होईल. ९७० मग भिक्षुगीताचा अर्थ जाणल्यानें समाधान होईल, यांत आश्चर्य कसलें ! जो आदरानें त्याचें श्रवण करील, त्यालाहि द्वंद्व बाधत नाहीं. ७१ पतिव्रता स्त्री परगांवीं गेलेल्या पतीचें पत्र जशी आदरानें व उत्कंठेनें ऐकते, तसें एकाग्र चित्त करून हें भिक्षुगीत ऐकावें. ७२ घरांतून निघून गेलेल्या पुत्राचा कांहीं तपास लागून त्याच्या निघून जाण्याचें कारण कळलें, म्हणजे माता चडफडून विव्हळ होते; ७३ तिच्यापाशीं असलेल्या इतर नातलग स्त्रियांनाहि स्नेहानें कळवळा येतो; परंतु त्यांच्या अंतःकरणाची त्या मातेसारखी तळमळ होत नाहीं. ७४ त्याचप्रमाणें हें भिक्षुगीत ऐकत असतां ज्याचें मन द्रवतें, ज्याच्या सात्त्विकवृत्ति जागृत होतात, त्याच्या पुढें द्वंद्वाचें कांहीं चालत नाहीं. ७५ असो; आदरानें याचें श्रवण घडलें नाहीं, तरी याचें नित्य

द्वंद्वांसी जाण नाटोपे ॥ ७५ ॥ असो नव्हे सादरें श्रवण । तरी करितां याचें नित्य पठण । भिक्षुगीता-प्रतापेंकरून । द्वंद्वें जाण नातळती ॥ ७६ ॥ पडतां पंचाननाची घाणी । मदगजां होय महापळणी । तेवीं भिक्षुगीतापठणीं । होय भंगणी द्वंद्वांची ॥ ७७ ॥ निर्लोभ होऊनि मानसीं । बैसोनि साधुसज्जनांपाशीं जो निरूपी भिक्षुगीतेसी । द्वंद्वें त्यासी नातळती ॥ ७८ ॥ अर्थे पाठें श्रवण करितां । द्वंद्वें निवारी भिक्षुगीता । हें वर्म कळलेंसे श्रीकृष्णनाथा । तो सांगे हितार्था उद्धवा ॥ ७९ ॥ ज्या भिक्षुगीतेची फळश्रुती । स्वमुखें सांगताहे श्रीपती । त्या भिक्षूचें भाग्य वानूं किती । धन्य त्रिजगतीं तो एक ॥ ९८० ॥ विवेकवैराग्यसमरसीं । जो साहे अतिद्वंद्वांसी । तोचि पढियंता हृषीकेशीं । हें उद्धवासी दाविलें ॥ ८१ ॥ जगासी उद्धवाचा उपकार । गुह्य ज्ञान परात्पर । उघडूनि श्रीकृष्णें भांडार । भिक्षुगीतासार प्रकटिलें ॥ ८२ ॥ उद्धव न पुसता जैं शांती । तैं हें कां सांगता श्रीपती । कृष्णासी उद्धवाची प्रीती । त्यासी नाना उपपत्ती उपदेशी ॥ ८३ ॥ हेंचि जडजीवां उद्धरण । येणें उपायें तरती दीन । जग तारावया जगज्जीवन । उद्धवमिषें श्रीकृष्ण बोलिला ॥ ८४ ॥ श्रीकृष्ण बोलिला भिक्षुगीत । जें वेदशास्त्रार्थमथित । उपनिषदांचें सारभूत । वार्तिकांतर्गत रहस्य ॥ ८५ ॥ येणें आपणियां आपण । लागताहे निजात्मलग्न । हें ज्ञानाचेंही गुह्य ज्ञान । भक्तकृपें श्रीकृष्ण बोलिला ॥ ८६ ॥ येणें जीवाचें जीवत्व उडे । शिवाचें शिवत्वही बुडे । द्वंद्वाचें बाधकत्व मोडे । स्वानंदाचें उघडे भांडार ॥ ८७ ॥ वेदें मौन धरिलें जेथ । सशब्द शास्त्रें लाजलीं तेथ । ऐसें अतिरहस्य भिक्षुगीत । तें मी प्राकृत बोलिलों ॥ ८८ ॥ जेवीं जळीं बुडते पाषाण । श्रीरामें तारिले आपण । तेवीं मी जड मूढ

पठण करावें, म्हणजे या भिक्षुगीताच्या प्रभावानें द्वंद्वें त्याला स्पर्शहि करणार नाहींत. ७६ सिंहाचा वास (त्याच्या अंगाचा दर्प) येतांच मत्त हत्तीहि घाबरून पळत सुटतात, त्याप्रमाणें या भिक्षुगीताचें पठण केलें असतां अहंकारादि द्वंद्वें मावळून जातात. ७७ जो निर्लोभ मनानें साधु-संतांपाशीं बसून भिक्षुगीताचें निरूपण करितो, त्याला द्वंद्व स्पर्शहि करीत नाहीं. ७८ भिक्षुगीताचा अर्थ जाणला असतां, त्याचा पाठ केला असतां, त्याचें श्रवण केलें असतां द्वंद्वांचें निवारण होतें. हें त्यांतील वर्म श्रीकृष्णनाथाला कळलें होतें. तें त्यानें उद्धवाच्या हितासाठीं त्याला सांगितलें. ७९ ज्या भिक्षुगीताची फलश्रुति स्वतः श्रीकृष्ण आपल्या मुखानें सांगत आहे, त्या भिक्षूच्या भाग्याचें वर्णन किती करावें! सगळ्या त्रैलोक्यांत तोच काय तो एक धन्य धन्य होय. ९८० विवेक व वैराग्य अंगीं पूर्णपणें बाणलें असतां जो सुख-दुःखादि द्वंद्वें सहन करितो तोच श्रीहरीला अत्यंत आवडतो. भिक्षुगीताच्या द्वारां श्रीहरीनें उद्धवाला हेंच स्पष्ट दाखवून दिलें. ८१ त्यामुळें उद्धवाचे जगावर केवढे तरी उपकार झाले आहेत. त्याच्यासाठीं श्रीकृष्णानें आपल्या परात्पर गुह्य ज्ञानाचें भांडार उघडून हें भिक्षुगीतसार प्रकट केलें. ८२ उद्धवानें जर हा शांतीचा प्रश्नच केला नसता तर श्रीकृष्णानें ही कथा कशाला सांगितली असती! पण उद्धवावर श्रीकृष्णाचें अत्यंत प्रेम असल्यामुळें नाना प्रकारच्या युक्ति-प्रयुक्तींनें त्याला त्यानें उपदेश केला. ८३ जड जीवांना उद्धरून जाण्याचें हेंच साधन आहे. याच उपायानें दीनजन तरून जातात. सगळ्या जगाला तारण्यासाठीं जगज्जीवन श्रीकृष्णानें उद्धवाच्या निमित्तानें हें गूढ ज्ञान सांगितलें. ८४ वेद-शास्त्रार्थाचा मथितार्थ, उपनिषदांचें सार, वार्तिकांतील गूढ रहस्य, असें हें भिक्षुगीत श्रीकृष्णानें सांगितलें. ८५ हें जाणलें असतां आपोआपच आत्म्याशीं जीवाचें लग्न लागतें. (जीव-शिवाचें तादाम्य होतें) हें ज्ञानांतीलहि गुह्य ज्ञान भक्तावर कृपा करण्यासाठीं श्रीकृष्णानें सांगितलें. ८६ याच्यायोगें जीवाचें जीवत्व नाहींसें होतें, शिवाचा शिवपणा बुडून जातो द्वंद्वाची बाधकता मोडून जाते आणि आत्मानंदाचें भांडार उघडतें. ८७ ज्याविषयीं वेदानें मौन धरिलें, शब्दशास्त्रें लाजून बसलीं, तें हें अत्यंत गूढ भिक्षुगीत मीं सामान्य मनुष्यानें सांगितलें,

अज्ञान । बोलवीं ब्रह्मज्ञान जनार्दनकृपा ॥ ८९ ॥ अहल्या जे व्यभिचारिणी । ते लागतां श्रीरामचरणीं । तिचेनि नामें पापा धुणी । प्रातःस्मरणी पढविली ॥ ९९० ॥ तेवीं सद्गुरुकृपेची करणी । माझी प्राकृत जड मूढ वाणी । मानिजे साधुसज्ञानीं । तैशीं बोलणीं बोलविलीं ॥ ९१ ॥ सरस्वती ज्यासी बोळे । तो मुकाही वेदशास्त्र बोले । तैसें जनार्दनें आम्हां केलें । भिक्षुगीत बोलविलें प्राकृत ॥ ९२ ॥ राजमुद्रा चढे ज्याचे हातीं । त्यातें समस्त सन्मानिती । तेवीं माझी वाणी सरती । केली निश्चितीं जनार्दनें ॥ ९३ ॥ बाळकाची बोबडी वाणी । ऐकोनि संतोषे निजजननी । तेवीं माझी आरिख वाणी । संतसज्जनीं प्रियकर ॥ ९४ ॥ मी माझें उंच नीच बोलणें । हेंही माथां घ्यावें कोणें । मीपण नेऊनि जनार्दनें । ग्रंथकथनें कथवित ॥ ९५ ॥ आधींच हें श्रीभागवत । त्यामाजीं गूढ एकादशार्थ । त्याहीमाजीं भिक्षुगीत । अतिगुह्यार्थ निर्द्वंद्व ॥ ९६ ॥ त्या भिक्षुगीताची टीका । एकला कर्ता नव्हे एका । तें एकपण हिरोनि देखा । ग्रंथार्थलेखा जनार्दन वदवी ॥९७॥ तेथ एक ना अनेक। ऐसें जनार्दनें केलें देख । त्यावरी द्वंद्वसाम्यकवतिक । ग्रंथ सम्यक वाखाणवी ॥ ९८ ॥ एका जनार्दना शरण । जनार्दनू झाला एकपण । ऐसेनि एकत्वें जाण । केलें संपूर्ण भिक्षुगीत ॥ ९९ ॥ माझे निजगुरू-चाही गुरू । श्रीदत्त परमगुरू । तो भिक्षुगीतार्थें साचारू । योग्यां योगेश्वरू तुष्टला ॥ १००० ॥ तेणें तोखलेनि अद्भुतें । आदरें आश्वासूनि मातें । अभय देऊनि निजहस्तें । पूर्ण ग्रंथार्थें डुल्लतू ॥ १ ॥ एका जनार्दना शरण । श्रोतां व्हावें सावधान । पुढील अध्यायीं श्रीकृष्ण । प्रकृति-

---

८८ पाण्यामध्यें बुडणाऱ्या शिळा केवळ रामनामाच्या प्रभावानें जशा तारल्या, तसा मी जड, मूढ, अज्ञ असतां श्रीजनार्दनाच्या कृपाप्रभावानें मजकडून ब्रह्मज्ञान बोलविलें. ८९ व्यभिचारिणी अहल्या श्रीरामचरणाला शरण जातांच तिच्या नुसत्या नांवानें पातकांचा नाश होऊं शकला व तिचें नित्य प्रातःस्मरण जसें होऊं लागलें (अहल्या, तारा, सीता, द्रौपदी व मंदोदरी या पंचकन्यांचें नित्य स्मरण केल्यानें पापांचा नाश होतो, असें शास्त्रवचन आहे.) ९९० त्याप्रमाणें सद्गुरुकृपेच्या लीलेनें माझी जड, मूढ, अडाणी वाणी साधूसंतांना मान्य होईल, असें भाषण करूं लागली. ९१ श्रीसरस्वती ज्याच्यावर प्रसन्न होते, तो मुका असला तरी वेद-शास्त्र बोलूं लागतो. त्याप्रमाणेंच श्रीजनार्दनस्वामींनीं आम्हांवर प्रसन्न होऊन हें भिक्षुगीत प्राकृतांत बोलविलें. ९२ ज्याला राज्यधिकाराची मुद्रा प्राप्त होते, त्याचा सगळे लोक जसा सन्मान करितात, तशी जनार्दनस्वामींनीं माझी वाणी प्रसादयुक्त केली. ९३ आपल्या बाळाचे बोबडे बोल ऐकून आई-बापांस जसा संतोष होतो, तसे माझेहि हे वेडे-वाकडे शब्द संत-सज्जनांना गोड वाटतात. ९४ पण 'मी' असें बोलून कमी-जास्त बोलण्याचा दोष मीं आपल्या शिरावर तरी कशाला घ्यावा ! श्रीजनार्दनस्वामींनीं 'मीपणा' नेऊन हे ग्रंथकथानक बोलविलें. ९५ आधींच हें श्रीमद्भा-गवत, त्यांतील हा अकरावा स्कंध फार गूढ, त्यांतहि हें भिक्षुगीत निर्द्वंद्व करणाऱ्या अत्यंत गूढ अर्थानें भरलें आहे. ९६ त्या भिक्षुगीतावरील टीकेचा कर्ता एकटा एकनाथ नाहीं, तर त्याचा 'एकपणाहि' नाहींसा करून श्रीजनार्दनानें ग्रंथाच्या अर्थाचा लेख वदविला. ९७ त्यांत एकहि नाहीं व अनेकहि नाहीं. असें जनार्दनानें करून ठेविलें, पहा. ग्रंथाची उत्तमप्रकारें वाखाणणी करविली हें त्याहूनहि द्वंद्वसाम्याचें अधिक कौतुक आहे. ९८ एकनाथ जनार्दनाला शरण जातांच दोघांचें ऐक्य झालें व त्या एकरूपानेंच भिक्षुगीत संपूर्ण झालें. ९९ माझ्या गुरूचाहि गुरु, योग्यांतील श्रेष्ठ योगी परम गुरु असा जो दत्तात्रय तो भिक्षुगीतानें प्रसन्न झाला. १००० त्यानें मला आश्वासन देऊन, आपल्या हातानें अभय दिलें व हें निरूपण ऐकून तो आनंदानें डोलूं लागला. १ एकनाथ जनार्दनाला शरण आहे. श्रोत्यांनीं

पुरुषलक्षण सांगेल ॥ २ ॥ ते प्रकृतिपुरुषांची कथा । विवंचना हृदयीं धरितां । मी सुखदुःखद्वंद्वापरता । निजात्मता निजबोधू ॥ ३ ॥ संतसज्जनां साष्टांग नमन । श्रोतेजनांसी लोटांगण ॥ एका विनवी जनार्दन । अतिगोड निरूपण पुढें आहे ॥ १००४ ॥ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां भिक्षुगीतनिरूपणं नाम त्रयोविंशतितमोऽध्यायः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ २३ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे त्रयोविंशोऽध्यायः ॥ २३ ॥

आतां सावधान व्हावें. पुढल्या अध्यायांत श्रीकृष्ण प्रकृति-पुरुषांचें लक्षण सांगणार आहे. २ ती प्रकृति-पुरुषांची कथा मनांत दृढ ठसवितांच आत्मज्ञानामुळें मी सुखदुःखादि द्वंद्वरहित झालों. ३ संत-सज्जनांस साष्टांग नमस्कार करून, श्रोत्यांपुढें लोटांगण घालून एकनाथ-जनार्दन विनवीत आहे कीं, पुढील निरूपण अत्यंत रसाळ आहे, तें ऐका. १००४.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित
टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील
भिक्षुगीतनिरूपण नांवाचा तेविसावा अध्याय समाप्त झाला.